**मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय**
औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद
जा.क्र./मनपा/मुलेप/२०११/
दिनांक : / /२०११

प्रति,
**मा.सभापती,**
स्थायी समिती,
औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

विषय :- **सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबादचा लेखापरीक्षणाचा वार्षिक अहवाल.**

**महोदय,**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १०६ (३) अनुसार लेखापरीक्षण विभागाच्या कामकाज विषयक आणि हिशेब तपासणीबाबतचा सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षासाठीचा वार्षिक अहवाल या सोबत सादर करीत आहे.

१) अहवाल वर्षात लेखापरीक्षण विभागात प्रत्यक्ष लेखापरीक्षणासाठी एकूण मंजूर पदसंख्या ९ असून ०९ कर्मचारी कार्यरत होते. त्यातील ३ कर्मचारी निवडणूक व इतर कामासाठी कार्यरत होते.

२) सन २०१०-२०११ च्या सुरूवातीस लेखापरीक्षण विभागात कार्यरत असलेला कर्मचारी वर्ग, मंजूर पदसंख्या, विभागामार्फ़त करण्यात येत असलेले कामकाज इत्यादीबाबत आढावा घेतला. त्यामध्ये महानगरपालिका स्तरावरील लेखापरीक्षणाचे स्वरूप, व्याप्ती व कामकाज विचारात घेता लेखापरीक्षणासाठी कर्मचारी वर्ग अपुरा असल्याचे प्रकर्षाने जाणवले. काही कर्मचारी मालमत्ताकर व पाणीपट्टी वसूलीसाठी वॉर्ड कार्यालयामध्ये कित्येक महिन्यांपासून कार्यरत असल्याचे दिसून आले. तसेच काही लेखा परीक्षणातील जाणकार कर्मचा-यांच्या इतरत्र बदल्या केल्या होत्या त्यामुळे असे कर्मचारी पुनश्च विभागामध्ये कार्यरत होण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली. **एकूण मंजूर पदसंख्या पाहता व कामकाजाचे स्वरूप विचारात घेता आजही लेखापरीक्षण विभागाकडे कर्मचारी वर्ग अपुरा असल्याचे नमूद करण्यात येते.** याबद्दल प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे**.**

३) सन २००९-२०१० व सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेच्या विविध खात्यातील लेखापरीक्षण करण्यासाठी लेखा परीक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे चांगले सहकार्य मिळाले. सर्वानीच आपआपली लेखापरीक्षणाची कामे निष्ठा,प्रामाणिकपणा व चांगल्या पध्दतीने पार पाडली. महानगरपालिकेच्या कामाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असतांना तसेच रेकॉर्ड उपलब्ध होणेस अडचणी असतांना व जास्तीत जास्त **सखोलतेने लेखापरीक्षण करतांना लेखापरीक्षण विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या**

**सहकार्यामुळे लेखापरीक्षणाचे काम व्यवस्थीतपणे पार पाडले हे नमूद करणे अगत्याचे आहे.**

**४)** सन २००९-२०१० या आर्थिक वर्षातील महानगरपालिकेचे निव्वळ महसूली उत्पन्न हे रू.२५३.३८ कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू.१०.५६कोटी ) इतके असून खर्च रू.२४८.११ कोटी इतका आहे. त्याचप्रमाणे सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षातील महानगरपालिकचे निव्वळ महसूली उत्पन्न रू. २६८.७८ कोटी (सुरूवातीची शिल्लक रक्कम रू. ५.२७ कोटी ) इतके असून खर्च रू. २६४.४२ कोटी इतका झाल्याचे दिसून आले.

५) सन २००९-१० व सन २०१०-११ या दोन्ही आर्थिक वर्षात वेतन व भत्ते यावरील खर्च अनुक्रमे रू.८५.०७ कोटी व रू. १०४.४० कोटी इतका आहे. एकूण महसूली उत्पन्न विचारात घेता आस्थापना खर्चाची टक्केवारी ही अनुक्रमे ३६.४३% व ४०.५४% इतकी असल्याचे दिसून आले. **सन २००९-१० पासून सहाव्या वेतन आयोगानुसार आस्थापना खर्च वाढला आहे. या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेचे महसूली उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.**

**६)** लेखापरीक्षणाचे अनुषंगाने मा. सौ.अनिताताई घोडेले, महापौर व मा.सौ. विजयाताई रहाटकर, माजी महापौर, मा.श्री.राजु शिंदे, सभापती, स्थायी समिती व मा.श्री.साजेद बिल्डर, माजी सभापती,स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद व मा. डॉ.पुरूषोत्तम भापकर, आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद हे अडीअडचणी लक्षात घेवून अत्यंत आस्थापूर्वक मोलाचे मार्गदर्शक व सहकार्य करीत आहेत. त्यामुळे लेखापरीक्षण अधिक सुलभ परिणामकारक व प्रभावी होण्यास मदत झाली आहे. त्यासाठी लेखापरीक्षण विभाग त्यांचा सदैव ऋणी राहील.

मा.उपमहापौर, मा.सभागृहनेता, मा.विरोधी पक्षनेता, सर्व सन्माननीय स्थायी समिती सदस्य व सर्व सन्माननीय सदस्य महानगरपालिकेचे सर्व विभागप्रमुख/ शाखा प्रमुख व त्यांच्या चमूकडून जे मोलाचे सहकार्य मिळत आहे, त्याबद्दलही मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

**लेखापरीक्षणात आढळून आलेल्या गंभीर बाबी, अपहार व अनियमितता बाबतचे विशेष अहवाल वेळोवेळी मा.स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर केलेले आहेत. त्यानुसार विभाग प्रमुख व खातेप्रमुखांकडून आक्षेप परिच्छेदांचे पूर्तता होऊन कार्यवाहीसह अनुपालन होणे अपेक्षित आहे.**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या व्यापक हिताच्या अनुषंगाने लेखापरीक्षण अधिक प्रभावी व परिणामकारक होण्यासाठी भविष्यातही सर्वांचे सहकार्य लाभेल, अशी आशा व अपेक्षा व्यक्त करतो.

**आपला विश्वासू,**

(विलास जाधव)
**मुख्य लेखापरीक्षक**
**महानगरपालिका,औरंगाबाद.**

औरंगाबाद.
**दिनांक :**

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद.

**मुख्य लेखापरीक्षक**
महानगरपालिका,औरंगाबाद.

# प्रशासकीय विभाग
## जमा बाजू लेखापरीक्षण अहवाल
## सन २००३–२००४ ते सन २००७–२००८.

**जमा बाजूचे लेखापरीक्षण :**

सन २००३-२००४ ते सन २००६-२००७ या वर्षातील अभिलेख्यांचे थकित लेखा परीक्षण व सन २००७-२००८ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणा मध्ये जमा बाजूच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधीत सन २००३-०४ पासून सन २००६-०७ पर्यंतचे अभिलेखे प्रशासकीय विभागातून उपलब्ध करून दिले नाही.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रशासकीय विभागाचे सन २००३-०४ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे नियमित लेखापरीक्षणाबाबत यापूर्वीच प्रशासकीय विभागास कळविण्यात आले होते. तथापि आपले पत्र क्र.६६, दिनांक १५.१.२००९ नुसार आपण सन २००७-०८ व सन २००८-०९ या वर्षाचे काही प्रमाणात लेखे अभिलेखे लेखापरीक्षणास पाठविले आहे. तरी सन २००३-०४ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे संपूर्ण आवश्यक ते सर्व अभिलेखे लेखापरीक्षणास्तव तात्काळ उपलब्ध करून देण्याविषयी पुनश्च प्रशासकीय विभागास कळविण्यात आले असता अद्यापपर्यंत लेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

सन २००७-२००८ व सन २००८-२००९ या कालावधीचे अभिलेखे उपलब्ध करून दिले लेखापरीक्षणा दरम्यान खाली नमूद केल्यानुसार कॅश रजिस्टर व पावती पुस्तकांची पडताळणी करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकांबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जनरल पावती पुस्तक क्र. |
|---|---|
| १. | २५५६७ |
| २. | २६३४ |
| ३. | २७८९ |
| ४. | २९६० |

जनरल पावती पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टर मध्ये घेवून मनपा फ़ंडात जमा केल्याबाबत तपासणी करण्यात आली.

**परिच्छेद क्र.१ : Vedeo Shooting (सर्व्हिस टॅक्स आकारणी) प्रित्यर्थ रू.२९६९/– इतक्या अतिप्रदान रकमेबाबत.**

संदर्भ:- प्रमाणक क्र.३६७, दिनांक २९.४.२००६.

सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील प्रमाणक क्र.३६७ दिनांक २९.०४.२००६ तपासले असता असे निदर्शनास आले की, मे.गुरूकृपा फ़ोटो स्टुडिओ औरंगाबाद यांना Bill No. ३४१ दिनांक १८.०३.२००६ नुसार अतिक्रमण हटवितांना केलेल्या चित्रीकरणासाठी (Vedeo Shooting) प्रतिदिन रू.१३००/- ऐवजी रू.१५००/- या दराने १२ दिवसांसाठी रू.१७१९१ ऐवजी रू.२०१६०/- (१०.२% ऐवजी १२% सर्व्हीस टॅक्स आकारणीसह) अदा केल्यामुळे रू.२९६९/- इतक्या जादा रकमेची अदाई झाली आहे.

करिता, सदर रक्कम रू.२९६९/- ही संबंधिताकडून वसूल करून महापालिका फ़ंडात भरावी असे सूचित केले असता अद्यापपावेतो सदरील रकमेचा भरणा केल्याचेदिसून येत नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.२ : प्रशासकीय विभाग अंतर्गत स्टेज, वाढदिवस,फ़लक व जप्त साहित्याची रक्कम वसूल न करण्याबाबत. (रक्कम रू.२४००/-)**

उपरोक्त विषयान्वये प्रशासकीय विभागामार्फ़त औरंगाबाद महानगरपालिका शहर अंतर्गत लावण्यात येणाऱ्या जाहीरात, बॅनर्स लावणे करीता परवानगी देण्यात येते व त्यांची विविध आकारानुसार मनपाने ठरविलेल्या दरानुसार रक्कम वसूल करण्यात येते. शुल्काची रक्कम अर्जावर नमूद केली आहे परंतु वसूल झाल्याची दिसून येत नाही. तसेच प्रशासकीय विभागाने अतिक्रमण हटाव मोहिम राबवून त्यामध्ये काही साहित्य जप्त केले आहे त्यांची दंडात्मक रक्कम अर्जावर दर्शविली आहे. परंतु वसूल कशा आधारे केली याचा बोध होत नाही. त्याबाबतचा सविस्तर तक्ता सोबत जोडण्यात येत आहे.

करीता रक्कम रू.२४००/- वसूल करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित करण्यात आले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे. (सोबत विवरण तक्ता- अ जोडला आहे.)

**परिच्छेद क्र.३ :- महानगरपालिका औरंगाबाद शहर अंतर्गत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे ८×५ साईनच्या बोर्डची रक्कम रू.१४४००/- भरणा न केल्याबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रशासकीय विभागामार्फ़त औरंगाबाद महानगरपालिका शहर अंतर्गत लावण्यात येणाऱ्या जाहीरात ,बॅनर्स लावणे करीता परवानगी देण्यात येते व त्यांची विविध आकारानुसार मनपाने ठरविलेल्या दरानुसार रक्कम वसूल करण्यात येते. परंतु दिनांक ४.९.२००८ च्या अर्ज श्री. रमेश एल.गायकवाड यांचा असून त्यांनी महानगरपालिका औरंगाबाद शहर अंतर्गत अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेसाठी सुभेदारी गेस्ट हाऊस येथे साईज ८×५ चे बोर्ड लावण्यासाठी रितसर अर्ज देवून परवानगी मागितली आहे. त्यानुसार त्यांना प्रशासकीय अधिकारी यांनी परवानगी दिली आहे. त्यांना जाहीरात कर रक्कम रू.१४४००/-चा भरणा करण्याबाबत सूचित केले आहे परंतु रक्कम भरणा केल्याचे दिसत नाही.

रक्कम रू.१४४००/- चा भरणा संबंधिताने कोणत्या पावती आधारे केला आहे याचा खुलासा लेखापरीक्षण विभागास करावा असे विभागास सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.४ : प्रशासकीय विभाग अंतर्गत स्टेज, वाढदिवस,फ़लक व जप्त साहित्याची रक्कम वसूल न करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये प्रशासकीय विभागामार्फ़त औरंगाबाद महानगरपालिका शहर अंतर्गत लावण्यात येणाऱ्या जाहीरात, बॅनर्स लावणे करीता परवानगी देण्यात येते व त्यांची विविध आकारानुसार मनपाने ठरविलेल्या दरानुसार रक्कम वसूल करण्यात येते. या संबंधित काही स्टेज, फ़लक बाबत जावक रजिस्टरला नोंद दर्शविली आहे. परंतु त्यासंबंधीची रक्कम कधी वसूल केली आहे व कोणत्या पावती आधारे रकमेचा भरणा झाला आहे याची माहिती उपलब्ध करून देण्याविषयी विभागास सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन प्राप्त आहे. (सोबत विवरण तक्ता- ब जोडला आहे.)

**परिच्छेद क्र.५ : आर्थिक वर्ष २००७-०८ ते सन २००८-०९ मध्ये प्रशासकीय विभागाने घेतलेल्या अग्रीम रक्कम व त्यासंबंधी संचिका उपलब्ध करून देणे बाबत.**

संदर्भ:- १) जा.क्र./मनपा/मुलेप/६६,दिनांक १४.४.२००८.
२) जा.क्र./मनपा/मुलेप/७३/२००९, दिनांक १७.४.२००९.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये प्रशासकीय विभागास लेखापरीक्षणा दरम्यान विभागाने घेतलेली अग्रीम रक्कम व त्यासंबंधी संचिका उपलब्ध करून देण्याबाबत पत्र देवूनही अद्याप विभागाकडून संचिका प्राप्त झालेल्या नाहीत.

जावक रजिस्टर व कॅश रजिस्टरची तपासणी केली असता सदरील रजिस्टर हे सक्षम अधिकाऱ्याकडून प्रमाणित केले नसल्याचे व रजिस्टरला रितसर पेजींग केली नसल्याचे निदर्शनास आहे. सदरचे अभिलेखे हे विभागाचे महत्वाचे दस्ताऐवज असल्याने ते प्रमाणित असावेत असे नियम आहेत.

सदरील लेखे उपलब्ध करून देण्याविषयी विभागास सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

# जायकवाडी स्थापत्य
# लेखापरीक्षण अहवाल
# सन २००६-०७ ते सन २००९-१०

**<u>खर्च बाजू लेखापरीक्षण :</u>**

जायकवाडी स्थापत्य विभागाचे सन २००६-०७ ते सन २००८-०९ या वर्षातील अभिलेख्यांचे थकीत चाचणी लेखापरीक्षण व सन २००९-१० या वर्षाच्या नियमित चाचणी लेखापरीक्षणामध्ये खर्च बाजूच्या अभिलेख्यांची तपासणी करण्यात आली असून तपासणी कालावधीमध्ये जे आक्षेप आढळून आले ते खालील प्रमाणे आहे.

**परिच्छेद क्र.१: औरंगाबाद पाणीपुरवठा योजना फ़ारोळा जलशुध्दीकरण केंद्रासाठी वार्षिक क्लोरीनचा पुरवठा करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२१,६१,२५०/–)**

औरंगाबाद पाणी पुरवठा योजना फ़ारोळा जलशुध्दीकरण केंद्रासाठी वार्षिक क्लोरीनचा पुरवठा करण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,६१,२५०/- चे तयार करण्यात आले असून सन २००६-०७ वर्षातील रसायन सामुग्री खरेदी या लेखाशिर्षातंर्गत प्रस्तावित केली त्यास संचिकेतील परिशिष्ट एनएस-६ परिच्छेद क्र.२० नुसार मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली. तसेच स्थायी समिती विषय क्र.१२५ दि.१९.१०.२००६ नुसार अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. त्या प्रमाणे निविदा मागविले असता एकूण चार निविदा प्राप्त झाले, सर्वात कमी दराची निविदा मधुमय उद्योग,मुंबई यांची असून त्यास मा.आयुक्त यांची मंजूरी घेण्यात आली आहे. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/काअ/पा.पु./९७/०७, दिनांक ५.३.२००७ अन्वये मे.मधुमय उद्योग, मुंबई यांना पुरवठाकरण्याबाबत कार्यादेश देण्यात आले. परंतु करारनामा करतांना करार नाम्यावर कोणाला पुरवठा करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे याबाबतचा उल्लेख नाही व करारनाम्यावर गुत्तेदाराची स्वाक्षरी नाही.

२. पुरवठाधारकाला कार्यादेश देताना त्यावर किती मालाचा पुरवठा करावयाचा आहे त्याबाबतचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

३. आर्थिक वर्ष २००६-०७ मध्ये क्लोरिन गॅस खरेदी साठी रसायन सामुग्री खरेदी या शिर्षकाखाली रक्कम रू.१०,२६,८००/- एवढी रक्कम शिल्लक असल्याबाबत संचिकेतील परिशिष्ट क्र.एनएस-५ व परिच्छेद क्र.१५ अंतर्गत नमूद केले आहे व परि.क्र.१६ अन्वये मा.मु.ले.अ.यांनी टोनर खरेदीसाठी तरतूद नसल्याकारणाने सुधारित अर्थसंकल्पात सादर होताना विभागाने वाढीव तरतूदीकरीता प्रस्ताव सादर करावा असे नमूद केलेले असताना विभागाने त्या आर्थिक वर्षात रक्कम रू.२१,६१,२५०/- ला ठराव क्र.२७० अन्वये दिनांक २७.२.२००७ रोजी स्थायी समितीची मंजूरी घेतलेली आहे व याबाबतची नोंद प्रोव्हिजन रजिस्टरला रक्कम रू.१०,२६,८००/- एवढीच घेतलेली आहे. म्हणजेच

वाढीव तरतूदीसाठी विभागाने प्रस्ताव सादर केलेला होता काय ? याबाबत विभागाने सविस्तर खुलासा सादर करावा.

४. पुरवठाधारकाने मालाचे डिलिव्हरी चलनवर पुरवठा करतांना त्यावर आदेश क्र.व माल आल्याबाबत वाहनाचा (LR) दिसून आलेला नाही. तसेच कंपनीचे पॅकींग स्लिप व टॅक्स इनव्हॉइस सदर संचिकेत दिसून आलेली नाही.

५. मालाचा विमा काढलेला दिसून आलेला नाही. नियमानुसार १% विमा कपात करणे आवश्यक असतांना विमा कपात झालेले नाही.

६. पुरवठा धारकाने पुरवठा करतांना डिलिव्हरी चलनमध्ये मालाचे वर्णन करताना कंपनीतूनच DC वर सिलेन्डर नंबर नोंदवून वितरण करावयास पाहिजे होते. परंतु तसे केल्याचे दिसून येत नाही.

७. पुरवठा धारकाने मालाचा पुरवठा वितरण करतांना ज्या व्यक्तीस अथवा संस्थेस पुरवठा केला आहे त्यांची माल मिळाल्याबाबत पोच देतांना दिनांक व वेळ दर्शविणे आवश्यक असतांना वेळ व दिनांक दर्शविण्यात आलेली नाही.

८. चलन क्रमांक ४६६/०७, दिनांक २८.२.२००८ अन्वये ५.४ MT टोनर वाहन क्र.MH ०४ -८४५३ या वाहनाद्वारे प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे. व तद्वतच वाहन क्रमांक MH ०४ –८४५३ द्वारेच ५.४ MT टोनर प्राप्त झाल्याचे दर्शविले आहे. म्हणजेच एकाच वाहनाद्वारे उक्त दिनांकामध्ये मुंबई येथून माल आल्याचे दर्शविले आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

९. पुरवठा झालेल्या मालाचे नोंद मसा रजिस्टर व स्टॉक रजिस्टर (१०९) मध्ये घेतांना सहा महिने पुरवठा केलेल्या आर्थिक वर्षात व सहा महिने पुढील आर्थिक वर्षात घेतल्याची नोंद दाखविली आहे ही बाब आक्षेपार्ह आहे.

करिता, वरील मुद्यांबाबत खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.२: मोजमाप पुस्तिका क्रमांक ९५० उपलब्ध करून देणे बाबत.**

जायकवाडी स्थापत्य या विभागाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून त्यानुषंगाने मोजमाप पुस्तिका क्रमांक ९५० तात्काळ उपलब्ध करून देण्याविषयी सूचित केले असता सदरील पुस्तिका ही लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.३: माहेवार खर्चाचा तपशिल (लेखा विभाग) उपलब्ध करून देणे बाबत.**

जायकवाडी स्थापत्य विभागाचे सन २०१०-११ या वार्षिक कार्यक्रमानुसार सन २००६-०७ ते सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून त्यानुषंगाने उपरोक्त

अर्धसमासपत्र देवूनही व तोंडी कळवूनही अद्यापपर्यंत माहेवार खर्चाचा तपशिल (लेखा विभाग) उपलब्ध झालेला नाही.

करिता सदरील माहेवार खर्चाचा तपशिल उपलब्ध करून देण्यात यावे असे सूचित केले असता विभागाने सदरील तपशिल उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. करिता आक्षेप वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.४ : जायकवाडी स्थापत्य विभागात पुरवठा करण्यात आलेल्या क्लोरिन गॅस, तुरटी, ब्लिचिंग पावडरच{ टॅक्स इनव्हॉईस (Tax INVOICE) कंपनीचे मालपुरवठा पॅकींग स्लिप व (LR.) उपलब्ध करून देणे बाबत.**

जायकवाडी स्थापत्य विभागाचे सन २००६-०७ ते सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून उपरोक्त लेखे आवश्यक असल्याने तात्काळ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्याविषयी सूचित केले असता सदरचे लेखे हे लेखापरीक्षणा दरम्यान उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.५ : आपल्या विभागाअंतर्गत काम केलेल्या खंडणकाळाची वर्षनिहाय माहिती मिळणे बाबत.**

जायकवाडी स्थापत्य या विभागाचे सन २००६-०७ ते सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून विभागामार्फ़त वेळोवेळी जलवाहिनीचे काम केलेले असून सदरील काम हे खंडणकाळामध्ये झालेले आहे.

तरी विभागामार्फ़त खंडणकाळ कोणकोणत्या दिवशी घेण्यात आला त्याबाबतची वर्षनिहाय माहिती लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात यावी असे सूचित केले असता विभागाने सदरची माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. करिता आक्षेप वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.६ : जायकवाडी स्थापत्य विभागा अंतर्गत भांडार विभागातील स्टॉक रजिस्टर (साठा रजिस्टर) वितरण रजिस्टर १०९,११०,१११ व जुने सामान जमा केल्या बाबतचे रजिस्टर आणि Indian उपलब्ध करून देणे बाबत.**

जायकवाडी स्थापत्य विभागाचे सन २०१०-११ या वार्षिक कार्यक्रमानुसार सन २००६-०७ ते सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून त्यानुषंगाने विभागाअंतर्गत भांडार विभागाचे स्टॉक रजिस्टर (साठा रजिस्टर/) वितरण रजिस्टर १०९,११०,१११ व जुने सामान जमा केल्याबाबतचे रजिस्टर आणि Indian लेखापरीक्षण कामी तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे असे सूचित केले असता विभागाने सदरचे लेखे उपलब्ध न करून देता मसा रजिस्टर उपलब्ध करून देण्यात आले होते.

अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.७ : जायकवाडी स्थापत्य विभागाअंतर्गत सन २००७-०८ व सन २००८-०९ मध्ये फ़ारोळा येथे खरेदी केलेल्या तुरटी / PAC च्या संचिका लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देणे बाबत.**

जायकवाडी स्थापत्य या विभागाचे सन २००६-०७ ते सन २००९-२०१० चे चाचणी लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००७-०८ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षात खरेदी केलेल्या तुरटी / PAC च्या खालील संचिका उपलब्ध करून देणे बाबत.

१. सन २००७-०८ मध्ये फ़ारोळा जलशुध्दीकेंद्रासाठी तुरटी ग्रेड -१ चा पुरवठा करणे. (अंदाजपत्रक रक्कम रू.२१,००,०००/-)

२. सन २००८-०९ मध्ये फ़ारोळा जलशुध्दीकरण केंद्रासाठी तुरटी ग्रेड -१ ऐवजी PAC पावडरचा पुरवठा करणे. (अंदाजपत्रक रक्कम रूपये २३,३१,०००/-)

करिता, सदरील संचिका लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात यावे असे सूचित करण्यात आले असता सदरील संचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या नाहीत. अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.८ : दुरूस्ती करीता विविध व्यासाचे व्हॉल्व पुरविणे. (अ.प.रक्कम रू.१०,३५,६६०/-)**

जायकवाडी स्थापत्य विभागा अंतर्गत औरंगाबाद पाणी पुरवठा योजना देखभाल व दुरूस्ती करिता विविध व्यासाचे व्हॉल्व पुरविण्याचे अंदाजपत्रक रक्कम रूपये १०,३५,६६०/- चे तयार करण्यात आले असून त्यास मा.आयुक्त व मा.स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. सर्वात कमी दराची निविदा न्यू साधना इंजिनियरिंग वर्क्स चिकलठाणा, यांची असून त्यास मा.आयुक्त व मा.स्थायी समिती प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली. त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१) २०० एमएम चे ५ व्हॉल्व व १५० एमएम चे ७ व्हॉल्व खरेदी केले होते. सदरील व्हॉल्व कोणत्या जागी बसविण्यात आले याबाबतचा बोध होत नाही.

२. संचिकेतील परिच्छेद क्र.एनएस-१३ परिशिष्ट क्र.३७ वर दि.१२.२.२००९ ला खंडणकाळ होता काय ? याबाबत खुलासा करावा.

३. संचिकेतील परिशिष्ट क्र.एनएस-१२ वरील परिच्छेद क्र.३६ मध्ये व्हॉल्व बसविण्याकरीता मोठ्या खंडणकाळाची आवश्यकता असतांना सदरील काम हे दि.१३.२.२००९ रोजी एकाच दिवसांत पूर्ण केल्याचे संचिकेवरून दिसून येते.

४. सदरील पुरवठा केलेल्या साहित्याची नोंद एमएसए रजिस्टरवर केलेली असून सदरील रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

करिता, मुद्या क्र.१,२,३,४ बाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.९ : औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना जायकवाडी ते बीपीटी दरम्यान १२०० मि.मी. अशुध्द उद्धरणवाहिनी वर १२ मी.मी. चे बटर फ़्लाय व्हॉल्व पुरविणे बसविणे. (अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२,१३,१००/-)**

जायकवाडी स्थापत्य विभागाअंतर्गत जायकवाडी ते बीपीटी दरम्यान १२०० मी.मी. अशुध्द उद्धरण वाहिनी वर १२ मी.मी. चे बटर व्हॉल्व पुरविण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.१२,१३,१००/- चे तयार करण्यात आले त्याप्रमाणे निविदा काढल्या असता मे.एल.के.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ४१% जास्त दराची निविदा प्राप्त झाली व त्यास मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केलेली आहे व दि.२८.८.२००६ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती मार्फ़त प्रस्तावित कामास मंजूरी प्रदान करण्यात आली. यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. संचिकेतील परिच्छेद क्र.२ नुसार १२०० मी.मी.व्यासाचे बटरफ़्लाय व्हॉल्व नविन बदलणे अत्यंत आवश्यक असल्याची नोंद आहे. परंतु सदरील काम हे केव्हा पूर्ण केले याचा बोध होत नाही.

२. १२०० मी.मी. व्यासाचे व्हॉल्व पिंपळवाडी बंड व टाकळी फ़ाटा येथे जुने काढून नविन बसविणे बाबत असतांना सदरील व्हॉल्व ढोरकीन व जायकवाडी येथे भांडार गृहात पोहचविल्या बाबतचे पत्र संचिकेमध्ये आहे. परंतु त्याबाबतचा DC,.L.R, Tax INVICE व साठा रजिस्टरच्या नोंदी संचिकेमध्ये दिसून आलेल्या नाही.

३. सदरील व्हॉल्व हे पिंपळवाडी बंड व टाकळी फ़ाटा येथे बसविण्याबाबत परिच्छेद क्र.१ मध्ये उल्लेख असतांना सदरील व्हॉल्व परिच्छेद क्र.६० मध्ये ढोरकीन व पिंपळवाडी असे नमूद केलेले ठिकाण आहे.

४. संचिकेतील जा.क्र./मनपा/काअ/पापु/१०७५/२००६, दि.२०.१२.२००६ रोजीच्या पत्रात मुद्या क्र.४ नुसार रू.१०० मुंद्रांकावर मनपा सोबत करारनामा करून द्यावा असे असतांना संबंधिताने रू.२०/- च्या मुद्रांकावर करारनामा केलेला आहे.

५. संचिकेती परिच्छेद ६० अन्वये मा.आयुक्त यांनी दिलेल्या दिनांक १२.२.२००९ ते १४.२.२००९ या कालावधीत खंडणकाळास परवानगी दिलेली असतांना व्हॉल्व बसविण्यात आलेले नाही. परंतु त्याच परिच्छेदमध्ये मुंबई येथील यंत्रणामार्फ़त सदरील काम करून घेण्याबाबत नमूद केले आहे. तरी सदरील काम कोणत्या तारखेला करून देण्यात आला याचा उल्लेख नाही व कोणत्या एजन्सी मार्फ़त केल्याबाबतची नोंद सदरील संचिकेत नोंद नाही.

६. सदरील काम एल.के.कन्स्ट्रक्शन या एजन्सीला दिले असतांना दुसऱ्या एजन्सी मार्फ़त सदरील काम का करून घेण्यात आले व त्याचे देयक अदा करण्याबाबत संचिकेत कोठेच उल्लेख नाही.

७. संचिकेतील कार्यादेशामधील मुद्या क्र.३ मधील निविदे अंतर्गत प्रस्तावित बाबी मध्ये इतर उपांगे समाविष्ट असल्याने उर्वरीत १५% देयकाची रक्कम साहित्य वापरल्यानंतर व योग्य ती चाचणी झाल्यानंतर उपांगाची पुर्तता झाल्यानंतर अदा करण्यात येईल असे असतांना सदरील एजन्सीला राहिलेले १५% रक्कम का अदा करण्यात आली.

८. सदरील काम केल्याबाबतची मोजमाप पुस्तिका क्र.१३०९ लेखापरीक्षणास्तव उपलब्ध झालेली नाही.

करिता, मुद्या क्र.१ ते ८ बाबतचा खुलासा विभागाने लेखापरीक्षण विभागास सादर करावा. असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१०: जलशुध्दीकरण केंद्र येथे गाळणी गृहा करीता व्हॉल्व पुरविणे / बसविणे बाबत. अ.प.रक्कम रू.७,२९,६००/-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जलशुध्दीकरण केंद्र फ़ारोळा येथे १०० द.ल.ली.क्षमतेच्या जलशुध्दीकरण केंद्रावर एकूण १२ गाळणीगृह उपलब्ध असून प्रत्येक गाळणी गृहाच्या आऊटलेट व वॉश आऊटकरीता ६०० मि.व्यासाचे बटरफ़लाय व्हॉल बसविण्याबाबत निविदा काढण्यात आले असून तीन निविदा प्राप्त झाले असून श्री.अनिरूध्द काळे यांची अ.प.दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा प्राप्त झाली असून खर्च सन २००५-०६ लेखाशिर्ष पाणीपुरवठा देखभाल दुरूस्ती या अन्वये एकूण खर्च ७,२९,६००/-हा (spillover) २००६-०७ मध्ये करण्यात आला असून त्यामध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहे.

१) निविदा संचिकेमध्ये गुत्तेदाराचे कागदपत्रे दिसून आलेली नाही.

२) परिच्छेद क्रमांक २ व ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण व्यासाचे बटरफ़लाय व्हॉल्व बसविण्याबाबत उल्लेख आहे. परंतु देयक अदा करतांना एकूण ८ व्हॉल्व चे देयक रक्कम रू.७,२९,६००/- अदा करण्यात आले आहे. दरपत्रकात सुध्दा खाडाखोड करून ४ नग ऐवजी ८ नग केले आहे.

३) शासनाचे पत्र क्र.जीईएन१०९८/१३५७/प्र.क्र.१६६/९८ नवी मुंबई दिनांक १.२.१९८९ च्या पत्रानुसार शासनाने वेळोवेळी कळविल्यानुसार कंत्राटी कामाचा व कंत्राटी कामे पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा विमा कंपनीकडे काम सुरू करण्यापूर्वी करणे आवश्यक असतांना संबंधिताने दिनांक क३१.७.२००६ ते दिनांक ३०.८.२००६ रोजी विमा काढलेला आहे. म्हणजेच संबंधिताकडून १% प्रमाणे ७२९६/- रू.विमा रक्कम वसूल करण्यात यावी.

करीता मुद्या क्र.१,२,३ बाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

# कर आकारणी १ व २ विभाग
# लेखापरीक्षण अहवाल
# सन २००३-०४ ते सन २००८-०९

करआकारणी १ व २ विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण विभागांतर्गत सुनावणी संचिका , समरी रजिस्टर आणि नोंद रजिस्टर व इतर अनुषंगिक अभिलेख्यांची तपासणी करतांना मुल्य निर्धारण अधिकारी यांनी पत्र जा.क्र.मनपा/क.आ/११६/२००९, दिनांक १३.८.२००९ अन्वये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये व कर निर्धारक व संकलन यांचे दिनांक ८.७.२००९ रोजीच्या पत्रान्वये सदरील हॉल सिल करण्यात आलेला आहे.त्यामुळे लेखापरीक्षण करीता कर आकारणीचा अभिलेख उपलब्ध करून देणे शक्य नाही. अगोदर मिळालेल्या लेख्यानुसार लेखापरीक्षण करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**परिच्छेद क्र.१: कमी क्षेत्रफ़ळास कर आकारणी करणे बाबत.**
**श्री.सोनी लालचंद रतनलाल, कर आ.क्र ८१७, सन २००३–२००४, धावणी मोहल्ला,औ.बाद.**

उपरोक्त मालमत्ता धारकाच्या माहितीपत्रकाची पडताळणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, माहितीपत्रकातील मालमत्ताधारकाची एकूण ६ रूमचे एकूण क्षेत्रफ़ळ ८७.१६ इतके असून प्रत्यक्षात मालमत्ता कर करतांना ८३.२१ चौ.मी. दर्शवून कमी आकारणी करण्यात आली. म्हणजेच ३.९५ चौ.मी. क्षेत्रफ़ळाची कमी आकारणी करण्यात आली.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने समाधानकारक खुलासा सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्र.२: कमी क्षेत्रफ़ळास कर आकारणी करणे बाबत.**
**श्री.सर्जेराव सांडू भगत, कर आ.क्र.८७९,प्लॉट नं.६, आदित्य नगर हर्सूल, औरंगाबाद.**

मालमत्ता धारकाच्या माहितीपत्रकाची पडताळणी करतांना माहितीपत्रकात खाडाखोड दिसून आली. ही बाब संशयास्पद वाटते.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने समाधानकारक खुलासा सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्र.३: कमी क्षेत्रफ़ळास कर आकारणी करणे बाबत. श्री.संजय शेवतकर, सुखकर्ता अपार्टमेंट फ़्लॅट नं.८, नारळीबाग, औरंगाबाद.**

मालमत्ता धारकाच्या माहितीपत्रकाची पडताळणी करतांना असे निदर्शनास आले की, सदर मालमत्ताधारकाच्या चार रूम असून माहितीपत्रकात त्याचे एकूण क्षेत्रफ़ळ ३८.१५ दर्शविण्यात आले

असून मालमत्ता कर आकारणी करतांना ३५.९५ चौ.मी. वरच करण्यात आली म्हणजेच २.२० चौ.मी. क्षेत्रफ़ळ कमी दर्शविण्यात आले.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने समाधानकारक खुलासा सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्र.४: कमी क्षेत्रफ़ळास कर आकारणी करणे बाबत . सौ.कमलाबाई भरत कुंडलवाळ, कर आकारणी क्र.३३७ (२००३–२००४) प्लॉट नं.४७ व ४८/पी, शंभूनगर शहानूरवाडी औरंगाबाद.**

मालमत्ता धारकाच्या कर आकारणी संदर्भातील माहितीपत्रकाची तपासणी करतांना सदर मालमत्ता धारकाच्या स्वत: निवासी सहा खोल्या असून ज्याचे एकूण क्षेत्रफ़ळ ५०.६७ $M^{२}$ आहे. या मालमत्तेवर कर आकारणी करतांना ३७.४७ $M^{२}$ गृहीत धरून टॅक्स लावण्यात आला. पर्यायाने १३.२० $M^{२}$ क्षेत्रफ़ळास टॅक्स लावण्यात न आल्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने समाधानकारक खुलासा सादर केलेला आहे.

**परिच्छेद क्र.५: कमी क्षेत्रफ़ळास कर आकारणी करणे बाबत . मुमताज जहॉ खुर्रमअली हाश्मी, कर आकारणी क्र.७९० (२००३–२००४) घाटी जयभिमनगर, औरंगाबाद.**

मालमत्ता धारकाच्या कर आकारणी संदर्भातील माहिती पत्रकाची तपासणी करताना सदर मालमत्ता धारकाच्या निवासेत्तर २.१० ×३.९०= ८.१९च$^{२}$ क्षेत्रफ़ळाच्या २४ रूम व ४.४०×२.४०च$^{२}$ क्षेत्रफ़ळाची एक खोली अशा एकूण २५ खोल्यांचे एकूण क्षेत्रफ़ळ = २०७.१२च$^{२}$ होते परंतु कर आकारणी करतांना १८६.९६च$^{२}$ क्षेत्रफ़ळ गृहीत धरून सदरील मालमत्ता धारकाच्या २०.१६च$^{२}$ क्षेत्रफ़ळावर कर आकारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येते. तसेच माहितीपत्रकावर दिनांकामध्ये खाडाखोड दिसून येते व अर्जदाराच्या अर्जावर आवक क्रमांक व दिनांक नमूद केलेला आढळून येत नाही.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.६: कमी क्षेत्रफ़ळास कर आकारणी करणे बाबत . सौ.अंजली गुलाब पजई, कर आकारणी क्र.२७७,कालिंदी अपार्टमेंट – फ़्लॅट नं.१०१, दिशानगरी,मुस्लकाबाद,औरंगाबाद**

मालमत्ता धारकाच्या कर आकारणी संदर्भातील माहितीपत्रकाची तपासणी करतांना सदर मालमत्ता धारकाच्या निवासी चार खोल्या असून ज्याचे एकूण क्षेत्रफ़ळ ४६.५९च$^{२}$ या मालमत्तेवर

कर आकारणी करतांना ४३.२९च$^2$ गृहीत धरून टॅक्स लावण्यात आला. पर्यायाने ३.४७च$^2$ क्षेत्रफ़ळावर कर आकारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.७: कमी क्षेत्रफ़ळास कर आकारणी करणे बाबत . श्री.रविंद्र जोशी, कार आकारणी क्र.२७२(२००३–२००४) कालिंदी अपार्टमेंट – फ़्लॅट नं.सी –२०३, दिशानगरी , मुस्लकाबाद, औरंगाबाद**

मालमत्ता धारकाच्या कर आकारणी संदर्भातील माहितीपत्रकाची तपासणी करतांना सदर मालमत्ता धारकाच्या निवासी चार खोल्या असून ज्याचे एकूण क्षेत्रफ़ळ ४६.५९च$^2$ असून या मालमत्तेवर कर आकारणी करतांना ४३.२९च$^2$ गृहीत धरून टॅक्स वसूल करण्यात आला. पर्यायाने ३.४७च$^2$ क्षेत्रफ़ळावर कमी कर आकारणी करण्यात आली. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.८: मालमत्तेची कमी किंमत लावून कर आकारणी करणे बाबत. श्री.पांडे कृष्णा दिगंबर, श्री.पांडे सुनिल गोकुळ, श्री.पांडे दिगंबर , गोकुळ,कर आकारणी क्र.५५७, बायजीपुरा, औरंगाबाद.**

मालमत्ता धारकाच्या कर आकारणी संबंधी माहितीपत्रकांची पडताळणी केली असा सदरील मालमत्ताधारकाचा मोकळा एक प्लॉट (सहन जागा) ज्याची किंमत कर आकारणी संबंधी माहितीपत्रकात रू.३२१३६०/- गृहीत धरून त्या किंमतीवर रू.४०१७/- प्रतिवर्ष कर आकारणी दि.१.१२.२००३ ला करण्यात आली. परंतु लेखा परीक्षण करतांना शहर भू-मापन विभागाच्या एका कागदपत्रावर सदरील प्लॉटची किंमत रू.४,५०,०००/- अशी नमूद करण्यात आलेली आहे. म्हणजेच कर आकारणी माहितीपत्रकात चूकीची किंमत नमूद करण्यात आली असून त्यामुळे मनपाचे मागील ६ वर्षात अंदाजे रू.१६०८/- प्रतिवर्ष प्रमाणे असे एकूण ९६४८/- आर्थिक नुकसान होत असून याबाबत विभागाने लेखी खुलासा तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.९: कमी कर आकारणी करणे बाबत. श्री.टिकाराम लक्ष्मण परदेशी,**

कर आकारणी क्र. ५१८ (सन २००३-२००४)घर क्र.५-१-७९, नगर भूमापन क्र.१७०६४, उस्मानपुरा,औरंगाबाद.

मालमत्ता धारकाच्या कर आकारणी संदर्भातील माहिती पत्रकाची तपासणी करताना सदरील मालमत्ता धारकाच्या स्वत: निवासी सहा खोल्या ज्याचे एकूण क्षेत्रफ़ळ ६३.८६ च$^{2}$ आहे. तसेच दोन दुकाने (निवासेत्तर) ज्याचे क्षेत्रफ़ळ ११.८३ च$^{2}$ इतके आहे. परंतु निवासी खोल्यांवर कर आकारणी करताना निवासी खोल्यांचे एकूण क्षेत्रफ़ळ ५२.९८ च$^{2}$ गृहीत धरून १०.८८ क्षेत्रफ़ळावर कर आकारणी करण्यात आलेली नसून त्यामुळे मनपाचे प्रतिवर्ष २७०/- असे मागील सहा वर्षापासून एकूण रू.१६२०/- आर्थिक नुकसान झालेले आहे तथा होत आह{.

तरी याबाबतचा लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

# नगरसचिव विभाग
## लेखापरीक्षण अहवाल
## सन २००३-०४ ते सन २००८-०९

नगरसचिव विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण विभागांतर्गत विविध खर्चाच्या संचिका व अनुषंगिक अभिलेखे तपासणी करण्यात आले. तपासणीअंती निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबी खालील प्रमाणे आहेत.

**परिच्छेद क्र.१ : देयकामध्ये जास्तीची रक्कम अदा करणे बाबत. (रक्कम रू.८,६५०/-)**

नगरसचिव विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना असे निदर्शनास आले की, एकूण चार बिले रक्कम रू.३९,९५०/- चे अदाईसाठी सादर केली. त्यापैकी स्थायी समिती सभा दिनांक २२.४.२००८ बील क्र. २५८, दिनांक २८.४.२००८ रक्कम रू.९,६००/- अदा केले. सदरील बीलाची रक्कम रू. ९५०/- असतांना पुरवठा धारकाला रू.८,६५०/- ची जास्तीची रक्कम अदा करण्यात आली असे निदर्शनास आले.

याबाबत विभागाने लेखी खुलासा सादर करावा असे सूचित केले असता जनरल पावती पुस्तक क्र. ३५२०, पावती क्रमांक ३५१९९३, दिनांक १४.९.२००९ अन्वये महानगरपालिका मुख्य कार्यालयाच्या फंडात सदरील रकमेचा भरणा करण्यात आला आहे. भविष्यात अशा चूका होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

**परिच्छेद क्र. २: औरंगाबाद महानगरपालिका मा.पदाधिकारी व स. नगरसेवक यांना मानधनातून दिलेल्या आयडिया, व्होडाफोन मोबाईल देयकाची रक्कम अदा करतांना मानधनातून कमी भरणा केल्याबाबत रक्कम रू.१२,२१५/-**

उपरोक्त संचिकेमध्ये मोबाईल देयकाची रक्कम (आयडिया, व्होडाफोन) मानधनातून कपात करतांना देयकामध्ये रक्कम रू.१२,२१५/- कमी रक्कम कपात करण्यात आली आहे.

करिता उक्त रक्कम वसूल करून त्याबाबतचा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**मा.पदाधिकारी व स.नगरसेवक यांच्या आयडिया व व्होडाफोन मोबाईल देयकाचे विवरण.**

| अ. क्र. | दिनांक | देयकाची एकूण रक्कम | अदा केलेली रक्कम | फरक रक्कम | जा.क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २.४.०८ ते १.५.०८<br>१५.२.०८ ते २८.२.०८ | ४४,४६४/-<br>१८,९००/-<br>६३,३६४/- | ६१,४७६/- | १८,८८/- | जा.क्र.आस्था-२/१४८२/०८ दिनांक २२.५.२००८ |
| २ | २.५.०८ ते १.६.०८ | ४२,३८७/- | ४२,१०९/- | २७८/- | जा.क्र.आस्था-२/१६२५/०८ दिनांक २६.६.२००८ |
| ३ | २.६.०८ ते १.७.०८ | ४१,८०४/- | ४०,६१७/- | ११८७/- | जा.क्र.आस्था-२/१८५३/०८ दिनांक २३.७.२००८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | २.७.०८ ते १.८.०८ | ४२,५८५/- | ४०,४८९/- | २०९६/- | जा.क्र.आस्था-२/२०४८/०८ दिनांक २६.८.२००८ |
| ५ | २.८.०८ ते १.९.०८ | ४१,६५१/- | ३९,६६३/- | १९८८/- | जा.क्र.आस्था-२/२१२३/०८ दिनांक २२.९.२००८ |
| ६ | २.९.०८ ते १.१०.०८ | ४२,८९७/- | ४०,५५१/- | २३४६/- | जा.क्र.आस्था-२/२२५५/०८ दिनांक २४.१०.२००८ |
| ७ | २.१०.०८ ते १.११.०८ | ४८,०७०/- | ४७,०६५/- | १००५/- | जा.क्र.आस्था-२/२३९७/०८ दिनांक २१.११.२००८ |
| ८ | २.११.०८ ते १.१२.०८ | ४४,३७९/- | ४२,९५२/- | १४२७/- | जा.क्र.आस्था-२/२५१२/०८ दिनांक २६.१२.२००८ |

अद्यापपावेतो सदरील रक्कम मनपा फंडात जमा करण्यता आलेली नाही.

**परिच्छेद क्र.३: साहित्य संमेलनास उपस्थित मान्यवरांना महापौर अतिथी भत्त्यातून भोजन देणे बाबत. (रक्कम रूपये ४०,८००/-)**

साहित्य संमेलनात सहभागी झालेल्या मान्यवरांना दिनांक ११.१.२००४ रोजी जेवण देण्यात आल्याबद्दल मा.महापौरांनी प्रस्तावित केले असून हा खर्च अतिथी भत्त्यातून खर्च करण्यास परिच्छेद क्र. ४ अन्वये कार्योत्तर मंजूरीसाठी बिल क्र.३१९९ दिनांक ११.१.२००४ अन्वये सादर केले आहे.

परिच्छेद क्र.५ नुसार उपायुक्त (म), यांनी अंकित केल्यानुसार लेखाधिकारी यांनी अतिथी भत्ता मर्यादा बाबत तसेच प्रोव्हिजन रजिस्टर मध्ये खर्च व शिल्लक बाबी नमूद कराव्यात असे लेखाधिकारी यांना अंकित केले असतांना देखील सदर बाबी नमूद केलेल्या दिसून येत नाहीत. सदरील देयक रक्कम रू.४०,८००/- मा.महापौर यांना अदा करण्यात आले आहे.

याबाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा समाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.४: सभापती, महिला व बालकल्याण समिती यांच्या कोल्हापूर, नाशिक व मुंबई दौ-यासाठी अदा करण्यात आलेल्या अग्रिमाबाबत. (रक्कम रू.५०,०००/-)**

संचिकेतील टिप्पणी पृष्ठ क्र.२ परिच्छेद क्र.६ दिनांक ३०.८.२००८ नुसार लेखाधिकारी यांनी असे अंकित केले आहे की, सभापती, महिला व बालकल्याण समिती यांना कोल्हापूर, नाशिक व मुंबई दौ-यासाठी अग्रीम प्रमाणक क्र. १०८० दिनांक २९.५.२००७ अन्वये रक्कम रू.५०,०००/- अदा करण्यात आले होते ते आजपावेतो अग्रिम समायोजन झालेले नसल्याचे नमूद केले आहे.

याबाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता रक्कम रू. ५०,०००/- रकमेचे समायोजन केल्यानंतरच सदरील परिच्छेद वगळण्यात येईल.

## परिच्छेद क्र.५: आरोग्य सभापती वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती महानगरपालिका औरंगाबाद मुंबई दौऱ्यासाठी जाणे-येणे करिता अग्रिम रक्कम रू. १५०००/-

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये नगरसचिव या विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना उपलब्ध संचिकांमध्ये खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

संचिकेची टिप्पणी पृ.क्र.एनएस-४ मध्ये परि.क्र.९ वर मुंबई- पुणे महानगरपालिका येथील कामकाज विषय माहिती अवगत करण्यासाठी सात सदस्य दिनांक १४.१२.२००६ ते १५.१२.२००६ या दिवशी दौरा करण्यात आला. व्हाऊचर क्र.१०९४५ दि.२०.१२.२००६ नुसार रू.१५०००/- अग्रीम घेण्यात आले.

१. दौरा दिनांक १४.१२.२००६ व १५.१२.२००६ असा दोन दिवस असतांना एकूण सात सदस्यांना तीन दिवसाचा भत्ता अदा करण्यात आला म्हणजे २२५×७= १५७५/- म्हणजे १५७५/- जास्त अदा करण्यात आले.

२. दौऱ्यासाठी सोनाली ट्रॅव्हल्सची टाटा सुमो गाडी भाड्यावर घेण्यात आली. प्रतिकिलो मिटर ९.५० असे बिलामध्ये नमूद केले आहे. या कालावधी मध्ये प्रतिकिलो मिटर ६.०० रू.चा दर असतांना रू.९.५० अदा केले.

   सदर दौऱ्यासाठी रात्री थांबल्यामुळे ट्रॅव्हल एजन्सी यांना रू.६००/- अदा करण्यात आले. (Night Half) प्रित्यर्थ व पुन्हा वाहनचालक भत्ता (Driver Allowance) म्हणून रू.४५०/- अदा करण्यात आले आहे.

३. संचिका टिप्पणी पृ.क्र.एनएस-६ वर परि.क्र.१६ ते १९ वर अग्रीम रक्कम रू.१५०००/- समायोजन करण्यात आले असून जास्तीची रक्कम रू.१२७ सह रक्कम रू.१५१२७ चे समायोजन करण्यात आले.

४. संचिका मधील व्हाऊचर पाहणी केली असता एकूण रक्कम रू.१६१७७/- एवढ्या रकमेचे व्हाऊचर (Voucher) मंजूर करण्यात आले असून संबंधितास रक्कम रू.१०५०/- जास्त अदा केल्याचे दिसून येते.

विभागाने वरील चारही मुद्यांबाबतचे अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला वरील चारही मुद्यांबाबतचा खुलासा असमाधानकारक आहे.

# अभिलेख कक्ष

## लेखापरीक्षण अहवाल

## सन २००५–०६ ते सन २००८–०९

अभिलेख कक्ष या विभागाचे सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणांतर्गत तेथील विविध सत्यप्रती बाबतचे अर्ज जनरल पावती पुस्तक व कॅश रजिस्टरची तपासणी केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**परिच्छेद क्र.१: अभिलेख विभागामार्फ़त देण्यात येणाऱ्या विविध सत्यप्रत मिळणे बाबतचे अर्ज लेखा परीक्षणा करीता वर्षनिहाय उपलब्ध करून देणे बाबत.**

अभिलेख कक्ष या विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले असून , या कामी सत्यप्रत मागणी अर्ज वर्षनिहाय उपलब्ध करून देण्यात यावे असे सूचित केले असता विभागाने अद्यापपावेतो सदरचे अर्ज उपलब्ध करून दिले नाही.

**परिच्छेद क्र.२: अभिलेख विभागामार्फ़त नक्कल (सत्यप्रत) फ़ी वसूली बाबत.**

अभिलेखे विभागाचे सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाअंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | पावती क्र. व दिनांक | पावती वरील सत्यप्रत संख्या | वसूल रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीनिवास सुरडकर | ०६३५३२/६३६<br>१०.५.२००४ | ७ | १०/- | सत्यप्रत दिलेली फ़ी कमी वसूल केली |
| २ | आ.एफ़. टोटला | ०६३५३६/६३६<br>१२.५.२००४ | १० इतर | १०/- | सत्यप्रत दिलेली फ़ी कमी वसूल केली |
| ३ | सरफ़राज अली झैदी | ९६०९०/९६१<br>१०.११.२००४ | ९ | १०/- | सत्यप्रत दिलेली फ़ी कमी वसूल केली |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | मोहसीन खॉन | २०९८३८<br>११.१.२००७ | -- | ५/- | कॅश रजिस्टर मध्ये नोंद नाही. |
| ५ | अमरसिंग जगनसिंग ठाकूर | ३०३६६०<br>१४.११.२००८ | -- | १०/- | फ़ी कमी वसूल केली. |

२. संबंधित आर्थिक वर्षातील कॅश रजिस्टर व जनरल पावती पुस्तकाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की दैनंदिन वसूली रक्कम रोजच्या रोज मनपा फ़ंडामध्ये भरावयास पाहिजे परंतु संबंधिताने रोजच्या रोज भरणा न करता १५ ते २० दिवस उशिरा भरणा केल्याचे दिसून आले.

३. अभिलेख विभागात नागरिकांनी नक्कलाची सत्यप्रत मिळण्याकरीता दिलेले अर्ज वर्षनिहाय अर्धसमास देवूनही लेखापरीक्षण विभागात तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यात आले नाही. त्यामुळे तपासणी पूर्ण करता आली नाही.

४. अभिलेख विभागात सत्यप्रत फ़ी जनरल पावती द्वारे वसूल करण्यात येते त्या भांडार विभागातून प्राप्त झाल्याचे स्टॉक रजिस्टर वर्षनिहाय लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून दिले नाही.

वरील चारही मुद्यांबाबतचे अनुपालन लेखापरीक्षण विभागास सादर करावे असा सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

# अग्निशमन विभाग
# लेखापरीक्षण अहवाल
## सन २००५-०६ ते सन २००८-०९

सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील अग्निशमन विभागाकडील अभिलेख्यांची तपासणी करण्यात आली असून त्या अंतर्गत वसूली बाबत जनरल पावती पुस्तके, कॅश रजिस्टर, चालान इ. तपासण्यात आले आहेत. तसेच विभागाने निर्गमित केलेल्या ना -हरकत प्रमाणपत्रांच्या संचिकांची तपासणी करण्यात आली आहे. शिवाय विभागास प्राप्त झालेल्या फायर कॉलचे विवरण रजिस्टर त्याबाबत वसूलीची रक्कम, विविध प्रकारच्या थकबाकीच्या रकमा, आस्थापना विषयक बाबी तसेच अहवाल वर्षातील खर्चाच्या बाबी इत्यादीची तपासणी करण्यात आली असून तपासणी अंती खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

**परिच्छेद क्र.१: प्रोव्हिजन्स रजिस्टर व साठा रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण कार्यरत असतांना त्याकरीता प्रोव्हिजन रजिस्टर व साठा रजिस्टर (स्टॉक रजिस्टर) लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून द्यावे असे सूचित केले असता अद्यापपावेतो लेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत.

**परिच्छेद क्र.२: अग्निशमन विभागास मिळालेल्या फ़ायर कॉल, रेस्क्यू कॉल, बंदोबस्त कॉल, ॲम्बुलन्स चार्जेस व इतर कॉलचे वसूल न झालेल्या रकमेबाबत. रू.१६,४४,५३५/-**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते २००८-२००९ या वर्षाचे Unpaid रजिस्टरची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षात फ़ायर कॉल, रेस्क्यू कॉल, बंदोबस्त कॉल, ॲम्ब्युलन्स चार्जेस व इतर कॉल यांची व्यक्ती किंवा संस्था यांचेकडे रू.१६,४४,५३५/-एवढी रकमेची थकबाकी असून या थकित रकमेच्या वसूली बाबत विभागाने काय कार्यवाही केली ? किंवा उपाययोजना केल्या ? याबाबत विभागाने खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने खुलासा सादर केला असून उपरोक्त वसूली झाल्यानंतरच सदरील परिच्छेद वगळण्यात येईल. (**सोबत : थकबाकीदारांची यादी** )

**परिच्छेद क्र.३: फ़ोम लिक्वीड खरेदी रू.१२,२२,६५०/– बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करताना उपरोक्त विषयाची खरेदी संचिका तपासणी करताना असे निदर्शनास आले की विभागाने के.व्ही.केमीकल प्रा.लि.मुंबई या पुरवठाधारककाकडून रू.१२,२२,६५०/- ची फ़ोम लिक्वीड खरेदी करण्यात आली व ती विभागाला प्राप्त झाली परंतु संचिका तपासणी करताना सदरील आयातीत मालावर रू.४०९९/- एवढ्या किंमतीच्या मालावर रू.१६४/- जकात पावती क्र.६९४५२३, दिनांक ८.७.२००९ द्वारे वसूल करण्यात आली म्हणजेच रू.१२,१८५५१/- किंमतीचे केमीकल हे विनाजकात पुरवठा धारकाने पुरवठा केले की काय ? या बाबत बोध होत नाही. रू.१२,१८५५१/- वर ४% दाने रू.४८७४२/- जकात भरणा केल्याची पावती संचिकेत दिसून आलेली नाही.

तरी विभागाने याबाबत लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने खुलासा सादर केला असून सोबत जकातीच्या झेरॉक्स प्रती जोडल्या आहेत.

**परिच्छेद क्र.४: संत एकनाथ रंगमंदिर येथे अग्निशमन यंत्र बसविणे बाबत. रू.४७०००/–**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करताना उपरोक्त विषयाची खरेदी संचिका तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, विभागाने संत एकनाथ रंगमंदिर येथे अग्निशमन यंत्र बसविण्यासाठी मे.रूद्राणी फ़ायर सर्व्हीस, औरंगाबाद पुरवठाधारकास हे काम देण्यात आले त्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथे अग्निशमन यंत्र बसविण्यात आले. परंतु संचिकेची तपासणी करताना जुने यंत्र मनपाच्या भांडार विभागात जमा केले किंवा नाही याचा बोध होत नाही.

तरी विभागाने याबाबत समाधानकारक खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.५: वाहन क्र.एमएच–२०, बीबी ३३३३ (टाटा सफ़ारी) च्या लॉगबुक तपासणी बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण करताना अग्निशमन विभागाच्या ताफ़्यातील वाहन क्र. एमएच-२०, बीबी३३३३ (टाटा सफ़ारी) या वाहनाचे लॉगबुक तपासणी करताना खालील आक्षेपार्ह बाबी व अनियमितता दिसून आल्या.

१. माहे मार्च २००८ या पूर्ण महिन्यात वाहन १८९२ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन १२९ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली. तसेच पूर्ण महिन्यात

वाहनामध्ये २७० लिटर पेट्रोल भरल्याची नोंद घेण्यात आली परंतु प्रत्यक्षात २४२ लिटर पेट्रोल भरण्यात आले म्हणजेच २८ लिटर पेट्रोल जास्त भरल्याची नोंद घेण्यात आली.

२. माहे मे २००८ या पूर्ण महिन्यात वाहन ३७०३ कि.मी. चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन २४८३ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले.म्हणजेच वाहन ११०१ कि.मी. जास्त चालल्याचे नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली.
तसेच पूर्ण महिन्यात वाहनामध्ये ५३३ लिटर पेट्रोल भरल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहनात ४३६ लिटर पेट्रोल भरल्याचे निदर्शनास आले याचाच अर्थ ९८ लिटर पेट्रोल जास्त भरल्याची नोंद घेण्यात आली.

३ . माहे जून २००८ या पूर्ण महिन्यात वाहन १२२४ कि.मी. चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १८६५ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच वाहन ६६१ किलोमिटर कमी चालल्याची नोंद घेण्यात आली. तसेच पूर्ण महिन्यात वाहनामध्ये २०९ लिटर पेट्रोल भरल्याची नोंद लॉगबुक मध्ये करण्यात आली, प्रत्यक्षात ३०४ लिटर पेट्रोल वाहनात भरण्यात आल्याचे निदर्शनास आले याचाच अर्थ वाहनामध्ये ९५ लिटर कमी पेट्रोल भरण्यात आल्याची नोंद घेण्यात आली.

४. माहे जुलै २००८ या पूर्ण महिन्यात वाहन २८२९ कि.मी. चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ३०७४ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले याचाच अर्थ वाहन २४५ कि.मी. कमी चालल्याचे निदर्शनास आले.
तसेच पूर्ण महिन्यात वाहनामध्ये ३१८ लिटर पेट्रोल भरल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली प्रत्यक्षात वाहनामध्ये ३७७ लिटर पेट्रोल भरल्याचे निदर्शनास आले याचाच अर्थ वाहनामध्ये ५९ लिटर पेट्रोल कमी भरल्याचे निदर्शनास आले.
तरी याबाबत लेखी खुलासा तीन दिवसांत लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने अद्यापपावेतो खुलासा सादर केलेला नाही.

**परिच्छेद क्र.६: अग्निशमन वाहन क्र.एमसीए/२१२५ च्या लॉगबुक तपासणी बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण करताना अग्निशमन वाहन क्र.एमसीए-२१२५ या वाहनाची दिनांक १.४.२००५ ते सप्टेंबर २००८ या कालावधीतील लॉगबुकची तपासणी चाचणी स्वरूपात केली असता खालील आक्षेपार्ह बाबी व अनियमितता दिसून आली.

१. माहे जून २००५ मध्ये सदरील वाहन पूर्ण महिनाभर एकूण ६७ कि.मी. चालले अशी नोंद लॉगबुक मध्ये करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात ही गाडी एकूण १४१ कि.मी. चालल्याचे किलोमिटरच्या नोंदी वरून दिसून येते.

२. माहे सप्टेंबर २००५ च्या पूर्ण महिनाभर ही गाडी ६१ कि.मी चालली असल्याचे लॉगबुकच्या कि.मी.रिडींग वरून दिसून येते. दिनांक १.९.२००५ चे ७६७९३ व दिनांक २१.९.२००५ चे कि.मी. रिडींग ७६८५४ म्हणजे २२ कि.मी. जास्तीची नोंद दर्शविण्यात आली.

३. माहे मार्च -एप्रिल –२००६ या दोन महिन्यामध्ये सदरील वाहन ८९० कि.मी. चालले असल्याची नोंद लॉगबुकवर घेण्यात आली. परंतु लॉगबुकची तपासणी करताना १ मार्च रोजी गाडीचे रिडींग ७७१४७ होते व दिनांक २०.४.२००६ रोजी ७७९९९ असे रिडींग नोंदविण्यात आले. म्हणजेच ८५२ किमी झाले असता ८९० कि.मी. अशी नोंद घेऊन ३८ किमी जास्तीची नोंद घेण्यात आली.

४. माहे मे.२००६ मध्ये सदरील वाहन हे ४२४ कि.मी. चालले असल्याचे लॉगबुकवर दर्शविण्यात आले. परंतु लॉगबुकची तपासणी केली असता वाहन ४६२ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच ३८ कि.मी. कमी दर्शविण्यात आले.

५. माहे नोव्हेंबर २००६ मध्ये वाहन ४३८ कि.मी. चालल्याचे लॉगबुकात नोंद आहे. परंतु लॉगबुक तपासणी केली २९८ कि.मी. चालले असल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच १४० कि.मी. जास्त चालल्याचे दर्शविण्यात आले.

६. माहे डिसेंबर २००६ मध्ये वाहन ६४३ किमी चालल्याचे नमूद केले आहे. परंतु प्रत्यक्षात ७४० किमी चालल्याचे निदर्शनास येते. म्हणजेच ९७ किमी जास्त दर्शविल्याचे निदर्शनास आले.

७. माहे मार्च २००७ मध्ये वाहन ४७२ किमी लॉगबुकमध्ये चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात ४५२ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले. २० किमी जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

८. माहे नोव्हेंबर २००७ मध्ये वाहन लॉगबुक मध्ये ४५६ किमी चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन २८५ किमी चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच १७१ किमी जास्त चालल्याचे नोंद घेण्यात आली.

९. माहे डिसेंबर २००७ मध्ये वाहन १७२ कि.मी. चालल्याची लॉगबुक मध्ये नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात २३२ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच ६० किमी. वाहन कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

१०. माहे जानेवारी २००८ मध्ये वाहन ४४३ किमी चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ५५० किमी चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच १०७ किमी कमी चालविल्याची नोंद घेण्यात आली.

तरी वरील आक्षेपार्ह बाबींचा खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.७: वाहन क्र.एमएच–२०, एच३३३३(मारूती जिप्सी)च्या लॉगबुक तपासणी बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण करतांना अग्निशमन विभागाच्या ताफ़्यातील वाहन क्र. एमएच-२०,एच-३३३३ (मारूती जिप्सी) या वाहनाचे लॉगबुक तपासणी करताना खालील आक्षेपार्ह बाबी व अनियमितता दिसून आली.

१. माहे एप्रिल –२००५ या पूर्ण महिन्यात वाहन १३८९ किमी चालल्याचे लॉगबुक मध्ये नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १२५३ किमी चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच १३६ किमी वाहन जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

२. माहे मे-२००५ या पूर्ण महिन्यात वाहन २१५३ किमी चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली प्रत्यक्षात वाहन २२९५ किमी चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच १४२ किमी कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

३. माहे जुलै २००५ या पूर्ण महिन्यात वाहन १६५६ किमी चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १६१० किमी चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच ४६ किमी वाहन जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

४. माहे डिसेंबर २००५ या पूर्ण महिन्यात वाहन १३८६ किमी चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १२६० किमी चालल्याचे निदर्शनास आले.म्हणजेच १२६ किमी वाहन जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

५. माहे जानेवारी २००६ या पूर्ण महिन्यात वाहन ९८९ किमी चालल्याचे लॉगबुक मध्ये नोंद घेण्यात आली.प्रत्यक्षात वाहन १०५९ किमी चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच ७० किमी वाहन कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

६. माहे फ़ेब्रुवारी २००६ या पूर्ण महिन्यात वाहन ६१६ किमी चालल्याचे लॉगबुक मध्ये नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ६५५ चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच ३९ किमी वाहन कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

७. माहे मार्च-२००६ या पूर्ण महिन्यात वाहन १७८१ किमी चालल्याचे लॉगबुक मध्ये नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १४६६ किमी चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच ३१५ किमी वाहन जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

८. माहे मे -२००६ या पूर्ण महिन्यात वाहन १५६३ किमी चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १३२० किमी चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन २४३ किमी जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली. तसेच पूर्ण महिन्यात वाहनात १८१ लिटर पेट्रोल भरण्यात आले अशी नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली .तपासणी केली असता

१५५ लिटर पेट्रोल वाहनात भरण्यात आले म्हणजेच २६ लिटर पेट्रोल जास्त वापरल्याचे निदर्शनास येते.

तरी याबाबत खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.८: वाहन क्र.एमएच–२०, ए ५८०४ (फ़ायर टेंडर च्या लॉगबुक तपासणी बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण करतांना अग्निशमन विभागाच्या ताफ़्यातील वाहन क्र. एमएच-२०,ए-५८०४ (फ़ायर टेंडर) या वाहनाचे लॉगबुक तपासणी करताना खालील आक्षेपार्ह बाबी व अनियमितता दिसून आली.

१. माहे मे -२००८ या पूर्ण महिन्यात वाहन ९०० कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ८२७ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ७३ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

२. माहे जून –२००८ या पूर्ण महिन्यात वाहन ७७ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १५३ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ७६ कि.मी. कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

३. माहे सप्टेंबर २००८ या पूर्ण महिन्यात वाहन ३४७ किमी चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ३०२ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले.म्हणजेच वाहन ४५ किमी जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

४. माहे ऑक्टोबर २००८ या पूर्ण महिन्यात वाहन २८३ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ३२८ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ४५ कि.मी. कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

५. माहे एप्रिल –२००९ या पूर्ण महिन्यात वाहन ७११ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ६१४ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ९७ कि.मी.जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

तरी या बाबत लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.९: वाहन क्र.एमएच–०४, एच ८०२७ (फ़ायर टेंडर च्या लॉगबुक तपासणी बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण करतांना अग्निशमन विभागाच्या ताफ़्यातील वाहन क्र. एमएच-०४,एच-

८०२७ (फ़ायर टेंडर) या वाहनाचे लॉगबुक तपासणी करताना खालील आक्षेपार्ह बाबी व अनियमितता दिसून आली.

१. माहे एप्रिल –२००६ या पूर्ण महिन्यात वाहन ३५५ कि.मी. चालल्याची नोंद लॉगबुक मध्ये घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ३३४ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच २१ कि.मी.वाहन जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

२. माहे सप्टेंबर –२००६ या पूर्ण महिन्यात वाहन ६९० कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ६५२ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच ३८ कि.मी. वाहन जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

३. माहे जानेवारी २००७ या पूर्ण महिन्यात वाहन १५६ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ८३ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच वाहन ७३ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

४. माहे फ़ेब्रुवारी –२००७ या पूर्ण महिन्यात वाहन १६२ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन २३५ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच वाहन ७३ कि.मी. कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

५. माहे मार्च-२००७ या पूर्ण महिन्यात वाहन २७७ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ३५५ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ७८ कि.मी. कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

तरी याबाबत लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागात सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१०: वाहन क्र.एमएच–२०, ए ५३४७ (ॲम्बुलन्स) च्या लॉगबुक तपासणी बाबत. टेंडर च्या लॉगबुक तपासणी बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखा परीक्षण करताना अग्निशमन विभागाच्या ताफ़्यातील वाहन क्र. एमएच-२०, ए-५३४७ (ॲम्बुलन्स) या वाहनाचे लॉगबुक तपासणी करताना खालील आक्षेपार्ह बाबी व अनियमितता दिसून आली.

१. माहे जुलै -२००५ या पूर्ण महिन्यात वाहन ५५१किमी चालल्याची नोंद घेण्यात आली प्रत्यक्षात वाहन ४८५ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन क्६६ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

२. माहे ऑगस्ट २००५ या पूर्ण महिन्यात वाहन ६४० किमी चालल्याची नोंद घेण्यात आली प्रत्यक्षात वाहन ७०६ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ६६ कि.मी. कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

३. माहे जुलै-२००६ या पूर्ण महिन्यात वाहन ५८८ कि.मी चालल्याची नोंद घेण्यात आली प्रत्यक्षात वाहन ५३४ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ५४ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

४. माहे ऑगस्ट २००६ या पूर्ण महिन्यात वाहन ३३५ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ३७९ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ४४ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेंण्यात आली.

५. माहे ऑक्टोबर २००८ या पूर्ण महिन्यात वाहन २४२ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन १८५ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन ५७कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

६. माह`एप्रिल २००८ या महिन्यात वाहनामध्ये एकूण ६४ लिटर डिझेल भरण्यात आले असल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहनात ६९ लिटर डिझेल भरल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच वाहनात ५ लिटर डिझेल कमी भरल्याची नोंद घेण्यात आली.

उपरोक्त मुद्यांबाबतचा खुलासा सादर करण्याचे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.११: वाहन क्र.एमएच–०४, एच –७४ (ॲम्बुलन्स) च्या लॉगबुक तपासणी बाबत.**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे चाचणी लेखापरीक्षण करताना अग्निशमन विभागाच्या ताफ़्यातील वाहन क्र.एमएच-०४, एच-७४ (ॲम्बुलन्स) या वाहनाचे लॉगबुक तपासणी करताना खालील आक्षेपार्ह बाबी व अनियमितता दिसून आली.

१. माहे ऑक्टोबर –नोव्हेंबर २००६ या पूर्ण महिन्यात वाहन १३२५ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली.प्रत्यक्षात वाहन १०७३ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन २५२ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

२. माहे डिसेंबर –२००६ या पूर्ण महिन्यात वाहन १३७ कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ४२४ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले. म्हणजेच वाहन २८७ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

३. माहे जानेवारी –२००७ या पूर्ण महिन्यात वाहन ९८० कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. वाहन प्रत्यक्षात ९५२ कि.मी.चालल्याचे निदर्शनास आले म्हणजेच वाहन २८ कि.मी. जास्त चालल्याची नोंद घेण्यात आली.

माहे फ़ेब्रुवारी २००७ या पूर्ण महिन्यात वाहन ५०० कि.मी. चालल्याची नोंद घेण्यात आली. प्रत्यक्षात वाहन ५२८ कि.मी. चालल्याचे निदर्शनास आले.म्हणजेच वाहन २८ कि.मी. कमी चालल्याची नोंद घेण्यात आली.

उपरोक्त मुद्यांबाबतचा खुलासा सादर करण्याचे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१२: फ़ायर NOC वर विलंब दंड वसूल न केल्याबाबत. रक्कम रू.५६२५०/–**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना अंजली सिनेमा खडकेश्वर औरंगाबाद या सिनेमागृहाची NOC संचिका तपासणी करताना सदरील सिनेमागृहाचे NOC नुतनीकरण तीन वर्ष विलंबाने करण्यात आले NOC नुतनीकरण करताना प्रतिवर्ष नुतनीकरण फ़िस रू.२०००/- व विलंब दंड रू.१०००/- असे एकूण तीनवर्षाचे (दिनांक १८.१.२००४ ते दि.१८.१.२००७) रू.८५००/- वसूल करण्यात आले. परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ (अ)/३७६ (१) नुसार विलंबदंड रू.५००/- रू.प्रतिवर्ष + प्रति दिवसासाठी रू.५०/- दंड आकारण्यात यावा अशी सक्ती करण्यात आली असून त्यानुषंगाने मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी जा.क्र./ मनपा / अशाद/४४४/२०००,दि.२७.४.२००० नुसार शासकीय निर्णयाची अंमलबजावणी करावी असे आदेशित केले आहे.

तरी सुध्दा या प्रकरणात संबंधित सिनेमागृहाकडून प्रतिवर्ष रू.५००/- + ५०/- प्रतिदिन असे एकूण तीन वर्षाचे रू.५६२५०/- वसूल करावयास पाहिजे होते. परंतु या सिनेमा गृहाकडून रू.८५००/- वसूल करण्यात आले. दंड कमी करतांना कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.

तरी याबाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१३: फ़ायर NOC वर विलंब दंड वसूल न केल्याबाबत. रक्कम रू.५६२५०/–**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना गोल्डी सिनेमा,रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद या सिनेमागृहाची NOC संचिका तपासणी करताना सदरील सिनेमागृहाचे फ़ायर NOC नुतनीकरण तीन वर्ष विलंबाने करण्यात आले NOC नुतनीकरण करताना प्रतिवर्ष नुतनीकरण फ़िस रू.२०००/- व विलंब दंड रू.१०००/- असे एकूण तीन वर्षाचे (दिनांक १८.१०.२००६ ते दि.१८.१०.२००९) रू.१०५००/- वसूल करण्यात आले.

परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ (अ)/३७६ (१) नुसार विलंबदंड रू.५००/- रू.प्रतिवर्ष + प्रति दिवसासाठी रू.५०/- दंड आकारण्यात यावा अशी सक्ती करण्यात आली असून त्यानुषंगाने मा.आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी जा.क्र./

मनपा / अशाद/४४४/२०००,दि.२७.४.२००० नुसार शासकीय निर्णयाची अंमलबजावणी करावी असे आदेशित केले आहे.

तरी सुध्दा या प्रकरणात संबंधित सिनेमागृहाकडून प्रतिवर्ष रू.५००/- + ५०/- प्रतिदिन असे एकूण तीन वर्षाचे (एकूण १०९५ दिवस) रू.५६२५०/- वसूल करावयास पाहिजे होते. परंतु या सिनेमा गृहाकडून रू.१०५००/- वसूल करण्यात आले. दंड कमी करतांना कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.

तरी याबाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१४: फ़ायर NOC वर विलंब दंड वसूल न केल्याबाबत. रक्कम रू.३६५००/–**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना रॉक्सी सिनेमा,पैठणगेट, या सिनेमागृहाची NOC ची संचिका तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, सदरील सिनेमागृहाचे नुतनीकरण तीन वर्ष विलंबाने करण्यात आले. NOC नुतनीकरण करतांना प्रतिवर्ष नुतनीकरण फ़ीस रू.२०००/- व विलंब दंड रू.१०००/- असे एकूण तीन वर्षाचे (दि.२७.३.२००५ ते दि.२७.३.२००८) रू.९०००/- वसूल करण्यात आले. परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ (अ) ३७६ (१) नुसार विलंब दंड ५००/- प्रतिवर्ष + प्रतिदिवसासाठी रू.५०/- दंड आकारण्यात यावा अशी सक्ती करण्यात आली असून त्यानुषंगाने मा.आयुक्त, मनपा औरंगाबाद यांनी जा.क्र./मनपा/ अशाद/४४४ / २०००, दिनांक २७.४.२००० नुसार शासकीय निर्णयाची अंमलबजावणी करावी असे आदेशित केले आहे.

तरी सुध्दा या प्रकरणात संबंधित सिनेमागृहाकडून प्रतिवर्ष रू.५००/-+५०/- रू.प्रतिदिन असे एकूण तीन वर्षाचे (एकूण १०९५ दिवस) रू.५६२५०/-वसूल करावयास पाहिजे होते. परंतु या सिनेमागृहाकडून रू.९०००/- वसूल करण्यात आले. दंड कमी करतांना कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली नाही.

तरी याबाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.१५: फ़ायर NOC वर विलंब दंड वसूल न केल्याबाबत. रक्कम रू.३६५००/–**

अग्निशमन विभागाचे सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करतांना दि औरंगाबाद जिमखाना क्लब प्रा.लि. प्लॉट नं.पी-६०, विमानतळ रोड,औरंगाबाद या हॉटेलची फ़ायर नुतनीकरण तथा NOC ची संचिका तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, सदरील हॉटेलचे सन २००४-२००५ व सन २००५-२००६ या दोन वर्षाचे नुतनीकरण फ़िस प्रतिवर्ष २००० तथा विलंब दंड फ़िस रू.५००/- प्रति वर्ष असेएकूण ५०००/- वसूल करून फ़ायर NOC देण्यात आली. परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६ (अ) /३७६(१) नुसार विलंब दंड रू.५००+प्रति दिवसासाठी

रू.५०/- दंड आकारण्यात यावा असा स्पष्ट आदेश आहे. व त्याबाबत मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी जा.क्र./मनपा/अशाद/४४४/२०००, दिनांक २७.४.२००० या आदेशाने याची अंमलबजवणी करावी असे आदेश दिले असतांना सुध्दा सदरील प्रकरणात संबंधित हॉटेल कडून प्रतिदिन रू.५०/- दंड वसूल करण्यातआला नाही. तरी विभागाने दोन वर्षाचे एकूण रू.३६५००/- (प्रति दिन ५०/- प्रमाणे ७३० दिवसाचे ) संबंधित हॉटेल कडून वसूल करून याबाबत विभागाने खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

# विधी विभाग
# लेखापरीक्षण अहवाल.

**<u>खर्च बाजुचे लेखापरीक्षण :</u>**

विधी विभागाचे सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हे उपलब्ध अभिलेल्यांच्या आधारे करण्यात आले. लेखापरीक्षणा दरम्यान न्यायालयात मनपा विरूध्द दाखल झालेल्या दाव्याची फीसची संचिका व रजिस्टरवर केलेल्या नोंदी तपासणी् करण्यात आल्या. तपासणी दरम्यान खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**<u>परिच्छेद क्र.१ :</u> रिट क्र.२९५३/२००३ आर.एस.मोरवंचिकर वि.मनपा ह्या मुंबई हायकोर्ट प्रकरणी ॲड.मंडलिक यांना जाणे–येणेसाठी २०,०००/– रू.धनादेश मंजूर करणे बाबत.**

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये विधी विभागाचे लेखा परीक्षण करीत असता उपरोक्त विषयाची संचिकाची तपासणी करीत असतांना दावा क्र.२९५३/२००३ मुंबई उच्च न्यायालय दाव्या प्रत्यर्थ सादर बाबत ॲड. श्री.मंडलिक यांनी आर.एस.मोरवंचीकर विरूध्द मनपा दिनांक ९.७.२००७ व दिनांक १३.७.२००७ सुनावणीसाठी मुंबई येथे जावून येणेचा खर्च रू.२०,०००/- चा धनादेश अदा करणेसाठी संचिका मंजूरीसाठी सादर केली. याबाबत संचिकेतील परिच्छेद क्र.३ व ४ प्रमाणे मा.आयुक्त यांनी दिनांक ११.७.२००७ नुसार मंजूरी दिली आहे. त्यानुसार मा.उपआयुक्त यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी व्हाऊचर्स वरील प्रमाणे दोन सुनावणीचे मंजूरी नुसार २०,०००/- रू. अदा करण्यात आले. परंतु परि.क्र.५ वर अशी नोंद करून मा.आयुक्त यांची मंजूरीनुसार ॲड. मंडलिक यांना सुनावणी फ़ी चे व्हाऊचर्स स्वाक्षीस्तव सादर केले. दिनांक ११.७.२००७ ला त्यांना रू.१०,०००/- चे धनादेश क्र. ००२८८१ दिनांक १२.७.२००७ नुसार अदा केले आहे. या धनादेशाबाबत कोणतीही मंजूरी घेण्यात आली नसल्याचे दिसून येते.

तसेच या दोन्ही देयक अदा करण्यात आले त्या बाबतचे ॲड. मंडलिक यांचे कोणतेही पत्र (बिल) मनपास दिले नसल्याचे दिसून येते.

सदर संचिका तपासणी करीत असतांना दिनांक २९.६.२००६ रोजी रू.४१५००/- व्हाऊचर्स द्वारे अदा केल्याचे दिसून येते. परंतु ४१५००/- ची कोणतीही मंजूरी घेण्यात आली नसल्याचे दिसून येते.

य़ाबाबत विभागाने खुलासा सादर केलेला असून तो असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.२: श्री. सतिष बोरकर यांच्या २ प्रकरणातील विशेष वकील फी बाबत.**

विधी विभागाचे सन २००३ ते २००९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना वरील विषयांकीत संचिकांची तपासणी करीत असतांना त्यांनी शहर भूमापन क्र.१५१८/०४ दिवाणी दावा क्र. ७१/९४ व भूमापन क्र.१५१८१/०६ दिवाणी दावा क्र. १४१/९४ **या दोन** खुल्या जागेवरील अतिक्रमण हटविणेसाठी दावा करण्यात आला होता. सदरच्या प्रकरणामध्ये ॲड.बोरकर यांनी विशेष परिश्रम घेवून दोन्ही दाव्यांचे मनपाच्या बाजुस निकाल लागला म्हणून सदरच्या दोन्ही दाव्यांच्या प्रित्यर्थ ॲड. बोरकर यांनी रु. २०,०००/- विशेष फी द्यावी याकरिता विनंती केल्याचे दिसून येते. सदर प्रकरणामध्ये रु. २०,०००/- विशेष फी द्यावी यासाठी आपल्या विभागामार्फत संचिका लेखाधिकारी यांच्याकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आली असता संचिकेमधील पान क्र. १५ वर लेखाधिकारी यांनी याबाबत असा अभिप्राय दिला की, सदर प्रकरणात विशेष फी मंजुर करता येत नाही. कारण विशेष फी अदा करण्याबाबतची कोणतीही योजना (Policy)नाही असा शेरा लिहिला आहे.

तद्नंतर उक्त संचिका मा.उपायुक्त यांच्या मंजुरीस्तव पाठविण्यात येवून सदर प्रकरणात मा.आयुक्त यांची मंजुरी न घेता रु.५०००/- विशेष फी मंजूर केल्याचे दिसून येते. परंतु जा.क्र./मनपा/विधी/१४४/२००५ दि.२७/१/२००५ च्या आदेशान्वये मधील अट क्र.३ मध्ये विशिष्ट प्रकरणांमध्ये प्रकरणाचे स्वरुप व महत्व लक्षात घेवून विशेष फी मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचे राहतील असे असतांना संबंधिताला कोणत्या आधारे विशेष फी रक्कम रु. ५,०००/- अदा करण्यात आले याबाबतचा खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.३ : पुणे येथे उपसंचालक भूमि– अभिलेख येथे मनपा विरूध्द फ़िरोजखान बाबत दावा क्र. न.भू.क्र. व २९८१ व २९८७.**

विधी विभागाचे लेखा परीक्षण सुरू असून सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील उपरोक्त विषयाची संचिका तपासणी करीत असतांना असे निदर्शनास आले आहे की, सदरच्या प्रकरणामध्ये पुणे येथे सुनावणीसाठी उपस्थित राहणेसाठी ॲड.बी.वाय.वंझारे यांनी दिनांक २५.६.२००४ च्या पत्राद्वारे कळविले होते व सदर ठिकाणी जाणे-येणेसाठी रू.५०००/- ची मागणी केल्याचे दिसून येते. परंतु लेखापाल यांनी सदरच्या ५०००/- रू.खर्च जास्तीचा असल्याचा अभिप्राय दिला आहे. तद्नंतर विधीसल्लागार यांनी चर्चा करून ५०००/- रू. मंजूर करून दिनांक २३.७.२००४ रोजी अदा केल्याचे दिसून येते.

परंतु सदरच्या प्रकरणात पुणे येथे सुनावणी उपस्थित राहीले किंवा नाही या बाबतचा संचिकेत कोणताही उल्लेख नाही व ५०००/- रू. खर्चाचे समायोजन केल्याचे दिसून येत नाही.

**परिच्छेद क्र. ४ : विशेष फ़ी अदा करणे बाबत.**

विधी विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना खालील संचिका मध्ये मा.आयुक्तांची मंजूरी न घेताच वकिलांना विशेष फ़ी दिल्याचे दिसून येत आहे.

१. ॲड.डी.व्ही.सोमन यांना दि.दा. ९९/२००३ चंद्रकुमार विरूध्द मनपा दि.दा.क्र.९७/२००३ अनिल खंडाळकर वि.मनपा सदरच्या प्रकरणात ॲड.सोमन यांनी ३०,०००/- रू.विशेषची मागणी केल्याचे दिसून येत आहे. दिनांक १.२.९४ च्या आदेशान्वये दाव्यासाठी ५००/- रू व खर्च २५०/- रू. फ़ी ठरविण्यात आली असतानाही सदर दोन प्रकरणात १५०००/- रू. दिल्याचे दिसूनयेत आहे.

२. ॲड. मनिष नावंदर यांना प्रकरण एस.ए.१९५/८४ शेख मोहम्मद वि.मनपा सदर प्रकरणाचा निकाल मनपा कडून लागला म्हणून ॲड.मनिष नावंदन यांनी ११,०००/- विशेष फ़ीची बिल सादर करून मागणी केली होती त्या प्रकरणामध्ये मा.आयुक्त यांची मंजूरी न घेताच रू.५०००/- दिल्याचे दिसून येते.

य़ाबाबत विभागाने खुलासा सादर केलेला असून तो असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.५: ॲड.नरेंद्र कपाडिया यांचे दिनांक १८.११.२००४ चे वकिल फ़ी बाबत. रक्कम रू.१२५००/-**

उपरोक्त विषयाची संचिका तपासणी करीत असतांना असे निदर्शनास आले आहे की, ॲड. नरेंद्र कपाडिया यांनी सत्यम बायोटेक विरूध्द दावा दाखल करणेसाठी एकूण ३५०००/- ची मागणी केल्याचे दिसून येते त्यापैकी रू. १२५००/- ची.रक्कम त्वरीत देणेसाठी विनंती केली. संचिका सादर करून मा.उपआयुक्त यांची मंजूरी घेवून दिनांक २४.११.२००४ नुसार १२५००/- रू ची रक्कम अदा करण्यात आली. सदर संचिकेत दावा दाखल करणे बाबतचा कोणतेही कागदपत्रे व त्या दाव्याचा क्रमांकही दिसून येत नाही. व सदर दाव्याची नोंद कोणत्या नोंदवही वर घेण्यात आली याबाबतही काहीही उल्लेख दिसून येत नाही.

य़ाबाबत विभागाने खुलासा सादर केलेला असून सदरची रजिस्टर वरील नोंद तपासल्यानंतरच सदरचा आक्षेप वगळण्यता येईल.

**परिच्छेद क्र.६: ॲड.प्रविण मंडलिक यांचे बिलाबाबत.रक्कम रू.१५०००/-**

उपरोक्त विषयाची संचिकाची तपासणी करतांना असे निदर्शनास आले आहे की, ॲड.प्रविण मंडलिक यांनी सत्यम बायो फ़र्टिलायझर्स या आरबीट्रेशन प्रोसेसिंग प्रकरणात वकिलाच्या खर्चाच्या बिलाबाबत दिनांक १९.६.२००६ रोजी १५०००/- ची ची मागणी केली असल्याचे बिलावरून दिसून येते. सदरच्या बिल अदा करणेसाठी मा.उपआयुक्त यांची मंजूरी दिनांक १८.९.२००६ रोजी घेण्यात आली. परंतु मा.आयुक्त यांची मंजूरी न घेताच १५०००/- अदा केल्याचे दिसून येते. व

सदर प्रकरणामध्ये कोणताही दावा क्रमांक दिसून येत नाही. सदर दाव्याची नोंद कोणत्या रजिस्टर मध्ये घेण्यात आली याबाबतही कोणतीच माहिती संचिकेत दिसून येत नाही.

य़ाबाबत विभागाने खुलासा सादर केलेला असून सदरची रजिस्टर वरील नोंद तपासल्यानंतरच सदरचा आक्षेप वगळण्यता येईल.

**परिच्छेद क्र.७: ॲड.यु.एस.मालते यांच्या एकूण १८ कॅव्हेटच्या बिलाबाबत.**

विधी विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण सुरू असून सन २००४-०५ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असता वरील संचिकेतील नोंदी प्रमाणे दाव्याच्या रजि.क्र.९० ची तपासणी केली असता सदरच्या नोंदीमध्ये तफ़ावत दिसून येत आहे. या बाबत लेखापरीक्षण विभागास अद्यापपावेतो खुलासा सादर केलेला नाही. (सो्बत १८ कॅव्हेटच्या बिलाबाबतचे विवरण- अ)

**परिच्छेद क्र.८ : कोर्ट स्टॅम्प डयुटी भरणे बाबत.**

विधी विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना उक्त संचिकांची तपासणी करीत असतांना अशा बाबी निदर्शनास आल्या आहेत की, कोर्ट स्टॅम्प फ़ी अदा करतांना कोर्ट फ़ी जमा केल्याबाबतची प्रत अथवा ती कोर्ट स्टॅम्प फ़ी ही कोर्टात जमा झाली किंवा नाही याबाबत कोणतीही माहिती संचिकेत दिसून येत नाही. म्हणजेच वकिलांना पत्र देवून मागणी केली असता ती कोर्ट फ़ी स्टॅम्प ड्युटी योग्य आहे किंवा नाही याबाबत ही काहीही कोणतीही शहानिशा न करताच अदा केल्याचे दिसून येते. संचिका खालील प्रमाणे -

| अ.क्र. | ॲड.चे नांव | दिदा क्र. /वर्ष | स्टॅम्प ड्युटी रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | ॲड.गजेंद्र शिरसीकर | १२११/८८,<br>१७२/०१<br>९४/८१<br>१७४५/२००० | ६८२२ |
| २ | ॲड.डी.व्ही.सोमण | १२०३/२००१<br>१०१/०३ | ९०६५ |
| ३ | ॲड.डी.व्ही.सोमण | १११४/९९<br>१६५/२००२ | ५११५ |
| ४ | ॲड. डी.व्ही.सोमण | १२०९/२००० | १४७५ |
| ५ | ॲड.डी.व्ही.सोमण | **LAR**/६७/८१ | १६५५ |
| | | **एकूण रक्कम रू.** | **२४१३२/-** |

उपरोक्त स्टॅम्प ड्युटी रक्कम रू.२४१३२/- बाबत खुलासा लेखा परीरक्षण विभागास सादर केला असून खुलासा समाधानकारक नाही.

**परिच्छेद क्र.९ : ॲड.विजय शर्मा यांच्या मा.उच्च न्यायालयाच्या वकील फ़ी बाबत. रक्कम रू.४१५००/-**

उपरोक्त विषयाची संचिका लेखा परीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आहे आहे की, ॲड विजय शर्मा यांच्या मा.उच्च न्यायालय अंतर्गत १४ प्रकरणाची देयक दिनांक २५.१०.२००४ रोजी दाखल करून मागणी करण्यात आली.

१. संचिकेतील परि.क्र.१ वरून दिसून येते की,४ कॅव्हेटसाठी नियमानुसार ५००/- प्रमाणे २०००/- रू. अदा करण्यात आले.

२. सदरच्या एकूण दाव्यापैकी ५ दाव्याची वकिल फ़ी २२५००/- रू. अदा केले आहे असे दिसून येते परंतु दिनांक २७.१.२००५ च्या मा.आयुक्त यांचे आदेशाप्रमाणे मा.उच्च न्यायालयाची वकिल खर्चासाठी एकूण रू. ४०००/- प्रति दाव्यासाठी ठरविण्याची आली असतांना, ४ प्रकरणांमध्ये वकील फ़ी १६०००/- रू. झाले असतांना, प्रत्यक्षात २०,०००/- रू.घेण्यात आले असल्याचे बिलावरून दिसून येते. म्हणजेच ४०००/- अतिरिक्त दिल्याचे दिसून येते.

३. ॲड.विजय शर्मा यांच्या कडून प्रकरणात विधी सल्ला घेण्यात आल्याचे दिसून येते. परंतु याच प्रकरणात असे दिसून येते की, सदरच्या सल्ला घेण्यात येणाऱ्या सल्ल्याबाबतची फ़ी अदा करतांना कोणत्या निकषावर विधी सल्ल्याची फ़ी रक्कम अदा केली १७,०००/- अदा केले गेले याबाबत खुलासा व्हावा.

४. सोबत दिलेल्या तक्त्यावरून असे दिसून येईल की, संचिकेची तपासणी केली असता व त्याची पडताळणी दावा नोंद रजि.नं.९० ची पडताळणी केली असता संचिकेतील नोंद असलेल्या दाव्याची नोंद ही नमुना ९० मध्ये दिसून येत नाही. (सो्बत विवरण- ब)

उपरोक्त बाबत खुलासा लेखा परीरक्षण विभागास सादर केला असून खुलासा समाधानकारक नाही.

**परिच्छेद क्र.१० :ॲड.संजय पगारे यांच्या वकील फ़ीस बाबत रक्कम रू.७९,२५०/–**

विधी विभागाचे लेखा परीक्षण करीत असतांना ॲड.संजय पगारे यांचे दि.१५.१२.०७ च्या उपरोक्त संचिकेत तपासणी करीत असतांना दावा क्र.२१०८२/०७ अमोल कुलकर्णी /मनपा दाव्याच्या वकिल फ़ीस बाबत ची नोंद घेतांना दावा रजि.नोदं नं.९० वरील WP I २००७ वरील पान क्र.८९ वर नोंद घेतांना दि.१५.१२.२००७ रोजी वरील दाव्याबाबत २५००/- चे वकिल फ़ीस चे बिल देवून २५००/- रू.ची मागणी केल्याचेदिसून येते व त्याबाबत २५००/- रू.दिल्याची नोंद घेण्यात आली नाही. परंतु ५.५.२००८ रोजी २५००/- रू.दिल्याची नोंद घेवून सदर प्रकरण Pending असे नोंदीवरून दिसून येते. त्यामुळे दि.१५.१२.०७ च्या वकिल फ़िस मागणी बीलाप्रमाणे २५००/- असे एकूण Pending केस मध्ये ५०००/- रू.दिल्याचे तपासणीअंती दिसून येते. सदर प्रकरणाचा निकाल लागण्यापूर्वीच दाव्याची फ़ीस ५०००/- रू. दिले तथा दाव्याच्या फ़ीस ४०००/- रू.असतांना १०००/- जास्तीचे दिले.

सदरील संचिकेतील पान क्र.एनएस-२५ वर परि.क्र.२४ वर असे नमूद करण्यात आले आहे की, दि.१५.१२.०७ च्या वकिल फ़ीसबाबतची दाव्याच्या नोंद नं.९० ची तपासणी केली असून बरोबर आहे असे नमूद केले तर दि.१५.१२.०७ च्या फ़ीसची नोंद का घेण्यात आली नाही. म्हणजेच २५००/- रू.ची नोंद न घेताच वकिल फ़ीस अदा केल्याचे दिसून येते.

उक्त विषयाकित संचिका तपासणी करीत असतांना दाव्याच्या रजि.नं.९० ची तपासणी करीत असतांना दावा क्र.२०७४४/०७ व ७६७४/०६ या दोन दाव्याची वकिल फ़ीस ही दिनांक १५.१२.२००७ रोजी २५००/- व दिनांक २७.८.२००७ रोजी २५००/- रू असे ५०००/- रू.एका दाव्याची वकिल फ़ीस दिली. परंतु सदरची फ़ीस ४०००/- रू.असतांना दोन्ही दाव्यापोटी २०००/- जास्तीचे बिल अदा केल्याचे दिसून येते.

वरील प्रकरणी योग्य तो खुलासा लेखापरीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही.

**परिच्छेद क्र. ११ : ॲड.एस.एम.रझवी यांच्या वकिल फ़ीस बाबत.**

विधी विभागाचे लेखा परीक्षण करीत असतांना वरील विषयांकित संचिका तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

सन २००३-०४ मध्ये ६.१.२००३ व १६.१.२००३ अन्वये एकूण ९७ कॅव्हेट दाखल बाबत २००/क्र. प्रमाणे १९४००/- चे बिल ॲड.एस.एम.रझवी यांना अदा केल्याचे दिसून येते. संचिका तपासणी करीत असता संचिकेतील पान क्र.एनएस-२१ वर परि.५५ वर ९७ कॅव्हेट बाबत दावा नोंदणी रजि.नं.९० वर सदर ९७ कॅव्हेटच्या फ़िसची नोंद घेण्यात आली आहे असे नमूद करण्यात आले प्रत्यक्षात दाव्याच्या रजि.नं.९० शी पडताळणी केली असता सदरील ९७ कॅव्हेट बिल रक्कम रू.२००/- ची नोंद घेण्यात आली नाही असे दिसून आले व काही कॅव्हेटचे क्रमांक ही नमूद करण्यात आले नाही.

१. दिनांक ५.५.२००३ रोजी ॲड.रझवी यांनी वेगवेगळ्या ५९ दाव्यामध्ये वकिल फ़ीस रक्कम रू.१७४००/- मागणी केल्याचे दिसून येते. काही दाव्या प्रकरणात वकीली .फीस मागणी प्रमाणे २५०/- व ५००/- रू.मागणी बिल देण्यात आहे. परंतु सदरच्या नोंदी दाव्याच्या रजि.नं.९० मध्ये बिल अदा केल्या बाबतच्या नोंदी घेतांना रक्कम रू.७५०/- ची नोंद घेण्याऐवजी रूपये २५०/- ची नोंद घेण्यात आली. उर्वरीत ५००/- रू ची नोंद धेण्यात आली नसल्याचे दिसून येते. नोंद न घेतल्यामुळे परत ५००/- रू. प्रमाणे जास्तीचे अदा केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२. दिनांक ३१.१०.२००३ चे ॲड.एस.एम.रझवी यांचे बीलाचे अवलोकन केले असता ४१ प्रकरणात ११५००/- रक्कम ची वकील फ़ीसची मागणी केली असल्याचे संचिकेतील पान क्र.एनएस-२४ वर प्रस्तावित केले आहे. परंतु सदर बिलांची तपासणी केली असता २० प्रकरणात ६६००/- चे बील होत असतांना वकिलास ११९००/- रूपये दिल्याचे व्हाऊचर वरून दिसून येते.

म्हणजेच ११५००-६६००=४९००/- रू. जास्तीचे ॲड.रझवी यांना अदा केल्याचे दिसून येते.

3) ULP/२०/०५ एस.के.साळवे वि.मनपा व ULP/२५/०५ रविंद्र वि.मनपा या दोन्ही दाव्याची फ़िस बाबतची नोंद घेताना दाव्याच्या नोंदी रजि.९० वर वकील फ़ी नोंद घेण्यात आली नाही.

४) Comp 324/ 04 अवतार सिंग विरूध्द मनपा या प्रकरणामध्ये वकिल फ़ीस १५००/- रू. अदा केल्याचे संचिकेववरील व्हाऊचर्स वरून दिसून येते. परंतु सदरच्या १५००/- रू. अदा केलेल्या फ़ीसची नोंद दाव्याच्या रजि.नं.९० वर १५००/- रू.ची. नोंद घेण्यात आली नाही.

वरील चारही मुद्यांबाबतचा खुलासा लेखापरीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही.

**परिच्छेद क्र. १२ :लेखा परीक्षणास्तव एकूण दाव्याची वर्षनिहाय माहिती मिळणे बाबत.**

विधी विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण सुरू असून सदरच्या कामी अद्यापपावेतो सन २००२-०३ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षात मनपा विरूध्द विविध न्यायालयात किती दावे दाखल झाले व मनपा ने विविध न्यायालयात दाखल केलेले दाव्याची वर्षनिहाय माहिती उपलब्ध करून देण्यात यावी व सदरील दाव्यासाठी मनपा तर्फ़े नेमणूक करण्यात आलेल्या वकीलाची वर्षनिहाय यादी लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देण्यात यावी.

तरी उपरोक्त माहिती अद्यावत स्वरूपात लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून द्यावी असे पत्रान्वये कळविले असता अद्यापपावेतो माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.१३: ॲड.संजय पगारे यांच्या वकिल फ़ीस बाबत.**

विधी विभागाचे सन २००२-३ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, संजय पगारे यांच्या दिनांक ३०.५.२००७ व दिनांक १५.१२.०७ रोजीच्या वकिल फ़ीस बाबत देयकाची तपासणी केली. खालील तक्त्यावरून असे दिसून य़ेते की एकाच प्रकारच्या ९ प्रकरणा मध्ये २०००+२०००= ४००० प्रत्येकी फ़ीस अदा करण्यात आली असल्याचे दिसून येते. म्हणजेच ९ प्रकरणांत १८००० रू. जास्तीचे अदा केले.

ॲड. संजय पगारे यांना दिनांक ३०.५.२००७ रोजी अदा केलेल्या बिलाची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | दावा क्र. | नांव | स्थिती | रक्कम रू. रजि.पान क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | ULP | MCA | allowed | २००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ७/०७ | विनोद मगरे | 15.3.07 | १३/१-०७ |
| २ | ULP<br>८/०७ | MCA<br>भानुदास महानोर | allowed<br>15.3.07 | २०००<br>१४/१-०७ |
| ३ | ULP<br>९/०७ | MCA<br>मो.खालेद | allowed<br>15.3.07 | २०००<br>१५/१-०७ |
| ४ | ULP<br>१०/०७ | MCA<br>कलाबाई | allowed<br>15.3.07 | २०००<br>१६/१-०७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | ULP ११/०७ | MCA आसाराम | allowed 15.3.07 | २००० १७/१-०७ |
| ६ | ULP १२/०७ | MCA राजु आव्हाड | allowed 15.3.07 | २००० १८/१-०७ |
| ७ | ULP १३/०७ | MCA भाले | allowed 15.3.07 | २००० १९/१-०७ |
| ८ | ULP १४/०७ | MCA संतोष | allowed 15.3.07 | २००० २०/१-०७ |
| ९ | ULP १५/०७ | MCA सांडु | allowed 15.3.07 | २००० २१/१-०७ |

ॲड. संजय पगारे यांना दिनांक १५.१२.२००७ रोजी अदा केलेल्या बिलाची तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

| अ.क्र. | दावा क्र. | नांव | स्थिती | रक्कम रू. रजि.पान क्र. |
|---|---|---|---|---|
| १ | ULP ६/०७ | MCA विनोद मगरे | Dismiss 11.12.07 | २००० १/०७ |
| २ | ULP ७/०७ | MCA भानुदास महानोर | Dismiss 11.12.07 | २००० २/०७ |
| ३ | ULP ८/०७ | MCA मो.खालेद | Dismiss 11.12.07 | २००० ३/०७ |
| ४ | ULP ९/०७ | MCA कलाबाई | Dismiss 11.12.07 | २००० ४/०७ |
| ५ | ULP १०/०७ | MCA आसाराम | Dismiss 11.12.07 | २००० ५/०७ |
| ६ | ULP ११/०७ | MCA राजु आव्हाड | Dismiss 11.12.07 | २००० ६/०७ |
| ७ | ULP १२/०७ | MCA भाले | Dismiss 11.12.07 | २००० ७/०७ |
| ८ | ULP १३/०७ | MCA संतोष | Dismiss 11.12.07 | २००० ८/०७ |
| ९ | ULP १४/०७ | MCA सांडु खरात | Dismiss 11.12.07 | २००० ९/०७ |

उपरोक्त बाबत खुलासा लेखा परीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही.

**<u>परिच्छेद क्र.१४:</u> सर्व्हे नं.५२/१ आणि १९/ १ गारखेडा येथील मेहरनगर मधील रेखांकनातील महानगरपालिका मालकी खुल्या जागेबाबत मा.दिवाणी न्यायालयात दावा दाखल करणे साठी कोर्ट फ़ीस रक्कम रूपये १४५०००/-**

विधी विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असताना संचिका तपासणी मध्ये खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. ॲड.सतीश बोरकर यांचे पत्र दिनांक ३०.९.२००८ दिले त्यानुसार विभागाने संचिका टिप्पणी पृ.क्र.एनएस-१ परि.क्र.१-२ प्रमाणे मा.न्यायालयात दावा दाखल करण्यासाठी कोर्ट फ़ीस मंजूरीसाठी रक्कम रू.१,४५,०००/- ची मागणी केली. त्याप्रमाणे संचिका सादर केली. टिप्पणी पृ.क्र.एनएस-३ मधील परिच्छेद क्र.८-९ नुसार ॲड.सतीश बोरकर यांच्या नावाने कोर्ट फ़ी रक्कम रू.१,४५,००० – अ नुसार मान्य आयुक्त यांनी मान्यता दिली. परि.१०,११ प्रमाणे व्हाऊचर ॲड. सतिश बोरकर च्या नांवे मा.उपआयुक्त यांनी मंजूरीसाठी दिली. व्हाऊचर मध्ये श्री.ॲड. सतिश बोरकर यांच्या नावावर खाडाखोड करून श्रीमती अपर्णा थेटे (सेडमकर) विधीसल्लागार यांचे नांवे नोंद केली. व्हाऊचर क्र.८०१४ दि.२८.११.२००८ दिला.

२. सदरील दावा दाखल करण्यासाठी कोर्ट फ़ी रू.१,४५,०००/- ची पावती संचिका मध्ये लावण्यात आली त्यावर कोर्ट फ़ी स्टॅम्प१,४५,०००/- असे नोंदची पावती त्यावर दिनांक व कोणासाठी स्टॅम्प घेतला याची नोंद नाही. कोर्ट फ़ी स्टॅम्प कधी खरेदी केला याचा बोध होत नाही. उपरोक्त रक्कम ही नोव्हेंबर –२००८ मध्ये घेवून त्याचे समायोजन ५ महिन्यात करण्यात आले.

उपरोक्त दोन्ही मुद्यांबाबत विभागाने जा.क्र./मनपा/विधी/४३३/२०१०,दिनांक २६.४.२०१० रोजी खुलासा सादर केलेला असून तो खुलासा असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.१५: स्पे.सिव्हील सूट नं.३१२/२००० डॉ.रियाज बाखरी विरूध्द महानगरपालिका औरंगाबाद या प्रकरणात महानगरपालिका तर्फ़े अपील करणे बाबत.**

विधी विभागाचे सन २००३-०४ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून उपरोक्त विषयांकित संचिका तपासणी करीत असतांना असे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आले की –

१. श्री.रियाज बाखरी यांनी रंगारगल्ली येथील त्यांचा दवाखाना विना नोटीस पाडण्यात आल्यामुळे त्यांनी नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. सदरील प्रकरणी मा.न्यायालयाने रक्कम रू.८४०००/- १० % व्याजासह इतका नुकसान भरपाई वादीस देण्यात यावी असा निकाल दिलेला असल्याने प्रकरणात मनपातर्फ़े अपील दाखल करावयाचे करीता श्री.बी.वाय.वंजारे वकील यांना मा.दिवाणी न्यायालयाच्या दिनांक ३०.८.२००४ रोजीच्या निकाला विरूध्द मा.जिल्हा न्यायालयात अपील दाखल करून स्थगिती घेण्यात यावी या करीता श्री.बी.वाय.वंजारे विहित मुदतीत दि.२९.९.२००४ च्या पत्रान्वये वकील

पत्र व निकालाच्या प्रति पाठविण्यात आल्या तद्नंतर दि.२९.१.२००५ रोजी धनादेश क्र.३०८९८३ रक्कम रू.१५३५८/- पत्रान्वये पाठविण्यात आले. संचिका एनएस-३ मध्ये परि.क्र.७ नुसार दि.३०.१२.०८ उपरोक्त प्रकरणी कोर्ट फ़ीची रक्कम देवूनही श्री.बी.वाय.वंजारे यांनी न्यायालयात अपील दाखल केली नाही.

विभागाने २९.१.२००५ ते ३०.१२.२००८ पर्यंत या कालावधीत अपील दाखल न केल्यामुळे मनपाचे रक्कम रू.८९८२४/- चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

**२.** उपरोक्त प्रकरणामध्ये ॲड.वंजारे यांना सदर प्रकरण न्यायालयात दाखल करण्यासाठी १५३५८/- रू.वकील फ़ीस अदा करण्यात आली होती. परंतु त्या प्रकरणात त्यांनी अपील केले नाही त्यामुळे त्यांना देण्यात आलेल्या वकील फ़ीस रक्कम रू.१५३५८/- वसूल करण्यात आले किंवा नाही याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याबाबत खुलासा लेखा परीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही.

**<u>परिच्छेद क्र.१६:</u> ॲड.प्रविण मंडलिक यांच्या वकिल फ़ीस बाबत.**

विधी विभागाचे सन २००२-०३ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीखण करीत असतांना वरील विषयांकित संचिका तपासणी केली असता ॲड प्रविण मंडलिक यांच्या वकिल फ़ीस बाबतचे ०५-०५-०४ रोजीचे बिलाची दाव्याच्या नोंद रजि.९० ची पडताळणी केली असता.

१. ) दावा क्र.WP ११२२/०४ मिनाक्षी वि.मनपा प्रकरणा मध्ये विधी सल्लागार यांनी प्रमाणित केलेल्या बिलावर थझ ११२२/०४ आहे. सदरची दावा रजि.पान क्र.१७ वर नोंद तपासणी केली असता WP ११२२/०४ या दाव्याची नोंद आहे. प्रमाणित देयकावर सदर दाव्याची वकिल फ़ीस १५००/- रू. देण्यात आले. परंतु रजिस्टर १०००- रू. नोंद घेण्यात आली. ५००/- रू. कमीच नोंद घेण्यात आली.

२. दावा क्र. WP ३४१/०४ भास्कर वि.मनपा ची वकिल फ़ीसची नोंद घेतांना प्रमाणित केलेल्या बिलावर सदरची नोंद रजि.क्र.१ पान क्र.१८ वर नोंद घेण्यात आली असे दिसून येते. प्रत्यक्षात त्याची त्यावर नोंद घेण्यात येवून दिनांक ५.५.२००४ रोजी १५००/- रू. वकिल फ़ीस दिल्याचे दिसून येते. नोंद घेतांना १०००- रू.ची घेण्यात आली. ५०० रू. कमी ने नोंद घेण्यात आली. दिनांक ११.३.२००८ रोजी परत त्याच प्रकरणाच्या बाबत २५००/- रू चे वकिलास फ़ीस देण्यात आली. म्हणजेच त्या प्रकरणामध्ये १५००+२५०० = ४०००/- वकिली फ़िस देण्यात आली असे दिसून येते म्हणजेच २०००/- रू. जास्तीचे वकिल फ़ीस अदा करण्यात आली.

३. दावा क्र.४११/४ अहमदखान वि.मनपा या प्रकरणाची रजि नं.९० च्या पान क्र. ३६ वर नोंद घेण्यात आली अशी प्रमाणित केलेल्या वकिल फ़ीस बिलावर नोंद आहे. परंतु त्याची पडताळणी रजि. दावा नं.९० शी केली असता पान क्र.३६ वर दावा क्र. WP 1952/04 शेख मुनिर वि.मनपा या दाव्याची नोंद घेण्यात आली. त्यामुळे ४११/४ या दाव्याची नोंद बाबत बोध होत नाही.

विभागाने वरील तीनही मुद्यांबाबत खुलासा लेखापरीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही.

**परिच्छेद क्र. १७: मौजे भावसिंगपुरा सर्व्हे नं.४४ व ३५ मधील रस्त्यावरील अतिक्रमण हटविणे बाबत.**

विधी विभागाचे सन २००२-०३ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना उपरोक्त विषयाची संचिका तपासणी करीत असतांना असे निदर्शनास आले आहे की, सदरील प्लॉट वरून मनपाचा डी.पी. रोड जात असतांना उक्त जागा आपली असल्याचे खोटी कागदपत्रे दाखून डीपी रोड साठी बाधीत होणाऱ्या जागेचा मावेजा आपल्याला द्यावा करीता नारायण खंडागळे यांनी मनपा विरूध्द दावा क्र. Res –३१७-९३ दाखल केला होता तो दावा चालू असतांना मनपाच्या मालमत्ता अधिकारी यांनी डीपी रोडवरील अतिक्रमण पाडून टाकले त्या वेळेस त्या मालमत्तेला मा.न्यायालयाने जैसे थे चा आदेश दिला होता. परंतु त्या आदेशाचे उल्लंघन झाले म्हणून नारायण खंडागळे यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर न्यायालयात अवमान संचिका दाखल केली. परंतु सदरच्या प्रकरणामध्ये नारायण खंडागळे यांच्या कागदपत्राची कोणतीही खातरजमा न करताच ४३०००/- रू. मालमत्तेचा मावेजा दिला व तद्नंतर सदरची दाखल केलेली कागदपत्रे बोगस असल्याची माहिती झाल्यावर त्याच्या विरूध्द परत वसूलीसाठी दावा दाखल केला .त्यामुळे मनपाचे ४३०००/- रू चे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते व त्या प्रकरणाची आजची न्यायालयीन स्थिती काय आहे .

सदरच्या प्रकरणामध्ये ॲड. बी.वाय.वंझारे यांचे रक्कम रू.७०००/- या प्रकरणाबाबत चे मागणी करणारे पत्र संचिकेत दिसून येत नाही व कोर्ट स्टॅम्प फ़ीस बाबत ची पावती जोडण्यात आली आहे त्या पावतीवर कोणताही दिनांक दिसून येत नाही. सदरच्या कोर्ट स्टॅम्प फ़ी ७०००/- चे फ़ीचे जून २००८ घेण्यात येवून त्याचे समायोजन ६ महिन्यांनी नोव्हेंबर २००८ करण्यात आले.

वरील बाबत योग्य तो खुलासा लेखा परीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही.

**परिच्छेद क्र.१८: ॲड.एस.एन.पगारे यांचे नियमित वकिल फ़ीस बाबत.**

उपरोक्त विषयाची सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील ५.५.२००८ या रोजीचे बिलाचे रजि.नोंदवही पडताळणी करीत असताना दावा क्र.सीए/२८७४/७ WP/ १२५१/०७ या दाव्याचे दोन्ही क्रमांक पांडुरंग बोर्डे यांच्या नावाने १५००/- रजि.क्र.९० पान क्र.९५/०७ यांच्यावर रक्कम रू.२५००/- दिल्याचे दिसून येते. उक्त बिलावर क्र.९५/७ वर दावा क्र. WP/ १२५१/०७ श्री.कमरूद्दीन यांचे नावाने १५००/- रू. अदा करण्यात आले आहेत म्हणजे सदरच्या १५००/- रूची नोंद दिसून येत नाही.

दावा क्र. WP६७२२/०७ सदाशिव अप्पा दुधाने रजि.क्र.१००/०७ या पान क्र.२५००/- रू. अदा केल्याचे दिसून येते. परंतु सदरच्या दावा रजि. तपासणी केली असता सदरची नोंद दिसून येत नाही.सदरच्या २५००/- रू. नोंद घेण्यात आली किंवा नाही याचा बोध होत नाही. सदरच्या पान क्र.१०० वर गुलाबबाई खरात WP ५७३२/०७ या नावाची नोंद दिसून येते.

दावा क्र. FA/ २७१५/०६ मनपा विरूध्द सोधी सदर प्रकरणामध्ये ॲड. एस.एन.पगारे यांना दिनांक ५.५.२००८ रोजीचे वकिल फ़ीस अदा करतांना रजि. पान क्र.१६४ वर दिनांक ५.५.२००८ रोजी ४०००/- रू.अदा करण्यात आल्याची नोंद घेण्यात आली परंतु सदरच्या प्रकरणामध्ये त्याच बिलामध्ये दावा क्र.३१८०/०६ FA/ २७१५/०६ मध्ये पान १६४ वर ४०००/- दिले बाबत नोंद दिसून येत नाही म्हणजेच त्याच प्रकरणामध्ये दोन वेळेस वकिल फ़ीस ४०००/- दिल्याचे दिसून येते.

दावा क्र.२१०८२/०७ अमोल कुलकर्णी विरूध्द मनपा या प्रकरणामध्ये दिनांक १५.१२.२००७ रोजी २५००, ५.११.२००७ रोजी १६००/- व दिनांक ५.५.२००८ रोजी २५००/-असे एकाच प्रकरणामध्ये ॲड. संजय पगारे यांना ६६००/- रू. वकिल फ़ीस दिल्याचा उपरोक्त दिनांकाच्या बिलावरून दिसून येते.

उपरोक्त बाबत खुलासा लेखा परीरक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता खुलासा अद्यापपावेतो अप्राप्त आहे. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**<u>परिच्छेद क्र.१९ :</u> सेवानिवृत्त न्या.मुतालिक यांचे आरबी ट्रेशन ची फ़ी बाबत. रक्कम रू.३८२५००/-**

विधी विभागाचे सन २००२-०३ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण सुरू असून उपरोक्त विषयांकित संचिकांची तपासणी करीत असताना आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या त्या खालील प्रमाणे -

१. दिनांक २७.३.२००६ च्या पत्रामध्ये न्या.मुतालिक यांनी रक्कम रू.२५०००/- बिल देवून मागणी केली असता त्यांना २१.४.२००६ रोजी ३०,०००/- रू. अदा करण्यात आले म्हणजेच ५०००/- रू. जास्तीचे अदा करण्यात आले.

२. दिनांक ५.१२.२००६ च्या पत्रामध्ये न्या.मुतालिक यांनी रक्कम रू.५०,०००/+ २५००= ५२५०० ची मागणी केल्याचे दिसून येते मात्र सदरच्या पत्रामध्ये १० दिवसाची सुनावणी बाबत बिल दिले परंतु त्या १० दिवसाच्या दिनांकाचा काहीही उल्लेख दिसून येत नाही.

३. दिनांक २१.३.२००७ रक्कम रू.७०,०००/- चेक क्र.०३३३०१/३०.५.२००७ अन्वये अदा करण्यता आले आहे. २१.३.२००७ च्या न्या.मुतालिक यांच्या पत्रामध्ये १४ सुनावणीचा दिनांक आहे. त्यास दिनांक २५.४.०७ रोजीची मा.आयुक्त यांची मंजूरी आहे.

४. २१.३.०७ च्या पत्रानुसार परत न्या.मुतालिक यांना ८०,०००/- रू. मागणी केल्याचे व त्यानुसार संचिका पान क्र.एनएस-७ वर नमूद केले आहे की, १६ सुनावणीचे आरबी ट्रेशनची श्री.न्या.मुतालिक यांना अदा करण्यासाठी संचिका मंजूरीस्तव सीएओ कडे पाठवून रक्कम रू.८०,०००/- चेक क्र.०२५९० दिनांक २४.६.२००७ रोजी अदा करण्यता आहे त्यामुळे वरील मुद्दा क्र.३ वर दिल्याप्रमाणे सदरच्या सुनावणीच्या एकूण किती दिवस आहेत या बाबत निश्चित बोध होत नाही.

५. दिनांक १.११.२००७ रोजी मुतालिक यांनी पत्र देवून १,४४,०००/- रू.चे मागणी करणारे बील सादर केले असता त्या पत्रामध्ये सुनावणीच्या दिनांकाच्या व मुद्या क्र.३ व ४ मधील सुनावणीच्या दिनांकाचा ताळमेळ होत नाही त्यामुळे सदर प्रकरणामध्ये एकूण किती दिवस सुनावणी झाली तसेच त्या प्रकरणांत निश्चित किती फ़ी अदा करण्यात आली याची माहिती होत नाही.

६. आदेश क्र.मनपा/विधी/१४४/०५, दिनांक २७.१.२००५ नुसार विशिष्ट प्रकरणामध्ये स्वरूप व महत्व लक्षात घेवून विशेष फ़ी मंजूर करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांचे राहतील असे असतानाही मुद्या क्र.१,२,४,५ मध्ये दिलेली रकमाबाबत मा.आयुक्त यांची मंजूरी घेण्यात आली नाही.

वरील प्रकरणामध्ये दाव्याची किती वेळा सुनावणी झाली आहे याबाबत दैनिकात प्रसिध्द झालेल्या नोटिफिकेशनची नोंद संचिके मध्ये व दिलेल्या पत्रामध्ये नाही व सदरील प्रकरणाची आजची स्थिती काय ?

वरील एकूण पाच मुद्यांबाबत खुलासा लेखापरीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२०: B.D.A.L या कंपनीच्या न्यायालयीन कामकाजासाठी घेतलेल्या अग्रीम समायोजन रकमेच्या अनियमिततेबाबत.**

महानगरपालिका अंतर्गत विधी विभागाचे लेखापरीक्षण करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. बी.डी.ए.एल या कंपनीच्या प्रकरणामध्ये न्यायालयीन कामकाजासंबंधाने मा.सर्वोच्च न्यायालयात दिल्ली येथे जाण्यासाठी संबंधित विभागाकडून अग्रीम रक्कम रू.५०,०००/- विमानाने जाण्यासाठी ची मंजूरी घेण्यात आला. परंतु परि.क्र. ४१ ते ४५ च्या तपासणी अंती असे निदर्शनास आले की, विमान प्रवासाने येण्याकरीता व जाण्याकरीता अग्रिम ३८९००/- राहण्याची व जेवण्यासाठी १५,०००/- (तीन दिवसासाठी) टॅक्सी खर्च १५००/- अशी एकूण रक्कम रू.५६५४५/- खाडाखोड असून परि.क्र.४४ अन्वये दर्शविलेली दिसून येते. परंतु प्रत्यक्षात एकूण रक्कम रू.५५,४००/-एवढीच होते म्हणजेच यामध्ये रक्कम रू.११४५/- ची तफ़ावत आहे.

२. टी.ए.बिलाची तपासणी केली असता दिल्ली येथे राहण्या व जेवणाचे बील क्र.९०९ दिनांक ९.१०.२००८ ते ११.१०.२००८ ३ दिवसाचे दर्शविण्यात आले.

निवास खर्च १५००× ३= ४५००/-
जेवण खर्च ३ दिवसाचे = १२००/-
एकूण = ५७००/-

एकूण रक्कम रू.५७००/- असतांनाही बिलावर ७५००/- +७५००/-, १५०००/- च्या टी.ए.बिलावर नोंद घेण्यात आली. म्हणजेच १८००+१८००= ३६००/- जास्तीची नोंद घेण्यात आली. दोन्ही देयकामध्ये एकूण १५०००/- बोगस बिल जोडून ते बिल घेण्यात आले.

३. विधी सल्लागार व विधी विभाग लिपीक यांनी टॅक्सीचे भाडे एकूण १५००/- दिनांक ९.७.२००८ ते ११.७.२००८ असे संचिकेत त्याबाबतचे कच्चे बिल जोडण्यात आले आहे.

४. मा.उपायुक्त महसूल यांचे टी.ए. बिलाची तपासणी केली असता हॉटेल बिल ९०७ नमूद करण्यात आले आहे.त्याची रक्कम रू.७५००/- असून विमान खर्च व निवास खर्च एकूण २२,२००/- रू. अदा करण्यात आले.मात्र त्या बाबतचे हॉटेलचे बील संचिकेत दिसून येत नाही.

शासन निर्णय क्रमांक प्रवास १०९८/प्र.क्र.७४/९८ सेवा-५ मंत्रालय, मुंबई दिनांक ४ डिसेंबर १९९९ या शासनाच्या निर्णया प्रमाणे विमान प्रवास हा फ़क्त शासन सेवेतील वर्ग-१ च्या अधिकाऱ्याला व वेतनश्रेणी २२४००-५२५-२४५०० या व त्यापेक्षा जास्त वेतन घेणारेच अधिकारी विमानाने प्रवास करू शकतील असे उपरोक्त शासन जी.आर. मधील टिप्पणी क्र.३ नमूद करण्यात आले आहे.

१०,०००/- रू. पेक्षा कमी मासिक वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्याला विमान भाडे, प्रवास भत्ता अनुज्ञेय नाही असे उपरोक्त शासन निर्णय मधील टिप्पणी क्र.४ मध्ये नमूद करण्यात आले असतानाही १०,०००/- पेक्षा कमी मधील वेतन घेणाऱ्या कर्मचारी कनिष्ठ लिपीक यांनी सदरच्या प्रकरणामध्ये विमानाने प्रवास केल्याचे दिसून येते. तरी सदरच्या प्रकरणामध्ये विमानप्रवास भत्ता संबंधिताकडून वसूल करणे .

वरील ५ मुद्यांबाबत योग्य खुलासा लेखा परीक्षण विभागास अद्यापपावेतो सादर केलेला नाही. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२१: विशेष फ़ीची नोंद घेणे बाबत.**

विधी विभागाचे सन २००२-०३ ते २००८-०९या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना विधी विभागातील वकिलाच्या काही दाव्याच्या बाबत मा.आयुक्तांच्या मंजूरीने काही प्रकरणामध्ये वकिलांनी दाव्याचे महत्व लक्षात घेता विशेष फ़ी रक्कम रू.१०,०००/-, २५,०००/- व ५०,०००/-मागणी केल्याचे दिसून येते. परंतु सदरच्या दाव्याच्या विशेष फ़ी दिल्याबाबतची कोणतीही नोंद रजि.नं.९० मध्ये घेण्यात येत नाही असे निदर्शनास येते. कारण विधी विभागा मार्फ़त वकिलांना दिल्या जाणाऱ्या वकिल फ़ीस रक्कम रू.२०००/-, ३०००/-, ४०००/- ची नोंद दाव्याचे रजि. नं.९० मध्ये घेण्यात येते. परंतु विशेष फ़ी अदा केल्याची नोंद घेण्यात येत नाही ही बाब आक्षेपार्ह असून सदरच्या बाबत योग्य तो

खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर केलेला असून तो असमाधानकारक आहे. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२२ : न्यायालयीन दाव्याच्या वकिल फ़ीस अदाई करतांना नोंद न घेणे बाबत.**

विधी विभागाचे सन २००२-३ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले आहे की, विधी विभागात मनपा तर्फे दाखल करण्यात आलेले दावे व मनपा वर दाखल करण्यात आलेले दावे या सर्व दाव्याच्या बाजू न्यायालयात मांडण्यासाठी मनपा कडून पॅनल वरील वकिलाची नेमणूक करण्यात येते व सदरच्या दाव्याबाबतची नोंद ही दाव्याचे रजि. नं.९० वर नोंद घेण्यात येते. परंतु वकिलाच्या फ़ीस अदाई संचिकांची दाव्याच्या रजि.९० शी पडताळणी केली असता असे निदर्शनास आले आहे की, वकिल फ़ीस अदाई धनादेशाद्वारे करण्यात आली आहे. सदर अदाई केलेल्या रकमाची नोंद दावा रजि.नं.९० मध्ये घेणे आवश्यक होते. परंतु सदरच्या रकमाच्या नोंदी घेण्यात येत नसल्याचे रजि.नं.९० च्या तपासणी वरून दिसून येते. ही बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे. कारण वकिल फ़ीस अदाईची नोंद घेणे आवश्यक असून सदरील लेखे विभाग प्रमुखाची स्वाक्षरी होवून अद्ययावत करून घ्यावे. नसता एकाच प्रकरणात दोन ते तिन वेळेस फ़ी अदाई घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी उर्वरीत वकिल फ़ीस च्या नोंदी तात्काळ घेवून नोंदी न घेतल्या बाबतचा खुलासा या विभागास द्यावा असे पत्रान्वये कळविले असता विधी विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२३ : भारती टेली व्हेचर मधील प्रकरणी ॲड. सोमण यांच्या बिलांबाबत.**

विधी विभागाचे सन २००२-०३ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करीत असतांना उपरोक्त विषयांकित संचिका तपासणी केली असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

१. महानगरपालिका विधी विभागातील शासन निर्णय क्र.प्रवास / १०९८/प्रक्र.७४/९८ सेवा-५ मंत्रालय, दि. ४.१२.१९९९ अनुसार विमान प्रवास भाडे अदा करण्याबाबत फ़क्त वर्ग-१ च्या अधिकाऱ्यातच विमान प्रवास करण्याची मुभा आहे. मनपा पॅनल वरील वकिलांना शासन निर्णयानुसार मनपाच्या फ़ंडातून विमान प्रवास करता येत नाही. करिता सदर बाब आक्षेपार्ह आहे.

२. उपरोक्त संचिका तपासणी केली असता ॲड.डी.व्ही.सोमण हे वरील प्रकरणाच्या सुनावणीसाठी मुंबई येथे विमानाने गेल्याचे त्यांच्या पत्रावरून दिसून येते. परंतु सदरच्या विमान प्रवासाबाबत जाणे-येणे बाबत निश्चित बोध होत नाही. संचिकेमध्ये समायोजन करताना विमान प्रवासाची तिकिटाची प्रत जोडणे आवश्यक असताना ॲड.डी.व्ही.सोमण यांच्या दि.८.८.२००६ च्या पत्राच्या आधारे विमान प्रवास रक्कम रू.१०,०००/- चे समायोजन करण्यात आले.

वरील आक्षेपाबाबत योग्य तो खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर केलेला असून तो खुलासा असमाधानकारक आहे. त्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२४ : ॲड.संजय पगारे यांच्या वकील फ़ीस अदाई बाबत.**

विधी विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना वरील विषयाकित संचिकाची तपासणी करीत असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या –

१ ) WP ८८१९/०३ भारती टेलिव्हेंचर्स ॲड. संजय पगारे यांचे पत्र २५.१.२००६ चे देयक रक्कम रू.३०००/- पान क्र.संचिकेचा पान क्र. एनएस-१, पार्ट क्र.१ ते ६ वर व्हाऊचर्स दिनांक ७.२.२००६ रोजी बिल अदा केल्याचे दिसून येते. स्टॅम्प क्र.१०३०२ /दावा क्र. ८८१९-०६ भारती सेल्युलर कंपनी विरूध्द मनपा उच्च न्यायालय प्रकरणामध्ये दि.२/०६/०६ रोजी २५००/- व दि.२.९.२००६ रोजी २५००/- असे एकूण ८०००/- रू.प्रलंबित प्रकरणामध्ये अदा केल्याचे दिसून येते. परंतु मा.उच्च न्यायालयाची वकिल फ़ीस खर्च रू.४०००/- असतांना ८०००/- रू.चे बिल दिले सदरच्या प्रकरणामध्ये ४०००/- अतिरिक्त वकिल फ़ीस ॲड.पगारे यांना दिल्याचे दिसून येते.

२) दावा क्र.miss ULP/३७/०५ यु.आर.रगडे वि.मनपा ह्या प्रकरणामध्ये उक्त प्रकरणाच्या वकिल फ़िस अदा करतांना प्रमाणित केलेल्या बिलावर सदरच्या प्रकरणाची नोंद नोंद रजि.नं.९० वरील २३/०५ वर घेण्यात आली असा आहे. परंतु २३/०५ रजि.९० ची तपासणी केली असता पान क्र.२३ वर सदरच्या पान क्र. Can.Petition St No १४०४७/०५ m/s BDA Limited MIDC वि मनपा दाव्याची नोंद घेण्यात आली आहे.
यु.आर.रगडे वि.मनपा या प्रकरणामध्ये रजि.नं.९० च्या २९/०५ या पानावर सदरच्या वकिल फ़ीस १२५००/- ची बिल दिल्याची नोंद दिसून येते. मात्र दावा क्र. ULP/२०/०५ एस.के.पाशा वि.मनपा प्रकरणामध्ये वकिल फ़ीस देयकावर पान क्र.२१९/५ १२५०/- अशी नोंद आहे

परंतु सदरच्या १२५०/- रू.ची.नोंद रजि.नं.९० च्या कोणत्या पान क्रमांकावर आहे. याबाबत बोध होत नाही.

तसेच याबाबत अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे मुद्दा क्र.१ व २ कायम करण्यात येतो.

# सिध्दार्थ जलतरण तलाव विभाग
# लेखापरीक्षण अहवाल
# सन २००२–०३ ते २००७–०८.

सिध्दार्थ जलतरण तलाव विभागाचे सन २००२-०३ ते सन २००६-०७ या वर्षातील अभिलेख्यांचे थकित लेखापरीक्षण व सन २००७-०८ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूंच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली असून तपासणी कालावधी मध्ये पावती पुस्तकांची पडताळणी करण्यात आली.

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टरमध्ये घेवून महापालिका फ़ंडात जमा केले बाबत तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबींचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

**(अ) जमा बाजू लेखापरीक्षण:**

**परिच्छेद क्र.१ : सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्म आर्थिक वर्ष २००२–०३ व आर्थिक वर्ष २००३–०४, जनरल पावती पुस्तक क्र.४ द्वारे एकाच पावती पुस्तकाची डबल रक्कम रू.१,२०,७७०/– वसूल करून रक्कम रू.६०,३८५/– मनपा फ़ंडात भरणा केल्याबाबत.**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००३-०४ चे लेखापरीक्षण करीत असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सिध्दार्थ जलतरण विभागास जनरल पावती पुस्तक क्रमांक ४ सन २००२-०३ या आर्थिक वर्षात भांडार विभागातून प्राप्त झाले असून सदरील पुस्तक हे याच आर्थिक वर्षात न वापरता सदरील पुस्तक सन २००३-०४ ला वापरण्यात आलेले आहे.

२. जनरल पावती पुस्तक क्रमांक ४ अन्वये वित्तीय वर्ष २००२-०३ व वित्तीय वर्ष सन २००३-०४ या दोन्ही आर्थिक वर्षात सभासद नोंदणी फ़ॉर्म अन्वये नोंद झाल्याचे दिसून आले आहे. परंतु वित्तीय वर्ष २००२-०३ मध्ये रक्कम भरणा केलेली दिसून आलेली नाही.

३. जनरल पावती पुस्तक क्र.४ अन्वये आर्थिक वर्ष २००३-०४ मध्ये रक्कम रू.६०,३८५/- वसूल केलेले असून सदरील रकमेचा भरणा (सन २००३-०४) मध्ये करण्यात आलेला असून सदरील पावतीवर सन २००२-०३ मधील सभासद नोंदणी फ़ॉर्मचे नावे दर्शवून व आर्थिक वर्ष २००३-४ मधील दिनांक दर्शवून रकमेचा भरणा मनपा फ़ंडात करण्यात आलेला आहे. म्हणजेच संबंधिताने आर्थिक वर्ष सन २००२-०३ व सन २००३-०४ या आर्थिक वर्षात पुस्तक क्र.४ चे सभासद हे दोन्ही आर्थिक वर्षात दर्शवून सन २००३-४ या (एकाच) आर्थिक वर्षाचा भरणा केलेला आहे. (याबाबतची उपलब्ध सभासद नोंदणी फ़ॉर्मची यादी)

४. सिध्दार्थ जलतरण येथील सन २००३-४ या आर्थिक वर्षातील कॅश रजिस्टर वरील नोंदी नुसार या आर्थिक वर्षात सभासद नोंदणी फ़ॉर्म क्र.९०१ ते १५०० एकूण ६०० फ़ॉर्म वितरीत झाल्याचे कॅश रजिस्टरवरील नोंदी नुसार दिसून येते.

५. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील उपलब्ध लेख्यावरून पाहणी केली असता आर्थिक वर्ष २००३-०४ मध्ये एकूण सभासद १००७ असल्याचे निदर्शनास आले. परंतु संबंधित विभागाने या आर्थिक वर्षात फ़क्त २४६ सभासद नोंदणी फ़ॉर्म उपलब्ध करून दिलेले आहे.

६. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्मची पाहणी करतांना सदरील फ़ॉर्मवर फ़क्त फ़ोटो, नांव दर्शविण्यात आले आहे. संबंधित फ़ॉर्मवर डॉक्टर, कोच व्यवस्थापक व लिपीक यांच्या स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना व नोंदणी फ़ॉर्म मधील विवरण तक्ता भरणे आवश्यक होते. परंतु तसे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे सभासद नोंदणी कधी झाली व कोणत्या कालवधीपर्यंत होती याचा बोध होत नाही.

७. सिध्दार्थ जलतरण तलाव येथे सन २००३-०४ च्या लेखापरीक्षण दरम्यान सन १९९४-९५ या आर्थिक वर्षातील (छापिल) पावती पुस्तके वापरण्यात आली आहे.

वरील मुद्या क्र.१,२, ३ वरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, जनरल पावती पुस्तक क्रमांक ४ अन्वये सन २००२-०३ व सन २००३-०४ या दोन्ही आर्थिक वर्षात सभासद नोंदवून रक्कम रू.१,२०,७७०/- वसूल करण्यात आले आहे. व आर्थिक वर्ष सन २००३-०४ मध्ये वसूल रक्कम रू.६०,३८५/- चा भरणा मनपा फ़ंडात केलेला असून आर्थिक वर्ष २००२-०३ मधील रक्कम रू.६०,३८५/- चा भरणा झालेला नाही. म्हणजेच रक्कम रू.६०,३८५/- ची अफ़रातफ़र केल्याचे स्पष्ट होते. (सोबत उपलब्ध सभासद नोंदणी फ़ॉर्मची यादी.)

**आर्थिक वर्ष सन २००३–०४ मधील सिध्दार्थ जलतरण तलाव येथे वापरण्यात आलेल्या जनरल पावती पुस्तकाचा तपशिल. (सभासद नोंदणी फ़ार्मच्या नोंदी)**

**(सभासद जनरल पावती पुस्तक क्र.४)**

| अ.क्र. | सभासदाचे नांव | नोंदणी फ़ार्म क्रमांक | दिनांक | पा.क्र./बुक क्र. व दिनांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पवार योगेश चंदक्रांत | १०८५ | १७.४.२००३ | ३५०/४ | ४६५/- |
| २ | मुदिराज आलेख अभय | १०३५ | १७.४.२००३ | ३५१/४ | ४६५/- |
| ३ | मुथा अक्षय राजेंद्र | १०५८ | १७.४.२००३ | ३५२/४ | ४६५/- |
| ४ | बजाज अभिजित रमेश | १०६३ | १७.४.२००३ | ३५३/४ | ४६५/- |
| ५ | सईद मुकीद मुतिब मुतिन | १०६१ | १७.४.२००३ | ३५४/४ | ४६५/- |
| ६ | पुजारी सायली संजय | १०५१ | १७.४.२००३ | ३५५/४ | ४६५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | चोटलानी करण मुकेश | १०५७ | १८.४.२००३ | ३५६/४ | ४६५/- |
| ८ | सचिन शामराव मोरे | १०७२ | १८.४.२००३ | ३५७/४ | ४६५/- |
| ९ | कोनडेकर चिन्मय राजाराम | १००० | १८.४.२००३ | ३५८/४ | ४६५/- |
| १० | किनी आदित्य दिपक | १०९५ | १८.४.२००३ | ३५९/४ | १०१५/- |
| ११ | देशमुख शुभंकर मदन | १०६७ | १८.४.२००३ | ३६०/४ | ४६५/- |
| १२ | कुलकर्णी अपुर्वा श्रीकांत | १०९४ | १८.४.२००३ | ३६१/४ | ४६५/- |
| १३ | साजन श्रीमान | १०३८ | १९.४.२००३ | ३६२/४ | ४६५/- |
| १४ | वैष्णवी संजय सराफ़ | ११०५ | १९.४.२००३ | ३६३/४ | ४६५/- |
| १५ | रितेश संजय सराफ़ | ११०३ | १९.४.२००३ | ३६४/४ | ४६५/- |
| १६ | जोशी विनोद गंगाधरराव | ८९३ | १२.४.२००३ | ३२९/४ | १४१५/- |
| १७ | अग्रवाल पर्थ सतिश | ९३० | १२.४.२००३ | ३३०/४ | ४६५/- |
| १८ | आदित्य शशिकांत विभुते | ९३३ | १२.४.२००३ | ३३१/४ | ४६५/- |
| १९ | कोठारे आशिष धरमचंद | ८७३ | १२.४.२००३ | ३३२/४ | १४१५/- |
| २० | संतोष विश्वंभर वानखेडे | ८३० | १२.४.२००३ | ३३३/४ | १४१५/- |
| २१ | दिनेश वसंतराव देव | ८३१ | १२.४.२००३ | ३३४/४ | १४१५/- |
| २२ | मृणाल राम रूईकर | ८२१ | १२.४.२००३ | ३३५/४ | १४१५/- |
| २३ | गायकवाड सुनिल | ९६० | १२.४.२००३ | ३३६/४ | ७१५/- |
| २४ | केंद्रे विवेक किशनराव | ८३९ | १२.४.२००३ | ३३७/४ | ७१५/- |
| २५ | डॉ.सरोसिया सुंदरबाबु मोहनलाल | ८०२ | १२.४.२००३ | ३३८/४ | १४१५/- |
| २६ | धोंगडे आशुतोष अतुलराव | १०९० | २१.४.२००३ | ३७६/४ | ४६५/- |
| २७ | धोंगडे तृप्ती अतुलराव | १०८८ | २१.४.२००३ | ३७७/४ | ४६५/- |
| २८ | इंगळे मोहित मोहन | १०८७ | २१.४.२००३ | ३७८/४ | ४६५/- |
| २९ | महेन्द्रकर निखिल नागेश | १०९२ | २१.४.२००३ | ३७९/४ | ४६५/- |
| ३० | पुरूजीत विजय भोसले | ९४१ | २१.४.२००३ | ३८१/४ | ४६५/- |
| ३१ | लहाने आदित्य नरेश | १०७० | २१.४.२००३ | ३८२/४ | ४६५/- |
| ३२ | लहाने अमोल नरेश | १०६९ | २१.४.२००३ | ३८३/४ | ४६५/- |
| ३३ | कंमाडोकर श्रेया | १०१८ | २१.४.२००३ | ३८४/४ | ४६५/- |
| ३४ | पठारे अन्नपुर्णा राजेश | १०१६ | २१.४.२००३ | ३८५/४ | ४६५/- |
| ३५ | स्वप्नील आंचलिया | १०३७ | २१.४.२००३ | ३८६/४ | ४६५/- |
| ३६ | विभुते आकाश अजय | १०५५ | २१.४.२००३ | ३८७/४ | ७१५/- |
| ३७ | राघवी रघु स्वामीनाथन | ११६४ | २१.४.२००३ | ३८८/४ | ४६५/- |
| ३८ | स्नेहा मोहन | ११६३ | २१.४.२००३ | ३८९/४ | ४६५/- |
| ३९ | साबु व्यंकटेश रविंद्र | ११६६ | २१.४.२००३ | ३९०/४ | ४६५/- |
| ४० | श्वेता मोहन | ११६२ | २१.४.२००३ | ३९१/४ | ४६५/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४१ | करिश्मा सुरेशसिंग बडेवाल | ११६१ | २१.४.२००३ | ३९२/४ | ४६५/- |
| ४२ | मुदिराज अभय नागनाथ | ११६० | २१.४.२००३ | ३९३/४ | ७१५/- |
| ४३ | डिग्रसकर रूतुला संजय | १२१५ | २२.४.२००३ | ३९४/४ | ४६५/- |
| ४४ | डिग्रसकर प्रतिक संजय | १२१६ | २२.४.२००३ | ३९५/४ | ४६५/- |
| ४५ | राव रूशवेंद्रा | १२१२ | २२.४.२००३ | ३९६/४ | ४६५/- |
| ४६ | निरमलकर सुजाता सुरेश | १०८१ | २२.४.२००३ | ३९८/४ | ४६५/- |
| | | | | **एकणू रक्कम रू.** | **२८६४०/-** |

**आर्थिक वर्ष सन २००२-०३ मधील सिध्दार्थ जलतरण तलाव येथे वापरण्यात आलेल्या जनरल पावती पुस्तकाचा तपशिल. (सभासद नोंदणी फ़ार्मच्या नोंदी)**

**(सभासद जनरल पावती पुस्तक क्र.४)**

| अ.क्र. | सभासदाचे नांव | नोंदणी फ़ार्म क्रमांक | दिनांक | पा.क्र./बुक क्र. व दिनांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | भापकर संदिप विठ्ठलराव (मासिक) | ६९९ | २३.५.२००२ | ४/३०१ १९.७.२००३ | ७१५ |
| २ | कोरे अमोल धोंडिबा (मासिक) | ७०७ | २३.५.२००२ | ४/३०२ १९.७.२००३ | ७१५ |
| ३ | टिबरीवाल कुमार संदिप(मासिक) | ७४७ | २३.५.२००२ | ४/३०३ १९.७.२००३ | ७१५ |
| ४ | बडजाते सचिन (मासिक) | ७४४ | २३.५.२००२ | ४/३०४ १९.७.२००३ | ७१५ |
| ५ | ठोले मनोज हुकुमचंद (मासिक) | ७४३ | २३.५.२००२ | ४/३०५ १९.७.२००३ | ७१५ |
| ६ | प्रदिप मुरलीधरराव धर्माधिकारी (मासिक) | ७३३ | २३.५.२००२ | ४/३०६ १९.७.२००३ | ७१५ |
| ७ | काटकर योगेश अशोक (मासिक) | ७४२ | २३.५.२००२ | ४/३०७ २०.७.२००३ | ७१५ |
| ८ | कुलकर्णी धनंजय नारायण (मासिक) | ७४१ | २३.५.२००२ | ४/३०८ २०.७.२००३ | ७१५ |
| ९ | राजगुडे रेणुका अंबादास (मासिक) | ७१८ | २३.५.२००२ | ४/३०९ २०.७.२००३ | ४६५ |
| १० | राजगुडे लक्ष्मी अंबादास (मासिक) | ७१७ | २३.५.२००२ | ४/३१० २०.७.२००३ | ४६५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | गौरव भारत रायभाने (मासिक) | ६८३ | २३.५.२००२ | ४/३११ २१.७.२००३ | ४६५ |
| १२ | पगारे प्रणीला गौतम (मासिक) | ६९८ | २३.५.२००२ | ४/३१२ २१.७.२००३ | ४६५ |
| | | | | **एकूण रक्कम रू.** | **७५८०/-** |

**परिच्छेद क्र.२: सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्म आर्थिक वर्ष २००२-०३ व आर्थिक वर्ष सन २००४-०५ जनरल पावती पुस्तक क्र.६८ द्वारे एकाच पावती पुस्तकाची डबल रक्कम रू.१,२८,६९०/- व जनरल पावती पुस्तक क्र.४६७ द्वारे एकाच पावती पुस्तकाची डबल रक्कम रू.१,३७,८८०/- वसूल करून पावती पुस्तक ६८ अन्वये रक्कम रू.६४३४५/- व जनरल पावती पुस्तक क्र.४६७ अन्वये रक्कम रू.६८९४०/- मनपा फ़ंडात भरणा केल्याबाबत.**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००४-०५ चे लेखापरीक्षण करीत असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सिध्दार्थ जलतरण विभागास जनरल पावती पुस्तक क्रमांक ६८ सन २००१-०२ या आर्थिक वर्षात भांडार विभागातून प्राप्त झाले असून सदरील पुस्तक हे याच आर्थिक वर्षात न वापरता सदरील पुस्तक सन २००४-०५ ला वापरण्यात आलेले आहे.

२. जनरल पावती पुस्तक क्रमांक ६८ अन्वये वित्तीय वर्ष २००२-०३ या आर्थिक वर्षात नोंदणी फ़ॉर्म अन्वये नोंद झाल्याचे दिसून आले आहे. परंतु वित्तीय वर्ष सन २००२-०३ रक्कम भरणा केलेली नाही.

३. जनरल पावती पुस्तक क्रमांक ६८ अन्व्ये आर्थिक वर्ष सन २००४-०५ मध्ये रक्कम रूपये ६४,३४५ /- वसूल केलेले असून सदरील रकमेचा भरणा (सन २००४-०५) मध्ये करण्यात आलेला असून सदरील पावतीवर सन २००२-०३ मधील सभासद नोंदणी फ़ॉर्म चे नावे दर्शवून व आर्थिक वर्ष सन २००४-०५ मधील दिनांक दर्शवून रकमेचा भरणा मनपा फ़ंडात करण्यात आलेला आहे. म्हणजेच संबंधिताने आर्थिक वर्ष सन २००२-०३ वर्षात पुस्तक क्रमांक ६८ चे सभासद हे आर्थिक वर्ष सन २००४-०५ या वर्षात दर्शविण्यात आलेले आहे. तसेच सदरील रकमेचा भरणा सन २००४-०५मध्ये करण्यात आला आहे. परंतु सन २००४-५ या वर्षातील सभासद नोंदणी फ़ॉर्म लेखा परीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही. (याबाबतची सन २००२-०३ मधील सविस्तर यादी सोबत जोडली आहे.)

४. सिध्दार्थ जलतरण विभागास जनरल पावती पुस्तक क्रमांक ४६७ सन २००२-०३ या आर्थिक वर्षात भांडार विभागाकडून प्राप्त झाले असून सदरील पुस्तक हे याच आर्थिक वर्षात न वापरता सदरील पुस्तक सन २००४-५ ला वापरण्यात आलेले आहे.

५. जनरल पावती पुस्तक क्रमांक ४६७ अन्वये वित्तीय वर्ष सन २००२-०३ या आर्थिक वर्षात सभासद नोंदणी फ़ॉर्म अन्वये नोंद झाल्याचे दिसून आले आहे. परंतु वित्तीय वर्ष सन २००२-३ मध्ये रक्कम भरणा केलेली दिसून आलेली नाही.

६. जनरल पावती पुस्तक क्र.४६७ अन्वये आर्थिक वर्ष सन २००४-०५ मध्ये रक्कम रूपये ६८,९४०/- वसूल केलेले असून सदरील रकमेचा भरणा सन २००४-०५ मध्ये करण्यात आलेला असून सदरील पावतीवर सन २००२-३ मधील सभासद नोंदणी फ़ॉर्मचे नावे दर्शवून व आर्थिक वर्ष (सन २००४-०५) मधील दिनांक दर्शवून रकमेचा भरणा मनपा फ़ंडात केलेला आहे. म्हणजेच संबंधिताने आर्थिक वर्ष सन २००२-०३ वर्षात पुस्तक क्रमांक ४६७ चे सभासद हे आर्थिक वर्ष सन २००४-०५ मध्ये दर्शविण्यात आलेले आहे. तसेच सदरील रकमेचा भरणा सन २००४-०५ मध्ये करण्यात आला आहे. परंतु सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील सभासद नोंदणी फ़ॉर्म वेळोवेळी मागणी करूनही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही. (सोबत उपलब्ध सभासद नोंदणी फ़ॉर्म बाबतची आर्थिक वर्ष २००२-०३ ची यादी सोबत जोडण्यात आली आहे.)

७. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील कॅश रजिस्टर वरील नोंदी नुसार या आर्थिक वर्षात सभासद नोंदणी फ़ॉर्म क्रमांक १५०१ ते २३०० असे एकूण ८०० फ़ॉर्म वितरीत झाल्याचे कॅश रजिस्टर वरील नोंदी नुसार दिसून येते.

८. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील उपलब्ध लेख्यावरून पाहणी केली असता आर्थिक वर्ष २००४-०५ मध्ये एकूण सभासद १२१४ आहे परंतु संबंधित विभागाने या आर्थिक वर्षात फ़क्त ३४१ सभासद नोंदणी फ़ॉर्म लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले आहे.

९. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्मची पाहणी करतांना सदरील फ़ॉर्मवर फ़क्त फ़ोटो, नाव दर्शविण्यात आले आहे. संबंधित फ़ॉर्मवर डॉक्टर, कोच ,व्यवस्थापक, व लिपीक यांच्या स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना व नोंदणी फ़ॉर्मवरील विवरण तक्ता भरणे आवश्यक होते, परंतु तसे निदर्शनास आले नाही. त्यामुळे सभासद नोंदणी कधी झाली व कोणत्या कालावधी पर्यंत होती याचा बोध होत नाही.

१०. सिध्दार्थ जलतरण तलाव येथे सन २००४-०५ च्या लेखापरीक्षण दरम्यान सन १९९४-९५ या आर्थिक वर्षातील (छापील) पावती पुस्तके वापरण्यात आली आहे.

वरील मुद्या क्र.१,२,३,४,५ व ६ वरून प्रथम दर्शनी असे दिसून येते की, जनरल पावती पुस्तक क्रमांक ६८ व ४६७ अन्वये सन २००२-०३ या आर्थिक वर्षात सभासद नोंदवून आर्थिक वर्ष सन २००४-०५ मध्ये एकत्रित रक्कम रू.१,३३,२८५/- चा भरणा केलेला आहे. सन २००२-०३ या आर्थिक वर्षातील एकत्रित रक्कम रू.१,३३,२८५/- इतक्या मोठया रकमेचा भरणा मनपा फ़ंडात झाल्याचे दिसून येत नाही.

म्हणजेच दोन्ही जनरल पावती पुस्तकांची एकत्रित रक्कम रू.१,३३,२८५/- ची अफ़रातफ़र केली आहे. (सोबत उपलब्ध सभासद नोंदणी फ़ॉर्म बाबतची आर्थिक वर्ष २००२-०३ ची यादी सोबत जोडण्यात आली आहे.)

## आर्थिक वर्ष सन २००२-०३ मधील सिध्दार्थ जलतरण तलाव येथे वापरण्यात आलेल्या जनरल पावती पुस्तकाचा तपशिल. (सभासद नोंदणी फ़ार्मच्या नोंदी)

**(सभासद जनरल पावती पुस्तक क्र.६८)**

| अ.क्र. | सभासदाचे नांव | नोंदणी फ़ार्म क्रमांक | दिनांक | पा.क्र./बुक क्र. व दिनांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुलकर्णी भक्ती दिगंबर (मासिक) | ६४ | १५.४.२००२ | ६८/६७९६ १२.५.२००४ | ४६५ |
| २ | जोशी प्रिया राजेंद्र(मासिक) | २१८ | १५.४.२००२ | ६८/६७९५ १२.५.२००४ | ४६५ |
| ३ | शाकीर तायझान फ़रदाब (मासिक) | २२० | १५.४.२००२ | ६८/६७९३ ११.५.२००४ | ७१५ |
| ४ | देव चिन्मय रेणुकादास (मासिक) | २२२ | १५.४.२००२ | ६८/६७९२ ११.५.२००४ | ४६५ |
| ५ | जहागिरदार मंदार महेश (मासिक) | २१९ | १५.४.२००२ | ६८/६७९१ ११.५.२००४ | ४६५ |
| ६ | कासले गणेश धोंडीराम (मासिक) | -- | १५.४.२००२ | ६८/६७९० ११.५.२००४ | ४६५ |
| ७ | पाटील अनुप राजु (मासिक) | २१४ | १५.४.२००२ | ६८/६७८९ ११.५.२००४ | ४६५ |
| ८ | पाटील अंकुश राजू (मासिक) | २१३ | १५.४.२००२ | ६८/६७८८ ११.५.२००४ | ४६५ |
| ९ | चव्हाण स्वप्नील शिवाजी (मासिक) | -- | १५.४.२००२ | ६८/६७८७ ११.५.२००४ | ४६५ |
| १० | बनसोड अक्षय भारत (मासिक) | ६१ | १५.४.२००२ | ६८/६७८६ ११.५.२००४ | ४६५ |
| ११ | पांडे नेहा दत्तात्रय (मासिक) | ६५ | १५.४.२००२ | ६८/६७८५ ११.५.२००४ | ७१५ |
| १२ | पांडे अमेय दत्तात्रय (मासिक) | ६३ | १५.४.२००२ | ६८/६७८४ १०.५.२००४ | ४६५ |
| १३ | सुहास दत्तात्रय हिवरकर (मासिक) | ७२ | १५.४.२००२ | ६८/६७८३ १०.५.२००४ | ७१५ |
| १४ | देशपांडे मोना शाम (मासिक) | २२७ | १५.४.२००२ | ६८/६७८२ १०.५.२००४ | ४६५ |
| १५ | देशपांडे मानसी शाम (मासिक) | २२८ | १५.४.२००२ | ६८/६७८१ १०.५.२००४ | ४६५ |
| १६ | पैठणकर आन्वी मक्कड (मासिक) | २२९ | १५.४.२००२ | ६८/६७८० ९.५.२००४ | ४६५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | कौठाले प्रकाश राजाराम (मासिक) | २२५ | १५.४.२००२ | ६८/६७७९<br>९.५.२००४ | ४६५ |
| १८ | खान तौसिफ़ ईस्माई (मासिक) | २३७ | १५.४.२००२ | ६७/६७७८<br>३.५.२००४ | ७१५ |
| १९ | कुलकर्णी अभिषेक भालचंद्र (तिमाही ) | ६८ | १५.४.२००२ | ६८/६७७७<br>९.५.२००४ | १०१५ |
| २० | राजेश पुखराज काळे (मासिक) | -- | १५.४.२००२ | ६८/६७७६<br>७.५.२००४ | ४६५ |
| २१ | रोहित छगनराव गाडेकर (मासिक) | १०० | १५.४.२००२ | ६८/६७७५<br>७.५.२००४ | ७१५ |
| २२ | राजेंद्र मैत्री परख (मासिक) | -- | १५.४.२००२ | ६८/६७७४<br>६.५.२००४ | ४६५ |
| २३ | पुरोहित परनिता अजय (मासिक) | -- | १५.४.२००२ | ६८/६७७३<br>६.५.२००४ | ४६५ |
| २४ | संध्या शेखर राणे (मासिक) | १०१ | १५.४.२००२ | ६८/६७७०<br>४.५.२००४ | ७१५ |
| २५ | खैरे अक्षय हिरामन (मासिक) | ५३ | १५.४.२००२ | ६८/६७७२<br>४.५.२००४ | ४६५ |
| २६ | श्रेयस शेखर राणे (मासिक) | १०,००० | १५.४.२००२ | ६८/६७७१<br>४.५.२००४ | ४६५ |
| २७ | प्रांजली प्रशांत कांगवडे (मासिक) | ५२ | १५.४.२००२ | ६८/६७६९<br>४.५.२००४ | ४६५ |
| २८ | वाघचौरे सिध्दार्थ निशीकांत (मासिक) | ७८ | १५.४.२००२ | ६८/६७६८<br>४.५.२००४ | ४६५ |
| २९ | कसबे अनिकेत सुंदरराव (मासिक) | ५१ | १५.४.२००२ | ६८/६७६७<br>४.५.२००४ | ४६५ |
| ३० | नंदापुरकर सौरभ विजयकुमार (मासिक) | ८५ | १५.४.२००२ | ६८/६७६६<br>४.५.२००४ | ४६५ |
| ३१ | चुडीवाल समय उमेश (मासिक) | ३३ | १५.४.२००२ | ६८/६७६५<br>४.५.२००४ | ४६५ |
| ३२ | खाडेश्वर रौनक उदय (मासिक) | ५४ | १५.४.२००२ | ६८/६७६४<br>४.५.२००४ | ४६५ |
| ३३ | पुराणिक गारगी अरूण (मासिक) | ५७ | १५.४.२००२ | ६८/६७६३<br>४.५.२००४ | ४६५ |
| ३४ | पुराणिक आदित्य अरूण (मासिक) | ५६ | १५.४.२००२ | ६८/६७६२<br>३.५.२००४ | ४६५ |
| ३५ | बोंडवे अमित बाबासाहेब (मासिक) | ७९ | १५.४.२००२ | ६८/६७६१<br>३.५.२००४ | ४६५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | परेश एकनाथ रोडगे (मासिक) | ८० | १५.४.२००२ | ६८/६७६० ३.५.२००४ | ४६५ |
| ३७ | उपासनी ऋषभ मोहन (मासिक) | ४३ | ११.४.२००२ | ६८/६७५२ २९.४.२००४ | ४६५ |
| ३८ | बडवाल दयालसिंग सुरेशसिंग (मासिक) | ४४ | ११.४.२००२ | ६८/६७५१ २९.४.२००४ | ४६५ |
| ३९ | उवापले मृणमयी दत्ता (मासिक) | ९४ | ११.४.२००२ | ६८/६७४९ २९.४.२००४ | ४६५ |
| ४० | गायकवाड रितु चंद्रकांत (मासिक) | ९० | ११.४.२००२ | ६८/६७४८ २८.४.२००४ | ४६५ |
| ४१ | काथार हर्षल सुधाकर (मासिक) | ४६ | ११.४.२००२ | ६८/६७४५ २७.४.२००४ | ४६५ |
| ४२ | भाविक योगेश पटेल (मासिक) | ४८ | ११.४.२००२ | ६८/६७४४ २७.४.२००४ | ४६५ |
| ४३ | चितळे योगेश पटेल (मासिक) | ४७ | ११.४.२००२ | ६८/६७४३ २६.४.२००४ | ४६५ |
| ४४ | प्रियल पारीख (मासिक) | ४९ | ११.४.२००२ | ६८/६७४२ २६.४.२००४ | ४६५ |
| ४५ | काथार आदित्य श्रीकृष्णा (मासिक) | ४५ | ११.४.२००२ | ६८/६७४६ २८.४.२००४ | ४६५ |
| ४६ | त्रिवेदी कार्तिक कांतीलाल (मासिक) | ८७ | ११.४.२००२ | ६८/६७४१ २६.४.२००४ | ४६५ |
| ४७ | भरड पंकज गोरख (मासिक) | ९६ | १२.४.२००२ | ६८/६७३९ २५.४.२००४ | ४६५ |
| ४८ | मक्कड शिवप्रसाद पन्नालाल (मासिक) | ९९०७ | १०.४.२००२ | ६८/६७३६ २४.४.२००४ | ७१५ |
| ४९ | खान जमद हशर (मासिक) | ९९ | १०.४.२००२ | ६८/६७३५ २४.४.२००४ | ७१५ |
| ५० | देशमुख गौरी संजीव (मासिक) | २४ | १०.४.२००२ | ६८/६७३४ २४.४.२००४ | ४६५ |
| ५१ | भौदा प्रियम राजेंद्र (मासिक) | ९९६३ | १०.४.२००२ | ६८/६७३३ २४.४.२००४ | ४६५ |
| ५२ | मौरा पलख राजेंद्र (मासिक) | ९९६४ | १०.४.२००२ | ६८/६७३२ २४.४.२००४ | ४६५ |
| ५३ | देशमुख रेणु राजेंद्र (तिमाही ) | ५ | १०.४.२००२ | ६८/६७३१ २२.४.२००४ | १०१५ |
| ५४ | देशमुख नेहा अविनाश (तिमाही ) | ०६ | १०.४.२००२ | ६८/६७३० २२.४.२००४ | १०१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५५ | विजय गणेश हजारी (मासिक ) | ९९२६ | १०.४.२००२ | ६८/६७२९ २२.४.२००४ | ७१५ |
| ५६ | देस्सा रविंद्र प्रेमकुमार (तिमाही) | ९९५६ | १०.४.२००२ | ६८/६७२८ २२.४.२००४ | १०१५ |
| ५७ | चौधरी अमेय संतोष (मासिक ) | २० | १०.४.२००२ | ६८/६७२७ २१.४.२००४ | ४६५ |
| ५८ | चावरिया उमंग (मासिक ) | ३६ | १०.४.२००२ | ६८/६७२६ २१.४.२००४ | ४६५ |
| ५९ | मकराणी फ़िजा फ़रीण (मासिक ) | ४० | १०.४.२००२ | ६८/६७२५ २१.४.२००४ | ४६५ |
| ६० | जोंधळे संकेत रावसाहेब (तिमाही) | २७ | १०.४.२००२ | ६८/६७२४ २०.४.२००४ | १०१५ |
| ६१ | जोंधळे चारूशिला रावसाहेब (तिमाही) | २६ | १०.४.२००२ | ६८/६७२३ २०.४.२००४ | १०१५ |
| ६२ | शेनॉय संजीव (मासिक ) | ४१ | १०.४.२००२ | ६८/६७२२ २०.४.२००४ | ४६५ |
| | | | | **एकूण** | **२६१९०/-** |

## आर्थिक वर्ष सन २००२-०३ मधील सिध्दार्थ जलतरण तलाव येथे वापरण्यात आलेल्या जनरल पावती पुस्तकाचा तपशिल. (सभासद नोंदणी फ़ार्मच्या नोंदी)

**(सभासद जनरल पावती पुस्तक क्र.४६७)**

| अ.क्र. | सभासदाचे नांव | नोंदणी फ़ार्म क्रमांक | दिनांक | पा.क्र./बुक क्र. व दिनांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | नंदापुरकर शार्दुल विजयकुमार (मासिक) | ८८ | १६.४.२००२ | ४६७/४६६०१ २४.५.२००४ | ४६५ |
| २ | केतकी अरूण वडमारे (मासिक) | ७६ | १६.४.२००२ | ४६७/४६६०२ २४.५.२००४ | ४६५ |
| ३ | निखिल अरूण वडमारे (मासिक) | ७७ | १६.४.२००२ | ४६७/४६६०३ २४.५.२००४ | ४६५ |
| ४ | धोंगडे युवराज (मासिक) | २७३ | १६.४.२००२ | ४६७/४६६१० २५.५.२००४ | ४६५ |
| ५ | नरमा अक्षय राजेश (मासिक) | २७६ | १६.४.२००२ | ४६७/४६६११ २५.५.२००४ | ४६५ |
| ६ | देशपांडे मुकुंद श्रीरंग (मासिक) | २७४ | १६.४.२००२ | ४६७/४६६१४ ७.६.२००४ | ४६५ |
| ७ | काजी जुबेर मोहीयोद्यीन (मासिक) | ९९९४ | १७.४.२००२ | ४६७/४६६१५ ७.६.२००४ | ७१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | राऊत निखिल विजय (मासिक) | २७१ | १७.४.२००२ | ४६७/४६६१६ ८.६.२००४ | ४६५ |
| ९ | युके जकाडीन अरूण (मासिक) | २७० | १७.४.२००२ | ४६७/४६६१७ ८.६.२००४ | ४६५ |
| १० | हिवरकर विशाखा सुदारू (मासिक) | ७३ | १७.४.२००२ | ४६७/४६६२१ १४.६.२००४ | ४६५ |
| ११ | पांडे शौनक मिलिंद (मासिक) | २८७ | १७.४.२००२ | ४६७/४६६२२ १४.६.२००४ | ४६५ |
| १२ | प्रिया सुर्यकांत चव्हाण | २८५ | १७.४.२००२ | ४६७/४६६२३ १४.६.२००४ | ७१५ |
| १३ | अभिजित सुर्यकांत चव्हाण (मासिक) | २८४ | १७.४.२००२ | ४६७/४६६२४ १५.६.२००४ | ४६५ |
| १४ | रितेश दत्तात्रय आव्हाड (मासिक) | २८६ | १७.४.२००२ | ४६७/४६६२५ १५.६.२००४ | ४६५ |
| १५ | मुशी अभिनव लक्ष्मीकांत (मासिक) | ८२ | १७.४.२००२ | ४६७/४६६२६ १५.६.२००४ | ७१५ |
| १६ | रोकडे अमित अनिरूध्द (मासिक) | २८३ | १७.४.२००२ | ४६७/४६६२७ १५.६.२००४ | ७१५ |
| १७ | रूक्षीपाठक ईशा उदय (मासिक) | २३४ | १७.४.२००२ | ४६७/४६६२८ १५.६.२००४ | ४६५ |
| १८ | जोशी विजयकुमार प्रमोद (मासिक) | २३५ | १७.४.२००२ | ४६७/४६६२९ २२.३.२००५ | ४६५ |
| १९ | अंबेकर अमय उदास (मासिक) | २२६ | १७.४.२००२ | ४६७/४६६३० २२.३.२००५ | ४६५ |
| २० | जोशी हर्षवर्धन भाट (मासिक) | १५४ | १७.४.२००२ | ४६७/४६६३१ २३.३.२००५ | ४६५ |
| २१ | घंडा अमित सतिश (मासिक) | २९३ | १७.४.२००२ | ४६७/४६६३९ २३.३.२००५ | ७१५ |
| २२ | नाईकवाडे नेहरीका दिनकर (मासिक) | १४९ | १७.४.२००२ | ४६७/४६६३४ २३.३.२००५ | ४६५ |
| २३ | नाईकवाडे तेजस दिनकर (मासिक) | १५० | १७.४.२००२ | ४६७/४६६३५ २३.३.२००५ | ४६५ |
| २४ | परमार दिपतेज प्रदीपकुमार (मासिक) | १४२ | १७.४.२००२ | ४६७/४६६३६ २३.३.२००५ | ४६५ |
| २५ | धमरडे ऋतुजा संजय (मासिक) | १४४ | १७.४.२००२ | ४६७/४६६३८ २३.३.२००५ | ४६५ |
| २६ | मापारी विजय परू (मासिक) | २९७ | १७.४.२००२ | ४६७/४६६३९ २३.३.२००५ | ७१५ |
| २७ | रोगे दिप्ती अमिराज (मासिक) | १५२ | १७.४.२००२ | ४६७/४६६४० २३.३.२००५ | ४६५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | रोनशेकर अनिकेता जयंत (मासिक) | १५१ | १७.४.२००२ | ४६७/४६६४१ २३.३.२००५ | ४६५ |
| २९ | भागळे रोहन प्रभाकर (मासिक) | ३१२ | २०.४.२००२ | ४६७/४६६७४ २८.३.२००५ | ७१५ |
| ३० | कुदाडे शेखर केसरसिंग (मासिक) | ३३३ | २०.४.२००२ | ४६७/४६६७६ ३०.३.२००५ | ७१५ |
| ३१ | पाटकर अशिश रामभाऊ (मासिक) | ३३७ | २१.४.२००२ | ४६७/४६६७५ ३०.३.२००५ | ७१५ |
| ३२ | रेखी गुरूदीपसिंग अरविंदर (मासिक) | ३६३ | २२.४.२००२ | ४६७/४६६८९ ३१.३.२००५ | ७१५ |
| ३३ | जोशी अमृता शाम (मासिक) | ३६७ | २२.४.२००२ | ४६७/४६६९० ३१.३.२००५ | ७१५ |
| ३४ | सतिश वैष्णव (कौ.तिमाही) | ३०६ | २१.४.२००२ | ४६७/४६६७० २८.३.२००५ | ३११५ |
| ३५ | वैष्णव जगदीश रणछोडदास (कौ.तिमाही) | ३०४ | २१.४.२००२ | ४६७/४६६६९ २८.३.२००५ | ३११५ |
| ३६ | पाटील भुषण लोटन (मासिक) | ३१३ | २१.४.२००२ | ४६७/४६६७३ २८.३.२००५ | ७१५ |
| | | | | **एकूण** | **२५७५५/–** |

**परिच्छेद क्र.३: सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्म आर्थिक वर्ष २००२–०३ व आर्थिक वर्ष २००५–०६, जनरल पावती पुस्तक क्र.४६९ द्वारे एकाच पावती पुस्तकाची डबल रक्कम रू. १,०५,२४०/– वसूल करून रक्कम रू.५२,६२०/– मनपा फ़ंडात भरणा केल्याबाबत.**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००५-०६ चे लेखापरीक्षण करीत असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सिध्दार्थ जलतरण तलाव विभागास जनरल पावती पुस्तक क्रमांक ४६९ सन २००२-०३ या आर्थिक वर्षात भांडार विभागातून प्राप्त झाले असून सदरील पुस्तक हे याच आर्थिक वर्षात न वापरता सदरील पुस्तक हे सन २००५-०६ ला वापरण्यात आलेले आहे.

२. जनरल पावती पुस्तक क्रमांक ४६९ अन्वये वित्तीय वर्ष सन २००२-०३ या आर्थिक वर्षात नोंदणी फ़ॉर्म अन्वये नोंद झाल्याचे दिसून आले आहे. परंतु वित्तीय वर्ष सन २००२-०३ या वर्षात रक्कम भरणा केलेली नाही.

३. जनरल पावती पुस्तक क्रमांक ४६९ अन्वये वित्तीय वर्ष सन २००५-०६ रक्कम रूपये ५२,६२०/- वसूल केलेले असून सदरील रकमेचा भरणा सन (२००५-०६) मध्ये करण्यात आलेला असून सदरील पावतीवर सन २००२-०३ मधील सभासद नोंदणी फ़ॉर्म

चे नावे दर्शवून व आर्थिक वर्ष (सन २००५-०६) मधील दिनांक दर्शवून रकमेचा भरणा मनपा फ़ंडात करण्यात आलेला आहे.

म्हणजेच संबंधिताने आर्थिक वर्ष सन २००२-०३ वर्षात पुस्तक क्रमांक ४६९ चे सभासद हे आर्थिक वर्ष सन २००५-०६ या वर्षात दर्शविण्यात आलेले आहे. तसेच सदरील रकमेचा भरणा सन २००५-०६ या वर्षात करण्यात आलेला आहे. परंतु सन २००५-६ या वर्षातील सभासद नोंदणी फ़ॉर्म वेळोवेळी मागणी करूनही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही. (या बाबतची उपलब्ध सभासद नोंदणी फ़ॉर्म बाबतची आर्थिक वर्ष २००२-०३ ची यादी सोबत जोडली आहे.)

४. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००५-६ या आर्थिक वर्षातील कॅश रजिस्टर वरील नोंदी नुसार या आर्थिक वर्षात सभासद नोंदणी फ़ॉर्म क्रमांक २३०१ ते ३४०० असे एकूण १००० फ़ॉर्म वितरीत झाल्याचे कॅश रजिस्टर वरील नोंदी नुसार दिसून येते.

५. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील उपलब्ध लेख्यावरून पाहणी केली असता आर्थिक वर्ष सन २००५-०६ मध्ये एकूण सभासद १७२४ असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु संबंधित विभागाने १७२४ सभासदापैकी या आर्थिक वर्षात फ़क्त ५०५ सभासद नोंदणी फ़ॉर्म उपलब्ध करून दिले आहे.

६. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्मची पाहणी करतांना सदरील फ़ॉर्मवर फ़क्त फ़ोटो, नांव दर्शविण्यात आले आहे. संबंधित फ़ॉर्मवर डॉक्टर, कोच, व्यवस्थापक व लिपीक यांच्या स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना व नोंदणी फ़ॉर्म वरील विवरण तक्ता भरणे आवश्यक होते परंतु तसे निदर्शनास आले नाही. त्यामुळे सभासद नोंदणी कधी झाली व कोणत्या कालावधी पर्यंत होती याचा बोध होत नाही.

७. सिध्दार्थ जलतरण तलाव येथे सन २००४-०५ च्या लेखापरीक्षण दरम्यान सन १९९४-९५ या आर्थिक वर्षातील (छापील) पावती पुस्तके वापरण्यात आली आहे.
वरील मुद्दा क्र.१,२, व ३ वरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, जनरल पावती पुस्तक क्रमांक ४६९ अन्वये सन २००५-०६ मध्ये रक्कम रू.५२,६२०/- चा भरणा केलेला आहे. व आर्थिक वर्ष २००२-०३ मध्ये रक्कम रू. ५२,६२०/- चा भरणा केलेला नाही. म्हणजेच एकच पुस्तक डबल नोंद दाखवून रू.५२,६२०/- ची अफ़रातफ़र केली आहे. (सोबत उपलब्ध सभासद नोंदणी फ़ॉर्मची यादी जोडण्यात आली आहे.)

**आर्थिक वर्ष सन २००२-०३ मधील सिध्दार्थ जलतरण तलाव येथे वापरण्यात आलेल्या जनरल पावती पुस्तकाचा तपशिल. (सभासद नोंदणी फ़ार्मच्या नोंदी)**

**(सभासद जनरल पावती पुस्तक क्र.४६९)**

| अ.क्र. | सभासदाचे नांव | नोंदणी फ़ार्म क्रमांक | दिनांक | पा.क्र./बुक क्र. व दिनांक | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डोंगरे कौस्तुभ रविलोचन (मासिक) | ५६५ | ७.५.२००२ | ४६९/४६८६८<br>५.५.२००५ | ४६५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | डोंगरे सौरभ रविलोचन (मासिक) | ५६४ | ७.५.२००२ | ४६९/४६८६९ ५.५.२००५ | ४६५ |
| ३ | सागर कन्हैय्यालाल जैस्वाल (मासिक) | ५८६ | ७.५.२००२ | ४६९/४६८७० ५.५.२००५ | ४६५ |
| ४ | ओआस अहेमद (मासिक) | ५८२ | ७.५.२००२ | ४६९/४६८७१ ५.५.२००५ | ४६५ |
| ५ | आहेर मयुर निळकंठ (मासिक) | २४४ | ७.५.२००२ | ४६९/४६८७२ ५.५.२००५ | ४६५ |
| ६ | कुलकर्णी अथर्वा रजनदिप (मासिक) | ५७१० | ७.५.२००२ | ४६९/४६८७३ ५.५.२००५ | ४६५ |
| ७ | आकाश कन्हैय्यालाल जैस्वाल (मासिक) | ५८७० | ७.५.२००२ | ४६९/४६८७४ ५.५.२००५ | ४६५ |
| ८ | कुलकर्णी साक्षी मधुकर (मासिक) | ५७२ | ८.५.२००२ | ४६९/४६८७६ ५.५.२००५ | ४६५ |
| ९ | मंदाडे अनुराग सतिश (मासिक) | ४७८ | ८.५.२००२ | ४६९/४६८७८ ५.५.२००५ | ४६५ |
| १० | अमृतकर अभिजित चंद्रकांत (मासिक) | ६४० | ८.५.२००२ | ४६९/४६८८० ५.५.२००५ | ४६५ |
| ११ | अमृतकर विवेक (मासिक) | ६३९ | ८.५.२००२ | ४६९/४६८८१ ५.५.२००५ | ४६५ |
| १२ | अंबरीश रविंद्र गणोरकर (मासिक) | ४७९ | ८.५.२००२ | ४६९/४६८७७ ५.५.२००५ | ७१५ |
| १३ | वाकले निखिल कारभारी (मासिक) | ६४८ | ८.५.२००२ | ४६९/४६८८२ ५.५.२००५ | ४६५ |
| १४ | पटेल आदिती मनोज (मासिक) | ६४९ | ८.५.२००२ | ४६९/४६८८३ ५.५.२००५ | ४६५ |
| १५ | शेख तौसिफ़ रशिद (मासिक) | ६२८ | ८.५.२००२ | ४६९/४६८८४ ५.५.२००५ | ७१५ |
| १६ | शेख आसिफ़ रशिद (मासिक) | ६२९ | ८.५.२००२ | ४६९/४६८८५ ६५.२००५ | ७१५ |
| १७ | कोरडे श्वेता सुनिल (मासिक) | ५६९ | ८.५.२००२ | ४६९/४६८८७ ६.५.२००५ | ४६५ |
| १८ | मुळे इन्शा प्रविण (मासिक) | ५६६ | ८.५.२००२ | ४६९/४६८८८ ६.५.२००५ | ४६५ |
| १९ | पाटील राजु विलास (मासिक) | ६२३ | ८.५.२००२ | ४६९/४६८८९ ६.५.२००५ | ४६५ |
| २० | मनोज बलराम अंभोरे (मासिक) | ६२५ | ११.५.२००२ | ४६९/४६८९८ ८.५.२००५ | ७१५ |
| २१ | जहागिरदार सिध्दांत सुहास (मासिक) | ६०२ | ११.५.२००२ | ४६९/४६९०० ८.५.२००५ | ४६५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २२ | पवन नंदकिशोर गंगावणे (मासिक) | ६७३ | १०.५.२००२ | ४६९/४६८९० ६.५.२००५ | ७१५ |
| २३ | वैभव नंदकिशोर (मासिक) | ६७४ | १०.५.२००२ | ४६९/४६८९१ ६.५.२००५ | ४६५ |
| २४ | पंढरे सुर्यभान किसनराव (मासिक) | ६६४ | १०.५.२००२ | ४६९/४६८९२ ७.५.२००५ | ७१५ |
| २५ | पंढरे प्रशांत सुर्यभार (मासिक) | ६६३ | १०.५.२००२ | ४६९/४६८९३ ७.५.२००५ सदरील पावती रद्द करण्यात आली. | ७१५ |
| २६ | सुर्यवंशी प्रशांत काशिनाथ (मासिक) | ६३४ | १०.५.२००२ | ४६९/४६८९४ ७.५.२००५ | ७१५ |
| २७ | पिदवानी सागर मोहन (मासिक) | ६३३ | १०.५.२००२ | ४६९/४६८९५ ८.५.२००५ | ७१५ |
| २८ | बेडेकर मयुरी बालकृष्ण (मासिक) | ६३० | ११.५.२००२ | ४६९/४६८९६ ८.५.२००५ | ४६५ |
| २९ | जाधव प्रतिक सुधिर (मासिक) | २४५ | ७.५.२००२ | ४६९/४६८७५ ५.५.२००५ | ४६५ |
| ३० | जोशी प्रणव हेमंत (मासिक) | ६०९ | ७.५.२००२ | ४६९/४६८६६ ३.५.२००५ | ७१५ |
| ३१ | जैस्वाल मनाली निरज (मासिक) | ६३२ | ११.५.२००२ | ४६९/४६८९७ ८.५.२००५ | ४६५ |
| ३२ | जहागिरदार निनाद मुकुंद (मासिक) | ६०३ | ११.५.२००२ | ४६९/४६८९९ ८.५.२००५ | ४६५ |
| | | | | **एकूण** | **१७३८०/-** |

**परिच्छेद क्र.४ :१) सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्म आर्थिक वर्ष २००५-०६ व आर्थिक वर्ष २००६-०७, जनरल पावती पुस्तक क्र.७४७ द्वारे एकाच पावती पुस्तकाची डबल रक्कम रू.९५४७०/- वसूल करून रक्कम रू.४७७३५/- मनपा फ़ंडात भरणा केल्याबाबत.**

**२)सिध्दार्थ जलतरण तलाव येथील जनरल पावती पुस्तक क्र.३४० च्या अनियमिततेबाबत.**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००६-०७ चे लेखापरीक्षण करीत असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. सिध्दार्थ जलतरण तलाव विभागास जनरल पावती पुस्तक क्र.७४७ सन २००४-०५ या आर्थिक वर्षात भांडार विभागातून प्राप्त झाले असून सदरील पुस्तक हे याच आर्थिक वर्षात न वापरता सदरील पुस्तक हे सन २००६-०७ ला वापरण्यात आलेले आहे.

२. जनरल पावती पुस्तक क्रमांक ७४७ अन्वये वित्तीय वर्ष सन २००५-०६ या आर्थिक वर्षात नोंदणी फ़ॉर्म अन्वये नोंद झाल्याचे दिसून आले आहे. परंतु वित्तीय वर्ष सन २००५-०६ या आर्थिक वर्षात भरणा केलेला नाही.

३. जनरल पावती पुस्तक क्रमांक ७४७ अन्वये वित्तीय वर्ष सन २००६-०७ मध्ये रक्कम रूपये **४७७३५/-** वसूल केलेले असून सदरील रकमेचा भरणा सन २००६-७ मध्ये करण्यात आलेला असून सदरील पावतीवर सन २००५-६ मधील सभासद नोंदणी फ़ॉर्मचे नावे दर्शवून व आर्थिक वर्ष सन २००५-०६ मधील दिनांक दर्शवून रकमेचा भरणा मनपा फ़ंडात करण्यात आलेला आहे.

म्हणजेच संबंधिताने आर्थिक वर्ष सन २००५-०६ वर्षात पुस्तक क्रमांक ७४७ चे सभासद हे आर्थिक वर्ष सन २००६-०७ या वर्षात दर्शविण्यात आलेले आहे.

तसेच सदरील रकमेचा भरणा सन २००६-०७ या वर्षात करण्यात आलेला आहे. परंतु सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील सभासद नोंदणी फ़ॉर्म लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही.

(जनरल पावती पुस्तक क्रमांक ७४७/७४६३७ दि.२७.५.२००५ कौटुंबिक मासिक सभासद प्रवेश फ़ॉर्म नंबर ३०१६ श्री.गरोल सुभाष बाबुलाल.)

४. सिध्दार्थ जलतरण विभागास जनरल पावती पुस्तक क्रमांक ३४० सन २००३-०४ या आर्थिक वर्षात भांडार विभागातून प्राप्त झालेले असून सदरील पुस्तक हे याच आर्थिक वर्षात न वापरता सदरील पुस्तक हे सन २००६-७ मध्ये वापरण्यात आलेले आहे.

५. जनरल पावती पुस्तक क्रमांक ३४० चे सभासद नोंदणी फ़ॉर्म लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे एकत्रित डबल रक्कम दर्शविता आली नाही.

६. जनरल पावती पुस्तक क्रमांक ३४० अन्वये वित्तीय वर्ष सन २००६-०७ रक्कम रूपये ५०५००/- वसूल केलेले असून सदरील रक्कम ही सन २००६-०७ या आर्थिक वर्षात भरणा करण्यात आलेली आहे.

७. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००६-०७ या आर्थिक वर्षातील कॅश रजिस्टर वरील नोंदीनुसार या आर्थिक वर्षात सभासद नोंदणी फ़ॉर्म क्रमांक ३४०१ ते ४९०० असे एकूण १५०० फ़ॉर्म वितरीत झाल्याचे कॅश रजिस्टर वरील नोंदी नुसार दिसून येते.

८. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील उपलब्ध लेख्यावरून पाहणी केली असता आर्थिक वर्ष सन २००६-०७ मध्ये एकूण सभासद २०३४ असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु संबंधित विभागाने या आर्थिक वर्षात फ़क्त ६२० सभासद नोंदणी फ़ॉर्म उपलब्ध करून दिले आहे.

९. सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्मची पाहणी करतांना सदरील फ़ॉर्म वर फ़क्त फ़ोटो, नांव दर्शविण्यात आले आहे. संबंधित फ़ॉर्मवर डॉक्टर, कोच व्यवस्थापक व

लिपीक यांच्या स्वाक्षरी घेणे आवश्यक असतांना व नोंदणी फ़ॉर्म वरील विवरण तक्ता भरणे आवश्यक होते परंतु तसे निदर्शनास आले नाही.

त्यामुळे सभासद नोंदणी कधी झाली व कोणत्या कालावधी पर्यंत होती याचा बोध होत नाही.

१०. सिध्दार्थ जलतरण तलाव येथे सन २००६-०७ च्या लेखापरीक्षणा दरम्यान सन १९९४-९५ या आर्थिक वर्षातील (छापील) पावती पुस्तके वापरण्यात आली आहे.

वरील मुद्या क्र.१,२ व ३ वरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, जनरल पावती पुस्तक क्र.७४७ अन्वये सन २००६-०७ मध्ये रक्कम रू.४७,७३५/- चा भरणा झालेला आहे. परंतु आर्थिक वर्ष २००५-०६ मधील रक्कम रू.४७,७३५/- चा भरणा झालेला नाही. व जनरल पावती पुस्तक क्र.३४० चे सभासद नोंदणी फ़ॉर्म उपलब्ध करून दिलेले नाही. त्यामुळे याबाबत खातरजमा करता आलेली नाही.

**परिच्छेद क्र.५ : सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद फ़ी रक्कम रू.२५००/– चा कमी भरणा करणे बाबत.**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००२-०३ चे लेखापरीक्षण दरम्यान वार्षिक सभासद फ़ी वसूली पुस्तक क्र.५ पावती क्रमांक ४३६ ,दिनांक ७.१.२००३ नुसार श्री.कापसीकर लक्ष्मीकांत ह्या सभासद कडून रक्कम रू.२५००/- ची वसूली केलेली असून सदरील रकमेची नोंद कॅश रजिस्टरला घेतलेली नसून त्याचा भरणा मनपा फ़ंडात केलेला दिसून येत नाही.

उक्त बाबत विभागाने रक्कम रू.२५००/- चा भरणा केलेला असून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर केलेला असून पा.क्र.०२८४८३९ ,दिनांक ४.२.२००९ नुसार मनपा फ़ंडात भरणा केला आहे. भविष्यात दक्षता घेण्यात यावी.

**परिच्छेद क्र.६ : सन २००२–०३ मधील सिध्दार्थ जलतरण तलाव येथील अजीव सभासदची रक्कम रू.१२,०००/– चा कमी रकमेचा भरणा केल्याबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सिध्दार्थ जलतरण तलाव येथील लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद १) श्री.राजीव मधुकर जोशी, २) श्री.चंद्रक्रांत लगड यांची अजीव सभासद फ़ी प्रत्येक रक्कम रू.१२०००/- असतांना संबंधिताने पावती क्र.१६७/०२ दिनांक २९.६.२००२ द्वारे धनादेश क्र.५९४९५७ दि.३०.५.०२ अन्वये रक्कम रू.६०००/- व पा.क्र.१७२/०२ दिनांक १६.७.०२ नुसार रक्कम रू.६०००/- चा या दोन्ही सभासदांनी भरणा केलेला असून राहिलेल्या रकमेचा भरणा (प्रत्येकी रक्कम रू.६०००/-) अद्यापपर्यंत भरणा केल्याचे दिसून आलेले नाही.

करिता, दोन्ही सभासदाकडील रक्कम रू.१२०००/- अद्यापपर्यंत वसूल झालेले नाही . तरी याबाबत विभागाने रक्कम रू.१२०००/- वसूल करून लेखापरीक्षण विभागास अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता अनुपालन प्राप्त झाले असून खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.७ : सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद फ़ी रक्कम रू.१२००/– चा कमी भरणा करणे बाबत.**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००४-०५ चे लेखापरीक्षण दरम्यान बारा वर्षाखालील वार्षिक सभासद फ़ी वसूली पुस्तक क्र.७ पावती क्र.६२६ दिनांक १८.३.२००५ नुसार कु.राजगौरी खेमनर ह्या सभासदाकडून रक्कम रू.१२००/- ची वसूली केलेली असून सदरील रकमेची नोंद कॅश रजिस्टरला घेतलेली नसून त्याचा भरणा मनपा फ़ंडात केलेला दिसून येत नाही.

उक्त बाबत विभागाने रक्कम रू.१२००/- चा भरणा केलेला असून पा.क्र.२८४८६ दि.२१.३.२००९ नुसार रक्कम रू.१२००/- चा भरणा मनपा फ़ंडात केलेला असून भविष्यात दक्षता घेण्यात यावी.

**परिच्छेद क्र.८ : आर्थिक वर्ष सन २००४–०५ मध्ये एकूण बेरजे मध्ये रक्कम रू.२५० चा कमी भरणा केल्याबाबत.**

उक्त संदर्भिय विषयान्वये जलतरण तलाव या विभागाचे सन २००२-०३ ते सन २००७-८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००४-०५ चे कॅश रजिस्टरची पाहणी करतांना असे निदर्शनास आले की, दिनांक १२.५.२००४ पान क्र.३७ वर एकूण बेरीज रक्कम रू.७९२५/- एवढी घ्यावयास पाहिजे असतांना रक्कम रू.७६७५/- एवढी दर्शविली आहे. म्हणजेच रक्कम रू.२५०/- चा कमी भरणा केलेला असून पा.क्र.२८४८६३,दि.२१.३.२००९ नुसार रक्कम रू.२५०/- चा मनपा फ़ंडात भरणा केला आहे. तथापी विभागाने भविष्यात अशा चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.९ :सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद नोंदणी फ़ॉर्म क्रमांक (३९०१ ते ४३००) चे रक्कम रू.५००/– कमी भरणा करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००२-०३ ते सन २००७-०८ चे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००६-०७ चे कॅश रजिस्टरची चाचणी केली असता दिनांक २४.५.२००६ रोजी सभासद नोंदणी फ़ॉर्म प्रत्येकी रू.५ प्रमाणे ४०० फ़ॉर्मचे रक्कम रू. २००० /- वसूल करावयास पाहिजे होते. परंतु संबंधिताने १५०० रू. वसूल केले आहे. म्हणजेच संबंधिताने ५०० रू. चा कमी भरणा केला आहे.

कमी भरणा केलेली रक्कम रू.५००/- चा भरणा पा.क्र. २८४८६५, दि.२१.३.२००९ नुसार मनपा फ़ंडात भरणा केला आहे.

तथापी विभागाने भविष्यात अशा चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१० : आर्थिक वर्ष सन २००६–०७ मध्ये एकूण बेरजेमध्ये रक्कम रू.२००/– चा कमी भरणा केल्याबाबत.**

उक्त संदर्भिय विषयान्वये जलतरण तलाव या विभागाचे सन २००२-०३ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००६-७ चे कॅश रजिस्टरची पाहणी करतांना असे निदर्शनास आले की, दिनांक ५.४.२००६ पान क्र. – एकूण बेरीज रक्कम रू.२१४२५/- एवढी घ्यावयास पाहिजे असतांना रक्कम रू.२१२२५/- एवढी दर्शविली आहे. म्हणजेच रक्कम रू.२००/- चा कमी भरणा केलेला असून पा.क्र.२८४८६६,दि.२१.३.२००९ नुसार मनपा फ़ंडात भरणा केला आहे.

तथापी विभागाने भविष्यात अशा चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.११ : आर्थिक वर्ष सन २००६–०७ मध्ये एकूण पावत्यांमध्ये रक्कम रू.५१५/– चा कमी भरणा केल्याबाबत.**

उक्त संदर्भिय विषयान्वये सिध्दार्थ जलतरण तलाव येथे आर्थिक वर्ष सन २००२-२००३ ते सन २००७-०८ या वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून बुक क्र.१६४२ पावती क्र.१६४१९८ क्षिरसागर अविनाश उध्दवराव यांच्या नावाचे रक्कम रू.५१५/- मासिक वर्गणीची पावती .फाडलेली असून कॅश बुक मध्ये बुक क्र.१६४२ पावती क्र.१६४१९९ दिनांक ४.४.२००६ पावती सुध्दा फ़ाडलेली आहे. परंतु १६४१९८ ची नोंद मुसाखान नवाब खान या नावाने घेण्यात आली असून ५१५/- चा भरणा करण्यात आला आहे व क्षिरसागर अविनाश उध्दवरावचे नांव कॅश बुकला घेतलेले नाही. म्हणजेच १६४१९९ पावतीची रक्कम रू.५१५/- कमी भरणा केलेला असून पा.क्र.२८४८६४, दि.२१.३.२००९ नुसार मनपा फ़ंडात जमा केला आहे.

तथापी विभागाने भविष्यात अशा चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१२ : आर्थिक वर्ष २००६–०७ मध्ये जनरल बुक क्रमांक ३४० पावती क्रमांक ३३९६१ वरील रक्कम रू.२५०/– चा कमी भरणा केल्याबाबत.**

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००२-०३ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००६-०७ या वर्षाचे लेखे पाहतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. जनरल बुक क्रमांक ३४० हे भांडार विभागातून आर्थिक वर्ष २००३-०४ मध्ये प्राप्त झाले आहे. परंतु सदरील जनरल पुस्तक क्रमांक ३४० हे सन २००६-०७ मध्ये वापरण्यात आले.

२. जनरल पुस्तक क्रमांक ३४० बाबतचे सभासद नोंदणी फ़ॉर्म लेखापरीक्षण कामी उपलब्ध झालेले नाही. संबंधिताने सन २००६-०७ मध्ये कॅशचा भरणा केला आहे.

३. जनरल पुस्तक क्रमांक ३४० पावती क्रमांक ३३९६१ वर रक्कम रू.७१५ वसूल केली आहे. परंतु दिनांक २४.४.२००६ रोजी कॅश रजिस्टरला भरणा करतांना रक्कम रू.४६५/- चा भरणा केला आहे. म्हणजेच रक्कम रू.२५०/- चा कमी भरणा केला आहे.

तरी मुद्या क्रमांक १,२ व ३ बाबत विभागाने खातरजमा करून तसा लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक आहे. (पा.क्र.३२९९४२, दि.२.६.२००९ नुसार रक्कम मनपा फ़ंडात जमा केली आहे. )

**परिच्छेद क्र.१३ : १) आर्थिक वर्ष सन २००७-२००८ मध्ये जनरल पुस्तक क्र.२१९० पावती क्र.२१८९९५ वरील रक्कम रू.२८५/- चा कमी भरणा केल्याबाबत.**

**२)कॅश रजिस्टर व दिनांक १७.४.२००७ पान क्र.३३ वर रक्कम रू.२००/- चा कमी भरणा केल्याबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००२-२००३ ते सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००७-२००८ चे जनरल बुक क्र. २१९० पावती क्र.२१८९९५ वरील रक्कम रू.३००/- असतांना आपण फ़क्त १५ चा भरणा केलेला दिसतो तरी रक्कम रू.२८५/- चा कमी भरणा केलेला आहे. (पावती क्र.२१८९८८ ते २१९०००) एकूण रक्कम४८० होत असतांना १९५/- भरण्यात आलेले आहे म्हणजेच रक्कम रू.२८५/- चा कमी भरणा करण्यात आला आहे.

तसेच कॅश रजिस्टर १, दिनांक १७.४.२००७ पान क्र.३३ वर एकूण रक्कम रू.२२७४०/- होते परंतु सदरील पानावर एकूण रक्कम रू.२२५४०/- दर्शविण्यात आली आहे म्हणजेच रक्कम रू.२००/- चा कमी भरणा करण्यात आला आहे.

तरी रक्कम रू.२८५/- व रक्कम रू.२००/- चा भरणा केलेला असून पा.क्र.२८४८७२ दि.२१.३.२००९ नुसार रक्कम रू.४८५/- भरणा केला आहे.

तथापी विभागाने भविष्यात अशा चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. १४ : लेखापरीक्षण कामासाठी सन २००२-०३ ते सन २००७-०८ पर्यंतचे जलतरण विभाग येथील जनरल पुस्तक साठा नोंद वही (Stock Reg.) उपलब्ध करणे बाबत.**

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये जलतरण विभागाचे सन २००२-०३ ते सन २००७-०८ पर्यंतचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत होते लेखापरीक्षण कामी साठा नोंदवही (Stock Reg.) आवश्यक असल्याने ते उपलब्ध करून देण्यात आले असून भांडार विभागाने वर्षनिहाय अचूक माहिती उपलब्ध न करून दिल्यामुळे Stock Reg तपासणी करण्यात आले नाही.

संबंधित विभागाचे अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र. १५ : जलतरण विभागातील सभासद नोंदणी फ़ॉर्म (प्रवेश अर्ज) क्रमांकासह व साठा नोंद वही उपलब्ध करून देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये जलतरण विभाग येथील सन २००२-०३ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून आपल्या विभागाला भांडार विभागाने निर्गमित केलेल्या सभासद नोंदणी फ़ॉर्म (प्रवेश अर्ज) क्रमांकासह व त्या संबंधित साठा नोंद वही लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही आणि काही प्रमाणात प्रवेश फ़ॉर्म लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

संबंधित विभागाचे अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र. १६ : जलतरण तलाव येथील गेट वरील दैनंदिन सभासद नोंदणी रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत.**

उपरोक्त विषयान्वये जलतरण विभाग येथील सन २००२-०३ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असून या विभागाने ठेवलेले दैनंदिन सभासद नोंदणी रजिस्टर लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

तथापि, विभागाकडून केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.१७ : जलतरण विभाग येथील सभासदांची वर्षनिहाय एकूण सभासद संख्या बाबत माहिती लेखापरीक्षणास्तव उपलब्ध करून देणे बाबत.**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, जलतरण विभागातील सन २००२-०३ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले आहे. सदर कामी महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या वर्गनिहाय जसे आजीवन सभासद ,वार्षिक सभासद, तिमाही सभासद, मासिक सभासद ,कौटुंबिक सभासद या बाबतची वर्षनिहाय सभासद संख्या लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

तथापि विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.१८ :आर्थिक वर्ष सन २००२–०३ ते सन २००७–०८ या आर्थिक वर्षातील सिध्दार्थ जलतरण तलाव येथे भांडार विभागातून वितरीत करण्यात आलेल्या ओळखपत्राची माहिती (क्रमांकासह) व साठा रजिस्टर उपलब्ध करून देण्या बाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सन २००२-२००३ ते सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असून लेखापरीक्षण कामी भांडार विभागातून वितरीत केलेले ओळखपत्र (क्रमांकासह) व साठा रजिस्टर लेखापरीक्षण कामी आवश्यक असल्याने अतिसत्वर उपलब्ध करून देण्याबाबत कळविले असता अद्यापपावेतो उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

तथापि विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.१९ : आर्थिक वर्ष सन २००२–२००३ ते सन २००७–२००८ या आर्थिक वर्षातील सिध्दार्थ जलतरण तलाव येथील लॉकर्स व कोचिंग फ़ीस पोटी जमा झालेल्या रकमेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सन २००२-२००३ ते सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात पोहण्यासाठी येणाऱ्या सभासदांना त्यांचे सामान ठेवण्यासाठी महानगरपालिकेने लॉकर्सची फ़ी प्रतीवर्ष २००/- घेवून लॉकर्सची सुविधा दिलेली आहे. तेव्हा त्या पोटी सन २००२-२००३ ते सन २००७-२००८ या कालावधीत किती रक्कम वसूल झाली त्याची माहिती व एकूण लॉकर्स किती आहे याबाबतची वर्षनिहाय माहिती देण्यात यावी.

तसेच शिकाऊ उमेदवारासाठी महानगरपालिकेने कोच नेमलेले आहे व पोहणे शिकविण्यासाठी सभासदाकडून कोचिंग फ़ी प्रती महिना रक्कम रू.२००/- घेतली जाते. तेव्हा सन २००२-०३ ते सन २००७-२००८ या कालावधीत किती कोचिंग फ़ीस जमा झाली त्याची माहिती वर्षनिहाय लेखापरीक्षण कामी आवश्यक असल्याने तीन दिवसांत उपलब्ध करून देण्यात यावी.

तथापि विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.२० : आर्थिक वर्ष सन २००२–०३ ते सन २००७–२००८ या आर्थिक वर्षातील सभासद नोंदणी .फ़ॉर्म बाबत.**

सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सन २००२-२००३ ते सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून सभासद नोंदणी एकूण ९३३६ असून त्यापैकी त्यांनी लेखापरीक्षण कामी ३०४१ फ़ॉर्म उपलब्ध करून दिलेले आहे व उर्वरीत सभासद फ़ॉर्म ६२९५ उपलब्ध करून देण्यात आलेले नाही.

तरी उर्वरीत ६२९५ फ़ॉर्म लेखापरीक्षण कामी त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावे.

तथापि विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला. ( सभासद नोंदणी फ़ॉर्म तक्ता खालीलप्रमाणे).

**सिध्दार्थ जलतरण तलाव येथील सभासद / सभासद नोंदणी फ़ॉर्म बाबत स्थिती दर्शविणारा तक्ता.**

| अ.क्र. | सन | एकूण सभासद | लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून दिलेले फ़ॉर्म संख्या | लेखापरीक्षण कामी उपलब्ध न करून दिलेले फ़ॉर्म संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २००२-२००३ | १२३१ | ५०० | ७३१ | -- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | २००३-२००४ | १००७ | २४६ | ७६१ | जनरल पुस्तक क्र.४ सभासद नोंदणी फ़ॉर्म नुसार. |
| ३ | २००४-२००५ | १२१४ | ३४१ | ८७३ | जनरल पुस्तक क्र.६८ व ४६७ च्या सभासद नोंदणी फ़ॉर्म नुसार. |
| ४ | २००५-२००६ | १७२४ | ५०५ | १२१९ | जनरल पुस्तक क्र.४६९ च्या सभासद नोंदणी फ़ॉर्म नुसार. |
| ५ | २००६-२००७ | २०३४ | ६२० | १४१४ | जनरल पुस्तक क्र.३४० व ७४७ च्या सभासद नोंदणी फ़ॉर्म नुसार. |
| ६ | २००७-२००८ | २१२६ | ८२९ | १२९७ | -- |
| | **एकूण** | **९३३६** | **३०४१** | **६२९५** | -- |

**परिच्छेद क्र.२१ : सिध्दार्थ जलतरण तलाव येथील स्टॉक रजिस्टर प्रमाणे भांडार विभागामार्फ़त वितरीत केलेले सदस्य नोंदणी फ़ॉर्म बाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयी सिध्दार्थ जलतरण तलाव या विभागाचे सन २००२-०३ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले असून या अंतर्गत जलतरण तलाव विभागामार्फ़त अद्ययावत ठेवण्यात आलेले स्टॉक रजिस्टर प्रमाणे (सदस्यांना वितरीत केलेले सदस्य नोंदणी फ़ॉर्म नुसार ) प्राप्त माहिती नुसार जलतरण तलाव येथे सन १९९४ –९५ ते सन २००७-०८ पर्यंत एकूण १ ते ५००० इतकेच सदस्य नोंदणी फ़ॉर्म वितरीत केल्याचे दिसून येते व आपल्या विभागामार्फ़त दोनदा १ ते १०,००० म्हणजेच एकूण २०,००० इतके सदस्य नोंदणी फ़ॉर्म सदस्यांना वितरीत करून नोंदणी केल्याचे विभागाचे लेख्यांवरून व वापरण्यात आलेल्या सदस्य नोंदणी फ़ॉर्म संख्येवरून दिसून आले.

तरी याबाबत विभागाने खातरजमा करून तसा अहवाल लेखापरीक्षण विभागास सादर करावा असे सूचित केले असता अनुपालन प्राप्त झाले असून विभागाचा खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.२२ : सन १९९३–९४ ते सन २००७–०८ या आर्थिक वर्षात सिध्दार्थ जलतरण विभाग येथे वितरीत केलेल्या पावती पुस्तकांचा तपशिल मिळणे बाबत.**

सिध्दार्थ जलतरण विभाग येथील सन २००२-०३ ते सन २००७-८ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले असून या कालावधीत आर्थिक वर्ष सन १९९३-९४ या कालावधीतील पुस्तक वापरले असल्यामुळे भांडार विभागाने वरील विभागास वितरीत केलेल्या पावती पुस्तकांचा वर्षनिहाय तपशिल मिळणे बाबत आपणास कळविण्यात आले होते. तथापि भांडार विभागाने सन १९९३-९४ पासून पावती पुस्तकांचा तपशिल उपलब्ध करून दिलेले आहे परंतु भांडार विभागाकडून प्राप्त माहिती वर्षनिहाय अचूक दिलेली नाही. त्यामुळे पावती पुस्तकांचा तपशिल तपासता आला नाही.

# सिध्दार्थ जलतरण तलाव विभाग

लेखापरीक्षण अहवाल

सन २००२-०३ ते २००७-०८.

**(ब) खर्च बाजुचे लेखापरीक्षण:**

सिध्दार्थ जलतरण तलाव विभागाचे सन २००२-०३ ते सन २००६-०७ या वर्षातील अभिलेख्यांचे थकीत लेखापरीक्षण व सन २००७-२००८ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये खर्च बाजुच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेतली असून तपासणी कालावधीत जे आक्षेप आढळून आले ते खालील प्रमाणे .

**परिच्छेद क्र.१ : सिध्दार्थ जलतरण विभाग येथील खर्च बाजूच्या संचिका उपलब्ध करून देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये सिध्दार्थ जलतरण विभाग येथील सन २००२-०३ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून जलतरण विभाग येथील खर्च बाजूच्या संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून द्यावे असे सूचित केले असता अद्यापपावेतो संचिका अप्राप्त आहेत.

संबंधित विभागाकडून खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात आला.

**परिच्छेद क्र.२ : आर्थिक वर्ष सन २००२-०३ ते सन २००७-०८ या वर्षातील सिध्दार्थ जलतरण तलाव येथील तुरटी, ब्लिचिंग पावडर, गॅस टोनर बाबतचे स्टॉक रजिस्टर, वितरण रजिस्टर लॉग बुक लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणेबाबत.**

उक्त विषयान्वये आर्थिक वर्ष सन २००२ –०३ ते सन २००७-२००८ चे लेखापरीक्षण कार्यरत असून उक्त कामी उपरोक्त विषया मध्ये दर्शविलेले लेखे लेखापरीक्षणास्तव आवश्यक असल्याने सत्वर उपलब्ध करून देण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो लेखे अप्राप्त आहेत.

तथापि, विभागाकडून अनुपालन प्राप्त झाले असून खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.३ : आर्थिक वर्ष २००२-२००३ ते सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील सिध्दार्थ जलतरण तलावावर घेण्यात आलेल्या स्पर्धा व इतर कामासाठी अग्रिम रकमेबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सन २००२-२००३ ते सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात स्पर्धा व इतर कामासाठी आगाऊ रक्कम (अग्रिम) किती घेतलेले आहे त्याची वर्षनिहाय तपशिलवार माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच अग्रिम रकमेचे समायोजन केले असल्यास

त्याच्या वर्षनिहाय संचिका उपलब्ध करून देण्यात याव्यात व अग्रिम रक्कम घेतलेले रजिस्टर उपलब्ध करून देण्यात यावे.

तसेच सन २००२-२००३ ते सन २००७-२००८ या वर्षात बाहेरील (लोकांना /संस्थांना) स्पर्धा घेण्यासाठी जलतरण तलाव देण्यात आला व त्यापोटी किती फ़ी जमा झाली त्याची माहिती वर्षनिहाय लेखापरीक्षण कामी आवश्यक असल्याने अद्यापपावेतो उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

तथापि विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

# वॉर्ड – ड कार्यालय
# सन २००५–०६ ते सन २००८–०९
# लेखापरीक्षण अहवाल.

सन २००५-२००६ ते सन २००७-२००८ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांचे थकित लेखापरीक्षण व सन २००८-०९ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आली. सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान निम्ननिर्दिष्ट केल्यानुसार पावती पुस्तकांची पडताळणी करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकांबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मालमत्ता कर वसूली पावती पुस्तके | - | ४०१ |
| २. | पाणीपट्टी कर वसूली पावती पुस्तके | - | २७४ |
| ३. | जनरल पावती पुस्तके | - | १४९ |

उक्त पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टर मध्ये घेवून मनपा फ़ंडात जमा केल्याबाबत तपासणी करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्ता धारकाकडील वसूल करावयाच्या कर नोंदी ह्या मागणी रजिस्टर प्रमाणे घेतलेल्या आहेत/नाहीत याबाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने चाचणी लेखापरीक्षणही करण्यात आले. तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या /आक्षेपार्ह बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**<u>जमा बाजुचे लेखापरीक्षण :</u>**

**परिच्छेद क्र. १ : मालमत्ता पा.क्र.१०३८१४ वर रू.५०००/– असतांना कॅश रजिस्टरवर खाडाखोड करून रक्कम रू.२५,०००/– दर्शविल्या बाबत.**

वॉर्ड - ड चे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून या अंतर्गत कॅश रजिस्टरची तपासणी करतांना मालमत्ता धारक मो.गफ्रु द्दीन रा.समतानगर घ.क्र.५-१७-३३/२२० (मालमत्ता मागणी रजि.क्र. ए-७ पान क्र.३६) मालमत्ता पा.पु.क्र./१०३९, पावती क्र.१०३८१४, दिनांक ६.४.२००५ अन्वये रक्कम रू.५०००/- ची वसूली करण्यात आली असून सदरील पावतीची कॅश रजिस्टर क्र.१, दिनांक ८.४.२००५ रोजी भरणा करतांना प्रत्यक्षात पावतीची रक्कम रू.५०००/- एवढी दर्शविणे आवश्यक होते.

परंतु संबंधिताने कॅश रजिस्टरवर नोंद घेतांना खाडाखोड करून रक्कम रू.२५०००/- सन १९८९ ते ९५ पर्यंत भरणा केल्याचे दर्शविले आहे. त्यामुळे असे दिसते की, महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड - ड या विभागाकडून पुढील वर्षी मालमत्ता कराच्या मागणी मध्ये रक्कम रू.२०,०००/- चे आर्थिक नुकसान झाले असते. लेखापरीक्षण विभागाने आक्षेप नोंदविल्यानंतर संबंधित विभागाने

जा.क्र./मनपा/वॉर्ड-ड/१७१९/०९, दिनांक ७.१०.२००९ रोजी पत्र देवून संबंधित विभागाने सदरील मालमत्ता धारकास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८ (१) अन्वये दिनांक ९.७.२००९ रोजी अ.क्र.४५६७ नुसार मागणी बील देण्यात आले.

**परिच्छेद क्र.२: कार्यालयीन साहित्याचे स्टॉक आणि डेड स्टॉक रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत.**

प्रभाग क्र. ड ,क्रांतीचौक सन २००५-०६ व सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान आपल्या विभागाचे स्टॉक आणि डेड स्टॉक रजिस्टरची लेखापरीक्षणकामी आवश्यक असल्याने विभागाने सदरील रजिस्टर तयार करून लेखापरीक्षणास सादर केलेले आहे.

**परिच्छेद क्र.३ : सन २००५–०६ मधील वॉर्ड – ड येथील कॅश रजिस्टरला मालमत्ता पावती क्रमांक १३२५८६ ची नोंद न दर्शविल्याबाबत.**

प्रभाग – ड चे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेण्यात आले असून या अंतर्गत कॅश रजिस्अरची तपासणी करतांना मालमत्ता कर पावती पुस्तक क्र.१३२६ पावती क्र.१३२५८६ दिनांक १०.३.२००६ अन्वये रक्कम रू.२७२६/- ची पावती फ़ाडण्यात आलेली असून सदरील पावतीची ईरसाल रजिस्टर क्रमांक ८, दिनांक १०.३.२००६ पान क्र.१४८ व १४९ वर नोंद घ्यावयास पाहिजे असतांना सदरील मालमत्ता कर पावतीची नोंद घेतलेली दिसून आलेली नाही.

तरी आक्षेपित रक्कम रू.२७२६/- जनरल पावती पुस्तक क्र.३३१२ पावती क्रमांक ३३११०१ दिनांक २६.६.२००९ चा मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.४: वॉर्ड – ड मधील पावत्या रद्द केल्याबाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयाचे सन २००५-०६ ते सन २००८-०९ या कालावधीमधील लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून या अंतर्गत मालमत्ता कर पावती पुस्तकांची तपासणी करीत असतांना बऱ्याच प्रमाणात पावत्या रद्द करण्यात आलेल्या आहे. ज्या पावत्या रद्द केल्या आहे त्या वॉर्ड अधिकाऱ्याच्या संमतीने केलेल्या दिसत नसून त्यावर वॉर्ड अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व शिक्का घेतलेला नाही असे दिसून येते.

तरी या बाबत विभागाने वॉर्ड अधिकारी यांच्या रद्द पावत्यावर स्वाक्षरी का घेण्यात आल्या नाही त्या बाबत विभागाने तत्कालीन रोखपाल यांना जा.क्र./मनपा/वॉर्ड-ड/७६०/०९, दिनांक २३.६.२००९ रोजी पत्र काढण्यात आल्याचे लेखापरीक्षण विभागास कळविले आहे.

**परिच्छेद क्र.५: वॉर्ड – ड कार्यालया अंतर्गत येणाऱ्या सिनेमागृहाच्या शो टॅक्स बाबत.**

प्रभाग – ड चे सन २००५-०६ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण हाती घेतले असून सन २००५-०६ या वर्षात मालमत्ता पावती पुस्तक क्र.१२३३ पावती क्र.१२३२७३

व १२३२७४ तसेच पावती पुस्तक क्रमांक १४१९ पावती क्रमांक १४१८५४ व १४१८५५ नुसार रक्कम केल्याचे दिसून येते. परंतु सदरील रक्कम कोणत्या आधारे वसूल करण्यात आली याबाबत सदरील विभागाने संचिका /रजिस्टर/अभिलेखे उपलब्ध करून देणे आणि आपल्या विभागाअंतर्गत किती सिनेमागृह व नाट्यगृह आहे त्याबाबतची माहिती व आतापर्यंत शोटॅक्सची किती रक्कम वसूल केली याचा तपशिल विभागाने सादर करावा.

तरी वरील मुद्यांबाबत विभागाने संचिका आणि रजिस्टर/ अभिलेखे उपलब्ध करून दिलेली नाही व किती सिनेमागृह व नाट्यगृह आहे याचीही माहिती अद्यापपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.६: सन २००५–२००६ मधील कॅश रजिस्टरला पाणीपट्टी कर पावती क्र. १६२२९४ ची नोंद न दर्शविल्याबाबत.**

प्रभाग – ड चे सन २००५-०६ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून या अंतर्गत कॅश रजिस्टरची तपासणी करतांना पाणीपट्टी कर पावती पुस्तक क्र.१६२३ पावती क्र.१६२२९४ दिनांक १९.७.२००५ अन्वये रक्कम रू.१८००/- ची पावती फ़ाडण्यात आलेली असून सदरील पावतीची इरसाल (कॅश) रजिस्टर क्रमांक ३ पान क्रमांक १५ वर नोंद घ्यावयास पाहिजे असतांना सदरील पाणीपट्टी कर पावतीची नोंद घेतलेली दिसून आलेली नाही. म्हणजे मनपा फ़ंडात रू.१८००/- चा भरणा झालेला नाही.

तरी आक्षेपित रक्कम रू.१८००/- जनरल पावती पुस्तक क्र.३३१४पावती क्रमांक ३३१३०१ दिनांक ३.७.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.७: कॅश रजिस्टरवर पाणीपट्टी कर वसूली पावतीची नोंद कमी दर्शविणे बाबत.**

प्रभाग – ड चे सन २००५-०६ ते सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००५-०६ या वर्षात पाणीपट्टी पावती पुस्तक आणि इरसाल (कॅश) रजिस्टरची एकत्रित तपासणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.२०१७ पावती क्र.२०१६६५ दि.११.३.२००६ श्री.दादाराव ए.कोलते नळ खाते क्र.६८०५ अजबनगर ५-२४-३४ यांच्याकडून मार्च २००६ पर्यंत रक्कम रू.३६००/- ची पावतीची वसूली करण्यात आली असून इरसाल (कॅश) रजिस्टर क्र.९ पान क्र.६ वर सदरील पावतीची नोंद देतांना रक्कम रू.१८००/- ची घेतल्याचे दिसून येते. म्हणजेच रक्कम रू.१८००/- चा कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

२. पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.२०१७ पावती क्र.२०१६६९ दि.११.३.२००६ श्री.सांडू बाबुराव विसपुते नळ खाते क्र.७०३७६ घ.क्र.४-१८-२१/पी यांच्याकडून मार्च २००६ पर्यंत रक्कम रू.५४००/- ची पावतीची वसूली करण्यात आली असून इरसाल (कॅश) रजिस्टर क्र.९ पान क्र.६ वर सदरील पावतीची नोंद घेतांना रक्कम रू.१८००/- ची घेतल्याचे दिसून येते. म्हणजेच रक्कम रू.३६००/- चा कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

तरी आक्षेपित रक्कम रू.१८०० बाबत विभागाने असे कळविले आहे की, श्री.इंगळे या पाणीपट्टी धारकाची डबल नोंद झाल्यामुळे सदरील पावती रद्द करण्यात आली आहे. आणि जनरल पावती पुस्तक क्र.३४०६ पावती क्रमांक ३४०५०१ दिनांक १७.९.२००४ रोजी रक्कम रू.३६००/- चा भरणा मनपा फ़ंडात केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.८: १) वॉर्ड – ड येथील कॅशिअर कॅश रजिस्टर क्रमांक १, पान क्रमांक ३ वर रक्कम रू.१५०० चा कमी भरणा केले बाबत.**
**२) पान क्रमांक ८५ वर रक्कम रू.९९ चा कमी भरणा करण्याबाबत.**

प्रभाग – ड चे सन २००५-०६ चे लेखापरीक्षण कार्यरत असून इरसाल रजिस्टर क्रमांक - १ पान क्रमांक ३ वर एकूण बेरीज ८१६२४ एवढी दर्शविली आहे. प्रत्यक्षात बेरीज ८३१२४ एवढी घ्यावयास पाहिजे होती म्हणजेच रक्कम रू.१५०० चा कमी भरणा केला आहे. तसेच पान क्रमांक ८५ वर एकूण बेरीज ६८३९२/- एवढी घेतली आहे. प्रत्यक्षात एकूण बेरीज ६८४९१ घ्यावयास पाहिजे होती म्हणजेच रक्कम रू.९९/- चा कमी भरणा केला आहे.

तरी एकत्रित आक्षेपित रक्कम रू.१५९९/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६६ पावती क्र.३४६५०४ दिनांक २७.७.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.९ : पाणीपट्टी पावती क्र.२१५५१३/२१५६ ची रक्कम रू.१८००/- ची कॅश रजिस्टरची नोंद न घेणे बाबत.**

प्रभाग – ड चे सन २००५-०६ चे लेखापरीक्षण कार्यरत असून पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.२१५६ पावती क्रमांक २१५५१३ दिनांक ३१.३.२००६ श्री.एन.एस.देशमुख रोकडिया हनुमान कॉलनी नळ खाते क्रमांक ६१४०७ रक्कम रू.१८००/- चा धनादेश क्रमांक ००९१६२०, दि.३१.३.२००६ उक्त पावती द्वारे भरणा केलेला आहे. परंतु इरसाल (कॅश) रजिस्टरला रक्कम रू.१८००/- चा भरणा झालेला दिसून आलेला नाही.

करिता, उपरोक्त १८००/- ची खातरजमा करून लेखी खुलासा लेखापरीक्षण विभागास जा.क्र./मनपा/वॉर्ड-ड/१११३/०९, दिनांक २७.७.२००९ रोजी कळविले असून सदरील धनादेश दिनांक ३१.३.२००६ रोजी मुख्य कॅशियर कॅश बुक पावती क्रमांक ९० नुसार महानगरपालिका फ़ंडात जमा झालेला आहे.

**परिच्छेद क्र.१०: पाणीपट्टी पावती क्र.२४२६/२४२५४१ ची इरसाल (कॅश) रजिस्टरवर कमी रकमेची नोंद घेणे बाबत.**

प्रभाग –ड चे सन २००६-०७ चे लेखापरीक्षण कार्यरत असून पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.२४२६ पावती क्र.२४२५४१ दिनांक ११.१.२००७ श्री.बाबुराव सांडुजी गायकवाड ,खाते

क्र.२०२६८ रक्कम रू.६४०० ची पावतीची वसूली करण्यात आली असून इरसाल (कॅश) रजिस्टर क्र.६, दि.११.७.२००७ वर सदरील पावतीची नोंद घेतांना रक्कम रू.५४००/- ची घेतल्याचे दिसून येते. म्हणजेच रक्कम रू.१०००/- चा कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

तरी आक्षेपित रक्कम रू.१०००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्रमांक ३४६२९५ दिनांक ३.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.११: पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.२५०० पावती क्र.२४९९५५ ची कॅश रजिस्टर रक्कम रू.१०००/– चा कमी भरणा केल्याबाबत.**

प्रभाग – ड चे सन २००६-०७ चे लेखापरीक्षण कार्यरत असून पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.२५०० पावती क्रमांक २४९९५५ दिनांक २६.३.२००७ श्री.सिताराम कोंडीराम सुपेकर नळखाते क्र.१३४७९, मोहल्ला कैलास नगर रक्कम रू.१०००/- ची पावती वसूली करण्यात आली असून इरसाल (कॅश) रजिस्टर क्रमांक ११ दिनांक २६.३.२००७ वर सदरील पावतीची नोंद घेण्यात आलेली आहे.

परंतु एकूण बेरजेतून रक्कम रू.१०००/- ची वजावट करण्यात आलेली आहे व त्यानंतर ह्या रकमेचा कोठेही भरणा केल्याचे दिसून येत नाही.

करिता याबाबत विभागाने शहानिशा करून आक्षेपित रक्कम रू.१०००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६६ पावती क्रमांक ३४६५०२ दिनांक ५.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१२: सन २००६–०७ मधील वॉर्ड – ड येथील कॅश रजिस्टरला मालमत्ता पावती क्र. १४५३९९ व पा.क्र.१४५४०० नोंद न दर्शविल्याबाबत.**

वॉर्ड - ड चे सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून या अंतर्गत इरसाल (कॅश) रजिस्टरची तपासणी करतांना मालमत्ता कर पावती पुस्तक क्र.१४५४ पावती क्र.१४५३९९ दि.१७.४.२००६ अन्व्ये रक्कम रू.५१९६ चेक क्र.०७६७८२ दिनांक ३१.३.२००६ ची पावती फ़ाडण्यात आलेली आहे आणि पावती क्र.१४५४०० दिनांक १७.४.२००६ अन्व्ये रक्कम रू.४०६४ ची पावती फ़ाडण्यात आलेली असून सदरील दोन्ही पावतीची इरसाल (कॅश) रजिस्टरला नोंद घ्यावयास पाहिजे असतांना सदरील मालमत्ता कर पावतीची नोंद घेतेलली दिसून आलेली नाही.

करिता, दोन्ही पावतीची एकत्रित आक्षेपित रक्कम रू.९२६०/- जनरल पावती पुस्तक क्र.३४५४ पा.क्र.३४५३७७ दिनांक १२.८.२००९ रोजी रक्कम रू.५१९६ व जनरल पावती पुस्तक क्र.३४५४ पावती क्र.३४५३७६ दिनांक १२.८.२००९ रोजी रक्कम रू.४०६४ चा भरणा मनपा फ़ंडात केलेला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१३: जनरल पावती पुस्तक क्र.१८५० पावती क्रमांक १८४९०५ ,१८४९०९ १८४९१० रक्कम रू.९००/– चा कॅश रजिस्टरला नोंद न दर्शविल्याबाबत.**

प्रभाग – ड चे सन २००६-०७ चे लेखापरीक्षण कार्यरत असून जनरल पावती पुस्तक क्र.१८५० पावती क्रमांक १८४९०५, दि.६.११.२००६ रक्कम रू.१००/-, पावती पुस्तक क्र.१८५० पावती क्रमांक १८४९०९ दि.४.१.२००७ रक्कम रू.५००/-, पावती पुस्तक क्र.१८५० पावती क्रमांक १८४९१० दि.५.१.२००७ रक्कम रू.३००/- अशी एकूण रक्कम रू.९००/- ची पावती फ़ाडण्यात आलेली असून सदरील तिन्ही पावत्यांच्या इरसाल (कॅश) रजिस्टरला नोंद घ्यावयास पाहिजे असतांना सदरील जनरल पावतीची नोंद घेतलेली दिसून आलेली नाही.

करिता, तिन्ही पावत्यांची एकत्रित आक्षेपित रक्कम रू.९००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६६ पावती क्रमांक ३४६५१० दिनांक १.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१४: प्रभाग – ड अंतर्गत वित्तीय वर्ष सन २००५–०६ ते सन २००८–०९ मध्ये तात्पुरते नळ कनेक्शन/ नविन नळ कनेक्शन /अभय योजना मध्ये मंजूर करण्यात आलेल्या नळ कनेक्शनची माहिती मिळणे बाबत.**

प्रभाग – ड कार्यालयाचे लेखापरीक्षणा दरम्यान वित्तीय वर्ष सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ मध्ये मंजूर झालेल्या तात्पुरते नळ कनेक्शन/ नविन नळ कनेक्शन/ अभय योजना मध्ये मंजूर करण्यात आलेल्या नळ कनेक्शन बाबत सविस्तर यादी लेखापरीक्षण विभागास तात्पुरत्या नळ कनेक्शरची यादी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे आणि नविन नळ कनेक्शन/ अभय योजना मध्ये मंजूर करण्यात आलेल्या नळ कनेक्शनची यादी उपलब्ध झालेली नाही.

**परिच्छेद क्र.१५: वित्तीय वर्ष २००७–०८ मधील ईरसाल रजिस्टरची एकूण बेरीज (दिनांक ३.९.२००७ ) मध्ये रक्कम रू.३०६० चा कमी भरणा केले बाबत.**

वॉर्ड - ड या विभागाचे वित्तीय वर्ष सन २००५-०६ ते वित्तीय वर्ष सन २००८-९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००७-८ मधील दिनांक ३.९.२००७ रोजी ईरसाल रजिस्टर ची एकूण भरणा रक्कम रू.११३४९७/- इतकी दर्शविली आहे. परंतु संबंधित रोखपाल यांनी पाणीपट्टी पावती क्रमांक २७३०१४/२७३१ दिनांक ३.९.२००७ वर डबल नोंद दर्शविली आहे व रक्कम रू.३०६० डबल भरणा झाली असे समजून दिनांक ४.९.२००७ रोजी रक्कम रू.३०६०/- वजावट केली आहे.

तरी विभागाने संबंधिताकडून आक्षेपित रक्कम रू.३०६० जनरल पावती पुस्तक क्र.३४५४ पावती क्रमांक ३४५३८५ दिनांक १०.८.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१६: कॅश रजिस्टर च्या अनियमिततेबाबत.**

प्रभाग – ड या विभागाचे सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून ईरसाल (कॅश) रजिस्टरची पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. कॅश रजिस्टरच्या पानावर पेजींग करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

२. सदरील विभागाचे कॅश रजिस्टर प्रमाणित केलेले नाही.

३. दैनंदिन कॅश देतांना सदरील विभागाचे रोखपाल व प्रभाग अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या केलेल्या दिसून आलेल्या नाही.

४. सदरील विभागाचे ऑफ़िस कॅश चलन देतांना त्याच्यावर रोखपाल व प्रभाग अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या आढळून आलेल्या नाही.
तरी याबाबत विभागाने तिन्ही तत्कालीन रोखपाल यास जा.क्र./मनपा/वॉर्ड - ड/१२३७/०९, दिनांक १०.८.२००९ रोजी पत्र काढण्यात आल्याचे कळविले आहे.

**परिच्छेद क्र.१७: जनरल पावती पुस्तक क्र.२७५९ पावती क्र.२७५८४८ रक्कम रू.१००/– चा कमी भरणा करण्याबाबत.**

प्रभाग-ड चे सन २००७-२००८ चे लेखा परीक्षण कार्यरत असून जनरल पावती पुस्तक क्र.२७५९ पावती क्र.२७५८४८ दिनांक २७.२.२००८ इरसाल (कॅश) रजिस्टर क्र.११ वरील दिनांक २४.३.२००८ विवाह नोंदणीची रक्कम रू.२५०/- ची पावती फ़ाडण्यात आलेली आहे. परंतु इरसाल रजिस्टरला रक्कम रू.१५०/- ची नोंद घेण्यात आलेली आहे. रक्कम रू.१००/- चा कमी भरणा करण्यात आलेला दिसून येतो. तसेच काही प्रकरणात रक्कम रू.२५०/- व काही प्रकरणात रक्कम रू.१५०/- वसूल केलेले दिसून येते. तरी आक्षेपित रक्कम रू.१००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्र.३४६२९८ दिनांक ३.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१८: जनरल पावती पुस्तक क्र.२२०४ पावती क्र.२२०३०७ ते २२०३०९ रक्कम रू.८००/– चा कॅश रजिस्टरला नोंद न दर्शविल्याबाबत.**

प्रभाग – ड चे सन २००७-२००८ चे लेखा परीक्षण कार्यरत असून जनरल पावती पुस्तक क्र. २२०४ पावती क्र.२२०३०७ रक्कम रू.३००/- दिनांक २६.११.२००७ दिनेश चंपालाल मुनोत, पावती पुस्तक क्र.२२०४ पावती क्र.२२०३०८ रक्कम रू.२५०/- दिनांक २६.११.२००७ जगन्नाथ दामोधर यादव, पावती पुस्तक क्र.२२०४ पावती क्र.२२०३०९ रक्कम रू.२५०/- दिनांक २६.११.२००७ बालाजी दर्शनी फ़ास्ट फुड अशा पावत्या फ़ाडण्यात आलेल्या असून सदरील तिन्ही पावत्यांच्या इरसाल कॅश रजिस्टरला नोंद घ्यावयास पाहिजे असतांना सदरील जनरल पावत्यांची नोंद घेतलेली दिसून आलेली नाही.

करिता वरील तिन्ही पावत्यांची एकत्रित आक्षेपित रक्कम रू.८००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्र.३४६२९७ दिनांक ३.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.१९: आर्थिक वर्ष सन २००६–०७ मधील पाणीपट्टी पुस्तक क्र.२६२३ लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालय येथील सन २००७-८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा अंतर्गत आर्थिक वर्ष २००६-०७ मधील पाणीपट्टी कर पावती पुस्तक क्र.२६२३ लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत अर्धसमास पत्र क्र.२७ दिनांक १८.९.२००९ जा.क्र./मनपा/मुलेप/२७२/०९, दिनांक २४.९.२००९ या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने संबंधित विभागाने दिनांक २५.९.२००९ रोजी पावती पुस्तक उपलब्ध करून दिलेले असून सदरील पाणीपट्टी पुस्तक क्र.२६२३ची पाहणी केली असता पावती क्र.२६२२०१ ते २६२२१३ पर्यंत अशा एकूण १३ पावत्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे व पावत्यांद्वारे संबंधित रोखपाल यांनी रक्कम रू.४८,९४५/- एवढी रक्कम वसूल केलेली आहे. परंतु दिनांक २३.९.२००९ पर्यंत रक्कम रू.४८,९४५/- चा भरणा मनपा फ़ंडात केलेला नव्हता.

सदरील पाणीपट्टी कर पावती पुस्तक क्र.२६२३ पावती क्रमांक २६२२१४ ते २६२३०० या पावत्या रद्द करण्यात आलेल्या आहे. परंतु संबंधिताने कोणत्या तारखेस पावतया रद्द केल्या व का रद्द केल्या याचा बोध होत नाही. तसेच विभागास पत्र दिल्यानंतर सन २००९-१० च्या इरसाल (कॅश) रजिस्टरला दिनांक २४.९.२००९ रोजी नोंदी घेवून रक्कम रू.४८,९४५ चा भरणा केलेला आहे.

**पावती पुस्तक क्र.२६२३ मधील पावती क्र.२६२२०१ ते २६२२१३ चे विवरण.**

| अ.क्र. | नांव | पावती क्र. | दिनांक | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | सागर अनिल धर्माधिकारी | २६२२०१ | २७.४.०७ | २२५०/- | |
| २ | अरूण बैजू निरजे | २६२२०२ | २६.४.०७ | २२५०/- | |
| ३ | दिपा भुषण फ़डके | २६२२०३ | २७.४.०७ | २२५०/- | |
| ४ | अशोक कंचन लालशहा | २६२२०४ | २.५.०७ | ६७७५/- | |
| ५ | संगिता राजेंद्र बंग | २६२२०५ | २.६.०७ | २२५०/- | |
| ६ | आश्विन जयप्रकाश लड्डा | २६२२०६ | २.६.०७ | २२५०/- | |
| ७ | दिपक राधेशाम झुनझुनवाला | २६२२०७ | २६.३.०८ | ८०५०/- | |
| ८ | अध्यक्ष मुक्ती सोपान | २६२२०८ | २९.३.०८ | ३०६०/- | |
| ९ | सौमंत मुखर्जी | २६२२०९ | २९.३.०८ | २११०/- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १० | शशांक तुकामरा खेरनार | २६२२१० | ३१.३.०८ | २१००/- | |
| ११ | अलेश व्ही. मुळे | २६२२११ | ३१.३.०८ | ४३००/- | |
| १२ | डि.व्ही.मुळे | २६२२१२ | ३१.३.०८ | ४३००/- | |
| १३ | डि.व्ही.मुळे | २६२२१३ | ३१.३.०८ | ७०००/- | |
| | | | **एकूण** | **४८,९४५/-** | |

**परिच्छेद क्र.२०: आर्थिक वर्ष २००८–०९ मधील वॉर्ड – ड येथील मालमत्ता बुक क्र.४११ मधील पावती क्र.४१०६५,४१०६६ ची कॅश रजिस्टरला नोंद न दर्शविल्याबाबत.**

वॉर्ड - ड येथील आर्थिक वर्ष २००८-०९ मधील मालमत्ता बुक क्र.४११ मधील मालमत्ता पावती क्र.४१०६५ रक्कम रू.६८८/- व पावती क्र.४१०६६ रक्कम रू.१०४७/- या दोन्ही पावतीची नोंद कॅश रजिसटरला दर्शविलेली नाही. म्हणजेच संबंधिताने एकत्रित रक्कम रू.१७३५/- चा महानगरपालिका फ़ंडात भरणा केलेला नाही.

तरी आक्षेपित रक्कम रू.१७३५/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्रमांक ३४६२८६ दिनांक १.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२१: पाणीपट्टी कर वसूली करतांना इरसाल रजिस्टरला कमी रक्कम दर्शविल्याबाबत. (रक्कम रू.१३,५००/–)**

वॉर्ड - ड कार्यालय येथे सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करतांना निम्ननिर्दिष्ट केल्याप्रमाणे पाणीपट्टी कर वसूली करतांना इरसाल रजिस्टरला कमी दर्शविलेली आहे ती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | नांव | पा.पु.क्र.व पावती क्र. | दिनांक | पावतीवर दर्शविलेली रक्कम | कॅश रजिस्टरवर दर्शविलेली रक्कम | फ़रक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.सुदाम एकनाथ गावंडे | ३११३<br>३११२३१ | १४.५.०८ | ३८१६/- | २०१६/- | १८००/- |
| २ | श्री.रिजुमल विद्यमन सैलानी | ३१९४<br>३१९३३३ | २५.६.०८ | ८७७५/- | १८००/- | ६९७५/- |
| ३ | श्री.बी.झेड.परदेशी | ३१९४<br>३१९३४० | २६.६.०८ | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| ४ | सौ.अलका मधुकर काथार | ३३५१<br>३३५०५४ | १३.११.०८ | २९२५/- | १८००/- | ११२५/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | श्री.शिवाजी अनंतराव देशमुख | ३३७६<br>३३७५८३ | ६.१.०९ | ३६००/- | १८००/- | १८००/- |
| | | | **एकूण** | **२२७१६/-** | **९२१६** | **१३५००/-** |

करिता उपनिर्दिष्ट रक्कम रू.१३,५००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्र.३४६२८१ दिनांक १.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२२: आर्थिक वर्ष २००८-९ मधील वॉर्ड - ड येथील जनरल बुक पावती पुस्तक क्र.२९८३ मधील पावती क्र.२९८२३८ या पावतीची कॅश रजिस्टरला कमी नोंद दर्शविल्याबाबत (रक्कम रू.२०००/-)**

वॉर्ड - ड कार्यालयातील आर्थिक वर्ष २००८-०९ मधील जनरल पावती पुस्तक क्र.२९८३ पावती क्र.२९८२३८ दिनांक १.९.२००८ वर श्री. भुपेंद्रसिंग बिंद्रा व इतर रा.गौतमनगर रक्कम रू.३५००/- दर्शविलेली आहे. परंतु संबंधित रोखपाल यांनी कॅश रजिस्टर क्र.७ दिनांक २४.९.२००८ रोजी पावतीची नोंद रक्कम रू.१५००/- दर्शविलेली आहे. महणजेच संबंधिताने रक्कम रू.२०००/- चा कमी भरणा केलेला आहे.

करिता संबंधिताकडून आक्षेपित रक्कम रू.२०००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्रमांक ३४६२८५ दिनांक १.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२३: आर्थिक वर्ष २००८-०९ मधील वॉर्ड - ड कार्यालय येथील जनरल पावती पुस्तक क्रमांक २९८६ पावती क्रमांक २९८५६५ ची कॅश रजिस्टरला कमी रक्कम भरणा केल्याबाबत. (रक्कम रू.४०००/-)**

वॉर्ड - ड कार्यालयातील आर्थिक वर्ष २००८-०९ चे लेखा परीक्षण करीत असतांना जनरल पुस्तक क्र.२९८६ पावती क्र.२९८५६५ दिनांक १८.९.२००८ वर शिवाजी करसन पटेल व शामजी भानजी पटेल यांच्याकडून रक्कम रू.४९००/- ची पावती फ़ाडण्यात आलेली आहे. परंतु कॅश रजिस्टर क्र.८ दिनांक २.१२.२००८ रोजी नोंद दर्शवितांना रक्कम रू.९००/- चा भरणा करण्यात आला आहे. म्हणजेच संबंधित रोखपाल यांनी रक्कम रू.४०००/- चा कमी भरणा केला आहे.

तरी आक्षेपित रक्कम रू.४०००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्रमांक ३४६२८४ दिनांक १.१०.२००७ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२४: आर्थिक वर्ष २००८–०९ मधील वॉर्ड – ड कार्यालय येथील जनरल पावती पुस्तक क्रमांक २९८४ ची कॅश रजिस्टरला कमी रक्कम भरणा केल्याबाबत. (रक्कम रू.११,०००/–)**

वॉर्ड - ड कार्यालयातील आर्थिक वर्ष २००८-०९ चे लेखा परीक्षण करीत असतांना जनरल पावती पुस्तक क्र.२९८४ पावती क्र.१ ते १०० ची एकूण रक्कम रू.२८,७४८/- एवढी होत असतांना कॅश रजिस्टर क्र.७ दिनांक २४.१०.२००८ रोजी सदरील एकत्रित पावत्यांची रक्कम रू.१७,७४८/- ची नोंद दर्शविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. म्हणजेच संबंधित रोखपाल यांनी रक्कम रू.११,०००/- चा कमी भरणा केलेला आहे.

तरी आक्षेपित रक्कम रू.११,०००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४६३ पावती क्रमांक ३४६२८० दिनांक १.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२५: दिनांक ३१.३.२००९ रोजी वॉर्ड ड कार्यालय येथील एकूण बेरीज मध्ये रक्कम रू.५५७०/– कमी रक्कम भरण्याबाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयातील सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना कॅश रजिस्टरची एकूण बेरीज करतांना एकूण बेरीज १,००,९०६२/- एवढी येते.

परंतु महानगरपालिका फ़ंडात भरणा करतांना १,००,८५,०५/- एवढा भरणा करण्यात आला आहे. म्हणजेच रक्कम रू.५५७०/- भरणा केल्याचे दिसून आले नाही.

करिता आक्षेपित रक्कम रू.५५७०/- जनरल पावती पुस्तक क्रमांक ३४६३ पावती क्रमांक ३४६२९९ दिनांक ३.१०.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२६: वॉर्ड – ड कार्यलय येथील सन २००५–६ ते सन २००८–०९ वर्षातील साठा (स्टॉक) रजिस्टर बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयाचे सन २००५-६ ते सन २००८-०९ या वर्षातील लेखापरीक्षण कार्यरत असून वॉर्ड मधील साठा रजिस्टरची पाहणी करीत असतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

१. स्टॉक रजिस्टर प्रमाणित नाही व रजिस्टरला पेजींग केलेली नाही.

२. भांडार विभागातून वॉर्ड - ड कार्यालयास प्राप्त केलेले मालमत्ता पावती पुस्तक, पाणीपट्टी पावती पुस्तक व जनरल पावती पुस्तकाच्या नोंदी स्टॉक रजिस्टरला दर्शविला आहे. परंतु त्यावर वॉर्ड अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तसेच पावती पुस्तके कोणी आणली व कोणास दिलेले आहे याबाबत नांव अथवा स्वाक्षऱ्या नाहीत.

३. वॉर्ड कार्यालयातील दैनंदिन कॅश भरणा केल्याबाबत चलन पाहिले असता त्यावर वॉर्ड अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या नाहीत.

करिता वॉर्ड - ड कार्यालयाने याबाबत तत्कालीन रोखपाल यांस जा.क्र./मनपा /वॉर्ड-ड /१८५०/०९, दिनांक २९.१०.२००९ रोजी पत्र दिल्याचे कळविले आहे.

**परिच्छेद क्र.२७: आर्थिक वर्ष २००८-०९ मधील वॉर्ड - ड येथील दिनांक ३०.३.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरलेल्या कॅश बाबत. (रक्कम रू.२३,७५,५०३/-)**

वॉर्ड - ड चे सन २००५-०६ ते सन २००८-०९ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण कार्यरत असून सन २००८-०९ मधील लेखापरीक्षण करीत असतांना दिनांक ३०.३.२००९ रोजी मनपा फ़ंडात भरणा करतांना रक्कम रू.२३,७५,५०३/- एवढ्या रकमेचा भरणा करण्यात आला आहे. व कॅश रजिस्टरला रक्कम रू.५३२०/- वजावट करून एकूण बेरीज रक्कम रू.२३,७०,१८३/- एवढी दर्शविली आहे. परंतु रक्कम रू.५३२०/- कोणत्या पावतीचेआहे. अथवा धनादेशाचे आहे. या बाबत बोध होत नाही.

करीता या बाबत विभागाने कॅश रजिस्टर क्र.१३, दिनांक ३०.३.२००९ रोजी पान क्रमांक ६९ वर पाणी पुरवठा पावती क्र.३५३७५२ दिनांक ३०.३.२००९ रोजी सदरील पावती चेक ने दर्शविल्याने ही पावती कॅशने दर्शविली आहे. परंतु ही पावती धनादेश क्र.९२८७९९ दिनांक ३०.३.२००९ रोजी रक्कम रू.५४००/- ची देना बॅंकेचे चेक आहे.

**परिच्छेद क्र.२८: वॉर्ड - ड अंतर्गत पाणीपट्टी धारक श्रीमती नंदाबाई बबन उगले यांची पाणीपट्टी रक्कम रू.७००/- कमी वसूल केल्याबाबत.**

वॉर्ड - ड अंतर्गत सन २००५-०६ ते २००८-०९ या आर्थिक वर्षाचे पाणीपट्टी डिमांड रजिस्टर क्रमांक ३१ पान क्र.९३ वर श्रीमती नंदाबाई बबनराव उगले नळ खाते क्र.१०८२७ रा.खोकडपुरा यांच्या नांवे सन १९९८ ते मार्च २००६ पर्यंत एकूण पाणीपट्टी रक्कम रू.११,०००/- एवढी असतांना संबंधिताने रक्कम रू.१०,३००/- (मार्च -२००६ पर्यंत) वसूल केली असून संबंधिताने मार्च २००८-०९ पर्यंत भरणा केलेला आहे.

म्हणजेच सन १९९८ ते मार्च २००६ पर्यंत रक्कम रू.७००/- कमी वसूल करण्यात आले आहे. तरी आक्षेपित रक्कम रू.७००/- संबंधिताने पाणीपट्टी पावती पुस्तक क्रमांक ३७१७ पावती क्र.३७१६२८ दिनांक १३.११.२००९ नुसार भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.२९ :वॉर्ड - ड कार्यालयातील सन २००५-०६ ते सन २००८-९ मधील नळ कनेक्शन फ़ॉर्म व ड्रेनेज कनेक्शन फ़ॉर्मची रक्कम भरणा करणे बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालय येथील सन २००५-०६ ते सन २००८-०९ या कालावधीतील लेखा परीक्षणादरम्यान वॉर्ड - ड कार्यालयास भांडार विभागातून निर्गमित करण्यात आलेल्या नळ

कनेक्शन फ़ॉर्मची तपासणी केली असता विभागाने लेखापरीक्षणापूर्वी नळ कनेक्शन फ़ॉर्म रक्कम भरलेली नव्हती.

परंतु लेखापरीक्षणा दरम्यान निदर्शनास आल्यानंतर विभागाने रक्कम रू.१९०००/- चा भरणा केलेला असून रू.५०/- प्रमाणे अद्याप ३८ नळ कनेक्शन फ़ॉर्म रक्कम रू.१९००/- अद्यापपर्यंत मनपा फ़ंडात भरणा झालेला नाही.

**परिच्छेद क्र.३०: वॉर्ड – ड अंतर्गत पाणीपट्टी धारक श्री.एकनाथ सदावर्ते यांचे नांवे बोगस नोंद दर्शविल्याबाबत. (रक्कम रू.८६५०/–)**

वॉर्ड - ड अंतर्गत सन २००५-६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र.५०/ ए पान क्रमांक १५२ वर श्री.एकनाथ सदावर्ते मो.रमानगर यांच्या नांवे मार्च-२००५ पर्यंत पाणीपट्टी पावती क्र.२०१२३१ दिनांक २.३.२००६ रक्कम रू.८६५०/- दर्शविलेली असून सदरील नोंद ही बोगस नोंद आहे.

तरी याबाबत विभागाने शहानिशा करून सदरील नोंद रद्द करण्यात येवून आक्षेपित रक्कम संबंधित नळ धारकाकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे विभागाने जा.क्र./मनपा/वॉर्ड-ड/२०२७/०९, दिनांक १७.११.२००९ रोजी कळविले आहे.

**परिच्छेद क्र.३१: वॉर्ड – ड अंतर्गत पाणीपुरवठा मागणी रजिस्टर क्र. ५/ए मधील पान क्र.८५ व ३०९ वरील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - ड अंतर्गत सन २००५-०६ ते २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र.५/ए ची तपासणी पाणीपट्टी कर पावती पुस्तकाद्वारे केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१) पाणी पुरवठा मागणी रजिस्टर क्रमांक ५/ए मधील पान क्र.८५ वर नळ भोगवटा धारकाचे नांव छगनराव बाळाराम कुडके, मोहल्ला नागेश्वरवाडी सन १९९६ ते २००८ पर्यंत एकूण रक्कम रू.१२,४००/- ची वसूली केल्याचे दर्शविले आहे. परंतु सदरील वसूलीमध्ये पावती क्र. २१८४२ नुसार रक्कम रू.२०००/- ची नोंद घेतलेली आहे ती बोगस /खोटी नोंद घेतल्याचे दिसून येते.कारण वॉर्ड - ड या विभागात सन २००५-६ ते २००८-९ मध्ये उक्त क्रमांकाचे पाणीपट्टी पावती पुस्तक वसूली करीता वापरण्यात आलेले नाही.

२) पाणी पुरवठा मागणी रजिस्टर क्र. ५ /ए पान क्र.३०९ वर श्री.दिगंबर श्रीनिवास कामटीकर मोहल्ला नागेश्वरवाडी यांच्याकडून सन २००५-०६ ची वसूली केल्याचे दर्शविलेले आहे. परंतु सदरील पावती ही सन २००४-०५ ची आहे. म्हणजेच संबंधिताकडे सन २००५-६ ची रक्कम रू.१८००/- येणे बाकी आहे.

तरी मुद्या क्र. १ व २ ची एकत्रित रक्कम रू.३,८००/- बाबत विभागाने लेखापरीक्षण विभागास जा.क्र./मनपा/वॉर्ड-ड/२०२८/०९, दिनांक १७.११.२००९ रोजी कळविले की मुद्या क्र.१ बाबत विभागाने सदरील रकमेची बोगस नोंद रद्द करून संबंधित नळ धारकाकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे व मुद्या क्र.२ बाबत संबंधित नळ धारकाकडून

पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.३६७४ पावती क्र.३६७३९० दिनांक ९.११.२००९ रोजी रक्कम रू.१८००/- चा भरणा चेक क्र.०२९९५२ दिनांक ९.११.२००९ ला मनपा फ़ंडात भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.३२: वॉर्ड – ड कार्यालय अंतर्गत मालमत्ता धारक श्री.विजय पंढरीनाथ शेळके यांचे नावे बोगस नोंद दर्शविल्याबाबत.**

वॉर्ड - ड कार्यालय येथील सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असून वॉर्ड - ड कार्यालय येथील डिमांड रजिस्टर पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. डिमांड रजिस्टर क्र. ७ बी पान क्रमांक ९३ वर सन १९९९-२००४ असे डिमांड दर्शविले असतांना त्यास खाडाखोड करून सन २००२-२००४ असे दर्शविण्यात आले.

२. उक्त डिमांड वसूल करतांना लमसम रक्कम रू.८०००/- चा भरणा मालमत्ता पुस्तक क्र.१२४३ पावती क्र.१२४२३२ दिनांक ३.२.२००६ द्वारे भरणा केल्याचे दर्शविले आहे.

३. प्रत्यक्षात मालमत्ता पुस्तक क्र.१२४३ पावती क्र.१२४२३२ दि.३.२.२००६ द्वारे रक्कम रू.८०००/- ची वसूली श्री.विठ्ठलराव रंगराव मीरजगांवकर घर क्र.५-२६-९४ रा.अजबनगर यांचे नावे असून त्यांनी सन २००५-०६ पर्यंत भरणा केलेला आहे.

तरी मुद्या क्र.१ ते ३ बाबत विभागाने पत्र दिले असता संबंधित मालमत्ता धारकाकडून विभागाने चेक क्र.०२४८७७ दिनांक १६.१०.२००७ रोजी मालमत्ता पावती क्र.८१६३७ दिनांक १६.१०.२००९ रोजी रक्कम रू.८४००/- ची पावती फ़ाडण्यात आली. परंतु लेखा विभागाकडे संबंधित धनादेशाबाबत विचारणा केली असता सदरील चेक बँकेकडून परत आल्याचे कळले. त्यानुसार संबंधित मालमत्ता धारकाने मनपा मुख्य कार्यालयात जनरल पावती पुस्तक क्र.३५२५ पावती क्रमांक ३५२४०१ दिनांक ९.११.२००९ रोजी रक्कम रू.८४००/- चा रोख भरणा केला आहे.

**परीच्छेद क्र.३३: वॉर्ड – ड मधील न वटलेल्या धनादेशाची यादी बाबत. (रक्कम रू.१९,८५,८६२/–)**

वॉर्ड - ड अंतर्गत सन २००५-०६ ते २००८-०९ या आर्थिक वर्षात न वटलेले धनादेशाबाबत माहिती मागविण्यात आली होती. त्या अन्वये उक्त विभागाकडे खालील निम्ननिर्दिष्ट केल्याप्रमाणे थकबाकी आहे.

| अ.क्र. | वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| १ | सन २००५-०६ | ४,७४,६९७/- |
| २ | सन २००६-०७ | ५,१८,८९७/- |
| ३ | सन २००७-०८ | ६,८०,१९६/- |
| ४ | सन २००८-०९ | ३,१२,०८१/- |
| | | **१९,८५,८६२/–** |

धनादेशाची उक्त रक्कम वसूल करणेबाबत विभागाला कळविले असता अद्यापपर्यंत खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.३४: वॉर्ड – ड अंतर्गत जनरल पावती पुस्तक कमांक २८५६ लेखापरीक्षणास्तव उपलब्ध न करून देणे बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालयाचे आर्थिक वर्ष २००५-०६ ते २००८-०९ या वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान जनरल पावती पुस्तक क्र.२८५६ उपलब्ध करून देणे बाबत अर्धसमास पत्र क्र.३३, दिनांक २५.९.२००९ व कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/मुलेप/२७९/०९, दिनांक २९.९.२००९ रोजी देण्यात आले होते. तसेच करमुल्य निर्धारक व संकलन यांना जा.क्र./मनपा/मुलेप/४२/२०१०, दिनांक २१.१.२०१० रोजी पत्र देण्यात आले होते. परंतु अद्यापपावेतो विभागाने उपनिर्दिष्ट जनरल पावती पुस्तक उपलब्ध करून दिले नाही. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.३५: वॉर्ड – ड कार्यालयातील तात्पुरते नळ कनेक्शन संचिकेतील थकबाकी रक्कम रू.२,५२,७७५/– च्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - ड अंतर्गत सन २००५-०६ ते २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना तात्पुरते नळ कनेक्शनच्या संचिका तपासतांना सोबत जोडलेल्या तक्त्यातील अ.क्र.१ ते १३ पर्यंतच्या तात्पुरते नळ कनेक्शन खातेदारांची अनियमितता व थकबाकी खालील प्रमाणे आढळून आलेली आहे.

१) काही तात्पुरते नळ कनेक्शन कायम केलेले नाही व बांधकाम परवाना भोगवटा प्रमाणपत्र आणि खरेदीखत संचिकेत आढळून आलेले नसून कोणत्या आधारे नळ कनेक्शन दिलेले आहे याचा बोध होत नाही. (अ.क्र.१ ते ४ आणि १२ व १३)

२) संचिकेवर सादरीकरण केलेले दिसत नाही.

३) रक्कम रू.२,५२,७७५/- थकबाकी असून ती वसूल केलेली दिसत नाही.

याबाबत विभागाला अर्धसमास पत्र देण्यात आलेले असून याबाबत रक्कम वसूली बाबत कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. (सोबत तात्पुरते नळ कनेक्शन दिलेल्या खातेदारांची यादी **(विवरण–अ) विवरण तक्ता - अ पान क्र.११७ व ११८ वर जोडण्यात आलेले आहे.)**

# सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील वॉर्ड अभियंता - ड कार्यालय लेखापरीक्षण अहवाल.

**खर्च बाजुचे लेखापरीक्षण :**

सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे वॉर्ड अभियंता –ड यांच्या अधिपत्याखालील करण्यात आलेल्या विविध विकास कामांचा ए-१ ,बी-१ व स्वेच्छानिधी खर्चाच्या कामाच्या संचिकांची तपासणी करण्यात आली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**परिच्छेद क्र.१: १) विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या कामाचा माहेवार खर्चाचा तपशिल उपलब्ध करून देणे बाबत. (लेखा विभागाच्या प्रोव्हिजननुसार)**
**२) स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी अंतर्गतच्या निधीतून केलेल्या कामाचा माहेवार खर्चाचा तपशिल उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड अभियंता-ड विभागाचे सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणा दरम्यान विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या विकास कामाचा माहेवार खर्चाचा तपशिल.(लेखा विभागाच्या प्रोव्हीजन नुसार) तसेच स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी अंतर्गतच्या निधीतून केलेल्या खर्चाची तपशिलवार माहिती लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्याबाबत विभागास कळविले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्रापत आहे.

**परिच्छेद क्र.२: वर्षनिहाय स्पिल ओव्हर कामाच्या संचिकेची माहिती उपलब्ध करून देणे बाबत.**

सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असतांना लेखापरीक्षण कामी स्पिल ओव्हर कामाच्या संचिकेची माहिती लेखापरीक्षणाास उपलब्ध करून देण्याविषयी विभागास कळविले असता अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.३: वॉर्ड - ड अभियंता अंतर्गतचे आवक –जावक रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत.**

प्रभाग –ड वॉर्ड अभियंता अंतर्गत सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असतांना लेखापरीक्षण कामी आवक-जावक रजिस्टरची आवश्यकता असतांना सदरील रजिस्टर उपलब्ध करून देण्यात आले नाही.

**परिच्छेद क्र.४: परतावा तक्ता (Refunding Statement) बाबतचे नोंद रजिस्टर उपलब्ध करून देणे बाबत.**

प्रभाग –ड वॉर्ड अभियंता अंतर्गत सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम कार्यरत असून लेखापरीक्षण कामी परतावा तक्ता (Refunding Statement) बाबतचे नोंद रजिस्टर उपलब्ध करून देण्याविषयी सूचविले असता रजिस्टर उपलब्ध करून देण्यात आले नाही.

**परिच्छेद क्र.५: रिंग व ढापे यांची खरेदी संचिका व स्टॉक रजिस्टर, वितरण रजिस्टर लेखा परीक्षणास्तव उपलब्ध करून देणे बाबत.**

प्रभाग –ड वॉर्ड अभियंता अंतर्गत खर्च बाजूचे लेखापरीक्षण सन २००५-६ ते सन २००८-०९ कार्यरत असून या कामी या विभागाचे रिंग व ढापे खरेदी संचिका व स्टॉक रजिस्टर तसेच वितरण रजिस्टरची लेखापरीक्षण कामी आवश्यकता असल्याचे विभागास सूचविले असता सदरील लेखे उपलब्ध करून देण्यात आले नाही.

**परिच्छेद क्र.६: कुशलनगर भागात अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलून २२५ मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक चूकीचे तयार करण्याबाबत.**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/का.अ./ज.नि.वि./१८२/०५, दिनांक ९.११.२००५.

कुशलनगर भागात अस्तित्वात असलेली ड्रेनेज लाईन बदलून २२५ मी.मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रू.२,५७,९००/- दर्शविलेले आहे. परंतु अंदाज पत्रकातील करावयाच्या कामाचा प्रकार /किंमत /नग व रक्कम बरोबर दर्शविलेली असून त्याची बेरीज रक्कम रू.२,५७,९००/- दर्शविलेले आहे. ती रू.२,७८,५५७.३८ व ५% वाढीव रक्कम रू.१३,९२७.८६ असे एकूण रू.२,९२,४८५.२४ अशी होते. ती कमी का दर्शविण्यात आलेली आहे?

तसेच सदरील काम केल्यावर तेथील जुने पाईप कोठे जमा केले आहे याची नोंद दिसत नाही. सदरील कामाचा विमा रक्कम रू.२५७९/- कपात केलेला नाही व FSD ३% व अनामत २% देयकातून वजा केल्याचे दिसून येत नाही.

तरी याचा खुलासा या विभागास सादर करण्याविषयी विभागास सूचविले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

परिच्छेद क्र.७: **वॉर्ड क्र.३६ नागेश्वरवाडी सुंदरनगर, भोईवाडा, उदय कॉलनी भागात ड्रेनेज लाईन देखभाल व दुरूस्तीची कामे करणे. अं.प.रक्कम रू.२,४९,०००/–**

संदर्भ:- जा.क्र./मनपा/का.आ./जनि.वि/५२/७,दि.२२.२.२००७.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये वॉर्ड - ड अभियंता कार्यालय येथे सन २००५-०६-०७ चे लेखापरीक्षण करतांना उक्त संचिकाची पाहणी करतांना खालील आक्षेपार्ह बाब निदर्शनास आल्या.

१. सन २००६-०७ मधील उक्त संचिकांची पाहणी करतांना असे निदर्शनास आले की, अंदाजपत्रक तयार करतांना रक्कम रू.२,४९,०००/- एवढे पाहिजे असतांना संबंधिताने रक्कम रू.२२४६७४/- एवढे बनविले आहे.

२. संबंधिताला देयक अदा करतांना पहिले रक्कम रू.७८८७४/- दिनांक ३०.३.२००७ रोजी देण्यात आले. दुसरे देयक रक्कम रू.१६९२६७/- दिनांक ६.१२.२००७ रोजी अदा करण्यात आले. म्हणजेच रक्कम रू२४८१४१/- एवढी रक्कम अदा करण्यात आली. याबाबत विभागास खुलासा सादर करण्याविषयी सूचविले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.८ : श्रीमती मानाबाई एन.पटेल व इतर यांची (जल:निसारण) जोडणी बाबतची संचिका लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड - ड कार्यालय येथील आर्थिक वर्ष सन २००५-०६ ते सन २००८-०९ या वर्षातील लेखापरीक्षणा दरम्यान विषयांकित प्रकरणाची संचिका (२००८-०९) लेखापरीक्षण कामी आवश्यक असल्याने सदर संचिका दिनांक २५.९.२००९, अर्धसमास पत्र क्र.४०, दिनांक ७.१०.२००९ व अर्धसमास पत्र क्र.४१, दिनांक २२.१०.२००९ बाबत तिनदा अर्धसमास पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत सदरची संचिका उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

**परिच्छेद क्र.९ : वॉर्ड – ड कार्यालयातील तात्पुरते नळ कनेक्शन संचिकेतील थकबाकी रक्कम रू.२,५२,७७५/– च्या अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - ड अंतर्गत सन २००५-०६ ते २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना तात्पुरते नळ कनेक्शनच्या संचिका तपासतांना सोबत जोडलेल्या तक्त्यातील अ.क्र.१ ते १३ पर्यंतच्या तात्पुरते नळ कनेक्शन खातेदारांची अनियमितता व थकबाकी खालील प्रमाणे आढळून आलेली आहे.

१) काही तात्पुरते नळ कनेक्शन कायम केलेले नाही व बांधकाम परवाना भोगवटा प्रमाणपत्र आणि खरेदीखत संचिकेत आढळून आलेले नसून कोणत्या आधारे नळ कनेक्शन दिलेले आहे याचा बोध होत नाही. (अ.क्र.१ ते ४ आणि १२ व १३)

२) संचिकेवर सादरीकरण केलेले दिसत नाही.

३) रक्कम रू.२,५२,७७५/- थकबाकी असून ती वसूल केलेली दिसत नाही.

याबाबत विभागाला अर्धसमास पत्र देण्यात आलेले असून याबाबत रक्कम वसूली बाबत कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. (सोबत तात्पुरते नळ कनेक्शन दिलेल्या खातेदारांची यादी)

# वॉर्ड – फ़ कार्यालय
# सन २००६–०७ ते सन २००८–०९
# लेखापरीक्षण अहवाल.

सन २००६-०७ ते सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील अभिलेख्यांचे थकीत लेखापरीक्षण व सन २००८-०९ या वर्षाच्या नियमित लेखापरीक्षणामध्ये जमा बाजूच्या अभिलेख्यांची तपासणी हाती घेण्यात आले. सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणा दरम्यान निम्ननिर्दिष्ट केल्यानुसार पावती पुस्तकांची पडताळणी करण्यात आली. तपासणी करण्यात आलेल्या पावती पुस्तकांबाबतचा तपशिल हा खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मालमत्ता कर वसूली पावती पुस्तके | = | ३७३ |
| २) | पाणीपट्टी कर वसूली पावती पुस्तके | = | २५६ |
| ३) | जनरल पावती पुस्तके | = | ४९ |

उक्त पावती पुस्तकांद्वारे वसूल करण्यात आलेली रक्कम ही वेळोवेळी संबंधिताने कॅश रजिस्टरमध्ये घेवून मनपा फ़ंडात जमा केल्याबाबत तपासणी करण्यात आली. तसेच संबंधित मालमत्ता धारकाकडील वसूल करावयाच्या कर नोंदी ह्या मागणी रजिस्टर प्रमाणे घेतलेल्या आहेत / नाहीत याबाबतची खातरजमा करण्याच्या दृष्टीने चाचणी लेखापरीक्षणही करण्यात आले. तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या आक्षेपार्ह बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

## जमा बाजूचे लेखापरीक्षण :

### परिच्छेद क्र.१ : प्रभाग फ़ अंतर्गत मालमत्ता कर पावती क्र.१६६५९३ ची रक्कम रू.२६७१/– चा कमी भरणा करणे बाबत.

प्रभाग - फ़ या विभागाचे सन २००६-२००९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण अंतर्गत सन २००६-०७ मध्ये मालमत्ता कर पावती पुस्तक क्र.१६६६ पावती क्र.१६६५९३ दिनांक १५.०२.२००७ रक्कम रू.२६७१/- ची पावती फ़ाडण्यात आलेली असून ती रद्द करण्यात आलेली आहे. परंतु सदरील पावतीची नोंद मागणी रजिस्टर क्र. बी –९३ पान क्र.३३ वर नोंद घेवून पुढील वर्षाचा सन २००७-०८ चा भरणा केल्याचे दिसून आले.

संबंधित मालमत्ता धारकाकडून रक्कम रू.२६७१/- मालमत्ता कर पुस्तक क्र.७९५ , पावती क्र.७९४५७ ,दिनांक १८.११.२००९ रोजी वॉर्ड- फ़ कार्यालय येथे भरणा करण्यात आले.

यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र. २ : इरसाल (कॅश) रजिस्टर क्र.१, पान क्रमांक ५६ वर एकूण बेरजेमध्ये रक्कम रू.५००/– कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग क या विभागाचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणा अंतर्गत इरसाल (कॅश) रजिस्टर क्रमांक १ पान क्र.५६,दिनांक ८.५.२००७ रोजीची एकूण बेरीज ४२३४२ होत असतांना एकूण बेरीज ४१८४२ दर्शविण्यात आली. म्हणजेच रक्कम रू.५०० चा कमी भरणा झालेला आहे.

तरी आक्षेपित रक्कम रू. ५००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४७८ पावती क्र.३४७७९० ,दिनांक ७.१२.२००९ चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.** ३ : **मनपा फ़ंडात रू.४००/– चा कमी भरणा करणे बाबत.**

मनपाच्या वॉर्ड - फ़ या कार्यालयाचे सन २००७-२००८ या वर्षाचे लेखा परीक्षण करतांना असे निदर्शनास आले आहे की, मालमत्ता पावती पुस्तक क्र.१९०४/१९०३३९, दिनांक ७.७.२००७ अन्वये रू.५७१६/- मालमत्ता कराची वसूली करण्यात आली. परंतु त्याची नोंद इरसाल रजिस्टरवर घेतांना रू.५३१६/- अशी नोंद घेण्यात आली पर्यायाने रू.४००/- चा कमी भरणा मनपा फ़ंडात करण्यात आला.

तरी आक्षेपित रक्कम रू. ४००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४७८ पावती क्र.३४७७८८ ,दिनांक ७.१२.२००९ चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.** ४ : **मनपा फ़ंडात रू.१००/– चा कमी भरणा करणे बाबत.**

मनपाच्या वॉर्ड - फ़ या कार्यालयाचे सन २००७-२००८ या वर्षाचे लेखापरीक्षण करतांना असे निदर्शनास आले आहे की, मालमत्ता पावती पुस्तक क्र.१९०७/१९०६४२ दिनांक १७.७.२००७ अन्वये रू.११२९/- मालमत्ता कराची वसूली करणयात आली. परंतु त्याची नोंद इरसाल रजिस्टरवर घेतांना रू.१०२९/- अशी घेण्यात आली. पर्यायाने रू.१००/- चा कमी भरणा मनपा फ़ंडात करण्यात आला.

तरी आक्षेपित रक्कम रू. १००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४७८ पावती क्र.३४७७८९ ,दिनांक ७.१२.२००९ चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.५ :मालमत्ता कर कमी करणे बाबतच्या सुनावणीच्या संचिका लेखा परीक्षणस्तव उपलब्ध करून देणे बाबत.**

प्रभाग -फ़ विभागाचे सन २००६-०७ ते सन २००८-०९ पर्यंतचे लेखापरीक्षण सुरू असून लेखापरीक्षणास्तव उपरोक्त विषयांकित संचिका लेखा परीक्षण कामी आवश्यक असल्याने विभागाने सदरील सुनावणीच्या संचिका लेखापरीक्षण पथकास सादर केलेल्या नाहीत.

**परिच्छेद क्र. ६ :इरसाल (कॅश) रजिस्टर क्र.५,पान क्रमांक ७३ वर रू.२०० /–, रजिस्टर क्र.६, पान क्रमांक ४ वर रू.२००/– आणि रजि.क्र.७, पान क्र.३७ वर रू.१०० असे एकूण बेरजेमध्ये रू.५००/– कमी भरणा करणे बाबत.**

प्रभाग - फ़ या विभागाचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणा अंतर्गत इरसाल (कॅश) रजिस्टर क्रमांक ५ पान क्रमांक ७३ दि.३.१.२००८ रोजीची एकूण बेरीज ६३४,९९९/- होत असतांना एकूण बेरीज ६३४७९९/- दर्शविण्यात आली. रजिस्टर क्र.६, पान क्र.४, दिनांक ८.१.२००८ रोजीची एकूण बेरीज ४२०७०१/- होत असतांना एकूण बेरीज ४२,०५०१/- दर्शविण्यात आली आणि रजि.क्र.७,पान क्र.३७, दि.६.२.२००८ पाणीपट्टीची रू.३६००/- रू. पावती असतांना ,इरसाल रजिस्टरवर ३५००/- नोंद दर्शविणत आली आहे. म्हणजेच रक्कम रू.५००/- चा कमी भरणा झालेला आहे.

तरी आक्षेपित रक्कम रू. ५००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४७९ पावती क्र.३४७८८३ ,दिनांक २४.१२.२००९ चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.७ :इरसाल रजिस्टर मध्ये भरणा रक्कम कमी लिहून कमी रकमेचा भरणा करणे बाबत. रक्कम रू.२५७९/–**

प्रभाग - फ़ या विभागाचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल रजिस्टर क्र.२ ते १० ची तपासणी केली असताना खालील प्रमाणे तक्त्यानुसार इरसाल रजिस्टर नोंद वरून दिसून येते.

| अ.क्र. | इरसाल रजिस्टर क्र. | दिनांक | प्रत्यक्षात घ्यावयास पाहिजे असलेली एकूण बेरीज | दर्शविण्यात आलेली एकूण रक्कम | फ़रक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | ३/७ | २३.०७.२००७ | २००५१७/- | २००३१७/- | २००/- |
| २ | ४/४३ | २३.१०.२००७ | १३३८७४/- | १३३६७४/- | २००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | ४/५७ | ०७.११.२००७ | १२८९४८/- | १२८८४८/- | १००/- |
| ४ | ६/४५ | १६.०२.२००८ | ४१४१९१/- | ४१३९११/- | २८०/- |
| ५ | ६/५१ | १८.०१.२००८ | १७७४१८/- | १७७३१९/- | ९९/- |
| ६ | ६/५७ | १९.०१.२००८ | ३६४४३३/- | ३६४३३३/- | १००/- |
| ७ | ७/१९ | ०१.०२.२००८ | ४१२९७१/- | ४१२३७१/- | ६००/- |
| ८ | ७/५१ | ११.०२.२००८ | ६८२२४/- | ६८१२४/- | १००/- |
| ९ | ७/६० | १३.०२.२००८ | २४५९६४/- | २४५७६४/- | २००/- |
| १० | ७/७३ | १६.०२.२००८ | १७६९२१/- | १७६८२१/- | १००/- |
| ११ | ८/१५ | २२.०२.२००८ | ३८७५७३/- | ३८७३७३/- | २००/- |
| १२ | ८/३८ | ०३.०३.२००८ | २७१७१२/- | २७१५१२/- | २००/- |
| १३ | ९/६७ | २७.०३.२००८ | ९०१५०५/- | ९०१३०५/- | २००/- |

तरी आक्षेपित रक्कम रू. २५७९/- जनरल पावती पुस्तक क्र.३४८१ पावती क्र.३४८०१३ ,दिनांक ०२.०१.२०१० चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.८ :मनपा फ़ंडात रू.२१६ चा कमी भरणा करणे बाबत.**

मनपाच्या वॉर्ड - फ़ या कार्यालयाचे सन २००८-०९ या वर्षाचे लेखापरीक्षण करताना असे निदर्शनास आले आहे की, पाणीपट्टी पावती पुस्तक क्र.३०४०/३०३९४५ दिनांक ४.४.२००८ या पावतीद्वारे रू.२०१६/- पाणीपट्टी वसूली करण्यात आली परंतु त्याची नोंद इरसाल रजिस्टर क्र.१ पान क्र.१८ वर घेताना रू.१८००/- अशी घेण्यात आली म्हणजेच रू.२१६/- चा कमी भरणा मनपा फ़ंडात करण्यात आला.

तरी आक्षेपित रक्कम रू. २१६/- जनरल पावती पुस्तक क्र.३४८१ पावती क्र.३४८०४१ ,दिनांक ०५.०१.२०१० चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

**परिच्छेद क्र.९ : इरसाल रजिस्टर क्र.४ पान क्र.३४ वर एकूण बेरीज मध्ये रक्कम रू. ११६००/- रू.कमी भरणा करणे बाबत.**

मनपाच्या वॉर्ड - फ़ या कार्यालयाचे सन २००८-०९ या वर्षाचे लेखापरीक्षण करतांना इरसाल रजिस्टर क्र.४ पान क्र.३४, दिनांक ३१.७.२००८ ची एकूण बेरीज तपासणी करतांना असे निदर्शनास आले आहे की, सदरील पानाची एकूण बेरीज रू.२४,६८,७१५/- अशी असतांना

रू.२४,५७,११५/- अशी नोंद घेण्यात आली म्हणजेच रू.११,६०० /- चा कमी भरणा मनपा फ़ंडात करण्यात आला.

तरी आक्षेपित रक्कम रू. ११,६००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४८१ पावती क्र.३४८०४० ,दिनांक ०५.०१.२०१० चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

परिच्छेद क्र.१० : **इरसाल रजिस्टर मध्ये भरणा रक्कम कमी लिहून कमी रकमेचा भरणा करणे बाबत. रक्कम रू.१२००/–**

प्रभाग - फ़ या विभागाचे सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना इरसाल रजिस्टर क्र.२ व ३ ची तपासणी केली असताना खालील प्रमाणे तक्त्यानुसार इरसाल रजिस्टर नोंद वरून दिसून येते.

| अ.क्र. | इरसाल रजिस्टर क्र. व पान क्र. | दिनांक | प्रत्यक्षात घ्यावयास पाहिजे असलेली एकूण बेरीज | दर्शविण्यात आलेली एकूण रक्कम | फ़रक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | २/१७ | २९.५.२००८ | १,९१६२२/- | १,९१,५२०/- | १००/- |
| २ | २/३८ | १०.६.२००८ | ३,०१,९५७/- | ३,०१,७५७/- | २००/- |
| ३ | ३/५३ | १८.६.२००८ | १,११,६०१/- | १,११,५०१/- | १००/- |
| ४ | ३/१२ | ९.७.२००८ | २,५२,७३७/- | २,५२,५३७/- | २००/- |
| ५ | ३/१८ | ११.७.२००८ | १,७४,८०५/- | १,७४,६०५/- | २००/- |
| ६ | ३/२३ | १६.७.२००८ | ७,५८,६७/- | ७५,६६७/- | २००/- |
| ७ | ३/४५ | २२.७.२००८ | ३,७५,७४०/- | ३,७५,५४०/- | २००/- |
| | | | **१४,८४,३२७/–** | **१४,८३,१२७/–** | **१२००/–** |

तरी आक्षेपित रक्कम रू. १२००/- जनरल पावती पुस्तक क्र.३४८१ पावती क्र.३४८०९० ,दिनांक १३.१.२०१० चा वॉर्ड -फ़ कार्यालय येथे भरणा केला आहे. यापुढे भविष्यात अशा चूका होवू नयेत म्हणून विभागाने दक्षता घ्यावी.

परिच्छेद क्र.११ :**वॉर्ड – फ़ कार्यालयातील नळ कनेक्शन फ़ॉर्म व ड्रेनेज कनेक्शन ५१ फ़ॉर्मची कमी रक्क भरणा केल्याबाबत.**

वॉर्ड - फ़ अंतर्गत नळ कनेक्शन व जलनि:सारण कनेक्शन फ़ॉर्म भांडार विभागातून वॉर्ड - फ़ कार्यालयास प्राप्त झालेले आहे. सदरील फ़ॉर्म बाबत सन २००७-०८ मध्ये विभागास फ़ॉर्म क्र.१२६५१ ते १२७०० एकूण फ़ॉर्म ५० ची एकूण रक्कम रू.२५०० व फ़ॉर्म क्र.१८१०० या एकच फ़ॉर्मची रक्कम रू.५० अशी एकत्रित रक्कम रू.२५५०/- मनपा फ़ंडात भरल्याचे दिसून आलेले नाही. करिता, विभागाने ५१ फ़ॉर्मची प्रतिफ़ॉर्म रू.५०/- याप्रमाणे ५१x५० = २५५०/- रूपये अद्यापपर्यंत मनपा फ़ंडात भरणा झालेला नाही. करिता आक्षेप करण्यात येतो.

**परिच्छेद** १२ : **जे.बी.गोलाईत, बालाजी नगर घ.नं.४-१८-३४/पी चा मालमत्ता कर भरणा बाबत. रक्कम रू.६३८४/-**

वॉर्ड - फ़ अंतर्गत मालमत्ता मागणी रजिस्टरची तपासणी करतांना मालमत्ता मागणी रजिस्टर क्रमांक सी-११५ मधील पान क्रमांक ११० वर श्री.जे.बी.गोलाईत यांच्या नांवे सन १९८८ ते २००६ पर्यंत एकूण कर रू.६३८४/- आहे. परंतु सदरील रजिस्टरवर मालमत्ता पावती पुस्तक क्रमांक १७८२ पावती क्रमांक १७८१९९ दिनांक १५.११.२००५ रक्कम रू.६३८४/- ची नोंद घेण्यात आलेली आहे तरी सदरील नोंदची पावती पुस्तकाद्वारे तपासले असता सदरील पावती ही सदरील मालमत्ता धारकांची नसून ती श्री.चक्रपाणी माधवराव, रत्नाकर यांच्या नांवे असून रक्कम रू.७२७/- आहे.

तरी याबाबत विभागाने शहानिशा करून लेखा परीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने रक्कम रू.६३८४/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.७७१०१ वर तामिल केल्याचे कळविले आहे. विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१३ :मागणी रजिस्टरला डिमांडची नोंद घेण्याबाबत.**

वॉर्ड - फ़ कार्यालयाचे सन २००६-०७ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण कार्यरत असून जमाबाजूच्या मागणी रजिस्टरची तपासणी केली असता काही मागणी रजिस्टरला डिमांडची नोंद घेण्यात आलेली दिसून येत नाही. सदरील नोंदी डिमांड रजिस्टरला घेऊन याबाबतचा अहवाल मा.मुख्य लेखापरीक्षक यांना सत्वर सादर करण्यात यावा असे विभागास कळविले असता विभागाने कार्यवाही करून अनुपालन अहवाल सादर करण्याविषयी कळविले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१४ : वॉर्ड – फ़ अंतर्गत मालमत्ता कर पावती क्र.१६५८४८ या एकच पावतीची दोन वेगवेगळ्या मालमत्ता धारकांच्या नांवे नोंद दर्शविल्याबाबत.**

वॉर्ड - फ़ या विभागाचे लेखापरीक्षण करीत असतांना मालमत्ता मागणी रजिस्टरची तपासणी करतांना मालमत्ता मागणी रजिस्टर क्र.सी-१०९, पान क्र.८७ वर मालमत्ता धारक श्री.के.एम.ठाकूर यांच्या नांवे सन २००६-०७ या वर्षात मालमत्ता बुक क्र.१६५९ पावती क्र.१६५८४८ दिनांक २२.५.२००७ अन्वये रक्कम रू.३३०४/- मालमत्ता कर वसूल केल्याबाबत नोंद दर्शविण्यात आलेली आहे. परंतु प्रत्यक्षात उक्त मालमत्ता पावती पुस्तकामधील पावती क्रमांक १६५८४८ ही मालमत्ता धारक श्री.विश्वनाथ कसबे यांचे नांवे रक्कम रू.२३७८/- भरल्याबाबतची नोंद दर्शविलेली आहे व सदरील नोंद मालमत्ता मागणी रजिस्टरवर सुध्दा दर्शविलेली आहे. म्हणजेच एकाच पावतीद्वारे दोन वेगवेगळ्या मालमत्ता धारकांच्या नांवे नोंद दर्शविल्याचे स्पष्ट होते.

तरी याबाबत विभागाने शहानिशा करून लेखा परीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने रक्कम रू.३३०४/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.७७१०२ तामिल केल्याचे कळविले आहे. खुलासा समाधानकारक नसल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१५ :पाणीपुरवठा मागणी रजिस्टर क्र.२५/२, मधील पान क्र.३८ व ४० वरील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - फ़ अंतर्गत सन २००६-०७ ते २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र.२५/२ ची तपासणी पाणीपटटी कर पावती पुस्तकाद्वारे केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र २५/२, पान क्र.३८ वर श्री.एन.एन.चिटगोपेकर,सरिता अपार्टमेंट,ज्योतीनगर, नळ खाते क्र ६५२२२ यांचेकडून सन २००५-०६ ची पाणीपट्टी कर पुस्तक क्र.२५०२,पावती क्र.२५०१११ दिनांक २.३.२००७ रोजी रक्कम रू.१८००/- ची पावती फ़ाडण्यात आलेली आहे. परंतु सदरील पावतीची नोंद मागणी रजिस्टरवर घेतांना सन २००५-०६ न दर्शविता सन २००६-०७ ची नोंद दर्शविण्यात आली आहे. म्हणजेच संबंधित नळधारकाकडे सन २००६-०७ ची रक्कम रू.१८००/- येणे बाकी आहे.

२. पाणीपुरवठा मागणी रजिस्टर क्र.२५/२ ,पान क्र.४० वर श्री.तातोणी एल.बलांडे ,सरिता अपार्टमेंट ज्योतीनगर नळ खाते क्र.६९९३५ सन २००६ ते सन २०१० पर्यंत एकूण रक्कम रू.७२००/- ची वसूली केल्याचे दर्शविले आहे. परंतु सदरील वसूलीमध्ये पाणीपट्टी कर पुस्तक क्र. २७० पावती क्र.२६९८८ ,दिनांक १.८.२००८ द्वारे रक्कम रू.५४००/- ची नोंद घेतलेली आहे. ती बोगस /खोटी नोंद केल्याचे दिसून येते. कारण वॉर्ड - फ़ या विभागात सन २००६-०७ ते सन २००८-०९ मध्ये उक्त क्रमांकाचे पाणीपट्टी पावती पुस्तक वसूलीकरीता वापरण्यात आलेले नाही.

मुद्दा क्र.१ ची रक्कम रू.१८००/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.९१६०४ व मुद्दा क्र.२ ची रक्कम रू.५४००/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.९१६०५ वर तामिल केल्याचे कळविले आहे. खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१६ : पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक F – ८ (जुने ) मधील अनियमिततेबाबत (रक्कम रू.३४००/–)**

वॉर्ड - फ़ अंतर्गत सन २००६-७ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक
F – ८(जुने )ची तपासणी पाणीपट्टी कर पावती पुस्तकाद्वारे केली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

१. पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र. F – ८ (जुने ) पान क्र.७३ वर श्री.जिभाऊ भिका गोलायत, नळ खाते क्र.८९०९६, बालाजी नगर यांचेकडे सन मार्च -२००८ पर्यंत रक्कम रू.८६००/- थकबाकी होती. परंतु संबंधिताकडून मार्च-२००८ पर्यंत रक्कम रू.७६००/- वसूल करण्यात आले. म्हणजेच रक्कम रू.१०००/- चा कमी भरणा झाल्याचे दिसून येते.

२. पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र. F – ८ (जुने ) पान क्र.७ वर श्री.नारायण भिकाजी रिंगणे, नळखाते क्र.७५५५९, बालाजीनगर यांच्याकडून सन २००६ ते मार्च ०९ पर्यंत एकूण रक्कम रू.५४००/- वसूल करावयास पाहिजे असतांना पाणीपट्टी पावती पुस्तक क्र. ३५५५, पावती क्र.३५५४३५ दिनांक ३१.३.२००९ द्वारे रक्कम रू.३६००/- वसूल केलेले आहे. म्हणजेच संबंधिताकडून रक्कम रू.१८००/- कमी वसूल केलेले आहे.

३. पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक F – ८ (जुने ) पान क्र.१५ वर श्री.उत्तम सखाराम नवगिरे, नळ खाते क्र.७८४७२, बालाजी नगर यांच्याकडे मार्च ०७ पर्यंत रक्कम रू.९५००/- थकबाकी होती. परंतु संबंधिताकडून मार्च २००७ पर्यंत रक्कम रू.८९००/- वसूल केलेले असून त्याच्याकडे रक्कम रू.६००/- कमी वसूल केलेले आहे. म्हणजेच संबंधिताकडून रक्कम रू.६००/- वसूल करण्यात यावे.

मुद्या क्र.१ ची रक्कम रू.१०००/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.९१६०१ व मुद्या क्र.२ ची रक्कम रू.१८००/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.९१६०६ आणि मुद्या क्र.३ ची रक्कम रू. ६००/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.९१६०७ वर तामिल केल्याचे कळविले आहे. विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१७ : वॉर्ड – फ़ अंतर्गत मालमत्ता मागणी रजिस्टर व पाणीपट्टी मागणी रजिस्टर प्रमाणित न करणे बाबत.**

वॉर्ड - फ़ या कार्यालयाचे सन २००६-०७ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करतांना मालमत्ता मागणी रजिस्टर व पाणीपट्टी मागणी रजिस्टरची तपासणी करतांना रजिस्टर हे प्राधिकृत सक्षम अधिकाऱ्यांकडून प्रमाणित केलेले नाहीत असे निदर्शनास आले. सदरील बाब ही लेखा परीक्षणाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर स्वरूपाची असून यामुळे भविष्यात मनपाला आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी सदरील रजिस्टर त्वरीत सक्षम प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून प्रमाणित करून घेवून त्याचा अहवाल लेखा परीक्षण विभागास सादर करावा.

विभागाने अद्यापपावेतो खुलासा सादर केलेला नाही. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१८ : पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक F–८ (जुने) पान क्र.११६ वरील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - फ़ अंतर्गत सन २००६-०७ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षण करीत असतांना पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक F-८ (जुने) पान क्र.११६ वर श्री.सुधाकर बंडू काथार, नळ खाते क्र.६६३१४, बालाजी नगर, यांच्या नांवे सन २००७-०८ ची पाणीपट्टी पावती पुस्तक क्रमांक १९३५ पावती क्रमांक १९३४१७ रक्कम रू.१८००/- दिनांक ५.२.२००६ ची नोंद घेतलेली आहे. ती बोगस / खोटी नोंद केल्याचे दिसून येते. कारण वॉर्ड - फ़ या विभागात सन २००६-०७ ते सन २००८-०९ मध्ये उक्त क्रमांकाचे पावती पुस्तके वसूलीकरीता वापरण्यात आलेले नाही.

तरी याबाबत विभागाने शहानिशा करून लेखा परीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने रक्कम रू.१८००/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.९१६०२ वर तामिल केल्याचे कळविले आहे. करिता विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१९ : पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्रमांक F–८ (जुने) पान क्र.३२ वरील अनियमिततेबाबत.**

वॉर्ड - फ़ या विभागाचे पाणीपट्टी मागणी रजिस्टर क्र. F-८ (जुने) पान क्र.३२ वर विजय कुमार नंदकुमार गंभीर, सुखद सहवास नगर, गारखेडा, प्लॉट क्र.४१, नळखाते क्र.८०६०७ यांच्याकडे सन २००२ ते २००८ पर्यंत एकूण थकबाकी रक्कम रू.१०७५०/- वसूल करण्यात आले असे दर्शविण्यात आले. परंतु तपासणीअंती असे निदर्शनास येते की, एकूण रक्कम रू.८०५०/- वसूल केल्याचे दिसून येते. म्हणजेच उर्वरीत रक्कम रू.२७००/- ही संबंधिताकडून वसूल झाल्याचे दिसून येत नाही.

तरी याबाबत विभागाने शहानिशा करून लेखा परीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित केले असता विभागाने रक्कम रू.२७००/- ची नोंद मागणी रजिस्टरवर घेवून थकबाकीसह बिल क्र.९१६०३ वर तामिल केल्याचे कळविले आहे. विभागाने केलेला खुलासा असमाधानकारक असल्यामुळे आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र. २० : सन २००५–०६ ते सन २००८–०९ या वित्तीय वर्षात वॉर्ड – फ़ या विभागास वितरीत केलेल्या स्वच्छता साहित्य बाबतचा तपशिल मिळणे बाबत.**

वॉर्ड - फ़ विभागाकडील सन २००५-०६ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षण हाती घेण्यात आलेले आहे. सदर कामी भांडार विभागाने वरील विभागास वितरीत केलेल्या स्वच्छता साहित्याबाबतचा वर्षनिहाय तपिशल उपलब्ध करून देणेसाठी भांडार विभागास जा.क्र.मनपा/मुलेप/२०१०/४९, दिनांक २९.१.२०१० रोजी पत्र दिले असता सदरील लेखापरीक्षण काळात स्वच्छता साहित्याबाबतचा तपशिल उपलब्ध न करून दिल्यामुळे सदरील विभागाचे लेखापरीक्षण करता आले नाही करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

# सन २००६–०७ ते सन २००८–०९ या आर्थिक वर्षातील वॉर्ड अभियंता – फ़ कार्यालय लेखापरीक्षण अहवाल.

**खर्च बाजुचे लेखापरीक्षण :**

सन २००६-०७ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे वॉर्ड अभियंता –फ़ यांच्या अधिपत्याखालील करण्यात आलेल्या विविध विकास कामांचा ए-१ ,बी-१ व स्वेच्छानिधी खर्चाच्या कामाच्या संचिकांची तपासणी करण्यात आली असता खालील आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या.

**परिच्छेद क्र.१ : १) विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या कामाचा माहेवार खर्चाचा तपशिल उपलब्ध करून देणे बाबत. (लेखा विभागाच्या प्रोव्हिजननुसार)**
**२) स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी अंतर्गतच्या निधीतून केलेल्या कामाचा माहेवार खर्चाचा तपशिल उपलब्ध करून देणे बाबत.**

वॉर्ड अभियंता -फ या विभागाचे सन २००६-०७ ते सन २००८-०९ या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घ्यायचे असून लेखा परीक्षण कामी विविध शिर्षाअंतर्गत केलेल्या विकास कामाचा माहेवार खर्चाचा तपशिल.(लेखा विभागाच्या प्रोव्हीजन नुसार) तसेच स.नगरसेवकांच्या स्वेच्छानिधी अंतर्गतच्या निधीतून केलेल्या खर्चाची तपशिलवार माहिती लेखापरीक्षण कामी उपलब्ध करून देण्याविषयी कळविण्यात आले असता अद्यापपावेतो सदरील तपशिलवार माहिती लेखापरीक्षण विभागास उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.२ : मो.सिल्कमिल कॉलनी येथील मनपा मंगल कार्यालयाची रंग– रंगोटी करणे बाबत. (अ.प.रक्कम रू.१,८०,०००/-)**

वरील संदर्भिय विषयाची संचिकेची तपासणी करतांना असे निदर्शनास आले आहे की, मो.सिल्कमील कॉलनी येथील मनपाच्या मंगल कार्यालयाची रंगरंगोटी करण्याचे कंत्राट अरबाज कन्स्ट्रक्शन औरंगाबाद या संस्थेस अंदाज पत्रकीय दराने रू.१,८०,०००/- देण्यात आले. सदर संचिकेची तपासणी करतांना परिच्छेद क्र.२९ वर वॉर्ड अभियंता यांनी दिनांक १३.३.२००७ रोजी कंत्राटदाराला करारनामा व कार्यादेश देण्याची शिफ़ारस मा.कार्यकारी अभियंता (विद्युत / ड्रेनेज) यांचेकडे करण्यात आली. मा.कार्यकारी अभियंत्यांनी दिनांक २९.३.२००७ रोजी सदरील कंत्राटदाराला करारनामा व कार्यादेश देण्याला मान्यता दिली. संचिकेच्या परिच्छेद क्र.३४ वर सदरील कामाचे प्रथम तथा अंतिम देयक रू.१,९३,३२२/- अदा करण्याला दि.३०.३.२००७ रोजी मा.कार्यकारी अभियंता (विद्युत / ड्रेनेज) यांनी मान्यता दिली.

सदरील कामाची गती पाहता दि.२९.३.२००७ ला कार्यादेश देण्यात येतो लगेचच दि.३०.३.२००७ ला रू.१,९३,३२२/- चे देयक अदा करण्याला मान्यता देण्यात येते म्हणजेच कंत्राटदाराने हे काम कधी केले ? याबद्दल संशय निर्माण होतो. तसेच कंत्राटदाराला १०% रक्कम देयकामध्ये रंगाचे भाव वाढल्यामुळे देण्यात आले. परंतु त्याची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली नाही .

तरी याबाबत विभागास खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.३ : वॉर्ड क्र.९८ शेकुदादा मोटे यांच्या घरापासून ते मनपा हद्दीपर्यंत रोडचे खडीकरण करणे बाबत. (अ.प.रक्कम रू.२,४९,९९१/-)**

वरील संदर्भिय विषयाच्या संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, वॉर्ड क्र.९८ शेकूदादा मोटे यांच्या घरापासून मनपा हद्दीपर्यंतच्या रोडचे खडीकरण करण्याच्या कामाचे कंत्राट ऋषिकेश कन्स्ट्रक्शन औरंगाबाद या संस्थेला देण्यात आले. सदरील कंत्राटदाराचे देयक तपासणी केली असता रू.२,४८,५९८/- मधून FSD, Vat, Income Tax व Royalty अशी एकूण रू.३८३७१/- वजा जाता रू.२,०७७४१/- कंत्राटदाराला अदा करावयास पाहिजे होते. परंतु त्या कंत्राटदाराला रू.२,१०,२२५/- अदा करण्यात आले म्हणजेच रू.२४८४/- जादा अदा करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

तरी याबाबत रक्कम वसूल करणेबाबत विभागास खुलासा सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.४ : प्रभाग क्र.९८ अंतर्गत कांचनवाडी (ईटखेडा) येथील स्मशानभूमीचा विकास करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.२९२६८०/-)**

वरील संदर्भिय विषयाच्या संचिकेची तपासणी करतांना असे निदर्शनास आले आहे की, प्रभाग क्र.९८ अंतर्गत कांचनवाडी (ईटखेडा) येथील स्मशानभूमीचा विकास करण्याच्या कामाचे कंत्राट ऋषिकेश कन्स्ट्रक्शन औरंगाबाद या संस्थेला देण्यात आले. सदरील कंत्राटदाराचे देयक तपासणी करतांना अ.क्र.७ मध्ये P/Flush Growed Pointing या कामासाठी १०१.३२ क्षेत्रफ़ळाला २७.३१ (perm²) या दराने रू.२७६७/- अदा करावयास पाहिजे होते. परंतु त्या कामाचे रू३०६२/- कंत्राटदाराला अदा करण्यात आले त्यामुळे मनपाचे रू.२९५/- आर्थिक नुकसान झाले असून याबाबत विभागाने जादा अदा केलेली रक्कम वसूल करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.५ : प्रभाग क्र.९८ बाऱ्हाळे हॉस्पिटल ते सैनिकीशाळा नाथपुरम कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण/ डांबरीकरण करणे बाबत. (अ.प.रक्कम रू.९,५०,३००/-)**

वरील संदर्भिय विषयाची संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, प्रभाग क्र.९८ बाऱ्हाळे हॉस्पीटल ते सैनिकीशाळा नाथपुरम कडे जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण तसेच डांबरीकरण करण्यासाठी प्रशासकीय मंजूरी देऊन सदरील काम ए.एस.कन्स्ट्रक्शन औरंगाबाद या संस्थेला अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा २४.२४% जास्त दराने देण्यात आले.

सदरील कंत्राटदाराचे देयक तपासणी करताना कंत्राटदाराला तीन टप्प्यात कामाची रक्कम अदा करण्यात आली देयकाची तपासणी करताना दुसरे व अंतिम बिलाची रक्कम रू.९,६४,०७१/- ऐवजी रू.९,६५,०७१/- रक्कम अदा करण्यात आली. म्हणजेच रू.१०००/- जास्त अदा करण्यात आले.

तरी याबाबत जादा केलेली रक्कम वसूल करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.६ :प्रभाग क्र.९३ अंतर्गत येथील ड्रेनेज लाईन टाकणे बाबत.**
**(अ.प.रक्कम रू.२,९९,९००/-)**

वरील संदर्भिय विषयाच्या संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, प्रभाग क्र.९३ येथील नविन ड्रेनेज लाईन टाकणे कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,९९,९००/- च्या खर्चाला प्रशासकीय मान्यता मा.शहर अभियंता यांनी दिली. परंतु संचिकेच्या पान क्र.३ परिच्छेद क्र.१० वर नविन पाईप टाकताना जुने पाईप मनपाच्या भांडार विभागात कंत्राटदाराने जमा करावेत या अटीवर सदरील कामाला मंजूरी देण्यात आली. परंतु संचिकेची तपासणी केली असता जुने पाईप कंत्राटदाराने भांडार विभागात जमा केले नसल्याचे निदर्शनास आले ही अतिशय गंभीर बाब असून याबाबत विभागास लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.७ : काबरानगर अंतर्गत पुर्न:डांबरीकरण करणे बाबत.**
**(अं.प.रक्कम रू.४,७२,०००/-)**

वरील संदर्भिय विषयाच्या संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, काबरानगर अंतर्गत पुर्न:डांबरीकरण करणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.४,७२,०००/- या कामासाठी श्री.चंद्राम्मा एम.आशन्ना या कंत्राटदारास १६.८५% कमी दराने कंत्राट देण्यात आले. या कामाचे देयक तपासणी करताना कंत्राटदाराने कंत्राट १६.८५% कमी दराने घेतल्याने नियमाप्रमाणे ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून रू.१९९९२/- देयकातून कपात करून देयक अदा करावयास पाहिजे होते. परंतु संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आलेले नाही.

तरी याबाबत विभागास लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागास सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.८ :वॉर्ड क्र.९७ बनेवाडी अंतर्गत साईड रस्त्याचे खडीकरण करणे बाबत. (अं.प.रक्कम रू.१,९८,५००/-)**

वरील संदर्भिय विषयाच्या संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, प्रभाग क्र.९७ बनेवाडी अंतर्गत साईड रस्त्याचे खडीकरण करण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.१,९८,५००/- चे काम श्री.जावेद खान या कंत्राटदाराला १९.३२% कमी दराने देण्यात आले. सदरील कंत्राटदाराच्या देयकाची तपासणी करताना कंत्राटदाराने कंत्राट १९.३२% कमी दराने घेतल्याने नियमाप्रमाणे ५% अतिरिक्त सुरक्षा ठेव रू.७७२३/- म्हणून बिलातून कपात करावयास पाहिजे होती परंतु ती रक्कम कपात करण्यात आलेली नाही. तसेच बिलाची तपासणी करताना अनुक्रमांक ५ मध्ये ५१८-९६ क्षेत्रफ़ळाला Spreading 60 mm/40mm Meter Road Side या कामासाठी रू.१३.६५/- $M^2$ या दराने रू.७०८३/- अदा करावयास पाहिजे होते. परंतु त्या कामाला रू.७३५७/- अदा करण्यात आले. म्हणजेच रू.२७३/- कंत्राटदाराला जादा अदा करण्यात आले.

तरी याबाबत जादा केलेली रक्कम वसूल करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.९ : सम्राट नगर वॉर्ड क्र.८९ येथे मोठ्या आकाराची ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. (अं.प.रक्कम रू.१४९६०४/-)**

वरील संदर्भिय विषयाच्या संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, प्रभाग क्र.८९ येथे मोठ्या आकाराची ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.१४९६०४/- चे काम श्री.किशोर जगन्नाथ शेलार या कंत्राटदाराला देण्यात आले. या कामाचे देयक तपासणी करताना अनुक्रमांक १ मध्ये २३८.८८ रनींग फ़ूट रू.३५.७० $M^2$ या दराने Exnfdn Pipe Line earth soil या कामासाठी रू.८५२८/- अदा करावयास पाहिजे होते. परंतु त्या कामाचे रू.९२४२/- अदा करण्यात आले. म्हणजेच रू.७१४/- जादा अदा करण्यात आले.

तरी याबाबत जादा केलेली रक्कम वसूल करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे. करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**परिच्छेद क्र.१० :प्रभाग क्र.९३ अंतर्गत येथील ड्रेनेज लाईन टाकणे बाबत. (अं.प.रक्कम रू.२,९९,९००)**

वरील संदर्भिय विषयाच्या संचिकेची तपासणी करताना असे निदर्शनास आले आहे की, प्रभाग क्र.९३ अंतर्गत येथील नविन ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रू.२,९९,९००/- च्या खर्चाला प्रशासकीय मान्यता मा.शहर अभियंता यांनी दिली. परंतु संचिकेच्या पान क्र.३ परिच्छेद क्र.१० वर नविन पाईप टाकताना जुने पाईप मनपाच्या भांडार विभागात कंत्राटदाराने जमा करावेत या अटीवर सदरील कामाला मंजूरी देण्यात आली. परंतु संचिकेची तपासणी केली असता जुने पाईप कंत्राटदाराने भांडार विभागात जमा केले नसल्याचे

निदर्शनास आले. ही अतिशय गंभीर बाब असून याबाबत समाधानकारक लेखी खुलासा लेखा परीक्षण विभागात सादर करण्याविषयी सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

करिता आक्षेप कायम करण्यात येतो.

**<u>परिच्छेद क्र.११</u> : भगवती कॉलनी स्नेहवर्धनी कॉलनी येथे साईड पंख्याचे खडीकरण करणे बाबत.(अं.प.रक्कम रू.२,९९,९४२/-)**

| ७४ | श्री.सर्जेराव वामन कांबळे | पुरूष मजूर | १,९२८/- |
| ७५ | श्री.एकनाथ गडकरी | पुरूष मजूर | २,४११/- |
| ७६ | श्री.बाबु बंडू खंडागळे | पुरूष मजूर | १,९२८/- |
| ७७ | श्री.रतन बाबु घोरपडे | पुरूष मजूर | ९,९७८/- |
| ७८ | श्रीमती धोंडाबाई व्ही.थोरात | स्त्री मजूर | २,१८५/- |
| ७९ | श्रीमती चंद्रभागाबाई गायकवाड | स्त्री मजूर | १,९२८/- |
| ८० | श्रीमती समिंद्राबाई एम.वाहूळ | स्त्री मजूर | १,८९५/- |
| ८१ | श्रीमती सरूबाई जगताप | स्त्री मजूर | १,९२८/- |
| ८२ | श्री.निवृत्ती वामन लोखंडे | पुरूष मजूर | १,९२८/- |
| ८३ | श्री.नारायण एम.निकम | पुरूष मजूर | १,९२८/- |
| ८४ | श्री.विष्णु डी.चव्हाण | पुरूष मजूर | १,९२८/- |
| ८५ | श्री.लक्ष्मण कचरू त्रिभूवन | पुरूष मजूर | १,९२८/- |
| ८६ | श्री.शिवराम भोलाराम चावरिया | पुरूष मजूर | ११,८५६/- |
| ८७ | श्रीमती किताबबाई व्ही.चावरिया | स्त्री मजूर | १,९२८/- |
| ८८ | श्रीमती रामपतीबाई दुलिचंद लाहोट | स्त्री मजूर | ७६,०८३/- |
| ८९ | श्री.राजकुमार चव्हाण | पुरूष मजूर | ११,७३८/- |
| ९० | श्रीमती कुसुमबाई नाथा खरात | स्त्री मजूर | ३,११८/- |
| ९१ | श्री.सुधाकर वामन कुलकर्णी | शिपाई | ७,७६५/- |
| ९२ | श्री.गणपत महिपत कांबळे | पुरूष मजूर | ३,११८/- |
| ९३ | श्री.लक्ष्मण किसन शेजूळ | पुरूष मजूर | १०,३६६/- |
| ९४ | श्रीमती लक्ष्मीबाई बी.गुडेकर | स्त्री मजूर | १५,३६६/- |
| ९५ | श्री.हरी संतोष इंगळे | सुरक्षा रक्षक | २१,९०९/- |
| ९६ | श्री.तुकाराम जी.जाधव | शिपाई | १४,१२२/- |
| ९७ | श्री.दर्शनसिंग मालके | पुरूष मजूर | ११,१३३/- |
| ९८ | श्रीमती चंद्रकला दत्तात्रय जलाटकर | स्त्री मजूर | १,९३२/- |
| ९९ | श्रीमती हौसाबाई बी.वाघमारे | स्त्री मजूर | ११,१०८/- |
| १०० | श्रीमती लक्ष्मीबाई एन.रगडे | स्त्री मजूर | २,२५०/- |
| १०१ | श्रीमती मिनाबाई पी.जैन | सेविका | २,१८७/- |
| १०२ | श्री.गोविंद एम.जंगे | सुरक्षा रक्षक | १४,०६६/- |
| १०३ | श्री.गोपाल चावरिया | पुरूष मजूर | १,९३२/- |
| १०४ | श्रीमती चंद्रभागाबाई हिवराळे | स्त्री मजूर | १२,६६०/- |
| १०५ | श्रीमती केराबाई ई. मुजमुले | स्त्री मजूर | १३,६००/- |
| १०६ | श्री.शेख मोईन | वरिष्ठ लिपीक | २९,२९४/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १०७ | श्रीमती सागरबाई एस.थोरात | स्त्री मजूर | ११,७९५/- |
| १०८ | श्री.अशोक एस.वाघमारे | पुरूष मजूर | १,८००/- |
| १०९ | श्रीमती इंदुबाई एफ़ सोनवणे | स्त्री मजूर | ११,६००/- |
| ११० | श्री.गणपत हिवराळे | पुरूष मजूर | १,८५०/- |
| १११ | श्री.भिकाजी मुजमुले | पुरूष मजूर | ११,३८५/- |
| ११२ | श्री.अशोक एस.ताकवाले | पुरूष मजूर | ११,६००/- |
| ११३ | श्री.रामा एस.वाघुळे | पुरूष मजूर | २,३२१/- |
| ११४ | श्री.फ़किरा खरात | पुरूष मजूर | १२,९८०/- |
| ११५ | श्री.बाबु टी.शेंडगे | पुरूष मजूर | १२,२४८/- |
| ११६ | श्री.साहेबराव रगडे | पुरूष मजूर | ११,७००/- |
| ११७ | श्री.शे. मेहबुब शे.फ़ैज | पुरूष मजूर | १४,९१०/- |
| ११८ | श्री.कडुबा देहाडे | पुरूष मजूर | १३,०३२/- |
| | | **एकूण** | **११,८७,१६५/-** |

संबंधित कर्मचाऱ्यांकडून सन २००९-१० व सन २०१०-११ या दोन्ही आर्थिक वर्षात पेन्शन कन्ट्रीब्युशन मधून जास्तीची एकूण रक्कम १३,३६,४२२/- ही वसूल करण्यात आली.

**अशा प्रकारे यापुढे अतीप्रदान रकमा अदा करण्यात येवू नये यासंबंधी आस्थापना-१, आस्थापना -२,वॉर्ड कार्यालये व इतर विभागांनी याची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.**

**परिच्छेद क्र.७: रोख नोंदवहीतील दिनांक ३१ मार्च अखेर शिलकेचा ताळमेळ न घालणे बाबत.**

**वर्ष अखेरची शिल्लक**

| दिनांक | रोखवही नुसार शिल्लक रक्कम रु. | बँक खात्यावरील शिल्लक रक्कम रु. | फरक रक्कम रु. |
|---|---|---|---|
| दि.३१.३.२००९ | १०,५५,८५,४८३=०० | १४,९६,१०,३५६=५४ | +४,४०,२४,८७३=५४ |
| दि.३१.३.२०१० | ५,२६,९१,९६५=०० | २,२६,७५,६८३=०० | -३,००,१६,२८२=०० |
| दि.३१.३.२०११ | ४,३५,८६,४०६=०० | ३,०८,२६,६६४=०६ | -१,२७,५९,७४१=९४ |

लेखा विभागाकडील सन २००८-०९, सन २००९-१० व सन २०१०-११ या आर्थिक वर्षातील रोखनोंदवहीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले की, दिनांक ३१ मार्च अखेरचे आर्थिक व्यवहाराबाबतच्या नोंदी ह्या सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या नाहीत. तसेच दिनांक ३१ मार्च रोजी शिल्लक रकमेचा ताळमेळ हा बँक खात्यावरील शिल्लक रकमेशीही घातलेला नाही. रोख रकमेचा नियमित ताळमेळ घेणे ही बाब आर्थिक व्यवहार सुरळीत आणि अचूक ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची बाब असून विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

तेव्हा, दिनांक ३१ मार्च अखेर शिल्लक रकमेचा ताळमेळ हा बँकखात्यावरील शिल्लक रकमेशी घेण्यात यावा आणि कार्यवाहीअंती लेखापरीक्षण विभागास अनुपालन अहवाल सादर करावा असे सूचित करण्यात येते.

**परिच्छेद क्र.८: मुंबई वित्तीय नियम १९५९ चे नियम ५१ प्रमाणे कार्यवाही करणे :**

महानगरपालिकेतील लेखा विभागाचे व इतर विभागांचेही लेखापरीक्षण करीत असतांना असे निदर्शनास आले की, लेखा विभागात व इतर विभागातही कार्यरत असलेल्या कर्मचा-यांपैकी जे कर्मचारी जोखीमीचे कामे करतात त्यांचेकडून मुंबई वित्तीय नियम १९५९ चे नियम ५१ प्रमाणे सुरक्षा / प्रतिभूती ठेव पत्रे घेणे बंधनकारक आहे. असे असतांनाही लेखा विभागात उपरोक्त नियमांच्या अन्वये सुरक्षा / प्रतिभूती ठेवपत्रे कर्मचा-यांकडून घेतलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तरी या संबंधी, विभागाचे प्रमुखांनी जोखीमीचे कामे करणा-या कर्मचा-यांकडून तातडीने सुरक्षा / प्रतिभूती ठेव पत्रे घेण्यात यावीत.

**परिच्छेद क्र.९: विविध शासकीय / निमशासकीय कार्यालयातून औरंगाबाद मनपा सेवेत कायम सामावण्यात येणा-या अधिकारी कर्मचारीयांचे सेवेतील रजा अंशराशीकरण व निवृत्तीवेतन अंशराशीकरण व भविष्य निर्वाह निधी बाबत.**

औरंगाबाद महानगरपालिकेत स्वीयेत्तर सेवेतून मनपा सेवेत कायम सामावण्यात येणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या पूर्वीच्या सेवेतील निवृत्ती वेतन अंशराशीकरण, रजा अंशराशीकरण, भविष्य निर्वाह निधी इत्यादी वेळच्या वेळी महानगरपालिका फंडात जमा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सेवानिवृत्त / मयत कर्मचा-यांनी मिळावयाच्या सेवाविषयक कायदेशीर कार्यवाहीस विलंब होतो. तसेच ज्यामुळे मनपाच्या आर्थिक स्थिती बिघडण्याची स्थिती निर्माण होण्याची बाब टाळता येत नाही.

उपरोक्त बाबी टाळण्यासाठी तसेच स्वीयेत्तर सेवेतील कर्मचारी मनपात सामावून घेतांना संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या पूर्वीच्या कार्यालयाने सेवेबाबतचे सर्व प्रकारचे फायद्यासह वर्ग केलेले आहे काय ? त्यासाठी वेळोवेळी शासनाने ठरवून दिलेल्या नियमाप्रमाणे शुल्क वसूली झाली आहे काय ? या अनुषंगाने तपासणी पूर्तता करूनच अधिकारी / कर्मचारी यांना मनपा सेवेत सामावून केल्याची कार्यवाही मनपा प्रशासन व लेखा विभागाने करणे बाबत सूचीत करण्यात येते.

**परिच्छेद क्र.१०: -नविन अंशदान निवृत्ती वेतन योजनेबाबत : Defined Contribution Pension Scheme.**

शासन निर्णय क्र. अंनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ अन्वये १ नोव्हेंबर २००५ व त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन अनुज्ञेय असणार नाही. याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. औरंगाबाद मनपामध्ये कार्यरत असलेल्या आणि १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्ती दिलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना सुध्दा उपरोक्त योजना लागू असतांना लेखा विभागातर्फ़े योजना लागू करणेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. उक्त योजना गेल्या ५ वर्षापासून अंमलात आणावयाची झाल्यास संबंधित अधिकारी /कर्मचारी यांच्यावर अतिरिक्त योजना हप्त्याचा बोझा येणार आहे. तसेच अधिकारी / कर्मचारी यांच्या वर्गणी इतकीच रक्कम मनपास D.C.P.S योजनेच्या स्वतंत्र खाती जमा करावी लागणार आहे. पर्यायाने मनपाच्य़ा दायीत्वात वाढ होत आहे. याबाबत वेळीच निर्णय घेण्याबाबत लेखा विभाग व मनपा प्रशासन यांना सूचित करण्यात येत आहे.

# (भाग –ब)
# लेखा विभाग

सन २००८-०९ ते सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखा विभागाचे जमा बाजूच्या लेखापरीक्षणा दरम्यान खालील अनियमितता आढळून आल्या.

**परिच्छेद क्र.१: लेखाविभागातील जमा बाजूच्या लेखापरीक्षणाबाबत.**

उपरोक्त विषयी लेखा विभागाचे सन २००८-०९ ते सन २००९-१० या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असता सन २००८-०९ या वित्तीय वर्षातील कॅशियर कॅश बुकची तपासणी करताना असे आढळून आले की, कॅश बुकला पान क्र.दिलेले नाहीत, तसेच दिनांक २४.४.२००८ रोजीच्या कॅश बुकातील नोंदींमध्ये वॉर्ड - अ च्या बँकेत जमा करावयाच्या धनादेशाच्या Pay in Slip वर रक्कम रूपये ३४,४५१/- अशी नोंद आहे. प्रत्यक्षात कॅशबुक मध्ये संबंधित कॅशियरने नोंद घेतांना रक्कम रू.३३,५५१/- ची नोंद करून रू.९००/- चा कमी भरणा केलेला आहे.

करिता संबंधित कॅशियरने कमी भरणा का केला याची सविस्तर तपासणी करून लेखापरीक्षण विभागाकडे खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.:२ लेखाविभागातील जमा बाजूच्या लेखापरीक्षणाबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयी लेखा विभागाचे सन २००८-०९ ते सन २००९-१० या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून सन २००८-०९ या वित्तीय वर्षातील कॅशियर कॅश बुकची तपासणी करताना असे आढळून आले की, दिनांक २५.४.२००८ रोजीच्या कॅश बुकातील नोंदींमध्ये वॉर्ड - अ च्या बँकेत जमा करावयाच्या धनादेशाच्या Pay in Slip वर रक्कम रूपये १०,४२५/- अशी नोंद आहे. प्रत्यक्षात कॅशबुक मध्ये संबंधित कॅशियरने नोंद घेतांना रक्कम रू.११,३२५/- ची नोंद करून रू.९००/- चा जास्तीचा भरणा केलेला आहे.

करिता संबंधित कॅशियरने जास्तीचा भरणा का केला याची सविस्तर तपासणी करून लेखापरीक्षण विभागाकडे खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन समाधानकारक असल्यामुळे परिच्छेद वगळण्यात येत आहे.

**परिच्छेद क्र.३: लेखाविभागातील जमा बाजूच्या लेखापरीक्षणाबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयी लेखा विभागाचे सन २००८-०९ ते सन २००९-१० या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणाचे काम हाती घेण्यात आले असून सन २००८-०९ या वित्तीय वर्षातील कॅशियर कॅश बुकची तपासणी करताना असे आढळून आले की, कॅश बुकला पान क्र.दिलेले नाहीत, तसेच दिनांक १८.३..२००९ रोजीच्या कॅश बुकातील नोंदींमध्ये वॉर्ड - फ़ च्या बँकेत जमा करावयाच्या

धनादेशाच्या Pay in Slip वर रक्कम रूपये ३,९६,९८१/- अशी नोंद आहे. प्रत्यक्षात कॅशबुक मध्ये संबंधित कॅशियरने नोंद घेतांना रक्कम रू.३,८६,८८१/- ची नोंद करून रू.१०,१००/- चा कमी भरणा केलेला आहे.

करिता संबंधित कॅशियरने कमी भरणा का केला याची सविस्तर तपासणी करून लेखापरीक्षण विभागाकडे खुलासा सादर करावा असे सूचित केले असता विभागाने सादर केलेला खुलासा असमाधानकारक आहे.

**परिच्छेद क्र.४: लेखा विभागाने अनिवार्य खर्चाचे नियोजन करणे बाबत.**

लेखा विभागाचे लेखा परीक्षणा दरम्यान असे निदर्शनास आले की, नोव्हेंबर-२००९ पासून कर्मचा-यांचे वेतन- सेवानिवृत्ती वेतन वेळेवर अदा केलेले नाही. तसेच विद्युत देयके, पाणी देयके, विविध कर्जांच्या परतफेडी वेळेवर केलेल्या नाहीत. त्यामुळे दंडव्याज भरण्याची पाळी येते.

उपरोक्त बाबी अनिवार्य खर्चात येत असल्यामुळे खर्चाचे नियोजन का करण्यात येत नाही याचा खुलासा करण्यात यावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो अहवाल अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.५: लेखा विभागामार्फत शासकीय कोषागारात वेळेवर रकमा जमा न करणे बाबत.**

लेखा विभागाचे लेखा परीक्षणादरम्यान असे निदर्शनास आले आहे की, लेखा विभागाने शासकीय कोषागारात जमा करावयाचे धनादेश त्याच तारखांना जमा न करता दोन महिन्यांनी उशिरा जमा केलेले आहे. असे करतांना शासकीय कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीची रकमेचे धनादेश सुध्दा उशिराने भरणा केलेले आहे. त्यामुळे संबंधित अधिका-यांचे भविष्य निर्वाह निधी खात्यात उशिराने जमा केलेल्या रकमेमुळे व्याजाचे नुकसान झाले आहे. याबाबत सविस्तर खुलासा सादर करावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

उपरोक्त प्रमाणे मनपाच्या अधिकारी कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीचे धनादेश दोन महिने उशिराने जमा केल्यामुळे महानगरपालिकेच्या कर्मचा-यांना द्यावयाच्या व्याजाच्या रकमेचा बोझा मनपावर पडत आहे. उशिराने धनादेश जमा का करण्यात आले याचा खुलासा सादर करण्यात यावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.६: लेखा विभागातील जनरल कॅश बुक रजिस्टरबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयी लेखा विभागाचे सन २००८-०९ ते सन २०१०-११ या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण सुरू असून सन २००९ ते सन २०१० पर्यंतचे जनरल कॅश बुक रजिस्टरची तपासणी केली असता दिनांक ७.५.२०१० पासून आजपावेतो, सर्वसाधारण रोखवही (जनरल कॅश बुक) रजिस्टरवर कोणत्याही अधिकाऱ्यांनी सांक्षाकित केलेले दिसून येत नाही.

तथापि, साक्षांकन न केल्यामुळे सदरील अभिलेख्यांची वैधता सिध्द होत नाही.

उपरोक्त बाबत खुलासा सादर करण्यात यावा असे सूचित केले असता अद्यापपावेतो खुलासा अप्राप्त आहे.

**परिच्छेद क्र.७: द्विलेखा नोंद पध्दतीच्या अंमलबजावणी बाबत.**

लेखाधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी पत्र क्र. मनपा/लेखा/९९८/दिनांक ८.६.२०११ अन्वये कळविले आहे की, औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत होणा-या सर्व आर्थिक व्यवहारांच्या नोंदी सन २०११-१२ या आर्थिक वर्षात दिनांक १.४.२०११ पासून नियमितपणे द्विनोंद लेखामध्ये घेण्याचे काम सुरु करण्यात आले असल्याचे शासनास कळविण्यात आलेले आहे. तथापि आजस्थितीत शासनाच्या निर्देशाप्रमाणे ई-गर्व्हनन्स कार्यप्रणाली अंतर्गत द्विलेखा नोंद पध्दतीमध्ये कार्यालयीन कामकाज करण्यासाठी प्रशासकीय अडचणी निर्माण होत आहे. लेखा विभागामध्ये जमेनुसार खर्चाचे योग्य नियोजन नसल्याने खर्चाच्या नोंदी होणे शक्य होत नाही. सद्यस्थितीत संगणकावर फक्त जमा बाजूच्या नोंदी घेण्यात येत असून खर्च बाजूच्या नोंदी संगणकावर घेण्यात येत नाही. माहे डिसेंबर २०१० पासून जमा बाजूच्या एकूण ७२९३, अंतर्गत लेखापरीक्षकांनी संगणकावर देयकांच्या ६७८ नोंदी घेतल्या असून त्यापैकी खर्च बाजूच्या देयकाच्या फक्त ९ नोंदी घेतल्या आहेत.

दिनांक ७.६.२०११ च्या बँक स्क्रोल नुसार प्रारंभीची शिल्लक रक्कम रू.२.६० लक्ष आहे व वाटप केलेले तथा न वटलेले धनादेशाची रक्कम १००८.७३ लक्ष असून शिल्लक (-) रक्कम रू.१००६.१३ लक्ष अशी स्थिती आहे. बँकेतील शिल्लकेनुसार धनादेश वितरण करणे आवश्यक आहे. तथापि बँक शिल्लकेपेक्षा जास्त रकमेचे धनादेश वाटप केल्यामुळे द्विलेखा नोंद पध्दतीमध्ये नोंदी कशा घेण्यात येतात व शासनाच्या नियमाप्रमाणे द्विलेखा नोंद पध्दतीची योग्य प्रकारे प्रभावीपणे अंमलबजावणी नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त बाबत विभागाने अनुपालन सादर करावे असे सूचित केले असता अद्यापपावेतो अनुपालन अप्राप्त आहे.

# विशेष तपासणी अहवाल

सन २००९-२०१०

व

सन २०१०-२०११

# भाग -२

# डॉ.चोबे हॉस्पिटल देवगिरी कॉलनी ते झांबड इस्टेट चेतनानगर, एम.एस.आर.डी.सी. विकास रस्त्यामधील ड्रेनेज लाईन संदर्भाने चौकशी अहवाल.

महानगरपालिका क्षेत्रातील वॉर्ड क्र. –ड मधील प्रभाग क्र.६४ मधील चोबे हॉस्पिटल देवगिरी कॉलनी ते झांबड इस्टेट चेतनानगर पुलापर्यंत विकास योजना रस्त्यातील ड्रेनेज लाईन दुरूस्त करण्याबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३)(क) अन्वये मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना असलेल्या अधिकाराचा उपयोग करून रक्कम रू.२,४९,५००/- चे अंदाजपत्रक मंजूरीस्तव प्रकरण होते.

सदरील प्रकरणी तांत्रिक कक्षामार्फ़त संचिकेत प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देवून नोंदविलेले अभिप्राय योग्य असून सद्यस्थितीत सदरील काम मंजूर करणे उचित वाटत नाही.

तांत्रिक कक्षाने शाखा अभियंता व उपअभियंता यांनी दिलेले संचिकेतील अभिप्राय परस्पर विरोधी आहेत असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे ती बाब सुध्दा बरोबर आहे.

उपरोक्त ड्रेनेज लाईन दुरूस्तीबाबतच्या कामाची संबंधित अधिकाऱ्यांनी दिनांक १९ डिसेंबर –२००९ पासून निकड असल्या बाबत कुठलाही पाठपुरावा केलेला दिसत नाही.

सबब, या चौकशी प्रकरणी आम्ही अशा निष्कर्षाप्रत पोहोचलो की, सदरील काम रद्द करणे योग्य राहील.

# डॉ. दिनकर देशपांडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, (सेवानिवृत्त) यांच्या विरुध्दच्या औषधी खरेदी प्रकरणातील

## चौकशी अहवाल

डॉ.दिनकरराव देशपांडे हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग, औरंगाबाद येथे महागनरपालिकेच्या सेवेत होते. ते या सेवेतून निवृत्त झाले. या पदावर कार्यरत असतांना त्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कार्याकडे निष्काळजीपणाने दुर्लक्ष केलेले होते व त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) अधिनियम १९७९ च्या नियम ३ (१) व (३) चा भंग त्यांनी केला, असा दोषारोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी दिनांक ११/०२/२००२ रोजी दिलेल्या लेखा परिक्षण अहवालात २००० - २००१ व २००१ - २००२ या वर्षातील औषधी, वैद्यकीय उपकरणे व साहित्य, इत्यादि खरेदीबाबत महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले आहे व नियमांचे उल्लघंन करुन खरेदीचा व्यवहार केला आहे असे नमूद केले आहे. लेखा परिक्षण अहवालात परिशिष्ट 'अ' मध्ये वरील दोन वर्षात जादा खर्चामुळे झालेले आर्थिक नुकसान खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.केंकरे ब्रदर्स, मुंबई | रु. ३,३४,८०३/- |
| २) | मे.प्रिमियम असोसिएटस्, नागपूर | रु. २,०३,४२०/- |
| | **एकूण** | **रु. ५,२८,२२३/-** |

२) तसेच, मे. तिवीम फार्मास्युटीकल्स, म्हापसा, गोवा यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या औषधी गोळयासाठी रु. ९,८५,४००/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. सदर खरेदी ही विशिष्ट गुणधर्माच्या गोळयांचे व्यापार नाव (Trade Name) देऊन व एकच निविदा अंतर्गत वाटाघाटी करुन खरेदी केलेली आहे. मंजूर केलेले दर हे कंपनीच्या अधिकतम किमतीपेक्षा (Market Rate Price) जास्त आहेत. मात्र त्या ऐवजी तसेच गुणधर्म असणाऱ्या दर करारावरील अथवा अन्य कंपनीच्या औषधी - गोळया खरेदी केल्या असत्या तर होणारा एकूण खर्च रु. ४,७७,९००/- ने कमी होऊ शकला असता व पर्यायाने महापालिकेचा आर्थिक फायदा झाला असता, असा लेखा परिक्षणात उल्लेख आहे.

३) सन १९९८-१९९९ व १९९९-२००० या वर्षी खरेदी करण्यात आलेल्या साहित्याच्या काही बिलांची चाचणी तपासणी घेण्यात आली असता त्यात प्रामुख्याने एक्सरे फिल्म, ग्लास सिरीज,हास्पीटल बेड, लॉकर्स इत्यादी ठळक साहित्यांची प्रत्यक्ष पडताळणी व खरेदीची बिले तपासली असता त्यातही आर्थिक नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आलेले आहे. उदा. एक्सरे फिल्मच्या रु. ९९,२३४/- च्या खरेदीत रु. ५९,२००/- ही रक्कम जादा दिल्याचे दिसून आले.

४) खरेदीचे व्यवस्थित नियोजन न केल्यामुळे सन २०००-२००१ या वर्षी आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेचा निधी एकाच प्रकारच्या औषधीमध्ये अडकून पडल्याची बाब निदर्शनास आली. मे. तिवीस फार्मास्युटीकल्स, म्हापसा, गोवा यांचे कडून दिनांक १५/२/२००१ व ३१/३/२००१ रोजी 'टिव्ही फ्लॅम' या गोळ्याची प्रत्येकी २.५० लाख प्रमाणे एकूण ५ लाख गोळयांची खरेदी करण्यात आली व या गोळयांचा वार्षिक खप हा

जास्त्ीत जास्त २.२५ लाख इतकाच आहे. असे असतांना सुध्दा ५ लाख गोळया खरेदी करुन या एकाच बाबीवर एकूण रु. ६.१५ लाख इतकी रक्कम एकाच वेळी खर्च करणे ही बाब तीव्र आक्षेपार्ह असून महापालिकेचा निधी विनाकारण अडकून पडला आहे.

५) पिण्याचे पाणी निर्जंतुक करण्यासाठी 'क्लोरीन' गोळयाची खरेदी करण्यात आली व या गोळया दर हजारी रु. ४५/- अशा दराने उपलब्ध असतांनाही या गोळया प्रती हजारी रु. ७२.५० अशा दराने खरेदी केल्या आहेत. तसेच याच निविदा सुचनेत मे.तिवीन फार्मास्युटीकल्स, म्हापसा, गोवा यांच्याकडून एकाच निविद्वारे लक्षावधी रुपयांची खरेदी करण्यात येऊन त्यात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. या सर्व औषधी, उपकरणे व साहित्य खरेदीत निविदाद्वारे प्राप्त झालेले दर, इतर उपलब्ध माहिती, दरपत्रके, दर करार, इत्यादीच्या आधारे तांत्रिकदृष्टया तपासून ते दर योग्य आहेत किंवा कसे याची संपूर्णपणे शहानिशा करण्याची जबाबदारी विभाग प्रमुख म्हणून आरोग्य वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. दिनकरराव देशपांडे यांची होती. परंतु आपल्या कर्तव्यात त्यांनी कसूर व दुर्लक्ष केले व एकाच निविदाद्वारे प्राप्त झालेल्या पुरवठा धारकाशी वाटाघाटीचे वेळी सरसकट १०% दर कमी करून निविदा मंजूर केलेल्या आहेत व प्राप्त दर हे सर्व समावेशक असतांना २% पॅकींग चार्जेस म्हणून अदा केलेले आहेत. व त्यामुळे महानगरपालिकेस बऱ्याच प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे.

६) हे सर्व दोषारोप डॉ. दिनकरराव देशपांडे यांनी नाकारले असून त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम, १९७९ मधील नियम ३ (१) (३) मधील तरतुदींचा कुठल्याही प्रकारे भंग केलेली नाही व आपल्या कर्तव्यातील कामाकडे दुर्लक्ष केलेले नाही. या काळातील हिशोबाचे लेखा परिक्षण, मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी वेळोवेळी यापूर्वीच केलेले आहे व तसा अंतीम व पूर्ण अहवाल मुंबई प्रांतीय महानगर अधिनियम, १९४९ च्या १०६ या कलमानुसार दिलेला आहे व सदर व्यवहाराबाबत मा.महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनीही लेखा परिक्षण केलेले आहे. त्यामुळे मुख्य लेखा परिक्षकाचा अहवाल हा मुंबई प्रांतीय महानगर अधिनियम, १९४९ च्या लेखा परिक्षणाच्या तरतुदींशी विसंगत आहे.तसेच मुख्य लेखा परिक्षकांना आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची चौकशी करण्याचे अधिकार वरील अधिनियमानुसार नाहीत. त्यामुळे त्यांचा लेखा परिक्षण अहवाल हा त्यांच्यावर बंधनकारक नाही. हा अहवाल तयार करण्यापुर्वी महानगरपालिका (यापुढे म.न.पा. असे संबोधण्यात येईल.) च्या प्रशासनास त्या संबंधी त्यांचे काय म्हणणे आहे हे लेखी स्वरुपात प्राप्त करुन घेणे आवश्यक होते. तसे करण्यात आलेले नाही. त्यांचे म्हणणे ऐकून न घेता म.न.पा. च्या प्रशासनावर अन्याय झालेला आहे व प्रशासनाची बदनामी झ ालेली आहे. मुंबई प्रांतीय महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ७३ व प्रकरण ५ या प्रमाणे खरेदी करणे बंधनकारक आहे व त्यानुसारच जाहीर निविदा काढून कायदेशीररित्या खरेदी करण्यात आलेले आहे. निविदा मागवण्याची कार्यवाही जरी एप्रिलमध्ये सुरु केली तरी म.न.पा.तील कार्यपध्दतीनुसार अंतिम करण्यासाठी बराच कालावधी लागतो. म.न.पा. तील दवाखान्यातील औषधी व साहित्य खरेदी सार्वजनिक आरोग्य व जीव रक्षणासाठी जनतेचे हीत लक्षात घेऊनच पुर्वीच्या स्थायी समितीने मंजूर केलेल्या दराने व योग्य त्या अधिकाऱ्याच्या मंजूरी नंतर वेळप्रसंगी औषध व साहित्य खरेदी करण्यात आले आहे व त्यात आक्षेंपार्ह काहीच नाही.

७) निविदा संबंधी वृत्तपत्रात जाहीरात देणे संबंधी संविदा या शिर्षकाखालील मुंबई प्रांतीय महानगर अधिनियम, १९४९ च्या तरतुदीनुसार प्रकरण ५ नियम २ (१) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून औषधी व साहित्य इत्यादीची खरेदी करण्यात आलेली आहे व या सर्व तरतुदींचे पालन केलेले आहे. मुख्य लेखा परिक्षकाच्या अहवालात नमूद केलेली पध्दती अवलंबणे असल्यास म.न.पा. च्या मंजूरीने संबंधित नियमात तरतूद करुन घ्यावी लागेल व नंतरच ती बंधनकारक राहील. या आधी नियमाच्या तरतुदीनुसार औषधी व साहित्य खरेदी करण्यासाठी गठीत केलेल्या समितीत मा.आयुक्त, मुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखा अधिकारी व आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश होता व त्यांनी जाहीरात देवून मागविलेल्या सर्व निविदांचा सर्वांगीण विचार करुन पुरवठा धारकास प्रत्यक्ष बोलावून त्याच्या बरोबर वाटाघाटी करुन सार्वजनिक आरोग्य व जीव रक्षणाची गरज लक्षात घेवून कमीत कमी दर असलेल्या निविदापेक्षा १०% दर कमी करुन मा.आयुक्तांकडे मंजूरीसाठी सादर केले व हे दर मा. आयुक्तांनी मंजूर करून निविदा अंतिम मंजूरीसाठी स्थायी समितीसमोर वेळोवेळी सादर करुन मंजूर करुन घेतले. २% पॅकींग चार्जेसची अदाई ही संबंधित पुरवठा धारकाशी केलेल्या करारनाम्यानुसार आहे. त्यामुळे म.न.पा.स आर्थिक फटका बसला हे म्हणणे बरोबर नाही. टिव्ही फ्लॅमच्या गोळयाचा वापर म.न.पा.तील दवाखान्यात मोठया प्रमाणात करावा लागतो व त्यामुळे या गोळयाचा स्टॉक जीव रक्षणाकरिता म्हणून केलेला आहे. त्यात म.न.पा.चा निधी विनाकारण अडकून पडला नाही.

८) तसेच पिण्याच्या पाण्याचे निर्जंतुकीकरण करण्यासाठी क्लोरीनच्या गोळया खरेदीबाबत जो आक्षेप घेतला आहे तोही चुकीचा आहे. या गोळयाही निविदा मागवून कायदयातील तरतुदीनुसार खरेदी केल्या आहेत. शहरातून गॅस्ट्रो, कावीळ इत्यादी पाण्यापासून होणारे रोग याला प्रतिबंध करण्यासाठी या गोळया पिण्याचे पाणी निर्जंतुक करण्यासाठी आवश्यक आहेत. शासनाचा दर करार म.न.पा.स.म.न.पा. ने नियम केलेले नसल्याने बंधनकारक नाही. या एका गोळीत ४७% क्लोरीनचे प्रमाण ३३% आहे. खरेदी करण्यात आलेल्या गोळया आय.एस.आय. मार्कच्या आहेत. म.न.पा.चे आर्थिकदृष्टया हित व गुणवत्ता लक्षात घेवूनच तातडीची गरज असल्याने या गोळयांची खरेदी करण्यात आली आहे.

९) मुख्य लेखा परिक्षकाच्या अहवालात जे रु. ५,२८,२३३/- चे आर्थिक नुकसान झाले हे काल्पनिक असल्याचे सिध्द होते. जादा खर्चाबाबत तपशील हा ढोबळमानाने तयार केला आहे. वरील अनुमान कोणत्या आधारावर केले आहे. याचा तपशील लेखा परिक्षणात नाही. म.न.पा.ने जाहीर निविदा काढतांना हे स्पष्ट केले की, कुठल्याही औषधी व साहित्याच्या ब्रॅंडमध्ये बदली वस्तू घेण्यात येणार नाही. रु. ४,७७,९००/- चा जादा खर्च हा चुकीच्या माहितीच्या आधारावर काढलेला आहे. यात म.न.पा.चे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

सर्व औषधी व साहित्य खरेदी मुंबई प्रांतीय महानगर अधिनियम, १९४९ च्या तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे. शासनाचे दर अथवा शासन आदेशानुसार खरेदी करावयाची असेल तर सर्वसाधारण सभेच्या ठरावाची गरज आहे. त्यामुळे सर्व आरोप डॉ. दिनकरराव देशपांडें यांनी आपल्या लेखी निवेदनात नाकारले आहेत.

१०) मुख्य लेखा परिक्षक मनपा ,औरंगाबाद यांनी आपल्या लेखा परिक्षण अहवालात परिच्छेद (१ ते ६) या संबंधी पुढील प्रमाणे उहापोह केला.

१. औषधी / वैद्यकीय साहित्य खरेदी इ. चे वेगवेगळे गट करून त्या त्या उत्पादकांकडून अथवा पुरवठादारांकडून दर प्राप्त करणे आवश्यक होते. परंतु सर्व मिळून साधारणत: ६३५ बाबींची एकच निविदा प्रसारित केल्यामुळे व त्यासाठी भरावी लागणारी अनामत रक्कम मोठी असल्यामुळे पुरेशा निविदा प्राप्त झालेल्या नाहीत.

२. संख्या करार अथवा दरकरार या पध्दतीने खरेदी करण्याची मुभा आहे. मात्र शक्यतोवर खरेदीची अंदाजीत रक्कम ठरवून वर्षभरासाठी लागणाऱ्या औषधी इ. ची संख्या कराराद्वारे खरेदी केली गेल्यास - निविदाधारकास पुरवठा करावयाच्या मालाची आगाऊ कल्पना असल्यामुळे किफायतशीर दर प्राप्त होवू शकतात. मात्र अशी पध्दती न अवलंबिता फक्त दर प्राप्त करून लागेल तशी खरेदी केलेली आहे.

३. खरेदीचे संपूर्ण आर्थिक वर्षाचे आगाऊ नियोजन करून निविदा मान्य होण्याचा संभाव्य कालावधी विचारात घेता आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वी निविदा अंतिम करणे आवश्यक होते. परंतु गेल्या ५/६ वर्षात, असे नियोजन न केल्यामुळे एक एप्रिल पासून पुढच्या वर्षाची निविदा कधी-कधी ऑक्टोंबर / नोव्हेंबर पर्यंत अंतिम होवून तो पर्यंत मागील निविदा दरानेच खरेदी करण्यात आली ही बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे.

४. संपूर्ण वर्षभरात निविदेद्वारा खरेदी केलेल्या औषधांची किंमत विचारात घेता नियमानुसार सदरच्या निविदा सूचना राज्य स्तरावरील, एक प्रादेशिक स्तरावरील एक व जिल्हा स्तरावरील एक अशा सर्वाधिक खपाच्या दैनिक वर्तमान पत्रातून प्रसिध्द करणे बंधनकारक असतांना एक / दोन अपवाद वगळता निविदा सूचना या स्थानिक पातळीवरील कमी खपाच्या वर्तमानपत्रात (जसे दै.मराठवाडा, लोकवार्ता, विश्वमित्र, आलमगीर टाईम्स्, शासन सम्राट इ.) प्रसिध्दीस देण्यात आल्या. त्यामुळे स्पर्धात्मक दराच्या निविदा प्राप्त होवू शकल्या नाहीत. तसेच प्रत्येक वेळी ३/४ निविदा प्राप्त झाल्या आहेत. ही बाब आर्थिकदृष्टया महानगरपालिकेचे नुकसान करणारी असल्याने या बाबत तिव्र आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

५. प्राप्त निविदापैकी फक्त एकाच निविदाधारकाने (मे.केंकरे ब्रदर्स , मुंबई ) जास्तीत जास्त बाबींचे दर नमूद केलेले आहेत. उर्वरित निविदा धारकांनी अत्यल्प बाबींचे दर नमूद केलेले आहेत. तसेच शासन नियमानुसार दोन लिफाफा पध्दती अवलंब करण्याचे आदेश असतांना फक्त एकच लिफाफा पध्दतीचा अवलंब केल्याने आवश्यक ती कागदपत्रे सादर न करणाऱ्या निविदाधारकांचा सुध्दा विचार करण्यात आलेला आहे. प्राप्त झालेल्या निविदा या केवळ मे. केंकरे ब्रदर्स, मुंबई यांची एक निविदा ही सर्व बाबींसाठी असल्यामुळे व इतरांनी अल्प बाबींचे दर भरल्यामुळे स्पर्धात्मक दरांचा कोणताही फायदा झालेला नाही. त्यामुळे फेर निविदा मागविणे आवश्यक होते. पंरतु तसे एकदाही केले नाही.

६. एकाच निविदेद्वारे प्राप्त झालेले दर हे इतर उपलब्ध माहिती दरपत्रके, दरकरार इ. च्या आधारे तांत्रिकदृष्टया तपासून ते दर योग्य आहेत किंवा

कसे ? याची पूर्णपणे शहानिशा करण्याची जबाबदारी विभाग प्रमुख म्हणून आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची होती. परंतू तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करता एकाच निविदेद्वारे प्राप्त झालेल्या पुरवठा धारकांशी वाटाघाटीचे वेळी सरसकट १०% दर कमी करून निविदा मंजूर केलेल्या आहेत. मात्र त्याच वेळी प्राप्त दर हे सर्व समावेशक असतांना २% पॅकिंग चार्जेस म्हणून अदा केलेले आहे. त्यामुळे महापालिकेस बऱ्याच प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे.

११) उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता पुढील बाबी सिध्द झाल्या आहेत.

१) **मुंबई प्रांतिय महानगर अधिनियम , १९४९ अन्वये निविदा मागविण्याचा अधिकार आयुक्तांना आहे व महाराष्ट्र शासनाची खरेदीसंबंधीची जी नियमावली आहे ती जरी महानगरपालिकेला जशीच्या तशी मान्य होणे बंधनकारक जरी नसले तरी या सर्व व्यवहारात पारदर्शकता, सचोटी व वरील कायद्याच्या तरतुदीनुसार सर्व व्यवहार झाला पाहिजे अशी अपेक्षा आहे. केवळ निविदा मागविल्या म्हणजे वरील कायद्यात ज्या तरतुदी आहेत त्याचे पालन झाले असे होत नाही. या संबंधीचा जो युक्तीवाद डॉ. देशपांडे यांच्या वतीने केला गेला तो मान्य होणारा नाही. निविदा या परिपूर्ण पाहिजे व अपूर्ण असतील तर फेरनिविदा मागविणे आवश्यक होते. डॉ.देशपांडे यांनी आपल्या लेखी युक्तीवादाबरोबर वृत्तपत्रात ज्या निविदा आल्या आहेत त्याची छायांकित प्रत सादर केली आहे. या निविदा दिनांक ५.१०.२००० च्या दैनिक सामना व दै.शासन सम्राट यात प्रसिध्द झाल्या आहेत व या निविदा आयुक्तांनी मागविल्या आहेत. केवळ नियमांची पुर्तता केली असे भासविणे हे स्पष्ट अनुमान यातून निघते. या निविदा ज्या वृत्तपत्राचा खप भरपूर आहे त्यात का प्रसिध्दीस दिल्या नाहीत, याचा खुलासा नाही. २% पॅकींग चार्जेस देवू असे कोठेही म्हटलेले नाही. १०% किंमत कमी करू असेही या निविदेत म्हटले नाही. दोन पाकिट पध्दतीचा अवलंब केला असे दर्शविले आहे. जास्तीत जास्त स्पर्धक निविदा पाठवतील असा कसलाही प्रयत्न नव्हता. त्यामुळे वर जे अनुमान काढले आहे त्याला प्रतिकार होवू शकत नाही. अनुल्लंघनिय असे याबाबतीत अनुमान काढावे लागते की कायद्याची पुर्तता केली असा आभास निमार्ण केला.**

२) **एकाच संस्थेच्या निविदा मान्य केल्या गेल्या आहेत व एकच निविदा धारकाच्या निविदा परिपूर्ण होत्या. एकाच संस्थेच्या निविदा मान्य करण्याचे कारण हे नियमबाहय व खरेदीच्या विहीत पध्दतीच्या विरूध्द आहे.**

३) निविदा मान्य केल्यावर मान्य केलेल्या दरामध्ये सर्व कर म्हणजे स्थानिक कर, विक्री कर व इतर कराचा समावेश असतो. २% पॅकींग चार्जेस लावणे या संबंधीचा कसलाही उल्लेख निविदात नसतानाही असे करणे हे नियमाबाहय आहे.

४) **सर्व खरेदी वर्षानुवर्ष मे. केंकरे ब्रदर्स, मुंबई या पुरवठा धारकाकडून केली गेली. जास्त खप असलेल्या वृत्तपत्रात जर निविदा प्रसिध्दीस दिल्या असत्या तर जास्त स्पर्धकांनी यात भाग घेतला असता. पण तसे करण्यात आले नाही. एकाच** विशिष्ट

पुरवठा करणाऱ्या औषधी, उपकरणे व साहित्य या कंपनीकडून खरेदी करणे त्यामुळे संशयास्पद ठरते. यात निश्चितच घोटाळा झाला आहे असा स्पष्ट निष्कर्ष निघतो.

५) राज्य अंगीकृत व केंद्र शासन पुरस्कृत औषधी कंपन्या जसे हाफकिन बायो फार्मास्युटीकल,मुंबई, हाफकीन अजंठा, जळगांव व महाराष्ट्र ॲन्टीबायोटिक लिमिटेड, नागपूर मुंबई या संस्थेकडून खरेदी झाली नाही. याला डॉ. दिनकरराव देशपांडे यांचा युक्तीवाद असा की तसे करणे मुंबई प्रांतिय महानगर अधिनियम १९४९ प्रमाणे बंधकारक नाही हे जरी क्षणभर मान्य केले तरी तसा स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करुन औषधी उपकरणे व साहित्य यांची खरेदी करता आली असती. पण ही गोष्टही विभाग प्रमुख डॉ.दिनकरराव देशपांडे यांनी केली नाही.

६) खरेदी समिती स्थापन करावी असा आग्रह ही डॉ.दिनकराव देशपांडे यांनी विभाग प्रमुख म्हणून धरला नाही व तसा अभिप्रायही दिला नाही. २५ लाखापेक्षाही सर्व जर करावयाचे असतील तर अशी खरेदी समिती मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली गठीत करावी असा आग्रह डॉ.दिनकराराव देशपांडे यांना लेखी अभिप्राय देवून करता आला असता, परंतु तो त्यांनी केला नाही ही बाब स्पष्ट आहे.

७) वर नमुद केल्यानुसार स्पर्धात्मक निविदा मागविण्यात आल्या नाहीत.

८) निविदाचे आर्थिक वर्षाचे नियाजन अगोदरच करून ठेवणे आवश्यक होते. निविदा कधी एक एप्रिल तर कधी ऑक्टोंबर / नोव्हेंबर या महिन्यात काढण्यात आल्या व ऑक्टोंबर / नोव्हेंबर पर्यंत मागील निविदा दरानेच खरर्दी करण्यात आली. या सर्व बाबी अत्यंत आक्षेपार्ह व खरेदीत घोटाळा झाला आहे हे निर्देशित करणाऱ्या आहेत.

९) एकच लिफाफा पध्दतीचा अवलंब केला आहे . दोन लिफाफा पध्दतीनुसार अवलंब करण्याचे निविदात भासविले तरी फक्त एकच लिफाफा पध्दतीचा अवलंब केल्यामुळे आवश्यक कागदपत्रे सादर न करणाऱ्या निविदा धारकाचा सुध्दा विचार करण्यात आला आहे. प्राप्त झालेल्या निविदा या केवळ मे. केंकरे ब्रदर्स , मुंबई यांची एकच निविदा ही सर्व बाबीसाठी असल्याने व इतरांनी असा दर भरल्यामुळे स्पर्धात्मक दरांचा कोणताही फायदा झाला नाही, असे जे अनुमान मुख्य लेखा परिक्षकांनी काढले ते योग्यच आहे असे म्हणावे लागते. फेर निविदा का मागविल्या नाहीत, याचा खुलासा अपचारी अधिकारी करीत नाहीत.

१०) औषधी, उपकरणे व साहित्य खरेदीपुर्वी या सर्व बाबी मा. आयुक्त व स्थायी समिती समोर प्रस्ताव व अभिप्रायासोबत का ठेवण्यात आल्या नाहीत, याचेही स्पष्टीकरण डॉ. दिनकरराव देशपांडे यांनी दिले नाही. मा. आयुक्तांना या बाबतीत विभाग प्रमुख म्हणून सर्व बाबी त्यांच्या समोर ठेवणे हे डॉ.दिनकरराव देशपांडे यांचे कर्तव्य होते. ते त्यांनी पार पाडले नाही तर त्यात अक्षम्य असे दुर्लक्ष केले आहे.

११) औषधी व साहित्याची वर्षभराची लेखी स्वरुपात मागणी, औषधी गुणवत्ता संख्यात्मक व गुणात्मक दर्जा, रुग्णालयाची उपयोगिता याचेही कसलेच नियोजन डॉ.देशपांडें यांनी केले नाही.

१२) एकूण सर्व पुराव्याचा सांगोपांग विचार केल्यास डॉ.दिनकरराव देशपांडे यांनी आरोग्य विभाग, महानगरपालिका यांचे विभाग प्रमुख म्हणून करावयाच्या कर्तव्यात अक्षम्य असे दुर्लक्ष केले आहे व औषधी उपकरणे व साहित्य खरेदी करताना नियमांची उघड उघड पायमल्ली केली आहे. त्यामुळे अधिकारी म्हणून त्याचे सर्व वर्तन हे शंकास्पद ठरते व त्याची संपूर्ण जबाबदारी डॉ.दिनकरराव देशपांडे यांची आरोग्य विभाग प्रमुख म्हणून आहे व ही जबाबदारी त्यांना झटकता येणार नाही.

**१३) डॉ.दिनकराराव देशपांडे यांच्यावर पुढील दोषारोप ठेवले आहेत.**

अ) अपचारी अधिकाऱ्याने औषधी उपकरणे व साहित्य खरेदीत नियमांचे पालन न करता मनपाचे रु. ५,२८,२२३/-, रु. ४,७७,९००/- व रु. ५९,२००/- असे एकूण रु. १०,५५,३२३/- इतके आर्थिक नुकसान केले आहे.

ब) अपचारी अधिकाऱ्याने महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम-१९७९ मधील नियम-३(१) ०१ चा भंग केला आहे.

**वरील दोन्ही दोषारोप सिध्द होत आहेत.**

# नागरी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (R.C.H.) अंतर्गत नेमणूकींचा चौकशी अहवाल

**१) प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दित नागरिकांना मनपा मार्फत जास्तीतजास्त सेवा देण्यात येत होती. आरोग्य कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना खालील बाबीं प्रामुख्याने जाणवत असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे.

१. औरंगाबाद मनपाचे २४ कार्यरत असलेले कमी दवाखाने.
२. उपलब्ध असलेले मनुष्यबळ अपुरे पडत आहे.

तसेच हा कार्यक्रम राबवितांना खालील आरोग्य समस्या प्रामुख्याने जाणवते असेही नमूद केले आहे.

| | |
|---|---|
| १. औद्योगीकरणाने औरंगाबाद वाढती | * लोकसंख्या सन-१९८१ लोकसंख्या-५,१५,९९४<br>* सन- १९९१ लोकसंख्या- ८,२९,४५३ |
| २. झपाट्याने वाढणारी झोपडपट्टी | * १९९१ जनगणना नुसार ३.५४% |
| ३. बालविवाह | * सन १९९१---- ०.१६३% |
| ४. स्त्री साक्षरतेचे प्रमाण | * सन १९९१---- ५२.९१% |

५. बालमृत्यू प्रमाणे इतर शहरापेक्षा जास्त - आय.एम.आर.-४८.९%, सी.डी.आर.- ७.८%

या सर्व समस्या सोडविण्यासाठी महानगरपालिकेचे मनुष्यबळ व अद्यावत आरोग्य संस्था कमी पडत आहेत. खाजगी दवाखाने, महिला मंडळ प्रतिनिधी, शिक्षक व आय.सी.डी.एस चा सहभाग घेण्यात येत आहे. वरील बाबींचा विचार करून राज्य शासनामार्फत केंद्रशासनाकडे आर्थिक सहाय्यीत प्रस्ताव सादर केला होता. युरोपीयन कमीशन अर्थ सहाय्यीत प्रकल्प केंद्रशासनाने मनपास मंजूर केला आहे. त्यानुसार प्रकल्प राबविण्यात आला. असे आरोग्य विभाग कळवितो

**२) नागरी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (RCH) प्रकल्पाची माहिती :**

१. प्रकल्पाचे नांव :- आरोग्य कुटुंब कल्याण सेक्टर अनव्हेस्टमेंट समिति
सदर प्रकल्पात प्रामुख्याने प्रजनन व बाल आरोग्य यांचा समोवश आहे.

२. प्रकल्पाचे कार्यक्षेत्र :- औरंगाबाद मनपा कार्यक्षेत्र.

३. प्रकल्प मंजुरीचा दिनांक :- २४/९/२००१

४. प्रकल्पाचा कालावधी :- जानेवारी २००२ ते ३१ मार्च २००७

५. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर सर्व प्रकारचा आर्थिकभार मनपा स्विकारणार आहे. त्याप्रमाणे मनपाचे सर्व साधारण सभेत मध्ये ठराव झालेला आहे.

**प्रकल्पाचे प्रमुख उद्देश :**

१. माता व बालकांना सर्व आरोग्य सेवा पुरविणे.
२. किशोरवयीन मुलींचे आरोग्य शिक्षण देणे.
३. प्रसुतीपूर्व, प्रसुती अंतर्गत व प्रसुती पश्चात आवश्यक त्या सेवा पुरविणे.
४. गरजु जोडप्यांना राष्ट्रीय कुटुंब कल्याण सेवा उपलब्ध करून देणे.
५. आरोग्य सेवेचा दर्जा सुधारून गुणवत्ता पुर्ण सेवा देणे. प्रजनन आरोग्य व बाल आरोग्य आबादीत ठेवणेस्तव जनजागृती करणे.
६. समाजाच्या सहभागसह जनतेच्या गरजेनुसार आरोग्य सेवाचे नियोजन करून अंमलबजावणी करणे.

**प्रकल्पाचे १० मुख्य घटक आहेत. :**

१. विविध स्तरावर माता व बाल संगोपन विषयी बाबत जनजागृती निर्माण करणे.
२. प्रजनन व बालआरोग्य विषय शाळेतील मुलींना आरोग्य शिक्षण.
३. तातडीची प्रसुती सेवा व संदर्भ सेवा.
४. पाच वर्षाखालील मुलांचे लसीकरण सेवांचे बळकटीकरण.
५. जीवनसत्व अ चा अभाव कुपोषित मुलांची संख्या कमी करणे.
६. पाच वर्षाखालील मुलांचे मृत्यूचे प्रमाण कमी करणे, श्वसनसंस्थेचे आजार व हगवन यासारख्या आजारांना तातडीने उपचार उपलब्ध करून देणे.
७. गर्भपात व कुटुंब कल्याण अंतर्गत सेवांचे बळकटीकरण करणे.
८. प्रजनन संस्थेचे आजार, गुप्त रोग या रोगांवर औषध उपचार व सेवा उपलब्ध करून देणे.
९. महानगरपालिकेतील आरोग्य सेवा यंत्रणाचे बळकटीकरण.
१०. आरोग्य कर्मचाऱ्यांचे सक्ष्मीकरण करणे.

**१. विविध स्तरावर माता व बाल संगोपन विषयी बाबत जनजागृती निर्माण करणे. :**

या घटकांतर्गत खालील प्रमाणे कार्य करण्यात आलेले आहे.

१. शहरातून ४५ ठिकाणी वॉल पेन्टींग करण्यात आलेले आहे.
२. पत्रकार परिषद घेण्यात आलेली आहे.
३. ४ सी.एम.ई. घेण्यात आलेल्या आहेत. २ खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व २ मनपा वैद्यकीय अधिकारी यांच्याकरिता.
४. आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनिकरिता निबंध स्पर्धा, पथनाट्य स्पर्धा व एकांकिका स्पर्धा एकूण ८ घेण्यात आलेल्या आहेत.
५. पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेमध्ये स्थानिक केबल टि.व्ही. वर फुट नोट, वॉल पेन्टींग, व्हिडीओ शुटींग करण्यात आली आहे.
६. जागतिक आरोग्य दिन व लोकसंख्या दिनानिमित्त गट सभाचे आयोजन करण्यात आले होते.

**२. प्रजनन व बाल आरोग्य विषय शाळेतील मुलींना आरोग्य शिक्षण :**

१. **सदरील घटकांतर्गत खालील प्रकारचे साहित्य तयार करून घेण्यात आले.**

१. संदर्भ सेवा पत्रक

२. सर्व्हेक्षण रजिस्टर
३. ए.एन.सी. कार्ड.
४. चाईल्ड कार्ड.
५. मुलींसाठी हेल्थ चेक-अप कार्ड.
६. कॉपरटी प्रमाणपत्र.

२. स्वयंसेवी संस्थेमार्फत जनजागृती करण्यासाठी जनशिक्षण संस्थान-श्रमीक विद्यापीठ यांची निवड करण्यात आली. सदरील संस्थेमार्फत ९० महिला मंडळ प्रतिनिधी व ६ कम्युनिटी ऑर्गनायझर यांची निवड करण्यात आलेली आहे. या सर्वांवर नियंत्रण ठेवण्याकरिता व आय.ई.सी. ॲक्टीव्हीकरिता श्री. सतीश सुराणा यांना आय.सी.को-ऑर्डीनिटेर म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. सदरील जनजागृतीकरिता कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. प्रत्येक कार्यकर्त्यांना १० ते १२ हजार स्लम भागातील लोकसंख्या देण्यात आलेली आहे.

३. मनपाच्या वैद्यकीय अधिकारी व निमवैद्यकीय कर्मचारी यांना आरोग्य व कुटुंब कल्याण केंद्र सिडको एन-५ येथे आर.सी.एच. प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. वैद्यकीय अधिकारी पी.एच.एन.-४, आरोग्य निरिक्षक-६, एम.पी.डब्ल्यू-८४, एएनएम-२८

४. मुलींची आरोग्य तपासणी व आरोग्य विषयक सल्ला देण्याकरिता शहरातील स्लम व मध्यम वर्गीय भागातील ५९ माध्यमिक शाळेची निवड करण्यात आली असून ७८ शिक्षिकांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**३) तातडीची प्रसूती सेवा व संदर्भ सेवा :**

१) कार्यक्रमांतर्गत मनपाचे ५ आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्यात आलेले आहे.

१. सिडको एन -११ रुग्णालय
२. सिल्कमिल कॉलनी रुग्णालय
३. कैसरकॉलनी रुग्णालय
४. आरोग्य केंद्र बन्सीलालनगर
५. सिडको एन - ८ रुग्णालय

वरील २४ तास रुग्ण सेवा उपलब्ध आहे. कुटुंब कल्याण शस्त्रक्रियाची सेवा, बाळांतपणाची सेवा, गर्भपाताची सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

२) सदरील घटकांतर्गत वैद्यकीय अधिकारी स्त्रीरोगतज्ञ, स्टाफ नर्स, प्रयोगशाळा तत्रंज्ञ , वार्डसेविका यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
३) रुग्णवाहिकेची सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
४) आरोग्य विषयक जनजागृती व आर.सी.एच.प्रकल्पांची माहिती देण्याकरिता शहरातील ४५ स्लम भागातून पथनाटयांचे आयोजन करण्यात आले आहे.

**४) पाच वर्षाखालील मुलांचे लसीकरण सेवांचे बळकटीकरण :**

१) आरोग्य केंद्रामधून आठवडयामधून देण्यात येणाऱ्या विविध आरोग्य सेवा बाबत माहिती देण्याकरिता २५ बोर्ड तयार करण्यात आलेले आहे.
२) ० ते ५ वयोगटातील बालकांची शहरातून ५२ ठिकाणी सुदृढ बालक स्पर्धा

आयोजीत करण्यात आली आहे. स्पर्धामधून एकूण ४८४५ बालकांची बालरोग तज्ञांकडून तपासणी करण्यात आली. एकूण ६२४ बक्षीस वाटप करण्यात आले.

**५) जीवनसत्व अ चा अभाव कुपोषित मुलांची संख्या कमी करणे :**

१) स्तनपान व आहार विषयक माहिती देण्याकरिता २५ बोर्ड पेन्ट करण्यात आले आहे.

२) बालरोगतज्ञाकडून कुपोषित बालकांची आरोग्य तपासणी व आहार विषयक सल्ला

३) आहारविषयक सल्ला बोर्ड पेंन्ट करण्यात आले आहे.

**६) पाच वर्षाखालील मुलांचे मृत्यूचे प्रमाण कमी करणे, श्वसनसंस्थेचे आजार व हगवन यासारख्या आजारांना तातडीने उपचार उपलब्ध करुन देणे**

१) बालरोगतज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२) रुग्णालयामध्ये नवजात शिशु सेवा देण्याकरीता रेडियन्ट हिट वॉर्मर, फोटोथेअरपी युनिटची स्थापना.

**७) गर्भपात व कुटुंब कल्याण अंतर्गत सेवांचे बळकटीकरण करणे :**

१) मनपाच्या ३ वैद्यकीय अधिकारी यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे एम.टी.पी. प्रशिक्षण देण्यात आले आहे. प्रकल्पांतर्गत नियुक्त ४ वैद्यकीय अधिकारी स्त्री रोगतज्ञ प्रशिक्षित आहे.

२) एक भुलतज्ञ यांची नियुक्ती कॉल बेसिसवर करण्यात आली आहे.

**८) प्रजनन संस्थेचे आजार, गुप्त रोग या रोगांवर औषध उपचार व सेवा उपलब्ध करुन देणे :**

१) श्रेणीवर्धीत रुग्णालयात व्ही.डी.आर.एल. तपासणी करण्यात येते.

२) गुप्तरोग विषयक सेवा व सल्ला देण्यात येतो.

**९) महानगरपालिकेतील आरोग्य सेवा यंत्रणाचे बळकटीकरण :**

* सदरील प्रकल्पांतर्गत खालील प्रमाणे करारपध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली होती.

| | |
|---|---|
| १) प्रकल्प सल्लागार | ०१ |
| २) सांख्यिकी सहाय्यक | ०१ |
| ३) क्लार्क कम अकाऊटंट | ०१ |

**१०) आरोग्य कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण करणे :**

१) प्रकल्पांतर्गत नियुक्त महिला मंडळ प्रतिनिधी यांच्याकरीता ७५ माहिती पुस्तिका खाजगी जी.टी.झेड. जर्मन प्रकल्प पुणे मार्फत मोफत उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

२) युरोपीयन कमीशन अर्थ सहाय्यीत सातारा येथे सुरु असलेल्या प्रकल्पाला भेट देण्यात आली आहे.

**सदरील प्रकल्पांतर्गत खालील प्रमाणे ठराविक वेतनावर विहित पध्दतीचा अवलंब करुन दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन, बिंदू नामावली लावून अधिकारी व**

**कर्मचारी यांची करारपध्दतीने नियुक्त करण्यात आले आहे. असा आरोग्य विभागाने दावा केला आहे.**

| अ. क्र. | पदाचे नांव | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| ०१) | वैद्यकीय अधिकारी | १० | ०७ | ०३ |
| ०२) | सांख्यिकी सहाय्यक | ०१ | ०१ | - |
| ०३) | अकाऊन्टंट कम क्लार्क | ०१ | ०१ | - |
| ०४) | स्टाफ नर्स | ११ | ०८ | ०३ |
| ०५) | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०४ | ०२ | ०२ |
| ०५) | वॉर्ड सेविका | १३ | १३ | - |
| **एकूण** | | **४०** | **३२** | **०८** |

**३) दिनांक १६-०७-२००९ रोजी संपन्न झालेल्या औरंगाबाद महानगरपालिकेच्या सर्वसधारण सभेतील (आरसीएच प्रकल्प अंतर्गत महापालिकेत कायमस्वरुपी नियुक्त केलेल्या कर्मचारी भरती संदर्भात) झालेली चर्चा व आरोग्य विभागाचा खुलासा**

**मुद्दा क्र. १** **सौ.लता दलाल** :महापालिकेत ४-५ दिवसापूर्वी म्हणजे या आठवडयात आरसीएच प्रकल्प अंतर्गत काही डॉक्टर, काही कर्मचारी व काही सेवकांना कायम स्वरूपी ऑर्डर देण्यात आलेल्या आहेत याबध्दल या सभागृहासमोर काही माहिती आलेली आहे का, सर्वसाधारण सभेसमोर तो प्रस्ताव मंजुरीसाठी आलेला आहे का याबध्दल माहिती दयावी आरसीएच प्रकल्प अंतर्गतचा जो प्रस्ताव झाला होता माझे माहिती प्रमाणे डॉ कराड हे महापौर व मी उपमहापौर होते त्यावेळी मा.महापौर यांनी असे म्हटलेले होते की या प्रकल्प अंतर्गत सध्या कार्यरत कर्मचारी अधिकारी यांचा खर्च प्रकल्प समाप्तीनतंर महापालिकेच्या फंडातून करावा इथपर्यत ठिक आहे परंतु त्यांना कायमस्वरूपी वर्ग करावे असे या ठरावात नाही.सन १९९५,९६,९८ पासून अनेक अध्किारी कर्मचारी काम करतात त्यांना कायम केले नाही हा सुध्दा प्रकल्प ४ कोटीचा होता २ कोटी आले होते पुढील दोन कोटी येणार होते तोपर्यत त्यांना ठेवायचे व पुढे काय करायचे या साठी या कर्मचा-यांना मानुसकीच्या भावनेतून मान्यता दिली याचा अर्थ त्यांना सेवेत कायम स्वरूपी नियुक्त्या दयावे असे नव्हते.या कर्मचा-यांना कायमस्वरूपी घेणार असाल तर आरोग्य विभागातच वरील प्रमाणे अनेक दिवसापासून कर्मचारी कार्यरत आहे त्याचा काय विचार करणार माझ्या माहिती प्रमाणे सेविकांना ॲटेंडन्स यांना ६महिण्यापासून सेवेत नव्हत्या त्यांना पाठवून त्यांना नियुक्ती पत्र पाठवून बोलवून घेतले असा हा कुठला कारभार चालतो या बद्यल व नियुक्त्या बद्यल संबधीत विभागाचे प्रमुखांनी खुलासा करावा.याच सभागृहात डॉ. वडेरा व इतर काही कर्मचारी यांचा प्रस्ताव आलेला होता त्यांना ऑर्डर दिली असतांना पुन्हा ती ऑर्डर रद्य करून परत या कर्मचा-यांना अस्थायी म्हणून ठराविक दैनिक वेतनावर घेण्यात आले.मग हे कर्मचारी कोठून आले यांचे काही विशेष आहे का या कर्मचा-

यांचे कुणी नातेवाईक संबधातले या प्रशासनामध्ये कुणी आहेत का याचा पण खुलासा करावा व कोणत्या नियमाने केले कारण सभागृहात जो ठराव झाला त्यात कुठेतरी बदल होउन प्रस्ताव गेला असावा शासनाची दिशाभूल केली असावी कोणत्या नियमाने नियुक्त्या दिल्या याची चौकशी झाली पाहिजे तोपर्यत या नियुक्त्या थांबविण्यात याव्या.आणि आरोग्य विभागातील सर्वच कर्मचा-यांना या प्रमाणे कायमस्वरूपी सेवेत घेण्यात यावे कारण ते अगोदरपासून सेवेत आहे नसता त्यांचेवर अन्याय होईल.यापूर्वी काहींना नियुक्त्या दिल्या पुन्हा ऑर्डर परत घेता हा सर्वसाधारण सभेचा सुध्दा अपमान आहे परंतु कुणाचा तरी अक्षेप होता म्हणून त्या नियुक्त्या रद्य केल्या होत्या परंतु इथे मांत्र बिनबोभाट तीनच वर्षापासून कर्मचारी कामावर होते ते महापालिकेचे नाहीत तरी त्यांना कायमस्वरूपी सेवेत नियुक्त केले जाते हा अन्याय मुळीच होता कामा नये न्याय दयायचा तर सर्वांना सारखाच दयावा नसता या दिलेल्या नियुक्त्या रद्य करण्यात याव्यात.या बाबतीत सर्व माहिती विभागप्रमुखाकडून घेण्यात यावी.

**खुलासा**

- सदरील नेमणूक ही माणूसकीच्या भावनेतून नसून मा. सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार व मा. आयुकत यांच्या हमीपत्रानुसार कार्यवाही.
- ६ महिन्यापासून सेवेत नव्हत्या असे कोणीही नाही.
- डॉ. बडेरा आणि इतर कर्मचारी यांचा व RCH मधील अधिकारी व कर्मचारी यांची पदे वेगवेगळी आहे. एकत्र काहीही संबंध नाही.
- कुठेही दिशाभूल करण्यात आलेली नाही. सविस्तर प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या मान्यतेनुसार शासनास मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला आहे.

**मुद्दा क्र. २** **श्री.काशिनाथ कोकाटे** :सर्वसाधारण सभेने जे १९९५ पासून जेसीबी, वाहनचालक,लघुटंकलेखक पदे मंजूर होते ही पदे मंजूर असतांना देखिल अदयाप भरले नाही. ४ महिण्यापूर्वी जेसीबी चालक श्री.मदगे,श्री.बोडखे तसेच श्री.ठोकळ व आरोग्य विभागातील काही कर्मचा-यांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेला आलेला असतांना देखिल प्रशासनाने तो प्रस्ताव परत मागे घेत आहोत व सर्व अस्थायी कर्मचारी यांना एकत्रिक करून कार्यवाही होत आहे म्हणून तो प्रस्ताव थांबविण्याचे पत्र आपल्याकडे आलेले होते.चार वेळेस त्या पदांना मंजूरी आली चारही वेळेस रद्य करण्यात आले पद कुणासाठी व कशासाठी हे काम चाललेले आहे प्रशासन पारदर्शकपणे काम करीत असेल तर अशा प्रकारचा गोंधळ का होतो या आरसीएच प्रकल्पातील कर्मचा-यांना कायमच्या ऑर्डर दिलेल्या नव्हत्या शासनाचा प्रकल्प आहे तो राबविला पाहिजे महापालिकेची मदत आवश्यक आहे म्हणून आरोग्य विभागावर कामाचा व्याप वाढू नये म्हणून नागरीकांना आरोग्याची सुविधा जास्तीत जास्त मिळावी म्हणून त्या कर्मचा-यांना अस्थायी कर्मचारी म्हणून ठेवावे असे आदेशीत केले होते परंतु त्यांना कायमस्वरूपी घेण्यात आले ते करीत असतांना कोणते नियमाचा अवलंब केला याचा खुलासा येथे होणे आवश्यक आहे्.एका कर्मचारी यांना जरी नियुक्ती दयायची असेल तरी तसा ठराव या सभागृहासमोर यायला पाहिजे नसता या सभागृहावर तो अन्याय आहे तो दिशाभूल करणार आहे या

कर्मचा-यांना कायमस्वरूपी करावेच परंतु ज्यांचे प्रस्ताव या सभागृहात आलेले होते त्यांना परत केले त्यांनाही सेवेत कायम करावे.

**खुलासा**
- मुलभूत आरोग्य सेवा सुविधा सर्व नागरिकांना देणे ही महानगरपालिकेचे कार्य आहे. यामध्ये मदत म्हणून या प्रकल्पाद्वारे आर्थिक, भौतिक व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले होते.
- प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर सर्वभार मनपाने सोसावयाचा होता असे शासनाचे आदेश होते. अस्थायी/स्थायी बाब कोणत्या प्रकारचे आदेश नव्हते.

**मुद्दा क्र. ३** **श्री.रेणुकादास वैद्य:** आरसीएच ला मुळ जी मंजूरी दिली होती त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आले. या सभागृहाने काय मंजूर केले याकडे दुर्लक्ष केले गेले.एक समातंर अस्थापना विभाग आरसीएचच्या माध्यमातून चालवण्याचा प्रयत्न या ठिकाणी होतो आहे.अस्थापना विभागाचाच यास पांठीबा असावा याशिवाय हे काम होवू शकत नाही.आरसीएच प्रोजेक्ट संस्थेला दिलेला आहे.ती संस्था चालवते ती संस्था भरती करते ते भरती झालेले लोक महापालिकेत कायमस्वरूपी ट्रान्सपर केले जातात संमातर अस्थापना विभाग चालविण्याचा प्रयत्न या ठिकाणी होत आहे ही गंभीर बाब आहे कोणाचीही मंजूरी न घेता परस्पर जो प्रकार चाललेला आहे तो गंभीर आहे याची बारीक चौकशी करून गुन्हे दाखल करावे अशी विनंती.

**खुलासा** आरसीएच प्रकल्प कोणत्याही संस्थेस देण्यात आला नव्हता. सदरील प्रकल्पाचे मनपा आरोग्य विभागामार्फत सोसायटी स्थापन करून काम करण्यात आले.

**मुद्दा क्र. ४** **श्री.भगवान घडमोडे** :आरसीएच प्रकल्पा अंतर्गत काही कर्मचारी कायमस्वरूपी नियुक्त केले पेपरला वाचले महापालिकेत अनेक कर्मचारी कित्येक वर्षापासून दैनिक वेतनावर काम करतात त्यांचे वय संपले परंतु त्यांना सेवेत कायम केले नाही.आरसीएच ही अशी कोणती योजना आहे त्यांना कायम केले शासनाने आदेश दिले कसे दिले कशाच्या माध्यमातून त्यांना कायम सेवेत घेतले आरसीएच ची मुळ योजना काय आहे कार्यपध्दती काय, त्या कर्मचा-यांना मर्च का करून घेतले कारण काय ज्या काही गोष्टी व्हायला नको त्या मुद्यामहून केल्या जातात ज्यांना न्याय मिळायला पाहिजे त्यांना न्याय मिळत नाही असे होत आहे.कर्मचा-यामध्ये अस्वस्थता पसरली की आरसीएच चे यांचा महापालिकेशी काडीमात्र संबध नसतांना कायम होतात परंतु वर्षानुवर्षापासून दैनिक वेतनावर या महापालिकेत अनेक कर्मचारी सेवा करतात त्यांना न्याय मिळत नाही.म्हणजे कर्मचा-यांची मानसिकता खराब होवून एक प्रकारची महापालिकेच्या कामाला खिळ बसणार आहे.जो सभागृहात ठराव झ ाला होता तो आताच वाचून दाखवला त्या ठरावाचा गैरअर्थ लावला योग्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.आपल्या परीने सेवेत घ्यायचे व आपल्या पध्दतीनेच त्यांना वर्ग करून घ्यायचे काम होत असेल तर योग्य नसून इतर कर्मचा-यावर अन्याय केल्यासारखे होईल म्हणून या केलेल्या नियुक्त्या रद्द केल्या पाहिजे थांबविल्या

पाहिजे. व या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे.हे सर्व कर्मचारी कुणाच्या माध्यमातून नोकरीवर नियुक्त झाले कॉन्ट्रक्ट बेसीस वर होते किंवा कसे अशी पध्दत सुरू झाली तर कॉन्ट्रक्टर महापालिकेकडे येईल काम करेल व कर्मचा-यांना घेण्याची जबाबदारी घ्यावी लागेल तेवढे बजेट महापालिकेकडे आहे का ? जनतेचा नुसता कर जमा करून पगार वाटप करणार का याचा सुध्दा खुलासा व्हावा जेव्हा प्रमोशन ,पगार वाढ किंवा नोकर भरती करायची त्यावेळी प्रशासनातील खर्च हा बरोबर टक्केवारीनुसार होतो जेवढा अस्थापना खर्च तेवढे बजेट फुगवून दाखवायचे.अशी दिशाभूल करून मंजूरी घ्यायची असे प्रकार होतात या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी

**खुलासा**

- आरसीएच मनपा आरोग्य विभागामार्फत इतर कार्यक्रमाप्रमाणे हा एक कार्यक्रम आहे. मनपा आरोग्य विभागातर्फे राबविला जातो.
- सोसायटी मार्फत ठराविक वेतनावर करारपध्दतीने विहित नियमांचा अवलंब करून दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बिंदु नामावली लावून निवड समितीद्वारे नियुक्ती करण्यात आलेली आहे.

**मुद्दा क्र. ५** **श्री.संजय जोशी :** वेगळा मुद्या मांडतो या सर्व गोष्टी आयुक्त जातांनाच का करतात पुर्ण वेळ काम करतांना त्यावेळी हया नियुक्त्या का केल्या नाही बदली होवून जाणार त्यापूर्वी एक किंवा दोन दिवस अगोदरच प्रमोशन नवीन नियुक्त्याची यादी येते त्यानुसार कार्यवाही होते. दुस-या दिवशी वृत्तपत्रात येते आयुक्तांनी जाता जाता खिरापत वाटली, काही लिहितात कर्मचा-यांचे भले केले.का बरे येथे बॉडी नाही का, लोकशाही पध्दतीने आम्हाला निवडूण दिले आहे. आयुक्तांनी साधारण भारतीय प्रशासन सेवेतील असा दंडक आहे असे मला वाटते जाता जाता असे काम आयुक्तांनी करू नये ज्या वेळेस पुर्ण वेळ येथे काम करीत होते.बदली होणार हे त्यांना माहित होते ८-१५ दिवसापूर्वी हे केले असते तर आम्ही त्यांना जाब विचारला असता आता विचारणा केली तर कार्यरत झालेले आयुक्त यांनाही प्रश्न पडेल की त्या आयुक्तांनी घेतलेल्या निर्णया बाबत मी काय निर्णय घेवू साहजिकच आहे.एक माणूस म्हणून सोबत सर्व्हीस करतात म्हणून त्यास हे आयुक्त सुध्दा बांधील राहतील. या पुर्वी असे घडलेले आहे पेव्हर ब्लॉकचे दीड दोन कोटी बिल ॲडव्हान्स देवून निघून गेले दुसरे आयुक्त आले त्यांनी चौकशी सुरू करणार तोच एकमेकांशी संपर्क झाला व ती कार्यवाही तेथेच थांबविली आयुक्तांनी जाता जाताच असे का केले.यापूर्वी ही जाता जाता आयुक्तांनी प्रमोशन केले आताही जाता जाता नियुक्त्या कुणी उधारीत परवानगी देतात या सर्व गोष्टी सभागृहाच्या भावना नगरविकास सचिव यांना कळविल्या पाहिजे नगरसेवक वाईट नाही येणारे आयुक्त जाता जाता काय करून जातात याचा सविस्तर अहवाल तयार करून शासनाला पाठवावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

| | | |
|---|---|---|
| **मुद्दा क्र. ६** | **श्री.प्रशांत देसरडा** | :आरसीएच व औरंगाबाद महानगरपालिकेचा दुरदुर संबध नाही आरसीएच अंतर्गत जे काम चालते त्यांची वेगळी ट्रस्ट आहे यात आयुक्त हे अध्यक्ष व आरोग्य अधिकारी हे सचिव आहे त्याचे धर्मादाय आयुक्त विभागाकडे रजिस्ट्रेशन असते जरी सेकंन्ड सर्टिफिकेट घेतले असले नसले तरी करोडो रूपये खर्च केले असे भारतात कुठेही उदाहरण मिळणार नाही.मा.धर्मादाय आयुक्तालयाकडून दोन सर्टीफिकेट घ्यावे लागतात या आरसीएच कडे एकच होते. जेंव्हा ठराव या सभागृहात आला होता त्यावेळी मी आरसीएच प्रकल्पातील कर्मचा-यांना कॉन्ट्रॅक्ट बेसेस वर का भरती करीत नाही प्रशासनाला प्रश्न केला होता त्यावेळी आयुक्तांनी असा खुलासा केला की सदर कर्मचारी कॉन्ट्रॅक्ट बेसेसवर भरती केले जातील इतिवृत्तात तशी नोंद आहे.शासनाला जेंव्हा पत्रव्यवहार केला त्यावेळी सदर ४० कर्मचारी हे महानगरपालिकेच्या सेवेत आहे म्हणून कायम करण्याची मंजूरी दयावी म्हटलेले होते यात शासनाची प्रशासनाने दिशाभूल केली आहे.जो कर्मचारी महापालिकेच्या सेवेत अस्थायी दैनिक वेतनावर कार्यरत असेल त्यांना सेवेत कायम करता येते.अनेक प्रकरण न्यायालयात आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाचे असे निर्देश आहे की कर्मचारी भरती करतांना वृत्तपत्रात ओपन जाहिरात देवून भरती केले पाहिजे.४० पदे जी निर्माण केली जो प्रस्ताव आणला ती पदे वेगळी व आता भरती केलेले वेगळे यात एक ऑडीटर म्हणून पद आहे आपणांकडे मुख्यलेखा परीक्षक ,मुख्यलेखाधिकारी असतांना त्या पदाची येथे आवश्यकता काय जे मिळाले ते घेतले या प्रमाणे शासनाकडे यादी पाठविली व हे कर्मचारी महापालिकेच्या सेवेत आहे यांना कायम करण्याची परवानगी दयावी असे पत्र व्यवहार मा. सचिव यांना केला त्यानुसार या पदांना मंजूरी दिली. हे कर्मचारी फेज-२ चे आहेत फेज -१ च्या कर्मचा-यांवर का अन्याय होतो असा भेदभाव का असे ही कळाले की फेज-१ चे कर्मचारी भेटले नाही.एक तर खुल्या पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात देवून लेखी, तोंडी चांचणी घेवून ही पदे भरावयास पाहिजे होती.प्रशासकीय खर्च हा ३५ टक्के पेक्षा जास्त व्हायला नको परंतु वसुलीचा विचार केला तर हा खर्च ४५ टक्केपर्यत जात आहे. जे शासनाकडे पाठवले त्यात असे म्हटले की खास बाब म्हणून मंजूरी दयावी एवढी काय आवश्यकता होती या पदांना मंजूरी घेणे आवश्यकच होते.महापालिकेत लाईनमन असतील सुरक्षा रक्षक असतील पदे रिक्त असतांना अस्थायी कर्मचा-यामधून भरती केली जात नाही. २५-२५ वर्ष झाले कायम करित नाही झोनचे एक कर्मचारी दैनिक वेतनावर सेवा करून निवृत्त झाले.३५ टक्केच्या खर्चात बसत नाही परंतु प्रशासनाने त्यांचे बाबतीत खास बाब म्हणून शासनाकडून त्यांना सेवेत कायम करण्या बाबत परवानगी मागीतली नाही.हा सर्व प्रकार संशयास्पद आहे शासनाकडून या पदांना मंजूरी आल्यानंतर या सभागृहाची मंजूरी घेणे जरूरी आहे |

की नाही जी नोकर भरती निवड समिती आहे त्यात सुध्दा चुकीचा प्रस्ताव ठेवला त्यामूळे पूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी.व तोपर्यत या कर्मचा-यांना आरसीएच प्रकल्पा अंतर्गत काम करण्याची बंदी घालावी.

**खुलासा**
- मनपा आरोग्य विभागात RCH कार्यक्रम राबवतो. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार समितीची स्थापना करून प्रकल्प राबविला जातो.
- सदरील पदे वृत्तपत्रात जाहिरात देऊन भरण्यात आलेली आहेत. जी ४० पदे निर्माण करण्यात आलेली व भरण्यात आलेली पदे यात कोणतीही इतर पदे भरण्यात आलेली नाही. यामध्ये तफावत नाही. ऑडीटर हे पद नाही.
- सदरील पदे EC-SIP(RCHI) प्रकल्पांतर्गत भरण्यात आलेली होती.

**मुद्दा क्र. ७** **श्री.अ.साजेद अ.सत्तार:** या प्रकरणी महानगरपालिकेने मा. प्रधान सचिव यांना दिं.२२-११-२००७ रोजी एक पत्र पाठवून त्यात असे दिले की महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत आरोग्य सेवेसाठी ४० प्रस्तावित पर्जन्य व बालआरोग्य कार्यक्रम अंतर्गत भरण्यात आलेली पदे कॉन्ट्रक्ट बेसीसवर घेतलेले होते. परंतु महापालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी असे लिहिले की या कार्यक्रम अंतर्गत भरण्यात आलेली पदे महापालिका अस्थापनेवर समावून घ्यायची आहे.प्रकरणी वरील प्रमाणे प्रकल्प अस्थापनेवर पर्जन्य व बाल आरोग्य सेवेसाठी वरील प्रमाणे नमुद केलेली ४० पदे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४)नुसार औरंगाबाद महानगरपालिकावर अस्थापनेवर तातडीने शासनाची मान्यता देण्यात यावी. हे कर्मचारी महापालिकेने कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घेतलेले आहे असा कुठेही उल्लेख केलेला नाही.शासनाची दिशाभूल करून व शासनाला एकूण ०७ पत्रे दिलेली आहे.नियुक्त्या करण्या बाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. जोपर्यत नावासहीत सर्वसाधारण सभा कोणत्याही पदाला मान्यता देत नाही तोपर्यत पदे भरता येत नाही.परंतु हे आदेश काढतांना सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यात आलेली नाही.तसेच पदाधिकारी स.सदस्यांना विश्वासात घेण्यात आले नाही.ज्या नियुक्त्या केल्या त्यास स्थागिती दयावी स्थायी समिती मध्ये या प्रकरणात मुख्य लेखा परीक्षक यांची कमेटी केलेली आहे त्यांचा अहवाल येईलच सत्यता काय आहे समजेल मा.सर्वोच्च न्यायालयाने नोकर भरतीच्या प्रकरणामध्ये असा निर्णय दिला की मागच्या दाराने कुणी कर्मचारी भरती करू नये कोणतेही पद भरतांना स्पर्धा झाली पाहिजे अस्थापनेवर १२ ते १५ वर्षापासून काही कर्मचारी कार्यरत आहे त्यांना कायम सेवेत न घेता कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर असलेल्या कर्मचा-यांना सेवेत कायम करण्याची ॲक्ट मध्ये कोणतीही प्रोव्हीजन नाही. जे आदेश दिले त्यास स्टे दयावा या प्रकरणाची सखोल चौकशी करून पुढील कार्यवाही करावी.

**खुलासा**
- मा. प्रधान सचिव, यांना दि. २२/११/२००७ च्या पाठविण्यात आलेल्या पत्रात परि. क्र. ३ वर स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे.

**मुद्दा क्र.८** **सौ.लता दलाल** : सभागृहाचे नियम धाब्यावर बसून काही गोष्टी घडतात त्याबद्यल सदस्यांनी मत व्यक्त केले गेल्या आठ दिवसात मा.आयुक्तांनी जे

प्रमोशन किंवा बदल्या जे काही केले असेल त्यांची चौकशी व्हावी आयुक्तांचीही चौकशी करावी व शासनाकडे पाठविण्यात यावे जेणे करून अशा गोष्टीना खिळ बसेल.

**मुद्दा क्र. ९** **डॉ.भागवत कराड :** या महापालिकेला केंद्र शासनाकडून आरसीएच-१ ,२ प्रकल्प मंजूर करण्यात आले होते या प्रकल्प अंतर्गत महापालिकेला अनुदान मिळाले होते अनुदान मिळाल्यानंतर जे कर्मचारी नियुक्त केले ते कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घेतले होते त्यांना सेवेत कायम घेण्यात यावे अशा प्रकारचा ठरावा केंव्हाही झालेला नाही.त्या कर्मचा-यांना महापालिकेच्या फंडातून रक्कम दयावी असा २००७ चा ठराव आहे कॉन्ट्रक्ट जो असेल जे काही पैसे दयायचे असतील पगार दयायचा असेल त्यात त्यांनी चालवावा असे ठरलेले होते.परंतु त्यानंतर महापालिका प्रशासनाने शासनाकडे पत्रव्यवहार केला व त्यांचे कायमस्वरूपी नियुक्ती देण्यासाठी पदास मान्यता घेणेसाठी प्रयत्न केला हे या सभागृहाला माहित नाही.महापालिकेत २६० -२७० कर्मचारी अस्थायी म्हणून अनेक वर्षापासून कार्यरत आहे त्यांना सेवेत कायम करण्यासाठी व त्या पदांना शासनाकडून मंजूरी आणून त्यांना सेवेत कायम करण्या बद्यल काही केले नाही परंतु कॉन्ट्रक्ट बेसीसवर जे आरसीएच प्रकल्पा अंतर्गत कर्मचारी होते त्यांना कायमस्वरूपी नियुक्तीचे आदेश दिले हे चुकीचे असून या सभागृहाला अंधारात ठेवून हे केलेले काम आहे.प्रशासनामध्ये जे कुणी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करण्याची गरज आहे ही सभागृहाची भावना आहे वाटेल तर तसा ऐनवेळी ठराव घ्यावा व केलेल्या नियुक्त्या हया रद्य कराव्यात.

**मुद्दा क्र.१०** **श्री.गजानन बारवाल** :आरसीएच मधे झालेला घोटाळा मोठा आहे हे सध्यातरी दिसून येते.या बाबतीत गांभीर्याने लक्ष देवून या बाबतीत खुलासा घेण्यात यावा खुलासा झाल्या नंतर जे दोषी असतील त्यांचे वर कडक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने गुन्हे नोंद करावेत.ज्या नियुक्त्या झाल्या त्या लगेच रद्य कराव्यात

**मा.महापौर:** अस्थापना विभागाचे अधिकारी यांनी खुलासा दयावा.

**मुद्दा क्र. ११** **श्री.प्रशांत देसरडा :** आरसीएच प्रकल्प हा आरोग्य विभागाशी निगडीत आहे त्या विभागाकडून खुलासा घेण्यात यावा.

**मुद्दा क्र. १२** **आरोग्य वैद्य. अधि.:** आरसीएच किंवा इसीएसआयपी या नावाने ओळखला जाणारा कार्यक्रम १९९९ साली सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार शासनाला कळविले होते की या महापालिका क्षेत्रामध्ये हा कार्यक्रम राबविला जावा त्याप्रमाणे सन २००२ साली हा कार्यक्रम सुरू झाला सुरूवातीला इसीएसआयपी कार्यक्रमाच्या अंडर एक वर्ष या कार्यकमाच्या प्रिपरेशनसाठी नंतर ४ वर्ष हा कार्यक्रम चालेल असे जाहिर केले

होते.यासाठी पुर्ण फंड हे शासन देणार होते. हा कार्यक्रम पुर्ण शासनातर्फे मंजूर करण्यात आला होता.शासनाने त्याचवेळी महानगरपालिकेकडून असे इशुंरन्स घेतलेले होते की हा कार्यक्रम पुढे बंद पडता कामा नये.महापालिकेने पुढे कन्टीन्यू ठेवावा तसे इंशुरन्स सर्वसाधारण सभेने व आयुक्ताच्या मार्फत देण्यात आलेले होते.त्याप्रमाणे हा कार्यक्रम २००२ साली चालू झाला २००६ पर्यंत चालू होता.या कार्यक्रमासाठी लागणारे सर्व कर्मचारी कॉन्ट्रक्ट पध्दतीने पदे भरलेली होती कायमची नियुक्त म्हणता येणार नाही सन २००६ साली हा कार्यक्रम संपला त्यावेळी शासनाने यास एक वर्षाची मुदतवाढ दिली त्यानुसार २००७ पर्यत कार्यक्रम चालू राहिला.२००७ मध्ये शासनाने ज्या प्रमाणे अगोदर सांगितलेले होते की हे नंतर महानगरपालिकेने घ्यावे त्या प्रमाणे या लोकांना म्हणजे इसीएसआयपी हा कार्यक्रम बंद झाला आणि आरसीएच फेज -२ कार्यक्रम सुरू झाला.जो शासन अजूनही चालविते सन २००७-१० असा तीन वर्षाचा तो कार्यक्रम आहे.या सर्व कार्यक्रमातून इसीएसआयपी असो किंवा आरसीएच असो शासनातर्फे ज्या योजना त्यात माता बाल संगोपण,इमॉनायजेशन कार्यक्रम,गर्भलिंग चाचणी कार्यक्रम हे सर्व कार्यक्रम शासनाच्या या माध्यमातून राबविले जातात.

**मुद्दा क्र.१३** **सौ.लता दलाल** :या नियुक्त्यांच्या संदर्भात आरोग्य विभागाकडून अस्थापनाकडे काही पाठविले होते का प्रकल्प काय हे आम्हाला माहित आहे.या नियुक्त्या करण्या संदर्भात कुणाचे मागणी झाली होती का कुणाचे पत्र आलेले होते का?

**खुलासा** ▪ प्रकल्प संपल्यानंतर दि.३१/०३/२००७ नंतर मा. सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांना मनपा अस्थापनेवर सामावून घेण्याबाबत संचिका आस्थापना विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या होत्या. अधिकारी व कर्मचारी यांनी कायम स्वरुपी नियुक्ती बाबत मा. महापौर, मा. पदाधिकारी व मा. आयुक्त मागणी केलेली आहे.

**मुद्दा क्र.१४** **आरोग्य वैद्य. अधि.**: सन २००७ साली या सभागृहाने असा ठराव केला की आर सी एच पूढे ठेवावे त्या प्रमाणे मा.आयुक्तांनी शासनाला कळविले होते.

**खुलासा**

**मुद्दा क्र.१५** **श्री.रेणुकादास वैद्य:** आर.सी.एच कर्मचारी महापालिकेने घेतले की खाजगी कॉन्ट्रक्टरने घेतले होते.

**खुलासा** ▪ सदरील पदे मनपा आरोग्य विभाग समितीतर्फे घेण्यात आलेले होते. खाजगी कंत्राटदारामार्फत

**मुद्दा क्र.१६** **आरोग्य वैद्य. अधि.:** हे कर्मचारी कॉन्ट्रक्ट बेसीसवर होते.त्यांची भरती ही जाहिरात देवून केलेली होती.लिंक वर्कर आहे शासनाने सुरूवातीला कॉन्ट्रक्टरच्या मार्फत भरवयास सांगितले आहे.

**मुद्दा क्र.१७** **श्री.देसरडा प्रशांत:** ४० कर्मचारी हे कॉन्ट्रक्ट बेसीसवर भरणार आहे मा.आयुक्तांनी ठराव सादर झाला त्यावेळी म्हटले होते. कायम सेवेत घेणेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता का?

**खुलासा** ▪ दि. २४/०७/२००७ रोजी कार्यरत पदांना (४०) मंजुरीबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला होता. पुन्हा दि. २२/११/२००७ रोजी कार्यरत पदांना मंजुरी बाबत पाठवण्यात आलेल्या

प्रस्तावामध्ये वेतनश्रेणी नमूद करण्यात आलेली होती. (दोन्ही प्रस्ताव मा. आयुकत यांच्या मार्फत पाठविण्यात आला आहे.)

**मुद्दा क्र.१८** **आरोग्य वैद्य. अधि.** : पुढे या कर्मचा-याचे काय करायचे असे शासनाला विचारणा केलेली होती.

**मुद्दा क्र.१९** **श्री.रेणुकादास वैद्य** : आताच अधिका-यांनी खुलासा केला जे कर्मचारी भरती केले ते कॉन्ट्रक्टरनी भरती केले त्यांचा महापालिकेशी संबध नाही.असे असतांना महापालिकेने प्रस्ताव सादर केला का केला असेल तर का केला याचा खुलासा व्हावा. कन्ट्रॅक्टरतर्फे भरलेले कायम करू शकतो का?

**खुलासा**

- सदरील पदे कॉन्ट्रॅक्टर मार्फत भरण्यात आलेली नाही. सदरील पदे कॉन्ट्रॅक्ट (करारपध्दतीने भरण्यात आलेली आहे.)

**मुद्दा क्र.२०** **श्री.अ.साजेद अ.सत्तार** : कॉन्ट्रक्ट बेसीसवर ज्या कर्मचा-यांना घेतले त्यांना सेवेत नियमानुसार कायम करता येते का?

**खुलासा**

**मुद्दा क्र.२१** **मा.महापौर** : कोणत्या नियमानुसार नियुक्त्या केल्या शासनाकडे पाठविले त्या अगोदर सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली होती का? अस्थापना विभागाकडे आरोग्य विभागाने मागणी केली होती का ?

**खुलासा**

- सदरील नियुक्त्या प्रकरणी सर्व कार्यवाही आस्थापना विभागामार्फत करण्यात आलेली आहे. आस्थापना विभागाकडे आरोग्य विभागाकडे मागणी केलेली नव्हती.

**मुद्दा क्र.२२** **श्री.अ.साजेद अ.सत्तार**:सेवेत कायम करण्याचे आदेश आरोग्य विभागाने काढलेले नाही.

**खुलासा**

**मुद्दा क्र.२३** **डॉ.भागवत कराड** : या कर्मचा-यांना सेवेत कायम करण्याचा ठराव या सभागृहात झाला नसेल तर कोणत्या बेसवर प्रशासनाने शासनाकडे पाठविलेला होता.

**खुलासा**

**मुद्दा क्र.२४** **श्री.अ.साजेद अ.सत्तार** : आरसीएच बाबत आरोग्य विभागाने माहिती दिली नियुक्तीचे आदेश अस्थापनाकडून झालेले आहे.ते कोणत्या नियमानुसार झाले याचा खुलासा देण्यात यावा.

**खुलासा**

**मुद्दा क्र.२५** **श्री.भगवान घडमोडे** :सदर कर्मचारी हे कॉन्ट्रक्टरचे होते की कॉन्ट्रक्ट बेसीसवर होते.

**खुलासा**

- कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर होते.

**मुद्दा क्र.२६** **आरोग्य वैद्य.अधि.**: कॉन्ट्रक्ट बेसीसवर घेतलेले होते.पेपरला जाहिरात देवून मुलाखती घेवून धेतलेले होते.लिंक वर्करसाठी शासनाने असे सांगितले होते की एक एजन्सी दिली होती लिंक वर्करची नियुक्ती आपणाकडून होत नाही.लिंक वर्कर हे एजन्सीच्या मार्फत घेतलेले आहे.

**खुलासा**

**मुद्दा क्र.२७** **श्री.भगवान घडमोडे** : एजन्सीचे होते तर ती जबाबदारी महापालिकेने का घेतली.

**खुलासा**

**मुद्दा** **सौ.लता दलाल** : युरोपीय कमीशनच्या मार्फत आरसीएच योजना आलेली ही एका

**क्र.२८** संस्थेच्या मार्फत आलेली होती माझे माहिती प्रमाणे आयुक्त हे त्याचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. व आरोग्य अधिकारी हे सचिव आहेत लिंक वर्करची माहिती देता उर्वरीत डॉक्टर क्लार्क व सेविका असतील यांची नियुक्ती कशी झाली.

**खुलासा** ▪ शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ही संस्था मनपा अंतर्गत स्थापन करण्यात आलेली होती.

**मुद्दा क्र.२९** **आरोग्य वैद्य. अधि.:** सदर कर्मचारी एका कार्यक्रमा अंतर्गत काम करीत होते त्यांना कायम सेवेत घ्यावे असा कोणताही विषय नाही.

**खुलासा**

**मुद्दा क्र.३०** **श्री.अ.साजेद अ.सत्तार:** जे पत्र शासनाकडे दिले त्यात सर्व काही शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.औरंगाबाद महानगरपालिका पर्जन्य व बाल आरोग्य सेवेसाठी शहरात करण्यात आलेले रूग्णालय व व्यवस्थापन या कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतील अस्थापना वरील प्रमाणे पदाची आवश्यकता आहे वरील ४० पदे महापालिका असथापनेवर निर्माण केल्यास त्याकरीता प्रचलित वेतनश्रेणी मासिक रू. ४,३६,१३५ व वार्षिक खर्च रू.५२,३३,४२० इतका अपेक्षीत आहे.हे सुध्दा शासनाला कळविलेले आहे.

**खुलासा** ▪ सत्यपरिस्थिती आहे.

**मुद्दा क्र.३१** **श्री.देसरडा प्रशांत:** प्रशासनाने जो काही पत्र व्यवहार केला त्यात असे म्हटले आहे की ते महापालिकेच्या अस्थापनेवर होते.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतली नाही

**खुलासा**

**मुद्दा क्र.३२** **श्री.अ.साजेद अ.सत्तार :** कॉन्ट्रक्ट बेसीसवर घेतलेले आहे.शासनाला पाठविलेल्या पत्रात कुठेही म्हटले नाही.

**खुलासा**

**मुद्दा क्र.३३** **श्री.संजय जोशी :** या नियुक्त्यांच इनलिगल आहेत जाता जाता झालेल्या आहे.या नियुक्त्याला स्थगिती दयावी हा विषय संपवावा.

**खुलासा**

**मुद्दा क्र.३४** **श्री.प्रशांत देसरडा :** **श्री.भगवान घडमोड** रद्य करण्यात याव्यात.

**खुलासा**

**मुद्दा क्र.३५** **सौ.लता दलाल** :हा विषय रद्य करण्यात यावा. तसेच जाता जाता अशा या नियुक्त्या होतात त्या बाबत सुध्दा आयुक्तांची चौकशी व्हावी व शासनाास कळवावे.

**खुलासा**

**मुद्दा क्र.३६** **श्री.भगवान घडमोडे :** शासनाकडे जो पत्रव्यवहार केला त्यात सुध्दा प्रशासनाने चुकीची माहिती देवून शासनाची दिशाभुल केली. त्याचाही उल्लेख करावा.

**खुलासा** ▪ कोणतीही चुकीची माहिती देण्यात आलेली नाही.

**मुद्दा क्र.३७** **श्री.अ.साजेद अ.सत्तार:**शासनास चुकीची माहिती देवून या पदास मंजूरी मिळविली आहे. याचा सुध्दा उल्लेख शासनाकडे पाठविल्या जाणा-या अहवालात करावा.

**मुद्दा क्र.३८** **मा.महापौर**

:आरसीएचच्या विषयाबाबत या सभागृहाने बरीच चर्चा केलेली आहे आणि मुळात या सभागृहाची अशी भावना आहे की कॉन्ट्रॅक्टवर जे कर्मचारी होते त्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेमध्ये सामावून घेण्याकरीता प्रशासनाने प्रयत्न केलेले आहे. या करीता कोणत्याही प्रकारची माहिती/मंजूरी किंवा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा कोणतीही माहिती सर्वसाधारण सभेला प्रशासनाकडुन मिळालेली नाही. ज्या पध्दतीने आरसीएचच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली आहे ती नियुक्ती संशयास्पद अशीच आहे. आत्ताच स.सदस्यांनी भावना व्यक्त केल्या की, या महानगरपालिकेमध्ये असे अनेक कर्मचारी आहेत जे वर्षानुवर्ष दैनिक वेतनावर कामे करतात. स.स.श्री.प्रशांत देसरडा यांनी एक उदा. दिले की, त्यातील एक कर्मचारी वाट बघता बघता आता रिटायर्ड झाला त्याला कायमस्वरूपी नियुक्ती मिळु शकली नाही. असे अनेक विषय जेव्हा असतात सगळे बाजूला ठेवून प्रशासनाने ज्या पध्दतीने आरसीएचच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे हि अत्यंत संशयास्पद वाटते. म्हणून मा.आयुक्तांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशा प्रकारचे सर्वसाधारण सभेचे जे विषय आहेत त्यांना या सभागृहाची मंजूरी असणे आवश्यक आहे आणि ज्या ज्या गोष्टी सर्वसाधारण सभेच्या मान्यता घेवून करणे आवश्यक आहे त्या न करण्याचा प्रशासनाने साहस करू नये. असे प्रशासनाला बजवायचे आहे. अशा पध्दतीने प्रशासनाने कोणतेही निर्णय घेवू नये. यामध्ये शासनाला माहिती कळविलेली आहे. त्यामध्ये शासनाची दिशाभुल झालेली आहे. जी पदे इथे कॉन्ट्रेक्ट बेसीसवर होत्या त्या कायमस्वरूपी नव्हत्या त्या भरण्याकरीता त्याची मान्यता घेण्याकरीता शासनाला कळविण्यांत गेलेले आहे. हे आजच्या घटकेला अत्यंत चुकीचे वाटते आहे. या प्रकरणाची पुर्णपणे चौकशी व्हावी. ज्यावेळी सर्वसाधारण सभेने असे कोणत्याही प्रकारचे आदेश दिले नव्हते अशा प्रकारे शासनाला कसे पत्र पाठवू शकतो. त्यामुळे याही संपूर्ण घटनेची चौकशी करावी आणि काय घटनाक्रम झाला कशा पध्दतीने हे घडले गेले चौकशी करून जे अधिकारी चुकीचे आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करावी आणि हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा आणि ज्याज्या वेळी मा.आयुक्त काही निर्णय घेतात तेव्हा ते निर्णय पारदर्शक घेणे आवश्यक असते सभागृहापुढे आणने आवश्यक असते. अशा प्रकारचे निर्णय घेतले आणि तशी स.सदस्यांनी भावना व्यक्त केली नंतर सुटटीवर जातात असे काही होते. आयुक्त शेवटी हे आमचे आहे यामध्ये अशा प्रकारची वाव राहील अशा प्रकारची कृती होवू नये अतिशय पारदर्शकपणे पुढील व्यवहार व्हावे अशा प्रकारने आदेशीत करण्यात येते.

### ४) प्रजनन व बाल आरोग्य सेवा कार्यक्रम (RCH) अंतर्गत नेमणूकीची चौकशी :

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी युरोपीयन कमिशनचा अर्थ सहाय्याने प्रजनन व बाल आरोग्य सेवा कार्यक्रम (RCH) मंजूर झाल्यानंतर या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेने ५ रुग्णालयांना श्रेणीवर्धित करून त्यासाठी १७ वैद्यकीय अधिकारी व इतर अशी एकूण ४० पदे निर्माण करण्यात आली होती. सदरील पदांवर करारपध्दतीने या कार्यक्रम कालावधीसाठी नियुक्त्या केल्या होत्या.

**अ) दिनांक ११-०१-२००७ रोजीच्या महानगरपालिका औरंगाबादच्या सर्वसाधारण सभेत विषय क्रमांक ६५५/४ अन्वये पुढील प्रस्ताव महानगरपालिका प्रशासनाने ठेवला होता.**

**विषय क्र. : ६५५/ ४**

शासनाने औरंगाबाद शहरासाठी प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-२ (आरसीच फेज-२) राबविण्यासाठी पत्र क्रमांक एसएफडब्ल्यू/ईसीएसआयपी/डी-७/एक्सटेशन/२८३९-४१/२००५ दिनांक १८/०५/२००६ व शासन निर्णय कुका१००५/५८४/सीआर/१०१/०५/एफडब्ल्यू-१/दिनांक २६ सप्टेंबर २००६ कळवले आहे. सदरील शासन निर्णयानुसार (ॲब्रेला) एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी स्थापन करावयाची आहे. सदरील सोसायटीचे मनपा आयुक्त हे पदसिध्द अध्यक्ष आहेत व आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे पदसिध्द सदस्य सचिव आहेत.

उद्दिष्ट : सर्वांसाठी आरोग्य या धर्तीवर प्रकल्पाच्या कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. मुख्यत्वे शहरातील स्लम भागासाठी सर्वकष प्रजनन व बाल आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. यामध्ये खालील प्रमाणे आरोग्य सेवांची विभागणी करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| **प्रथम टप्पा (First Tier)** | :- | बाह्य रुग्ण विभागाच्या प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सेवा व सर्व राष्ट्रीय कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे. |
| **दुसरा टप्पा (Second Tier)** | :- | बाह्य रुग्ण, अंतर रुग्ण, बाळांतपण, गर्भपात, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा चाचण्या, नवजात शिशूच्या प्राथमिक स्वरुपातील सेवांच्या समावेश असणार आहे. |
| **तिसरा टप्पा (Third Tier)** | :- | गुंतागुंतीच्या रुग्णांसाठी संदर्भ सेवा. |

या अंतर्गत खालील आरोग्य सेवाचा अंतर्भाव करण्यात आला आहे. प्रकल्पाच्या कालावधी दिनाक ०१ जानेवारी २००७ ते दिनांक मार्च २०१० पर्यंत आहे. सदरहू प्रकल्पाचे स्वरुप थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

१. ९ नविन आरोग्य केंद्राची स्थापना करणे.

२. किशोरवयीन मुले-मुलीकरिता आरोग्य सेवा सत्र सुरू करणे.

३. ४० वर्षाच्या वरील लाभार्थीसाठी विशेष आरोग्य सेवा सत्र सुरू करणे.

४. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण.

५. आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम.

त्यानुसार आवश्यक ते मनुष्यबळ, औषधी साहित्य व सामुग्री खरेदी, सदरील खर्चासाठी तरतूद प्रकल्पांतर्गत करण्यात आली आहे. याकरिता नविन नागरी आरोग्य केंद्राकरीता शासनाच्या प्रमाणकानुसार ९ वैद्यकीय अधिकारी, ३६ परिचारिका, ९ लिपीक व ९ सेवक / सेविका यांची नेमणूक केली जाणार आहे. यापैकी आस्थापनेवरील (पदावरील) होणारा खर्च शासनाच्या सूचनेनुसार खालील प्रमाणे शासनाकडून अनुदान प्राप्त होणार आहे.

१ जानेवारी २००७ ते ३१ मार्च २००७- १०० टक्के शासनाकडून आर.सी.एच. –२

१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८-१०० टक्के शासनाकडून आर.सी.एच. –२

१ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९-५० टक्के शासनाकडून आर.सी.एच.२+ ५० टक्के महानगरपालिका.

१ एप्रिल २००९ ते ३१ मार्च २०१०-२५ टक्के शासनाकडून आर.सी.एच. २ + ७५ टक्के महानगरपालिका.

शासनाकडून मिळणारे सर्व अनुदान सदरील सोसायटी मार्फ़त प्राप्त होवून वितरीत करण्यात येणार आहे. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर पुढील आर्थिकभार नियमित स्वरूपात मनपास सोसावा लागेल. वरील प्रस्तावास सर्वसाधारण सभेची मंजूरी मिळणे आवश्यक आहे. तसेच ह्याबाबतचे हमीपत्र शासनास व प्रकल्प राबविण्यास्तव मंजूरीस्तव मा.सर्वसाधारण सभेस सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरासाठी प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा –२ (आरसीएच फ़ेज -२) राबविण्यास तसेच एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी स्थापन करण्यास व युरोपीयन कमिशन अंतर्गत सध्या कार्यान्वित असलेला प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम नियमित स्वरूपात राबविण्यास व या प्रकल्पांतर्गत सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन तसेच श्रेणीवर्धीत रूग्णालय चालविण्यासाठी खर्च प्रकल्प समाप्तीनंतर म्हणजेच दिनांक ०१ एप्रिल २००७ नंतर महानगरपालिका फ़ंडातून करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

(ब) **वरीलप्रमाणे महानगरपालिका सर्वसाधारण सभेने नागरी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमा संदर्भात ठराव पारीत केल्यानंतर मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी पत्र क्र. जा.क्र./मनपा/८२/२००७, दिनांक २४.७.२००७ अन्वये पुढीलप्रमाणे प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता.**

मा. प्रधान सचिव आणि आयुक्त यांचे दिनांक ३०.३.२००१ अर्धशासकीय पत्रानुसार औरंगाबाद महानगरपालिकेला युरोपियन कमिशनच्या अर्थसहाय्याने आर.सी.एच. प्रकल्प मंजूर करण्यात आलेला होता.

सदरील प्रकल्पांतर्गत ५ रूग्णालय श्रेणीवर्धीत करण्यात आलेले आहे. सध्या सुस्थितीमध्ये सुरू आहे. आर.सी.एच. प्रकल्पांतर्गत खालील पदे करारपध्दतीने भरण्यात आलेली आहेत.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **पदसंख्या** |
|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | १० |
| ०२ | सांख्यिकी सहाय्यक | ०१ |
| ०३ | अकाऊन्टंट कम क्लर्क | ०१ |
| ०४ | स्टाफ़ नर्स | ११ |
| ०५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०४ |
| ०६ | वॉर्ड सेविका | १३ |
| | **एकूण** | **४०** |

सदरील आर.सी.एच. प्रकल्पाची मुदत दिनांक ३१.३.२००७ रोजी संपुष्टात आलेली आहे. संदर्भ क्र.२, ३ व ६ नुसार औरंगाबाद मनपा प्रकल्प पुढे नियमित राबवित आहे. श्रेणीवर्धीत रूग्णालयाचा औषधी, साहित्य व देखभाल दुरूस्तीचा खर्च करण्यास तयार आहे. श्रेणीवर्धीत रूग्णालय नियमित व सुस्थितीत यापुढे चालू ठेवण्याकरीता सदरील पदे नियमित करणे गरजेचे आहे. याकरिता सध्या कार्यरत असलेले पद यापुढे नियमित स्वरूपात चालू ठेवण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला.

(क) मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी पत्र क्र. १६९, दिनांक २२.११.२००६ अन्वये पुढील प्रमाणे दुसरा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. महानगरपालिका, औरंगाबाद क्षेत्रात संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी पुरस्कृत एकात्मिक लोकसंख्या व विकास प्रकल्प सन २००१-२००७ या कालावधीत केंद्र शासनाच्या अर्थ सहकार्याने राबविण्यात करारपध्दतीने खालील ४० पदे मंजूर केलेली आहेत.

सदरील प्रकल्पांतर्गत ५ रूग्णालय श्रेणीवर्धीत करण्यात आलेले आहे. सध्या सुस्थितीमध्ये सुरू आहे. प्रजनन व बाल आरोग्य (आर.सी.एच.) प्रकल्पांतर्गत खालील पदे करारपध्दतीने भरण्यात आलेली आहेत. आर.सी.एच. कार्यक्रमांतर्गत खालील ४० पदे मनपा आस्थापनेवर मंजूर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | १० | ८०००-२७५-१३५०० |
| ०२ | सांख्यिकी सहाय्यक | ०१ | ५०००-१५०-८००० |
| ०३ | अकाऊन्टंट कम क्लर्क | ०१ | ४०००-१००-६००० |
| ०४ | स्टाफ़ नर्स | ११ | ४५००-१२५-७००० |
| ०५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०४ | ५०००-१५०-८००० |
| ०६ | वॉर्ड सेविका | १३ | २५५०-५५-३२०० |
| | एकूण | ४० | |

१९

सदरील आर.सी.एच. प्रकल्पाची मुदत दिनांक ३१.३.२००७ रोजी संपुष्टात आलेली आहे. संदर्भत क्र.२ ,३ व ६ नुसार औरंगाबाद मनपा प्रकल्प पुढे नियमित राबवित आहे. श्रेणीवर्धीत रूग्णालयाचा औषधी, साहित्य व देखभाल दुरूस्तीचा खर्च करण्यास तयार आहे.

महानगरपालिका औरंगाबाद क्षेत्रातील प्रजनन व बाल आरोग्य सेवांसाठी श्रेणीवर्धीत करण्यात आलेली रूग्णालये आणि व्यवस्थापन सुरळीत करणे याकामी औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवरील वरीलप्रमाणे ४० पदांची आवश्यकता आहे. वरील पदांना महानगरपालिका आस्थापनेवर निर्माण केल्यास त्याकरीता प्रचलित वेतनश्रेणीनुसार मासिक रू.४,३६,१३५/- आणि वार्षिक खर्च रू.५२,३३,६२०/- अपेक्षित आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे. मनपा आस्थापना खर्च ३५ टक्के पेक्षा कमी अधिक आहे. परंतु आरोग्य विभागाकरीता राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्याच्या सेवा देण्याकरीता सदर पदांची आवश्यकता असल्याने, उत्पन्नाची बाब दुर्लक्षित करणे योग्य होईल. मनपा मार्फ़त पुरविल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचा व दर्जा उंचाविण्याकरीता सदरील अधिकारी व कर्मचारी यांची मोठी मदत होईल व सदरच्या पदांची उपयुक्तता व आवश्यकता आहे. सदरील पदे ही बिंदू नियमावलीनुसार भरलेली आहेत.

महानगरपालिका ,औरंगाबाद अंतर्गत आरोग्य सेवेसाठी ४० प्रस्तावित प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमांची अंतर्गत भरण्यात आलेली पदे मनपा आस्थापनेवर सामावून घ्यावयाची आहेत. प्रकरणी वरील प्रमाणे प्रकल्पांतर्गत आस्थापनेवर प्रजनन व बाल आरोग्य सेवांसाठी वरील प्रमाणे नमूद केलेली विविध ४० संवर्गाची पदे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार औरंगाबाद महानगरपालिका आस्थापनेवर तातडीने शासनाची मान्यता देण्यात आली.

**(ड)** महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासननिर्णय क्र. संकिर्ण /१००७/१५४७/प्र.क्र.४६/०७, नवि-२२, दिनांक २३ जानेवारी २००८ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**प्रस्तावना** :

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी युरोपियन कमिशनच्या अर्थसहाय्याने प्रजनन व बाल आरोग्य सेवा कार्यक्रम (RCH) मंजूर करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेने ५ रूग्णालयांना श्रेणीवर्धीत करून त्यासाठी १७ वैद्यकीय अधिकारी व इतर अशी एकूण ४० पदे निर्माण करण्यात आली होती. सदरील पदांवर करार पध्दतीने या कार्यक्रम कालावधीसाठी नियुक्त्या केल्या होत्या . या (RCH) प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता निर्मित पदांसाठीच्या अनुदानाची मुदत ३१.३.२००७ रोजी संपुष्टात आल्यानंतर महानगरपालिकेने सदरील प्रकल्प पुढे चालू ठेवून या पदावरील व प्रकल्पांवरील खर्च करण्यास तयारी दर्शवून तसा ठराव पारीत केला आहे. त्या अनुषंगाने आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी या कार्यक्रमासाठी निर्माण केलेली आवश्यक ती पदे नियमितपणे निर्माण करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भाधिन पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे. त्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय घेवून नियमित पद निर्मितीसाठी लागणारा कालावधी पाहता, या पदावर कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांचे वेतनाचा / मानधनाचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियमित पदनिर्मितीस मान्यता मिळेपर्यंत संबंधित पदांवरील कर्मचाऱ्यांना सध्याचे दराने मानधनावर / ठोक वेतन पध्दतीने वेतन अदा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

औरंगाबाद महानगरपालिकेने प्रजनन व बाल आरोग्य सेवा कार्यक्रमाच्या (ठउक) अंमलबजावणीसाठी ५ रूग्णालये श्रेणीवर्धीत करून निर्माण केलेल्या खालील ४० पदांवरील कर्मचारी / अधिकारी यांना या कार्यक्रमाचे निकषाप्रमाणे सध्या प्रचलित असलेल्या दराने ठोक वेतन / मानधनानुसार वेतन नियमित पदनिर्मितीचे पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत अदा करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५१ (४) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | १० |
| ०२ | सांख्यिकी सहाय्यक | ०१ |
| ०३ | अकाऊन्टंट कम क्लर्क | ०१ |
| ०४ | स्टाफ़ नर्स | ११ |
| ०५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०४ |
| ०६ | वॉर्ड सेविका | १३ |
| | **एकूण** | **४०** |

या अनुषंगाने सर्व सांविधानिक बाबींची पूर्तता आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी करून तसा अहवाल शासनास सादर करावा.

(इ) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासननिर्णय क्रमांक संकिर्ण /१००७/१५४७/प्र.क्र./१४६/०७ /नवि –२२, दिनांक १६ मे २००८ अन्वये पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**प्रस्तावना :**

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी युरोपियन कमिशनच्या अर्थसहाय्याने प्रजनन व बाल आरोग्य सेवा कार्यक्रम (ठउक) मंजूर करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेने ५ रूग्णालयांना श्रेणीवर्धीत करून त्यासाठी १७ वैद्यकीय अधिकारी व इतर अशी एकूण ४० पदे निर्माण करण्यात आली होती. सदरील पदांवर करार पध्दतीने या कार्यक्रम कालावधीसाठी नियुक्त्या केल्या होत्या. या (RCH) प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरीता निर्मित पदांसाठीच्या अनुदानाची मुदत ३१.३.२००७ रोजी संपुष्टात आल्यानंतर महानगरपालिकेने सदरील प्रकल्प पुढे चालू ठेवून या पदावरील व प्रकल्पांवरील खर्च करण्यास तयारी दर्शवून तसा ठराव पारीत केला आहे. त्या अनुषंगाने आयुक्त, महानगरपालिका यांनी या कार्यक्रमासाठी निर्माण केलेली आवश्यक ती पदे नियमितपणे निर्माण करण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव

संदर्भाधिन पत्रान्वये शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे. त्याबाबत संचालक, आरोग्य सेवा / सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय घेवून नियमित पदे निर्मितीसाठी लागणारा कालावधी पाहता, या पदावर कार्यरत कर्मचारी / अधिकारी यांचे वेतनाचा / मानधनाचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी नियमित पदनिर्मितीस मान्यता मिळेपर्यंत संबंधित पदांवरील कर्मचाऱ्यांना सध्याचे दराने निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. तद्नंतर अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे यांचे माता व बाल मृत्यु दरांचे प्रमाण कमी करणे या दृष्टीने राज्याच्या शहरी भागातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमधील, प्रजनन व बाल आरोग्य या बाबींचे अनन्य साधारण महत्व विचारात घेवून, औरंगाबाद आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे मनपा आस्थापनेवर विविध संवर्गातील ४० कायम पदे निर्माण करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

औरंगाबाद महानगरपालिका विषय क्र. ६५५/४, दिनांक ११.१.२००७ अन्वये पारीत ठरावानुषंगाने, आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत विहीत पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेण्यासाठी, आरोग्य सेवे अंतर्गत महानगरपालिका आस्थापनेवर विविध संवर्गातील ४० पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

२. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम नियमितपणे राबविण्यासाठी मनपाने विषय क्र. ६५५/४, दिनांक ११.१.२००७ अन्वये पारीत केलेला महासभा ठरावानुषंगाने आयुक्तांनी सादर केलेला प्रस्ताव व अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे अभिप्राय विचारात घेवून, औरंगाबाद मनपाच्या आस्थापनेवर या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी विहित पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेण्यासाठी पुढीलप्रमाणे विविध संवर्गातील ४० पदे निर्माण करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ५१ (४) मधील तरतूदीस अधिन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **पदसंख्या** | **वेतनश्रेणी** |
|---|---|---|---|
| ०१ | वैद्यकीय अधिकारी | १० | ८०००-२७५-१३५०० |
| ०२ | सांख्यिकी सहाय्यक | ०१ | ५०००-१५०-८००० |
| ०३ | अकाऊन्टंट कम क्लर्क | ०१ | ४०००-१००-६००० |
| ०४ | स्टाफ़ नर्स | ११ | ४५००-१२५-७००० |
| ०५ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०४ | ५०००-१५०-८००० |
| ०६ | वॉर्ड सेविका | १३ | २५५०-५५-३२०० |
| | **एकूण** | **४०** | |

३. या पदनिर्मिती अनुषंगाने सर्व सांविधानिक बाबींची पूर्तता आयुक्त,महानगरपालिका , औरंगाबाद यांनी करून तसा अहवाल शासनास सादर करावा.

**५) चौकशी समितीचे अभिप्राय :**

(१) महानगरपालिका प्रशासनाने शासनाला दि. २४.७.२००७ व दि. २२.११.२००७ रोजी जे प्रस्ताव दिले, त्यात पूढील बाबी ह्या धोरणात्मक स्वरूपाच्या होत्या.

(अ) नागरी प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना महानगरपालिका औरंगाबादचा नियमित आस्थापनेवर घेऊन कायम करणे.

(ब) सदरील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी निश्चित करून त्यांना वेतन श्रेणी देवून नियमित करणे.

उक्त बाबी धोरणात्मक असल्या कारणाने महानगरापलिका प्रशासनाने शासनाला उक्त संदर्भिय प्रस्ताव पाठविण्यापूर्वी महानगरपालिका औरंगाबादच्या सर्वसाधारण सभेमध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) प्रमाणे विहित निवड समितीच्या मान्यतेने सविस्तर प्रस्ताव उक्त अधिनियमातील कलम ५१ (४) व कलम ५३(१) अन्वये मान्यतेसाठी सादर करणे/ठेवणे आवश्यक होते. तथापी अशी प्रक्रिया / कार्यवाही न करताच सदरील कार्यक्रमाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना म.न.पा. अस्थापनेवर नियमित व कायम स्वरूपी नेमणूकींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे.

(२) महाराष्ट्र शासनाने देखील दि. २३.१.२००८ च्या शासन निर्णयान्वये सदरील कार्यक्रमाच्या ४० पदावरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना या कार्यक्रमाच्या निकषानुसार सद्याच्या प्रचलीत दराने ठोक वेतन / मानधनानुसारच वेतन अदा करण्यास मान्यता देऊन दि. १६.५.२००८ च्या शासन निर्णयान्वये म.न.पाच्या अस्थापनेवर वेतनश्रेणीसह सामावुन घेण्यास मान्यता का व कशी दिली, ही बाबही अनाकलनीय वाटते.

(३) महानगरपालिकेतील सर्व लेखा व लेखा परिक्षक विषयक कामे करणाऱ्या लेखा लिपिकांना (अकाऊन्ट क्लर्क) रू.३०५०-७५-३९५०-८०-४५९० अशी वेतनश्रेणी मंजुर केलेली असतांना सदरील कार्यक्रमातील लेखा लिपिकास रू.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी कशी काय प्रस्तावित केली व शासनाने त्यास मान्यता कशी दिली या बाबी ही अनाकलनीय आहेत. तेव्हा सदरील लिपीकास रू.३०५०-७५-३९५०-८०-४५९० ही वेतनश्रेणी देण्याची शिफ़ारस करण्यात येत आहे.

४) वरील सर्व बाबींचा विचार करता सदरील कार्यक्रमांतर्गतच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या म.न.पा. अस्थापनेवर सामावुन घेण्यासाठीच्या प्रस्तावास नव्याने अधिनियमातील कलम ५४(१) नुसार निवड समितीची मान्यता घेऊन महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची कलम ५३ (१) नुसार मंजुरी घेण्यात यावी, अशी चौकशी समिती शिफारस करते.

(५) या पूढे भविष्यात सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेखेरीज अशा नेमणूका किंवा समायोजन किंवा धोरणात्मक निर्णय घेण्यात येऊ नयेत, अशी दक्षता संबंधितांनी घेण्यात यावी असे चौकशी समितीचे मत आहे.

# <u>ड्रेनेज चोकअप व मलनिस्सारण वाहिनीमधील गाळ काढण्यासाठी पॉवर बकेट व सिव्हर रॉडिंग मशीनचा वापर करणे बाबतचा चौकशी अहवाल.</u>

**<u>प्रस्तावना</u> :-**

संदर्भात नमूद असलेल्या कार्यालयीन आदेशान्वये शहरातील ड्रेनेज चोकअप काढण्यासाठी महानगरपालिकेने खरेदी करुन सहा वॉर्ड आफिसर्स/इंजिनियर्स यांना प्रत्येकी एक संच याप्रमाणे सहा प्रभागास पॉवर बकेट मशिन व सिव्हर रॉडिंग मशीन पुरवलेले आहे.

उक्त यंत्र संचाचा प्रभावी वापर होत नसल्याचे मा.आयुक्त यांच्या निदर्शनास आल्यामुळे सदर सिव्हर रॉडिंग व पॉवर बकेट मशीन केंव्हा खरेदी करण्यात आल्या, त्याची किंमत, प्रभाग कार्यालयांना उक्त मशीन्स केंव्हा हस्तांतरीत केल्या, आतापावेतो सदर मशीन्सचा वापर न केल्यास त्याबाबतची कारणे, तसेच मशीन्सची विद्यमान स्थिती या संदर्भात मुख्य लेखापरीक्षक व तांत्रिक कक्ष प्रमुख यांची संयुक्त समिती चौकशी कामी नियुक्त केली आहे व चौकशी अहवाल सादर करणेस आयुक्तांचे आदेश आहेत.

प्राप्त आदेश व सुचनानुसार मशीन खरेदी व वापर संबंधातील कार्यकारी अभियंता (ब व क) यांचे कार्यालयाकडून मशीन खरेदीबाबतची संचिका तसेच मशीन वापराबाबत प्रभाग कार्यालयाकडे असलेले अभिलेख व कागदपत्रे उपलब्ध करुन घेऊन सविस्तर तपासणी करण्यात आली व प्रकरणात सविस्तर तपासणी अहवाल खालील प्रमाणे प्रभाग निहाय सादर करण्यात येत आहे.

**१) <u>पॉवर बकेट, सिव्हर रॉडिंग मशीन (सहा संच) खरेदी करणे.</u>**

शहरातील मलनिस्सारण वाहिनी चोकअप असल्याचे विविध प्रभागातून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निरसन व्यवस्थित व प्रभावीपणे होत नसल्याचे आढळून आल्यामुळे यंत्राव्दारे चोकअप काढणे व वाहिनी आणि चेंबरमध्ये असलेला गाळ काढून योग्य ठिकाणी विल्हेवाट लावण्यासाठी प्रभाग निहाय यंत्रसंच खरेदी करुन खाजगी कंत्राटदारामार्फत सात (७) कामगार, एक ट्रक्टर ट्रॉली यांचे मार्फत कामे करुन घेणेस प्रस्तावित करण्यात आले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात सहा यंत्र संच खरेदी करण्यासाठी रुपये ४०,८०,०००/- चे अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता (ड्रेनेज/विद्युत) यांनी सादर केले. उक्त अंदाजपत्रकास तसेच आऊट सोर्सिंगव्दारे मेंटेनन्स व रिपेअर करणेस दि.२०/१/२००७ रोजी संपन्न झ ालेल्या मा. सर्वसाधारण सभेत रुपये ४०,८८,०००/- चे सहा यंत्रसंच खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

मा. सर्वसाधारण सभेकडून प्राप्त झालेल्या प्रशासकीय मान्यतेनंतर प्रथमतः दि. ८/३/०७ ला निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. परंतु उक्त सुचनेस प्रतिसाद न मिळाल्यामुळे व एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा निविदा मागविण्यात आल्या व निविदा स्वीकृतीच्या अंतिम दिवसापर्यंत एकच देकार प्राप्त झाल्यानुसार , प्राप्त देकार दि. २४/८/२००७ रोजी उघडण्यात आली असता श्रीमती मीनाक्षी अशोक कोटा , सिध्दीविनायक इंटरप्रायजेस, सोलापुर यांनी रु. ७,१४,०००/- प्रती संच नुसार एकूण रुपये ४२,८४,०००/- चा देकार दिलेला होता व उक्त प्राप्त निविदेस दि. ४/९/२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती विषय क्र. १२१ नुसार

मान्यता प्राप्त झालेली आहे. निविदेतस प्राप्त मान्यतेनुसार पुरवठा धारकास यंत्रसामुग्री पुरवठा करण्यास एक महिन्याची कालमर्यादा देवून दि. १/१०/२००७ रोजी कार्यादेश निर्गमीत झालेले आहेत. तथापि पुरवठा धारकाने मुदतवाढीसाठी केलेल्या विनंतीप्रमाणे मा.आयुक्त यांच्या मंजुरीनुसार उक्त यंत्रसामुग्री पुरवठा करणेस पुरवठा धारकांस दि. ३०/१२/२००७ पर्यंत मुदतवाढ मंजुर करण्यात आलेली आहे.

संबंधित पुरवठा धारकाने निविदेमध्ये नमूद असलेले सिव्हर क्लिनींग पॉवर बकेट, सिव्हर रॉडिंग मशीन सर्व सुटे तसेच संलग्न भागासह एकूण सहा संचाचा पुरवठा दि. १८/१२/२००७ च्या डिलीव्हरी चलनानुसार कार्यकारी अभियंता (ड्रेनेज/विद्युत) यांच्याकडे पुरवठा केलेला आहे. पुरवठा केलेल्या साहित्याचा तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे. प्राप्त साहित्याची आवश्यक ती तपासणी करुन घेऊन संबंधित पुरवठा धारकास रुपये ४२,८४,०००/- चे देयक साहित्याचा पुरवठा होताच अदा करण्यात आले शिवाय डिफेक्ट लायबीलीटी पिरियड संपल्यानंतर पुरवठा धारकाचे सुरक्षा अनामत रक्कम रुपये ८५,७००/- सप्टेंबर-२००८ मध्ये परत करण्यात आले आहेत.

दि. १८/१२/२००७ रोजी प्राप्त झालेल्या सर्व मशीन्स व त्यासह असलेले संलग्नित व सुटेभाग एकत्रितरित्या मनपा सेंट्रल नाका वर्कशॉप परिसरात सुरक्षितरित्या ठेवण्यात आले होते.

प्राप्त झालेल्या यंत्र सामुग्रीचा प्रत्यक्ष वापर करणेस ठरवलेल्या धोरणानुसार प्रभागनिहाय खाजगी कंत्राटदाराची नियुक्ती करण्यासाठी प्रभागनिहाय पॉवर बकेट, रॉडींग मशीनव्दारे प्रभाग क्षेत्रातील मलनिस्सारण वाहिन्यांचे चोकअप काढणे व गाळाची विल्हेवाट करण्यास वार्षिक करारावर खाजगी कंत्राटदार नेमणेस वॉर्डनिहाय अंदाजपत्रके सादर करण्यात आली. त्यांचा तपशील व अंदाजपत्रक मंजुरीबाबत सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रभागाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | प्रशासकीय मंजुरी दिनांक |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग- अ | रु. ९,४९,३००/- | ०१/०७/२००८ |
| २ | प्रभाग- ब | रु. ९,४९,३००/- | ०१/०७/२००८ |
| ३ | प्रभाग- क | | |
| ४ | प्रभाग- ड | रु. ८,९९,५००/- | ०१/०७/२००८ |
| ५ | प्रभाग- ई | रु. ९,४९,३००/- | ०१/०७/२००८ |
| ६ | प्रभाग- फ | रु. ९,७२,३००/- | ०१/०७/२००८ |

उपरोक्त नुसार अंदाजपत्रकास प्राप्त मंजुरी अन्वये सर्व कामांची प्रथमत: निविदा मागविण्यात आल्या व सर्व निविदा दि. १४/०८/२००७ रोजी व १८/०८/२००८ रोजी उघडण्यात आल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. क्र. | प्रभागाचे नांव | प्राप्त निविदा संख्या | सर्वात कमी दराची निविदा | निविदा उघडल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग- अ | दोन | ९.५% जास्त | १८/०८/२००८ |
| २ | प्रभाग- ब | तीन | ९.५% जास्त | १८/०८/२००८ |
| ३ | प्रभाग- क | | | |
| ४ | प्रभाग- ड | तीन | ९.९% जास्त | १४/०८/२००८ |
| ५ | प्रभाग- ई | दोन | ९.५% जास्त | १४/०८/२००८ |
| ६ | प्रभाग- फ | दोन | ९.५% जास्त | १४/०८/२००८ |

उपरोक्त नुसार प्राप्त सर्व कमी दरांच्या निविदा या एकाच ठेकेदाराचे म्हणजेच श्री.सिध्दीविनायक इंटरप्रायजेस यांची होती व ही निविदा वगळता इतर ठेकेदार राजहंस कंस्ट्रक्शन, अनिरुध्द अरुणराव काळे यांच्या निविदा तांत्रिक कारणामुळे उघडण्यात आलेल्या नाहीत. तथापि वर तक्त्यामध्ये नमूद सर्व निविदा फेरनिविदा करणेस सप्टेंबर-२००८ मध्ये कार्यकारी अभियंता (ब व क ) यांनी आदेशित केले.

कार्यकारी अभियंता ड्रेनेज/विद्युत यांच्या आदेशान्वये मागविण्यात आलेल्या फेरनिविदा दि.१२/०९/२००८ रोजी उघडण्यात आल्या. प्राप्त निविदा व दर यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रभागाचे नांव | प्राप्त निविदा संख्या | कमी दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग- अ | दोन | ०.२५% below | तांत्रिक कागदपत्राच्या अभावी दुसरी निवदा उघडण्यात आली नाही. |
| २ | प्रभाग- ब | एक | ०.२५% below | |
| ३ | प्रभाग- क | | | |
| ४ | प्रभाग- ड | एक | ०.४५% below | |
| ५ | प्रभाग- ई | एक | ०.२५% below | |
| ६ | प्रभाग- फ | एक | ०.२५% below | |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराच्या सर्व निविदा श्रीमती. मीनाक्षी अशोक कोटा, श्री.सिध्दीविनायक इंटरप्रायजेस यांच्या आहेत व या सर्व निविदांना कार्यकारी अभियंता (ड्रेनेज/विद्युत) यांनी दि. १५/९/२००८ रोजी मान्यता देऊन प्रत्येक प्रभाग निहाय कामास स्वतंत्र कार्यादेश दि. १८/९/२००८ रोजी निर्गमीत केले. कार्यादेश दिल्यानंतर मुळ निविदा व मुळ निविदा संचिका या प्रत्येक प्रभागास सप्टेंबर-२००८ मध्येच हस्तांतरीत करण्यात आल्या व नेमलेले खाजगी कंत्राटदारामार्फत दि. १९/८/२००८ रोजी प्रत्यक्ष ताब्यात दिलेल्या मशीन्सचा वापर करुन निविदाप्रमाणे कार्यवाही करणेस संबंधित वॉर्ड अभियंता यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त सुचनेनुसार /कार्यादेशानुसार प्रभाग निहाय निविदा व निविदेप्रमाणे केलेल्या कामांचा तपशील.

**प्रभाग-अ :-**

वॉर्ड अभियंता-अ यांच्याकडून प्रस्तावित करणत आलेल्या अंदाजपत्रक/निविदानुसार प्रभाग-अ मध्ये १) १५०-२५०mm dia. drainage line चे चोकअप - @ - ३७४२.६६ Rmt २)३००mm-४५०mm dia. line चे chokup-१६० Rmt ३) चेंबर क्लीनिंग करणे-११५ नग ४)surplus material/गाळ वाहतूक करणे-२५५ m ५) चेंबर/मॅनहोल रिपेअर-४५ नग ६)RCC कव्हर्स बसविणे-२० नग ७) SFRC cpven बसविणे-२० नग याप्रमाणे कामे प्रस्तावित होती. दि.२२/१२/२००८ पर्यंत.

| | | |
|---|---|---|
| १५०mm-२५० mm line चे chokup | - | १३३०.९० Rmt |
| चेंबर्स क्लीनिंग | - | ९६ No. |
| surplus material carfly | - | १७२.९८ |
| Repair of Chamber | - | २३ No. |
| Rcc covers | - | १० No. |

याप्रमाणे कामे करण्यात आल्याचे नमूद करुन त्यानुसार रुपये २,८९,६६०/- चे दरम्यान देयक अदा करण्यात आले आहे. उपरोक्त कामे मशीन प्राप्त झाल्यानंतर म्हणजेच १९/८/०८ ते २०/१२/०८ च्या दरम्यान झाल्याचे आढळून येते. मोजमाप पुस्तिकेनुसार कोणत्या दिवशी नेमके किती काम झाले आहे याचा बोध होत नाही.

**प्रभाग-ब :-**

वॉर्ड अभियंता-ब यांच्याकडून प्रस्तावित करण्यात आलेल्या अंदाजपत्रक/निविदानुसार प्रभागात

| | | |
|---|---|---|
| १) १५०-२५०mm line चे चोकअप काढणे | - | ३७४२.६६ Rmt |
| १B) ३००-४५० mm line चे चोकअप काढणे | - | १६००.०० Rmt |
| २) चेंबर क्लीनिंग करणे | - | ११५ नग |
| ३) गाळ वाहतुक करणे | - | २५५ m |
| ४) मॅन होल रिपेअर्स | - | ४५ No. |
| ५) Rcc Covers | - | २० No. |
| ६) SFRC Covers | - | २० No. |

याप्रमाणे कामे प्रस्तावित होती.
दि. १७/४/०९ पर्यंत दोन दरम्यान देयके

१) A- १५० mm-२५०mm line चे चोक अप - ३३४५.६० Rmt

B- २५० mm-४५० mm line चे चोकअप - ९५६.८० Rmt
२) चेंबर्स क्लीनिंग करणे - १४६ No.
३) Surplus material वाहतूक करणे - १४४.३१ M

उपरोक्त प्रमाणे कामे झाल्याचे नमूद करुन कामासाठी दोन दरम्यान देयक अदा करण्यात आले आहेत. कामावर एकूण खर्च रु. ७,५४,१८०/- इतका झालेला आहे.

**प्रभाग-क :-** संचिका प्राप्त झालेली नाही.

**प्रभाग-ड :-**

वॉर्ड अभियंता-ड कडून प्रस्तावित केल्यानुसार या प्रभागात

१) १५०mm-२५०mm line चे चोकअप - ३५०२.१३ Rmt
१B) २५०mm-४५० mm line चे चोकअप - १४९८.०० Rmt
२) चेंबर क्लीनिंग करणे - ११५ नग
३) गाळ Surplus material वाहतूक - २५५ m
४) मॅन होल रिपेअर्स - ४५ No.

५) Rcc Covers - २० No.
६) SFRC Covers - २० No.

याप्रमाणे कामे प्रस्तावित होती. सदरील प्रभागात करण्यात आलेल्या दि.२८/१/२००९ पर्यंतच्या कामाचे

१) १५०mm-२५०mm line चे चोकअप - २२७३.६० Rmt
१B) २५०mm-४५० mm line चे चोकअप - १५६.०० Rmt
२) चेंबर क्लीनिंग करणे - ६८ नग
३) Surplus material वाहतूक - १०२.७८ m

याप्रमाणे कामे झाल्याचे नमूद करुन रुपये ४,०१,१५५/- चे दरम्यान देयक अदा करण्यात आले आहे.

**प्रभाग-ई :-**

वॉर्ड अभियंता-ई कडून प्रस्तावित अंदाजपत्रक नुसार या प्रभागात

१) १५०mm-२५०mm line चे चोकअप - ३७४२.६६ Rmt
१B) ३००mm-४५० mm line चे चोकअप - १६००.०० Rmt
२) चेंबर क्लीनिंग करणे - ११५ नग
३) Surplus material वाहतूक - २५५ m
४) मॅन होल/चेंबर रिपेअर्स - ४५ No.
५) Rcc Covers - २० No.
६) SFRC Covers - २० No.

याप्रमाणे कामे पस्तावित होती.

दि. २९/१/२००९ पर्यंत या प्रभागात

| | | |
|---|---|---|
| १A) १५०mm-२५०mm line चे चोकअप | - | १२३७.५० Rmt |
| B) ३००mm-४५० mm line चे चोकअप | - | ७७६.१० Rmt |
| २) चेंबर क्लीनिंग करणे | - | ८६ नग |

याप्रमाणे कामे करण्यात आल्याचे नमूद करुन रु. ३,७३,२२९/- चे दरम्यान देयक अदा करण्यात आले आहे.

**प्रभाग-फ :-**

वॉड अभियंता-फ यांच्याकडील प्रस्तावित अंदाजपत्रकीय/निविदानुसार या प्रभागात

| | | |
|---|---|---|
| १) १५०mm-२५०mm line चे चोकअप | - | ३८५३.२७ Rmt |
| १B) ३००mm-४५० mm line चे चोकअप | - | १६४८.०० Rmt |
| २) चेंबर क्लीनिंग करणे | - | ११५ नग |
| ३) Surplus material वाहतूक | - | २५५ m |
| ४) मॅन होल/चेंबर रिपेअर्स | - | ४५ No. |
| ५) Rcc Covers | - | २० No. |
| ६) SFRC Covers | - | २० No. |

याप्रमाणे एकूण कामे प्रस्तावित होती.

दि. २९/१/२००९ पर्यंत या प्रभागात

| | | |
|---|---|---|
| १) १५०mm-२५०mm line चे चोकअप | - | २०९२.१० Rmt |
| १B) ३००mm-४५० mm line चे चोकअप | - | १६० Rmt |
| २) चेंबर क्लीनिंग करणे | - | १२० नग |

याप्रमाणे कामे झाल्याचे नमूद करुन रु. ४,१३,४७७/- इतक्या रक्कमेचे R.A. Bill देण्यात आले आहे.

उपरोक्त सर्व सहा प्रभागांना दि. १९/८/२००८ रोजी यंत्रसामुग्री ताब्यात देण्यात आलेली आहे. सर्व सहा प्रभागात चोक अप काढणे, गाळ वाहतुक करणे व इतर कामे साठी मे. श्री.सिध्दीविनायक इंटरप्रायजेस यांना दि. १८/९/२००८ रोजी कार्यादेश देण्यात आले आहेत. कामाची मुदत एक वर्ष होती. मुदत दि. १७/९/२००९ ला संपलेली आहे.

खरेदी करण्यात आलेल्या सहा यंत्रसामुग्रीचे संच सहा प्रभागाच्या ताब्यात दिल्यानंतर संबंधित प्रभागांनी वार्षिक देखभाल दुरुस्ती कामासाठी मे.सिध्दीविनायक इंटरप्रायजेस यांची नियुक्ती झाल्यानुसार यंत्रसामुग्री संबंधित एजन्सीकडे दिलेली आहे.

सदरील यंत्रसामुग्री बाबत चौकशी केली असता सर्व साहित्य संबंधी वॉर्ड कार्यालयाचे ठिकाणी ठेवण्यात आल्याचे एजन्सीचे प्रतिनिधी यांनी नमूद केले. वॉर्ड अभियंता-अ कडील काही सामुग्री एकतानगर येथे फसली असल्याचे समजते.

ड्रेनेज चोकअप कामाकरिता नियुक्त खाजगी ठेकेदाराची मुदत संपलेली आहे. त्याचप्रमाणे कामाचे परिमाण (Qty) सुध्दा संपल्याचे व ठेकेदाराचे अंतिम देयक देणे बाकी असल्याचे संबंधीतांनी नमूद केले.

चोकअप कामासंबंधातील नियुक्त एजन्सीची मुदत संपलेली आहे. यापुढील काळात चोक अप तक्रारी संबंधातील कामे त्वरीत करण्यासाठी नविन एजन्सी नियुक्त करणे आवश्यक आहे किंवा खरेदी करण्यात आलेल्या मशनरी मार्फत मनपाच्या कर्मचाऱ्यांकडून कामे करावयाची असल्यास कर्मचाऱ्यांना याबाबतचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रशिक्षीत कर्मचारी Operators इ. आवश्यक आहेत. ड्रेनेज चोक अप काढण्यासाठी नियुक्त एजन्सीची मुदत संपलेली असल्याने यापुढील काळात खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री idle राहु नये याकरिता नवीन एजन्सी नियुक्त करणे अथवा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देवून मशनरी वापरात ठेवणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :-**

१) ड्रेनेज लाईन चोकअप काढणे या कामाकरिता सहा पॉवर बकेट व सिव्हर रॉडींग मशीन संच मे.सिध्दीविनायक इंटरप्रायजेस यांच्याकडून दि. १८/१२/२००७ रोजी प्राप्त करण्यात आले. यासाठी रु. ४२,८४,०००/- इतका खर्च झालेला आहे.

२) प्राप्त मशीन संच सहा प्रभाग कार्यालये/वॉर्ड अभियंता यांना दि. १९/८/२००८ रोजी ताब्यात देण्यात आल्या.

३) सहा प्रभागामध्ये वार्षिक चोकअप काढणे या कामासाठी मे.सिध्दीविनायक इंटरप्रायजेस यांना दि. १८/९/२००८ रोजी कार्यादेश देण्यात आले. कामाची मुदत १ वर्ष दि.१७/९/२००९ पर्यंत होती.

४) संबंधित एजन्सीला परिच्छेद १४ ते २० मध्ये नमूद केल्यानुसार दरम्यान देयके अदा करण्यात आलेली आहे . उर्वरित कामाचे मोजमापे व देयक देणे आहे.

५) संबंधित एजन्सीने उर्वरीत परिमाण (Qty) पुर्ण झाल्याचे व मुदत संपल्याचे नमूद केले.

६) संबंधित नियुक्त एजन्सीच्या ताब्यात दिलेली मशनरी सुस्थितीत प्राप्त झाल्यानंतरच अंतिम देयक देणे योग्य राहील.

७) वॉर्ड 'ब' व 'क' वगळता इतर सर्व वॉर्डातील सदरील कामाची मदत संपलेली असल्याने यापुढील कालावधीमध्ये ड्रेनेज चोकअप संदर्भातील तक्रारी त्वरीत दूर करण्यासाठी खरेदी करण्यात आलेली यंत्रसामुग्री idle राहू नये याकरिता नवीन एजन्सी नियुक्त करणे अथवा मनपा कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या संदर्भात शहर अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता यांनीही लक्ष घालणे आवश्यक वाटते.

# औरंगाबाद महानगरपालिका शहर बस सेवा योजनेचा चौकशी अहवाल.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने औरंगाबाद शहरातील शहर बस सेवा तोट्यात जात असल्यामुळे बंद करण्याचा निर्णय घेतला व महानगरपालिकेस ही सेवा चालविण्याबाबत कळविले. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ नुसार शहरातील नागरीकांसाठी शहर बस सेवा उपलब्ध करून देणे महानगरपालिकेचे ऐच्छिक कर्तव्य आहे. परंतु या योजनेसाठी लागणारा खर्च व सेवा सुरु केल्यानंतर येणाऱ्या संभाव्य तोट्याचा विचार करून औरंगाबाद महानगरपालिकेने ही सेवा बी.ओ.टी. तत्वावर सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दिनांक १५.९.२००५ रोजी राज्यस्तरीय वर्तमानपत्रातून शहर बस वाहतूक परिवहन उपक्रमासाठी अभिकर्ता नेमण्यासाठी निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. मे.अकोला प्रवासी व मालवाहतूक सह. संस्था म.अकोला यांनी भरलेली बस रनिंगच्या प्रती कि.मी.८० पैसे रॉयल्टीची निविदा मंजूर करण्यात आली. दिनांक ३१.१०.२००५ रोजी अकोला प्रवासी संस्थेशी महानगरपालिकेने करार केला व दिनांक २६ जानेवारी २००६ पासून शहर बस सेवा सुरू करण्याचे निश्चित केले. त्यानुसार दिनांक २५ जानेवारी २००६ रोजी शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते शहर बस सेवेचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

औरंगाबाद महानगरपालिका परिवहन उपक्रम मागील चार वर्षापासून संपूर्ण महाराष्ट्र राज्यात नावाजला गेलेला उपक्रम होता. राज्यातील सर्व महानगरपालिका नागरीकांना शहर बस वाहतूक सेवा पुरविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करीत असतांना औरंगाबाद महानगरपालिका मात्र अचढ द्वारे प्रती वर्ष ३० ते ३५ लक्ष उत्पन्न मिळवित होती. त्यामुळे राज्यातील सर्व महानगरपालिकांनी या उपक्रमास भेट देवून मार्गदर्शन घेतले होते. मागील जवळपास एक वर्षापासून मात्र या उपक्रमास उतरती कळा लागल्याचे दिसून येते.

## <u>मनपा शहर बस योजनेच्या चौकशीचे आदेश :</u>

मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे कार्यालयीन आदेश क्र. मनपा/मआ /स्वीस /२०१०/२५१, दिनांक ३१.५.२०१० अन्वये असे कळविले आहे की, औरंगाबाद शहरातील नागरीकांसाठी –२००७ मध्ये एएमटी (AMT) बस वाहतूक सुरू करण्यात आलेली आहे. या संदर्भात अकोला प्रवासी महासंघ, अकोला यांचेशी करारनामा करण्यात आलेला आहे. या बस वाहतूकीबाबत गेल्या काही दिवसापासून वेगवेगळ्या बाबी संबंधात अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे. या अंतर्गत करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार कार्यवाही न होणे, प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडील थकित रक्कम बाबत, शहर बस वाहतूकीच्या फ़ेऱ्या इत्यादी मुद्यांबाबत तपासणी करणे आवश्यक आहे.

या प्रकरणी सर्वंकष अभ्यास करून सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्यासाठी मुख्य लेखापरीक्षक व उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका,औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**<u>अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्थेचा प्रस्ताव :</u>**

अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्या. अकोला या संस्थेने दिनांक ११.७.२००५ रोजीच्या पत्रामध्ये नमूद केले होते की, ही संस्था सध्या अकोला महानगरपालिकेचा परिवहन उपक्रम शहर बस वाहतूक सेवा अकोला म.न.पा.सोबत १० वर्षाचा सामंज्यस करार करून बी.ओ.टी. तत्वावर चालवित आहे. त्या करारानुसार सध्या अकोला शहरात १३ बसेस कार्यरत असून ह्या प्रकल्पाला अकोलेकरांकडून मिळणाऱ्या प्रचंड प्रतिसादामुळे २७ नविन बसेस वाढविण्याचा प्रस्ताव अकोला महानगरपालिकेने मंजूर केला आहे.

ह्या प्रकल्पातून अकोला म.न.पा. ला दरमहा ५% रॉयल्टीच्या रूपात १३ बसेसद्वारे ५० हजार रूपयांपर्यंत उत्पन्न कोणत्याही प्रकारचा खर्च न करता, ह्या उपक्रमाद्वारे उत्पन्न मिळते व ह्या उपक्रमातील बसेस वाढल्यानंतर अकोला म.न.पा. चे रॉयल्टीद्वारे उत्पन्न महिन्याकाठी १.५० ते २.०० लाख रू.पर्यंत हमखास मिळ शकते. ह्या उपक्रमाद्वारे अकोला म.न.पा.ला कोणत्याही प्रकारचा खर्च न करता दरमहिन्याला शहर बससेवा निधी द्वारे स्वामित्वधन जमा होत आहे.

ह्याचप्रमाणे औरंगाबाद म.न.पा.ने हा प्रकल्प सुरू केल्यास औरंगाबाद म.न.पा. ला सुध्दा ह्या प्रकल्पाद्वारे साधारण सुरूवातीला ४०-५० बसेस सुरू केल्यास दर महिन्याला १.५० ते २.०० लाख रूपयांपर्यंत शहर बस सेवा निधी ५% रॉयल्टीद्वारे स्वामित्वधन प्राप्त होऊ शकते व औरंगाबाद म.न.पा.च्या आर्थिक उत्पन्नात भर पडून शहरवासियांना "स्वस्त आणि सुरक्षित प्रवासा" चे माध्यम उपलब्ध होऊ शकते.

आमच्या संस्थेद्वारे सर्वानुमते ठराव घेऊन असे ठरविण्यात आले की, संस्थेने औरंगाबाद म.न.पा.चा शहर बस सेवा परिवहन उपक्रम चालविण्यासाठी घ्यावा कारण की, आमच्या संस्थेच्या संचालकांना ह्याबाबत सर्व प्रकारचा पुर्वानुभव असल्यामुळे हीसेवा आमची संस्था औरंगाबाद येथेही सुरू करू शकते त्याकरीता मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना यासंबंधात विनंती करण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार आम्ही संस्थेकडून आपणांकडे विनंती करतो की, आपल्या औरंगाबाद म.न.पा.चा शहर बस सेवा परिवहन उपक्रम अकोला म.न.पा. ने ज्या धर्तीवर कायद्याचे व नियमाचे काटेकोरपणे पालन करून चालविण्यासाठी संस्थेला दिला त्याच धर्तीवर आम्ही औरंगाबाद म.न.पा. चा शहर बस सेवा परिवहन उपक्रम चालविण्यास तयार आहोत व आम्ही संस्थेमार्फ़त १०० बसेस दोन टप्प्यात सुरू करण्यास तयार आहोत व आवश्यकतेनुसार व जनतेच्या मागणी विचारात घेवून बसेस च्या संख्येत वाढ करण्यात येईल. त्याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, आमच्या अनुभवी असलेल्या व कार्यरत असलेल्या संस्थेला हा प्रकल्प चालविण्यास देण्यात यावा ही विनंती.

औरंगाबाद म.न.पा.असल्यामुळे ही सेवा म.न.पा.ने जनतेला द्यायलाच पाहिजे अशी तरतूद मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (२०) अन्वये नमूद आहे. जनसेवेच्या दृष्टीने म.न.पा.ने हा उपक्रम सुरू करणे हे जनहिताच्या दृष्टीने व शाळकरी विद्यार्थी, सरकारी, निमसरकारी कर्मचारी, महिला, अपंग व गरीबांच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे म.न.पा.ने ही सेवा द्यायलाच पाहिजे. ह्या सेवेमुळे म.न.पा.ला तर आर्थिक उत्पन्न मिळेलच परंतु

शासनाला सुध्दा प्रवासी कराचे रूपाने तिकीट विक्रीच्या ३.५% प्रवासीकर व बालकुपोषण कराद्वारे म.न.पा.चे दुप्पट उत्पन्न शासनाला सुध्दा मिळेल.त्यामुळे शासनाचे आर्थिक उत्पन्नाचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे व औरंगाबाद म.न.पा.ला ह्या प्रकल्पाकरीता कोणत्याही प्रकारचा फ़ंड किंवा निधी जमा करण्याची आवश्यकता नाही किंवा कोणत्याही प्रकारचे कर्मचारी नियुक्ती करण्याची गरज नाही व त्यामुळे औरंगाबाद म.न.पा.ला कोणत्याही प्रकारचा खर्च न करता व आर्थिक गुंतवणूक न करता तिकीट विक्रीच्या ५% रॉयल्टी द्वारे निव्वळ उत्पन्न जमा होते (शहर बससेवा निधी जमा होतो.)

करिता आपणांकडे विनंती करण्यात येते की, औरंगाबाद शहर बस सेवा हा उपक्रम आपण सुरू करून तो आमच्या सहकारी संस्थेचा पुर्वानुभव आणि अकोला शहरात यशस्वीपणे राबवित असल्यामुळे आमच्या संस्थेला चालविण्यास दिल्यास आपल्या अपेक्षांना आम्ही पात्र ठरू व औरंगाबाद वासियांना "स्वस्त आणि सुरक्षित प्रवास " करविण्यास आम्ही कटीबध्द राहू.

या प्रकल्पामध्ये शहरातील १९ मार्गावर व वाळूज औद्योगिक वसाहतींसाठी एकूण २३ मार्गावर १०० बसेसच्या माध्यमातून शहर बस सेवा पुरविण्यात येणार आहे. सध्या ए.एम.टी.कडे ७३ बसेस असून पैकी ७० बसेसच्या माध्यमातून शहरांतर्गत सर्व मार्गावर व वाळूज औद्योगिक वसाहतीसाठी शहर बस सेवा पुरविण्यात येत होती. ३ बसेस राखीव ठेवण्यात येतात.

अकोला प्रवासी व मालवाहतूक संस्थेने मनपा सोबत केलेल्या करारानुसार वाहक, चालक चेकर्स इत्यादी कर्मचाऱ्यांची नेमणूक संस्थेने केली आहे. २५६ वाहक चालकासह जवळपास ३०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती शहर बस सेवे अंतर्गत अकोला संस्थेतर्फ़े करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च संस्थेतर्फ़े करण्यात येतो. इंधन खर्चाची व वाहनांच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी देखील संस्थेचीच आहे. तसेच शहर बस थांबे उभारणीचा खर्च देखील संस्थे तर्फ़ेच करण्यात येतो. सद्यस्थितीत एकूण ६० बस थांबे तयार आहेत. करारानुसार शहर बस थांब्यावर लावलेल्या जाहिरातीचे उत्पन्न संस्थेस मिळते. शहर बसेस वाहनांची एक बाजू महानगरपालिकेसाठी राखीव ठेवण्यात आली आहे. या बाजूवर महानगरपालिकेतर्फ़े जनहितार्थ जाहिराती लावण्यात येतात. उर्वरीत बाजुंवर संस्था जाहिरात लावून उत्पन्न घेवू शकते. संस्थेने बसथांबे व बस वाहनांवर लावलेल्या जाहिरातीचा जाहिरात कर मात्र महानगरपालिकेकडे भरावयाचा आहे.

शहर बसेसची वाहने नेमून दिलेल्या मार्गावर प्रवाशांची ने-आण करतात. मार्गाचे अंतर बसने मारलेल्या फ़ेऱ्या यावरून त्या वाहनाने दिवसभरात किती अंतर कापले हे समजते. बस रनिंग कि.मी.८० पैसे प्रमाणे रॉयल्टी संस्थेकडून महानगरपालिकेस मिळते.

**अ) महानगरपालिकेला प्राप्त झालेले उत्पन्न : (रॉयल्टी) : रू.९१ लक्ष**

कराररनाम्यातील अट क्र.४ अन्वये परिवहन विभागाचे टॅक्सेस भरण्याची संपर्णू जबाबदारी अकोला संस्थेची असतांना देखील आ.टी.ओ. टॅक्स थकीत ठेवला जातो. आरटीओ विभाग बसेस जप्तीची कार्यवाही करतो, त्यामुळे वर्तमानपत्रात वृत्त प्रसिध्द होऊन, एएमटी व ओघानेच मनपची

देखील बदनामी होते. वास्तविक महानगरपालिकेने अकोला संस्थेस **ॲटो ट्रान्सफ़र** ची सवलत देऊन निधी वापराची पूर्ण मुभा दिली आहे. परंतु अकोला संस्था या सवलतीचा गैरवापर करून मनपा रॉयल्टी व आरटीओ कर थकीत ठेवत आहे.

करारातील अट क्र. १० अन्वये महानगरपालिकेने अकोला संस्थेस बसेसच्या पार्कींग व वर्कशॉपसाठी जकात नाक्याच्या पाठीमागे जागा दिलेली आहे. या जागेवर कार्यशाळा, सर्व्हीस सेंटर, वॉचमन रूम इत्यादी उभारून जागेचा विकास करणे हे संस्थेचे काम असतांना देखील अकोला संस्थेने या जागेचा काहीही विकास केलेला नाही. त्यामुळे अनेक बसेस नादुरूस्त व अस्वच्छ असतात. ही बाब या प्रकल्पाची व पर्यायाने मनपाची प्रतिमा मलिन करणारी आहे.

अकोला प्रवासी संस्थेतर्फ़े पुरविण्यात येणाऱ्या सेवेवर मनपाच्या वतीने यांत्रिकी विभागातर्फ़े नियंत्रण ठेवण्यात येते. शहरातील नागरिकांना योग्य वेळेवर योग्य ठिकाणावरून सुव्यवस्थीत सेवा पुरविण्यास संस्थेस बध्द करणे, संस्थेने दिलेल्या दैनंदिन अहवालाचे मुल्यमापन करणे, आवश्यक ठिकाणी बसेसच्या वेळापत्रकात बदल करायला लावणे, इत्यादी कामे मनपाच्या नियंत्रणाखाली केली जातात.

एकूणच औरंगाबाद महानगरपालिकेच्या तिजोरीवर कुठलाही बोजा न पडता शहरातील नागरिकांसाठीच ही सेवा मनपाने उपलब्ध करून दिली आहे. दररोज सरासरी ३० ते ३५ हजार प्रवासी या सेवेचा लाभ घेतात. तसेच शालेय विद्यार्थ्यांना ५० टक्के सवलतीच्या दराने शाळेत जाण्यासाठी पासेसही वितरीत करण्यात आले आहेत. एस.टी.महामंडळ देत असलेल्या इतर सवलती बाबत अद्याप निर्णय झालेला नाही. नागरी सुविधे सोबतच रॉयल्टीच्या स्वरूपात मनपास उत्पन्न मिळत होते. शासनास देखील आर.टी.ओ. टॅक्स, न्युट्रीशन टॅक्सच्या माध्यमातून भरीव रक्कम मिळणे अपेक्षित होते.

## सद्यस्थितीतील परिस्थिती :

सन २००९-२०१० या वर्षात मात्र एएमटी परिवहन उपक्रम अडचणीत आला असून,अवैध प्रवासी वाहतूक, कंत्राटदाराचे दुर्लक्ष, डिझेल-स्पेअरपार्टचे वाढलेले दर, कर्मचारी वेतनात झालेली वाढ या बाबींमुळे हा उपक्रम आर्थिक संकटात सापडला आहे. कंत्राटदाराने मागील एक वर्षापासून मनपा रॉयल्टीरचे रूपये २९ लक्ष भरले नाहीत. त्यामुळे मनपा प्रशासनाने विद्यार्थी पासेस रकमेमधून रूपये ९.४४ लक्ष व निवडणूक कामासाठी वापरण्यात आलेल्या एएमटी बसेसचे भाडे रूपये २.२० लक्ष वळती करून घेतले आहे. सद्यस्थितीत रूपये १७ लक्ष रॉयल्टी अकोला संस्थेकडे थकीत **आहे.** तसेच रूपये ७३ लक्ष आर.टी.ओ. टॅक्स देखील थकीत असल्यामुळे आरटीओ टॅक्सच्या वसूलीसाठी परिवहन विभागाने ४५ एएमटी बसेस जप्त केल्या होत्या त्यानंतर अकोला संस्थेने ३० लक्ष टॅक्स भरून ३० बसेस सोडवून घेतल्या आहेत. तथापि अद्याप ही १५ बसेस आर.टी.ओ.च्या ताब्यात आहेत. त्यामुळे फ़क्त ५८ बसेस शिल्लक राहिल्या असून पैकी १२ असेस नादुरूस्त असून ४६ बसेसच्या माध्यमातून शहर बस वाहतूक सेवा पुरविण्यात येत आहे. बस संख्येच्या कमतरतेमुळे एकूण २३ मार्गापैकी ४ मार्ग बंद करण्यात आलेले असून फ़क्त १९ मार्ग सुरू आहेत.

शहरातील विद्यार्थी, नागरिकांसाठी शहर बस वाहतूक सेवा सुरू राहणे अत्यंत गरजेचे असल्यामुळे मनपा प्रशासनाने विद्यार्थी पासेसच्या रकमेपैकी रूपये २० लक्ष तातडीने आरटीओ कार्यालयास भरणा केले आहेत. परंतु अद्याप जप्त केलेल्या बसेस पैकी १५ बसेस सोडण्यात आलेल्या नाहीत. अकोला संस्थेस दिनांक १२.६.२०१० पर्यंत सर्व बसेस सोडवून घेणे व बसेसची योग्य ती दुरूस्ती करणे बाबत लेखी सूचना देण्यात आलेली आहे. तसेच अकोला संस्थेकडे मॅग्मा फ़ायनान्स यांचे जवळपास रूपये ६० लक्ष थकीत आहेत.

## **चौकशी समितीची प्रत्यक्ष पाहणी :**

चौकशी समितीने महानगरपालिकेच्या यांत्रिकी (Mechanical) शाखेच्या कनिष्ठ अभियंता श्री.अमोल कुलकर्णी यांचेसह दिनांक १०.०६.२०१० रोजी मनपा औरंगाबादच्या शहर बससाठीच्या मध्यवर्ती नाक्याजवळील कार्यशाळेस (Workshop) भेट दिली असता, तेथील अवस्था अत्यंत विस्कळीत, अस्वच्छ तसेच त्या जागेवर खड्डे व पाणी साचलेले आढळून आले. तेथे नादुरूस्त बसेस होत्या. तेथे बसेस दुरूस्तीच्या पुरेशा सुविधा दिसून आल्या नाहीत. किरकोळ दुरूस्ती होईल अशीच सोय दिसून आली. व्यवस्थित, सुसज्ज,स्वच्छ व अद्यावत कार्यशाळेऐवजी अत्यंत बिकट अवस्थेतील कार्यशाळेमुळे एएमटी बसेसची अवस्था सुधारण्याऐवजी बिघडण्याची शक्यता जास्त आढळून येते. त्यानंतर चौकशी समितीने सिडको बसस्टॅण्ड समोर जळगांव रोडवर उभ्या असलेल्या दोन ए.एम.टी. बसेसची पाहणी केली.

१. गाडी क्र. एमएच-२० डब्ल्यू ९२७०,
वाहनचालक श्री.भगवान मुळे सिडको बसस्टॅण्ड ते रेल्वेस्टेशन.

२. गाडी क्र. एमएच-२० डब्ल्यू ९२७४
वाहनचालक श्री.सुधाकर दिंडोरे, सिडको बसस्टॅण्ड ते औरंगपुरा.

या बसगाड्यांची अवस्था अत्यंत खिळखिळी, पाटे खडखड आवाज करणारे, सीट निखळलेले, वायपर नसलेले, गाडीचे इंजिन बॅटरी नसल्यामुळे सतत चालू असलेले, गाडयांचा रंग निघालेला व गाड्यांमध्ये सर्वत्र कचरा, कागदांचे तुकडे अस्तव्यस्त पडलेले आढळून आले. गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट व शोचनिय दिसून आली. गाड्यांची नीटनेटकी देखभाल दूरच दैनंदिन आवश्यक असणारी स्वच्छता ,ऑईल पाणी, कपडा मारणे अशी साधीसुधी कामेही केलेली नाहीत. गाडीचे प्रवासी बाजूंचे लाईट निघालेले, गाडीवर खडूनेच दिशादर्शक पाटी लिहिलेली आढळून आली. या सर्व बाबींकडे संबंधित ठेकेदारांचे व मनपा प्रशासनाचेही दुर्लक्षच दिसून येते.

## **चौकशी समितीचा शहर बसचा प्रत्यक्ष प्रवास :**

चौकशी समितीने दिनांक १४.६.२०१० रोजी सायंकाळी ६.३० ते ७.२० ए.एम.टी बसने दोन बसेस मधून प्रवास केला.

१. एमएच-२०, डब्ल्यू ९७५६ औरंगपुरा शिवाजीनगर मार्ग

| | | | |
|---|---|---|---|
| २. | एमएच-२०,डब्ल्यू | ९३२३ | सिडको बसस्टॅण्ड ते औरंगपुरा व्हाया कामगार चौक, गजानन महाराज मंदिर. |

**प्रवासा दरम्यान पुढील प्रमाणे अनुभव आले –**

बसमध्ये स्वच्छता केलेली नव्हती. सर्वत्र धूळ व कागदांचे तुकडे पडलेले दिसून आले. बऱ्याच सीट फ़ाटलेल्या होत्या. काही सीट निघालेल्याही होत्या. पाट्याचा खडखड असा आवाज येत होता. गाडीच्या मागील भाग मध्ये चेपलेला दिसून आला. तसेच मागील बाजूच्या काचा फुटलेल्या होत्या. गाडीत चढउताराच्या ठिकाणचे दिवे बंद होते. गाडीचा रंग उडालेला होता. गाडीचे ब्रेक लवकर लागत नसल्याचे दिसून आले. गाडीत प्रवासी संख्या चांगली आढळून आली. औरंगपुरा ते शिवाजीनगर मार्गाच्या बसमध्ये तर गाडी पूर्ण भरल्यामुळे बरेच जण उभे राहून प्रवास करीत होते. एकूणच गाड्यांची देखभाल व दुरूस्ती योग्य प्रकारे करण्यता येत नसल्याचे दिसून आले.

अशाच प्रकारे ही सेवा चालू राहिल्यास सदरील गाड्या धोकादायक व प्रवासाकरीता निकामी ठरण्याची शक्यता आहे.

**ए.एम.टी बस व बस थांब्यावरील कर :**

औरंगाबाद महानगरपालिकेने शहर बस सेवा ही सन २००६-२००७ या वर्षापासून अकोला प्रवासी व माल वाहतूक सहकारी संस्था मर्यादित अकोला यांना करारनामा करून चालविण्यासाठी देण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने शहर बस वाहतूक व अकोला प्रवासी व मालवाहतूक संस्थे सोबत केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार अट क्र.१६ अन्वयेशहर बस थांब्यावर व बसच्या दोन्ही बाजूवर जाहीरात लावण्याची मुभा देण्यात आलेली आहे. व याबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांनी मालमत्ता अधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांना जा.क्र./मनपा/अशअ/यांत्रिकी/७७४/२००६, दिनांक १०.८.२००६ च्या पत्राद्वारे जाहिरातीवरील मालमत्ता कराची रक्कम निश्चितपणे काढून देणेबाबत विभागास कळविण्यात आलेले होते. तसेच मालमत्ता विभागास वारंवार / वेळोवेळी पुढील प्रमाणे कार्यवाहीबाबत पत्र देण्यात आलेले आहे.

१. जा.क्र./मनपा/यांत्रिकी/८०२/२००८, दिनांक २४.३.२००८
२. जा.क्र./मनपा/यांत्रिकी/३५३/२००८, दिनांक २८.१०.२००८
३. जा.क्र./मनपा/यांत्रिकी/२७६/२००८, दिनांक २६.११.२००८

सदरच्या संचिकेची पाहणी केली असता ए.एम.टी.शहर बसेस व थांब्यावरील जाहीरात कराच्या दरास मा.आयुक्त यांनी शासकीय मंजूरी दिनांक २५.४.२००७ रोजी दिलेली असून मा.महापौर यांनी मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी ठराव क्र. ३१२, दिनांक २०.११.२००८ नुसार फ़िरत्या वाहनावरील / बसेसवर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी रू. २०/- प्रति चौ. फूट दर निश्चित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

तथापि संबंधित विभागाकडून वारंवार लेखी कळविल्यानंतर मालमत्ता अधिकारी यांनी सन २००६-२००७ ते सन २००८-२००९ या कालावधीचा जाहिरात कर रक्कम रू.५४,४१,५८०/-चा भरणा करण्यासाठी संस्थेस पत्र देण्यात आले असता संस्थेने जनरल पावती पुस्तक क्रमांक ३२७५ पावती क्रमांक ३२७४००, दिनांक २.७.२००९ रक्कम रू.२,००,०००/- नुसार भरणा केलेला आहे व उर्वरीत थकित रक्कम रू.५२,४१,५८०/- व सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाचा जाहिरात कर रक्कम रू.१८,१३,८६०/- असे एकूण रक्कम रू.७०,५५,४४०/- चा भरणा करण्यासाठी संस्थेस कळविले असता संस्थेने त्यापैकी जनरल पावती पुस्तक ३६२६ पावती क्र.३६२५६५ दिनांक १७.२.२०१० रोजी धनादेश क्र.०७१६२३ दिनांक १६.२.२०१० मलकापुर अर्बन बँक द्वारेचा रक्कम रू.१,५०,०००/- चा भरणा मालमत्ता विभागास केलेला होता मात्र सदरील धनादेश वटलेला नसल्याने पुढील कार्यवाही करणे अपेक्षित होते. तथापि याबाबत काहीही कार्यवाही झालेली नाही, असे दिसून येते.

**विद्यार्थी पासेस सवलत योजना :**

औरंगाबाद महानगरपालिकेने ए.एम.टी. (A.M.T.) शहर बस सेवेअंतर्ग सन २००६-०७ या वर्षापासून अकोला प्रवासी मालवाहतूक सहकारी संस्था मर्यादित अकोला यांनी ठराव क्र.६०१, दिनांक ७.६.२००६ रोजी तत्कालीन महापौर मा.किशनचंद तनवाणी साहेबांनी मनपाच्या सभागृहात एक कार्यक्रम घेवून मनपा शहर बस सेवेतर्फे शहरातील विद्यार्थी अपंग व अंध यांची तिकिटांच्या दरामध्ये ५०% सवलत देणेबाबत घोषणा केली व काही विद्यार्थ्यांना सवलतीचे पासेस देवून सवलतीची सुरूवात करण्यात आली. तथापि, या कार्यक्रमात सवलतीच्या पासेससाठी ५०% रक्कम मनपातर्फे देण्यात येईल असे ठरविण्यात आले होते. त्यानुषंगाने संचिकेची तपासणी /पडताळणीअंती खालील प्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या.

१. सदरच्या प्रकरणात परि.एनएस-४ वर परिच्छेद क्र.८ वर विद्यार्थ्यांच्या नावांसह विवरण तयार आहे असे नमूद केलेले आहे. परंतु पहाणीअंती असे निदर्शनास येते की, विद्यार्थ्यांच्या नावांचा संचिकेत उल्लेख नाही.सदरील योजना ही अंध, अपंग ,सिनियर सिटीजन यांना ५०% सवलत देणेबाबत आहे. परंतु यादीमध्ये नांवे नसल्याने तसेच त्यांची अपंग, सिनियर सिटीजन व अंध याबाबत पुरावे संचिकेमध्ये नाही.त्यामुळे वसूल केलेली रक्कम कशाआधारे केली याचा बोध होत नाही.

२. विद्यार्थ्यांच्या सवलतीच्या दरात पासेससाठी रक्कम रू.३९,४४,०५४/- एवढ्या रकमेची मंजूरी घेण्यात आली. परंतु सदरची रक्कम रू. २० लक्ष आर.टी.ओ.मोटार वाहन कर थकित व रक्कम रू.९,४४,०५४/- मनपा फ़ंडात रॉयल्टी म्हणून जमा करण्यात आली तसेच त्यानंतर ती वळती करण्यात आली. व उर्वरीत रक्कम रू.१० लक्ष एएमटी कर्मचारी यांचे ESIC/PF सनी मे अकोला प्रवासी माल वाहतूक सहकारी संस्था यांना भरणा करावा असे सूचित केले.

३. संचिकेत हमीपत्र नसतांना हमीपत्राच्या अधिन राहून मंजूरी देण्यात आली. ही बाब योग्य नाही.

४. अकोला संस्थेकडून मनपाची रॉयल्टी येणे व जाहीरात कर येणे असतांना सदरील संपूर्ण रक्कम समायोजित का केली नाही याचा बोध होत नाही.

**शहर बस वाहतूक फ़ेऱ्यांची तपासणी :**

औरंगाबाद महानगरपालिका ए.एम.टी. (A.M.T.) शहर बस सेवेअंतर्गत सन २००६-०७ या वर्षापासून अकोला प्रवासी मालवाहतूक सहकारी संस्था मर्यादित अकोला यांनी फ़ेऱ्याबाबतचे लॉग बुक ठेवलेले नाही, असे तपासणी अंती दिसून आले. त्यामुळे किती फ़ेऱ्या झाल्या व वाहन दैनंदिनी किती किलोमीटर चालले यांचा बोध होत नाही. याबाबत संबंधित विभागाने कोणतेही नियंत्रण ठेवल्याचे दिसून येत नाही किंवा विभागाने अधून-मधून क्रॉस चेकींग किंवा गाड्यांची अचानक तपासणी वगैरे केलेली नाही. संस्थेने दिलेल्या माहितीच्या आधारेच आजतागायत महानगरपालिकेत रॉयल्टी जमा केली जाते ही बाब योग्य वाटत नाही.

**बँक गॅरंटी न भरणे बाबत :**

शहर बस वाहतूक सेवा सुरू करतेवेळी संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र.३५ अन्वये, संस्थेने सेवा सुरू केल्यापासून व बसेसच्या रजिस्ट्रेशन तारखेपासून तीन महिन्याच्या आत ५० लाख रूपयांची बँक गॅरंटी टप्प्या- टप्प्याने मनपास देणे आवश्यक असतांना सन २००९-२०१० ची बँक गॅरंटी दिनांक २५.८.२००९ पर्यंत घेणे आवश्यक असतांना अद्यापपावेतो घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे संस्थेकडून येणे असलेली वसूली किंवा महापालिकेस झालेल्या नुकसानीची भरपाई करता येत नाही.

**अट क्र. ६ नुसार सुसज्ज कार्यशाळा व बसथांबा नसणे :**

संचिकेची तपासणी केली असता अकोला मालवाहतूक संस्थेमार्फ़त सुसज्ज कार्यशाळा सुरू करणे बाबत तसेच बसेसचा विमा काढणे व विम्याचे नुतनीकरण करणे बाबत करारनाम्यात उल्लेख आहे. परंतु संस्थेने सुसज्ज कार्यशाळा व बसेसचा विमा करणे बाबत काहीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे बसेसची देखभाल व दुरूस्ती बसेसच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो.

कार्यशाळेच्या व बसथांब्याच्या जागेत पुष्पनगरी ते जकात नाका व तेथून सिडको एन-१२ येथे स्थलांतरामुळे सुसज्ज अशी कार्यशाळा न झाल्याने बसेसची देखभाल व दुरूस्ती नीट झालेली नाही. याबाबत प्रशासनाची हलगर्जी दिसून येते.

**<u>अट क्र. १२ :</u>**

अकोला प्रवासी मालवाहतूक सहाकारी संस्था यांनी करारनामा अट क्र.१२ नुसार घसाराची डिपॉझीट किंमतीबाबत सन २००८ नंतर काहीही कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही. ही बाब योग्य नाही. याबाबत प्रशासनाने काहीच कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे भविष्यात ए.एम.टी.बसेसची देखभाल व दुरूस्ती यावर परिणाम होऊ शकतो.

टिपणी पृष्ठ क्र. ६,७ नुसार तपासणी केली असता एकूण ५५ बसेसवरील बँकेचे उर्वरीत कर्ज रक्कम रू.२९४३३८००/- अद्यापपर्यंत भरणा करणे बाकी आहे. याबाबत प्रशासनाने काहीच कार्यवाही केलेली नाही.

<u>महानगरपालिकेच्या विधी सल्लागारांच्या पॅनल वरील विधीज्ञांचे अभिप्राय :</u>

शहर बस सेवा योजनेच्या चौकशी संदर्भात तज्ञ विधीज्ञांचा सल्ला घेण्यासाठी या विभागाने विधी सल्लागार यांना दिनांक १५.६.२०१० रोजी विधी विभागाच्या पॅनल वरील एका विधीज्ञास नेमण्यास सूचित केले होते. त्यानुसार अॅड. महेश कानडे यांना विधी विभागाने दिनांक १८.६.२०१० रोजीच्या पत्रान्वये या संदर्भात सल्ला देण्यासाठी कळविले होते.

त्यानुसार अॅडव्होकेट श्री.महेश कानडे, यांनी दिनांक ३.७.२०१० रोजी त्यांचे अभिप्राय या कार्यालयास कळविले आहेत.

सदरील अभिप्रायानुसार अकोला प्रवसी मालवाहतूक संस्थेने करारनाम्यातील अट क्र.१, १६ व २६ चे पालन केलेले नाही. करारनाम्यानुसार १०० ची बस संख्या पुरविली नाही, जाहिरातींचा तपशील व उत्पन्न कळविले नाही व तसेच जॉईन्ट अकाउन्ट मध्ये उत्पन्नाची रक्कम जमा केलेली नाही. त्यामुळे महानगरपालिका करारानुसार सदरील संस्थेविरूध्द भां.द.वि. चे कलम ४०९ व ४२० अन्वये आवश्यक ती कार्यवाही करू शकते. रॉयल्टीच्या वसूलीसाठी कायदेशीर नोटीस देणेची शिफ़ारसही केली आहे.

**<u>चौकशी समितीची पुष्पनगरी वाहन तळास भेट :</u>**

चौकशी समितीने दिनांक ८.७.२०१० रोजी ठिक १२.१५ वाजता पुष्पनगरी येथे अकोला प्रवासी मालवाहतूक संस्था मर्यादित यांना महानगरपालिकेने शहर वाहतूक बसेससाठी ज्या ठिकाणी कार्यशाळा देण्यात आली होती, त्या ठिकाणी स्थळ पाहणी केली असता पुढील बाबी दिसून आल्या.

१. सदरचे ठिकाणची पाहणी केली असता कंपाउन्डच्या दरवाजावर तुकनगिरी महाराज यांचे मठ (विश्वस्त मठाधिश ) तसेच नोंदणी क्र. ए ३१५२/ वर्ष १९७२ असे दिसून आले.

२. श्री.जगदिशगीरी गुरू व पिता कांचनगीरी महाराज असे गेटच्या दरवाजावर लिहिलेले दिसून आले.

३. जागेचे क्षेत्रफ़ळ २ एकर १० गुंठे असे लिहिलेले दिसून आले असून त्याचा सर्वे नं.९ असे दर्शविण्यात आलेले दिसले. तसेच मनपा घर क्र.५.१४.७९ नगर भूमापन न.२०७२२ असे स्पष्ट अक्षरात लिहिलेले दिसून आले.

४. गेटच्या आत जाऊन कार्यशाळेची पाहणी केली असता त्या ठिकाणी ६×१० चा एक हौद बांधण्यात आलेला दिसला असून दुरूस्तीसाठी एक रॅम्प सदरच्या क्षेत्रफ़ळात दिसून आला. तसेच सर्व जागेवर जास्तीत जास्त झाडे-झुडपे दिसून आले.

५. तेथील रहिवाशी श्री.रमेश घोडके पाटील व इतर यांनी सांगितले की, सदरील जागा तुकनगिरी महाराज मठाची असून मागील कालावधीत काही मंडळींनी त्यांची मालमत्ता असल्याचे भासवून महानगरपालिकेस फ़सवले आहे. आम्ही व या परिसरातील नागरिकांनी सदरील जागा उक्त मठाची असल्याने येथील ए.एम.टी. बसचा वाहनतळ व कार्यशाळा रद्द करून जागा रिकामी करून घेतली आहे.

## अकोला प्रवासी व मालवाहतूक सहकारी संस्था यांनी दिलेले निवेदन :

आपला संयुक्त मनपा शहर बस प्रकल्प सुरु झाल्यापासून विविध नैसर्गिक व सामाजिक अडचणी आल्यास त्याची पूर्ण झळ संस्थेस सोसावी लागते. दिनांक ०५.०७.२०१० रोजीच्या भारत बंद मुळे संस्थेच्या बसचे नुकसान होऊन व प्रवाशी नसल्यामुळे पुन्हा संस्थेला आर्थिक नुकसान सोसावे लागले. मोठा पाऊस आला तरी प्रवाशी संख्या घटून संस्थेला नुकसान सोसावे लागते. मनपा शहर बस प्रकल्पाने मागील ४ वर्षात रू. १ कोटी ६१ लाख रूपये आर.टी.ओ. टॅक्स भरलेला आहे. मनपाला रॉयल्टीच्या स्वरूपात रू. ९० लक्ष दिलेला आहे. या उलट एस.टी.महामंडळाला आर.टी.ओ.चे टॅक्स किंवा मनपा रॉयल्टी द्यावी लागत नसतांना एस.टी.महामंडळाला सन २००४ पूर्वीच्या ५ वर्षात रू. १२.३८ कोटी रूपयांचे तोटा झाला होता.

मागील चार वर्षापासून तिकिट दर वाढही करण्यात आली नाही, याच काळात इतर **मनपा** शहर बस व एस.टी.महामंडळाने दोन वेळा तिकिट दरात वाढ केलेली आहे. तिकिट दर वाढ न झाल्यामुळेही संस्थेला मागील दोन वर्षापासून आर्थिक नुकसान होत आहे. तसेच वेळोवेळी अवैध वाहतूकीसाठी पोलिस आयुक्तांना व प्रादेशिक परीवहन कार्यालयाला विनंती करूनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. कंपन्यांच्या बसेस व TATA ACE या वाहनांमधून मोठ्या प्रमाणात अवैध प्रवासी वाहतूक होत आहे. त्यामुळे रोज जवळपास ३५,०००/- रूपयांचे नुकसान होत आहे.

आपल्या शहर बस प्रकल्पासाठी सुरवातीला महानगरपालिकेतर्फ़े पुष्प नगरी येथील पार्किंग देण्यात आली होती तेथे आम्ही पाण्यासाठी बोर, हौद, मेन्टनससाठी रॅम्प, वॉचमन व स्पेअरसाठी रूम,गेट, मुरूम यासाठी जवळपास २० लक्ष रूपये खर्च केला परंतु तेथील स्थानिक रहीवाशांनी तीजागा गार्डन साठी राखीव असल्याचे सांगून विरोध केला. या विरोधामुळे ती जागा अपूरी असल्यामुळे तेथून स्थलांतरीत होवून मध्यवर्ती जकात नाका येथे पार्कींग देण्यात आली या ठिकाणी पुन्हा मुरूम टाकणे पंम्पचरसाठी शेड, स्पेअर साठी रूम असा जवळपास ६ लाख रूपये खर्च करण्यात आला परंतु त्या पार्कींग मध्ये बऱ्याच काळा पासून कचरा साठवण्यात आलेला असल्यामुळे

मुरूम टाकूनही त्या ठिकाणी चिखल होत आहे. व ती जागा ही अपूरी पडत आहे. काही बसेस मनपा वर्कशॉप मध्ये किंवा जकात नाक्याच्या जागेत पार्क केल्या जात आहेत. त्यामुळे आता पार्किंगएन-१२ येथे देण्यात आली आहे. याठिकाणी संस्थेस खर्च करावा लागत आहे.

Aurangabad Municipal Transport
Curent Position

| | |
|---|---|
| Expences per month | |
| Labour Salary | 1900000 |
| Bonus | 120000 |
| Admin & Office staff | 180000 |
| Maintanance Labour Charges | 120000 |
| Diasel Exp | 3400000 |
| Spairparts & tayers Perchase | 600000 |
| AMC Royalty | 250000 |
| RTO & Nutrition Tax | 500000 |
| Bus Insurance | 150000 |
| Loan Instalments | 1254844 |
| Office Stationary & Ticket Perchase | 100000 |
| Mislanius | 250000 |
| | |
| Total | 8824844 |
| Collection per month | 7200000 |
| **Aproximate loss per month** | **1624844** |

शहर बस पार्किंगसाठीही तिसऱ्या वेळा खर्च करावा लागत आहे त्यामुळे पुन्हा आर्थिक बोजा ठेकेदार संस्थेवर पडत आहे. अशा परिस्थितीतही आम्ही शहर वासियांना सेवा पुरवत आहोत.

## चौकशीचे निष्कर्ष व चौकशी समितीच्या शिफ़ारशी :

१. औरंगाबाद महानगरपालिका परिवहन उपक्रम एक-दीड वर्षापूर्वी संपूर्ण महाराष्ट्रात नावाजला गेलेला एक उपक्रम होता. राज्यातील सर्व शहर बस वाहतूक सेवा तोट्यात चालत असतांना, औरंगाबाद महानगरपालिका मात्र शहर बस वाहतूक प्रकल्पात कोणतीही गुंतवणूक न करता प्रति वर्ष साधारणपणे रू. ३० ते ३५ लाख उत्पन्न मिळवित होती. तथापी मागील एक-दीड वर्षात मात्र या शहर बस वाहतूक उपक्रमास उतरती कळा लागल्याचे दिसून येते. एकूण २३ मार्गांपैकी फ़क्त १९ मार्गावर शहर बसेस धावताना आढळून आल्या. उर्वरीत ४ मार्गावर बस संख्येच्या कमतरतेमुळे बसेस धावत नाहीत. औरंगाबाद शहरातील सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सदरील शहर बस वाहतूक अत्यंत जिव्हाळ्याचा व दैनंदिन आवश्यकता

असणारा भाग आहे. त्यामुळे अकोला प्रवासी वाहतूक संस्थेस तंबी देवून बस वाहतूकीत सुधारणा करणे आवश्यक आहे. बंद पडलेले ४ मार्ग लवकरात लवकर सुरू करण्याची कार्यवाही विभागाने तातडीने करावी अशी शिफ़ारस करण्यात येते.

२. आर्थिक दृष्टीने विचार करता सदरील प्रकल्प डबघाईला आल्याचे दिसून येते. ठेकेदार संस्थेच्या निवेदनानुसार प्रतिमाह रू.१६,२४,८४४/- एवढ्या तोट्यात सदरील शहर बस प्रकल्प चालतो आहे. त्याशिवाय महानगरपालिकेचे साधारणत: रू.१७ लाख रॉयल्टी पोटी येणे आहे. शासनाच्या प्रवासी कराचे रू.२० लाख व मॅग्मा फ़ायनान्सचे रू.६० लाख थकीत आहेत. सदरील प्रकल्पावरील महानगरपालिकेच्या प्रभावी नियंत्रणाच्या अभावामुळे आणि ठेकेदार संस्थेच्या दुर्लक्षामुळे अशी अवस्था झाल्याचे दिसून येते. यापूर्वीच्या मनपा प्रशासनाच्या गलथान व चूकीच्या निर्णयामुळे पुष्पनगरी येथील कार्यशाळा व बसथांबा बदलल्यानंतरही मध्यवर्ती जकात नाक्याजवळील जागाही अपूरी व गैरसोयीची आढळल्याने दुसऱ्यांदा कार्यशाळा बदलून एन-१२ येथे हलविण्याचा निर्णय यामुळे शहर बसच्या अवस्थेवर देखभाल दुरूस्तीवर प्रचंड परिणाम झाल्याचे आढळून आले आहे. यावर गांभिर्याने लक्ष दिलेले नाही म्हणून जसे जमेल व जोपर्यंत चालेल तसे हा प्रकल्प ओंगळवाण्या पध्दतीने चालू असल्याचे दिसून येते. यादृष्टीने बस वाहतूक तिकीट दरात वाढ व त्या बरोबरच बस गाड्यांच्या देखभाल दुरूस्तीकरीता सुसज्ज अशी कार्यशाळा व बसथांबा तातडीने तयार करणेची शिफ़ारस करण्यात येते.

३. करारनाम्यातील अट क्र.१ नुसार सदरील प्रकल्पात किमान १०० बसेस लवकरात लवकर पुरविण्याबाबत ठेकेदार संस्थेस बाध्य करण्याची गरज होती पण तसे झालेले नाही. सदरील प्रकल्पाची सद्यस्थिती शोचनीय आहे. ठेकेदार संस्थेस बस संख्या वाढविण्याची सूचना व संधी देण्यात यावी. तद्नंतरही त्याचा अंमल न झाल्यास औरंगाबाद महानगरपालिकेस कोणतीही व कसल्याही प्रकारची आर्थिक झळ न बसता सदरील शहर बस प्रकल्प महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास (S.T.) हस्तांतरीत करण्याची शिफ़ारस करण्यात येते.

४. उक्त शिफ़ारशीनुसार शहर बस प्रकल्प राज्य परिवहन (S.T.) महामंडळास हस्तांतर करण्याचे ठरल्यास सदरील प्रकल्पातील वाहन चालक व वाहक (Drivers & Conducters) सह बाकी कर्मचारी वर्गासह हस्तांतर करणेची शिफ़ारस करण्यात येते.

५. करारनाम्यातील अट क्र.१६ नुसार बसवरील व बसस्टॉपवरील जाहिराती संबंधीची माहिती व त्यापासून मिळणारे उत्पन्न यासंबंधीची माहिती व त्यापासून मिळणारे उत्पन्न या संबंधीची माहिती ठेकेदार संस्थेने महानगरपालिकेस लवकरात लवकर द्यावी. तसेच त्यानुषंगाने नियमानुसार अनुज्ञेय जाहिरात कराची परिगणना मालमत्ता विभागाने तातडीने करावी आणि त्याची वसूली करण्याची शिफ़ारस करण्यात येते.

६. वरील प्रमाणे करारनाम्यातील अटी व शर्तींचे पालनाबाबत योग्य ती संधी देवूनही पालन न झाल्यास भारतीय दंड विधान संहिता कलम ४०९ व ४२० नुसार ठेकेदार संस्थेविरूध्द कायदेशीर कार्यवाही करण्याची शिफ़ारस करण्यात येते.

७. शहर बस वाहतूक प्रकल्पाकरीता महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागाचा स्वतंत्र अधिकारी वा कर्मचारी नेमणूक केले नसल्यामुळे सदरील प्रकल्पावर प्रभावी असे नियंत्रण व गांभीर्यपूर्वक कार्यवाही झालेली नसल्याचे आढळून आले. त्याकरीता भविष्यात या विषयाचे गांभीर्य व सर्वसामान्य नागरिकांचे हित जोपासण्याकरीता स्वतंत्र जबाबदार असा सक्षम कर्मचारी / अधिकारी नेमण्याची शिफ़ारस करण्यात येते.

# कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र.३ भाडेतत्वावर देणेबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल.

श्री.सुनिल साबळे,जिल्हा कार्याध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ़ इंडिया यांनी दिनांक ६.८.२०१० रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस कबाडीपुरा येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र.३ भाडेतत्वावर देणेबाबत भ्रष्टाचार झाल्याची तक्रार दिलेली आहे. या संदर्भाने सविस्तर बाबी खालील प्रमाणे -

महानगरपालिकेच्या मालकीच्या कबाडीपुरा येथील दु.क्र. ३ भाडेतत्वावर देणे संदर्भाने दिनांक १८.८.२००९ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत निविदा मागविण्यात आल्या होत्या. या निविदा दिनांक २१.८.२००९ रोजी उघडण्यात आल्या असता श्री.देविदास चित्ते यांनी रू.४२८५/- तर श्री.शेख मोहमंद शकील यांनी रू.३३०० निविदेत दर प्राप्त झाले. सर्वात जास्त दर श्री.देविदास चित्ते यांचे असल्याकारणाने मालमत्ता विभागाने श्री. चित्ते यांना पत्र देवून भाडेतत्वावर पुढील कार्यवाही करणे संदर्भाने क्र.मनपा/मामअ/१९४५/२००९, दि.२१.१०.२००९ अन्वये श्री.देविदास चित्ते यांचे नांवे देवून सात दिवसात अनामत रक्कम वार्षिक भाडे, सेवाशुल्क व अकृषिकर रकमा भरणा करणे संदर्भाने मनपाचे हक्कात भाडेपट्टा संदर्भाने करारनामा करून देण्यात यावा त्यानंतर दुकानाचा रितसर ताबा देणेत येईल असे कळविले. सदरील पत्र मिळाल्याची पोच श्री.किशोर लक्ष्मण चित्ते यांनी दिल्याचे दिसून येते. तद्नंतर मालमत्ता विभागाने पुनश्च स्मरणपत्र क्र.मनपा/मामअ/२४२५/२००९, दिनांक १७.१२.२००९ अन्वये स्मरणपत्र श्री.देविदास चित्ते यांचे नांवे देण्यात आले त्यात ३ दिवसाची मुदतीची संधी देण्यात आली आणि जर मुदतीत प्रतिसाद न दिल्यास भरलेली अनामत जप्त करून मंजूर झालेले दुकान रद्द करण्यात येईल असे कळविले. या पत्रावर पोच श्री.दिलीप चित्ते यांची आहे. तद्नंतर उपआयुक्त (सिडको) यांचे वतीने श्री.देविदास चित्ते यांना जा.क्र.मनपा/मामअ/२१७/२०१०, दिनांक २५.१.२०१० अन्वये पुनश्च ३ दिवसांची अंतिम नोटीस देण्यात आलेली आहे. या नोटीसीवर श्री.किशोर यांची पोच आहे. मालमत्ता विभागाने पत्र क्र. मनपा/मामअ/३५०/२०१०, दिनांक १०.२.२०१० अन्वये श्री.देविदास चित्ते यांनी निविदेसोबत भरणा केलेली रक्कम रू.५०००/- जप्त करून दुकान मनपाचे ताब्यात घेण्यात आल्याचे पत्र देण्यात आले आहे. या पत्रावर श्री.देविदास अशा नावाची पोच आहे.

या प्रकरणात श्री.मो.शकील मो.शरीफ़ यांनी कबाडीपुरा येथील दुकान क्र.३ भाडेतत्वावर मिळावी असा अर्ज दिनांक ४.२.२०१० रोजी मा.सभापती, स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे नांवे देवून त्याची प्रत मालमत्ता अधिकारी यांना दिली. सदरील प्रकरणी दिनांक १५.२.२०१० रोजी विषय क्र.४०३ अन्वये कबाडीपुरा येथील दुकान क्र.३ अर्जदार श्री.मोहमद शकील मो.शरीफ़ यांना रू.२४०० प्रतिमाह प्रमाणे मान्य दरानुसार भाडेतत्वावर देण्याबाबत मा.स्थायी समितीने ठराव संमत केलेला आहे. दिनांक १५.२.२०१० च्या ठराव क्र.४०३ प्रमाणे श्री.मो.शकील मो.शरीफ़ यांना दुकान भाडे, अनामत रक्कम, सेवाशुल्क व अकृषीक कर भरणा करणे व भाडेपट्टा करारनामा करून देणे संदर्भाने पत्र जा.क्र.मनपा/मामअ/४३२ दि.२०.२.२०१० अन्वये ७ दिवसाची मुदत देण्यात आली. अर्जदार मो.शकील मो.शरीफ़ यांनी

मनपा फ़ंडात पावती क्र.३०६८४९ दि.३१.५.२०१० अन्वये रू.२८८०० कबाडीपुरा दु.क्र.३ ची अनामत रक्कम व पावती क्र.३०६८५० दिनांक ३१.५.२०१० अन्वये रू.३०४२४ दुकान भाडे, सेवाशुल्क व अकृषीक कराचा भरणा केला आहे. तसेच भाडेपट्टया संदर्भाने दिनांक ३.६.२०१० रोजी मनपा सोबत रजिस्टर्स करारनामा करून दिलेला आहे. मालमत्ता विभागाने कबाडीपुरा येथील दु.क्र.३ चा रितसर ताबाही दिनांक १५.६.२०१० रोजी संबंधितांना दिला.

या प्रकरणी श्री.देविदास चित्ते यांनी दिनांक ११.६.२०१० रोजी अर्ज करून कळविले की, मी सदरील कबाडीपुरा येथील दुकान क्र.३ चे भाडे जास्तीचे भरणा करून सुध्दा दुकान मिळाले नाही. संबंधित लिपीकास भेटलो असता मला दिलेली दुकान रक्कम ठेवून दुसऱ्यास दिल्याचे तोंडी सांगितले याबाबत सविस्तर चौकशी करावी असे अर्जात नमूद केले आहे.

या प्रकरणी तत्कालीन मालमत्ता अधिकारी श्री.निकम यांचे असे म्हणणे आहे की –

दुकान क्र.३ साठी निविदा भरली होती. त्याचे दर सर्वात जास्त असल्यामुळे त्यांची निविदा मान्य करण्यात येवून त्यांना अनामत रक्कम एक वर्षाचे वार्षिक भाडे, अकृषी कर भरणे बाबत व मनपाच्या हक्कात भाडे करारनामा मुद्रांक शुल्कावर भरून देणे बाबत पत्र देवून सात दिवसाच्या आत पूर्तता करणे बाबत कळविले होते. तद्नंतर या प्रकरणात पुन्हा एक स्मरणपत्र अंतिम नोटीस व त्यानंतर अनामत रक्कम जप्त करून दुकान ताब्यात घेतलेली होते.

तद्नंतर मा.स्थायी समिती यांच्या ठराव क्र.४०३ दिनांक १५.२.२०१० अन्वये मो.शकील मो.शरिफ़ यांना सदर दुकान भाडेतत्वावर देण्याचा ठराव मंजूर झाला असल्यामुळे संबंधितास पत्र देवून भाडे व अनामत रक्कम भरणे बाबत कळविले आहे. त्यानुसार संबंधितांची संपूर्ण रक्कम भरली तद्नंतर मनपाच्या हक्कास श्री.मो.शकील मो.शरिफ़ यांनी रजिस्टर्ड नोंदणीकृत करारनामा करून दिलेला आहे. त्यामुळे तसा दुकानाचा ताबा संबंधितास देण्यात आलेला आहे.

## <u>मालमत्ता विभागाबाबतच्या तक्रारी :</u>

१. श्री. देविदास लक्ष्मण चित्ते रा.बुद्धीलाईन, जुनाबाजार,औरंगाबाद यांनी दिनांक ११.६.२०१० रोजी कबाडीपुरा, औरंगाबाद येथील दुकान क्र.३ चे सर्वात जास्त निविदा दर त्यांनी भरले असून सदरील दुकानाचा ताबा त्यांना मिळणे बाबत मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांना अर्ज सादर केला आहे. त्यात त्यांनी नमूद केले आहे की - दुकान क्र.३ कबाडीपुरा, औरंगाबाद येथील दुकान मिळावे म्हणून सर्वात जास्त बोली रक्कम रू.४२८५/- प्रतिमाह एवढी बोलली होती. ती बोली मान्य करून श्री.देविदास चित्ते यांना भाडेरक्कम व अनामत रक्कम भरण्यासंबंधी पत्र देण्यात आले होते. परंतू श्री.देविदास चित्ते कार्यालयात रक्कम भरण्यासाठी आले असतांना त्यांना कोणीही प्रतिसाद दिला नाही व प्रत्यक्ष संबंधित लिपीकास श्री.चित्ते भेटले असता त्यांनी आपले दुकान रद्द होवून दुसऱ्यास देण्यात आले आहे असे तोंडी सांगितले. वास्तविक दुकान रद्द केले तर त्याबाबत मालमत्ता विभागाकडून कळविणे योग्य होते. तसे झालेले नसून संबंधित निविदेवर कारवाई करणाऱ्या लिपीकाने तसे केले नाही व परस्पर दुकान दुसऱ्यास प्रदान केले. सदर दुकान रद्द झाल्याबाबतचे पत्र श्री.चित्ते यांना प्राप्त झालेले नाही. जर पत्र प्राप्त झाले असते तर पुन्हा

निविदेमध्ये भाग घेवून त्या दुकानासाठी निविदा भरली असती. परंतु ज्यावेळेस निविदा प्रसिध्द झाली त्यामध्ये दुकान क्र.३ कबाडीपुरा ही निविदा काढली नाही व परस्पर मंजूर करून दुसऱ्या व्यक्तिस देण्यात आली. जेव्हा की, मनपाच्या नियमाप्रमाणे निविदा काढणे जरूरी होते. श्री.चित्ते यांनी विनंती केली की, दुसऱ्या व्यक्तिस कोणत्या आधारे सदरील दुकान देण्यात आले व ती निविदा न काढताच देता येते का याची पूर्ण चौकशी करून श्री.चित्ते यांना ते दुकान देण्यात यावे व त्याबद्दलची रक्कम भरण्यास तयार असल्याबाबत तक्रारीत नमूद केले आहे. श्री.देविदास चित्ते यांनी उपरोक्त आशयाचा अर्ज दिनांक १०.६.२०१० रोजी उपायुक्त(सिडको) व दिनांक ११.६.२०१० रोजी मालमत्ता अधिकारी यांना सादर केलेला आहे.

२. दिनांक १६.७.२०१० रोजी मा.आयुक्त यांना श्री.सुनिल साबळे,जिल्हा कार्याध्यक्ष,रिपब्लिकन पार्टी ऑफ़ इंडिया ,औरंगाबाद यांनी महानगरपालिका,सिडको उपायुक्त श्री.जावळीकर ,मालमत्ता अधिकारी श्री.तुकाराम जाधव, नविन मालमत्ता अधिकारी श्री.रविंद्र निकम व कनिष्ठ लिपीक श्री.मोमीन व जिलानी यांनी कबाडीपुरा दुकान क्र.३ मध्ये भ्रष्टाचार करून निविदाधारक श्री.देविदास लक्ष्मण चित्ते यांनी निविदेमध्ये रू.४२८५/- रक्कम बोली लावली असता तरीही मो.शकील मो.शरीफ़ यांना रू.२४००/- मध्ये देण्यात आल्याचे तक्रारीत निवेदन देवून त्यात नमूद केले आहे की, महानगरपालिकेचे मालमत्ता अधिकारी श्री.जाधव यांनी मो.शकील यांना पैसे भरण्यासाठी पत्र दिले होते व त्या पत्रामध्ये पैसे भरण्याचा उल्लेख हा ७ दिवसांचा होता व श्री.शकील यांनी सदरील रक्कम ९५ दिवसानंतर भरली व ७ दिवसात जर सदरील व्यक्तीने रक्कम न भरल्यास दुकान रद्द होईल असा उल्लेख होता. नविन मालमत्ता अधिकारी रविंद्र निकम यांनी तक्रार असतांना मो.शकील यांना ताबा दिलेला आहे. सदरील दोन्ही मालमत्ता अधिकारी यांनी निविदा न काढता महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी स्वत:चा फ़ायदा करून घेतलेला असून लाखो रूपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर फ़ौजदारी गुन्हे व त्यांना बडतर्फ़ करण्यात यावे. तसेच उपायुक्त (महसूल), महानगरपालिका कार्यालय यांनी दिनांक २३.६.२०१० रोजी उपोषण सोडून आमच्या मागण्या एक महिन्याच्या आत निकाली काढण्यात येईल असे लेखी पत्र दिले आहे. तसेच आरपीआय च्या वतीने निवेदन देवून काहीही कारवाई करत नसल्यामुळे मा.विभागीय आयुकत साहेब यांच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येतील असे तक्रारीत नमूद केले आहे.

३. वरील परिच्छेदातील अशाच आशयाचे निवेदन श्री.सुनिल साबळे यांनी दिनांक ६.८.२०१० रोजी मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना सादर करून सदरील दुकानाचा ठराव रद्द करणेबाबत कळवून दिनांक १३.८.२०१० रोजी आमरण उपोषण करण्यात येईल असे कळविले होते.

**चौकशीकरीता विलंबाने संचिका पाठविणे .**

दिनांक १६.७.२०१० रोजीच्या श्री.सुनिल साबळे यांच्या निवेदनावर मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी सुस्पष्टपणे शहर अभियंता व मुख्य लेखापरीक्षक यांनी तात्काळ तपासून सादर करावे असा शेरा दिनांक १६.७.२०१० रोजीच मारलेला असतांनाही सदरील संचिका चौकशीकरीता मुख्य लेखापरीक्षकांकडे दिनांक १६.८.२०१० रोजी मुख्य लेखापरीक्षक यांच्या सततच्या पाठपुराव्यानंतर पाठविण्यात आल्या आहेत.

**निष्कर्ष व शिफ़ारशी :**

श्री.देविदास चित्ते यांनी निविदा दर रू.४२८५/- प्रतिमाह नमूद केला होता. त्यांना अनामत रक्कम व करारनामा करण्यासाठी दिलेली पत्रे इतरांनाच मिळाल्याची पोच त्यावर दिसून येते. त्यांना दिलेली सर्व पत्रे त्यांनाच दिली किंवा नाही याची खात्री होत नाही. तसेच मो.शकील मो.शरीफ़ रा.कबाडीपुरा औरंगाबाद यांनाही दिनांक २०.२.२०१० रोजी अनामत रक्कम व इतरचा भरणा करण्याचे पत्र देवूनही त्यांनी त्याचा भरणा ९५ दिवसानंतर केल्याचे दिसून येते. असे असतांना (अशासकीय प्रस्तावाद्वारे मा.स्थायी समितीने दिनांक १५.२.२०१० रोजी मंजूर केल्यानुसार) श्री.मो.शकील मो. शरीफ़ यांची रू.२४००/- प्रतिमाह प्रमाणेचा दर स्वीकारण्याची एकूणच प्रक्रिया संशयास्पद दिसून येते. कारण या प्रकरणात महानगरपालिकेचे एकुण प्रतिमाह रू.१८८५/- एवढे म्हणजेच एकूण ३० वर्षाचे ( १८८५× १२×३०) रू.६,७८,६००/- आणि अनामत रक्कम (१८८५×१२) रू. २२६२०/- एकूण रू.७,०१,२२०/- एवढे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. श्री.देविदास चित्ते यांना कबाडीपुरा येथील दुकान क्र.३ मंजूर करतांना मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांची मान्यता घेण्यात आली होती. परंतु श्री.मो.शकील मो.शरीफ़ यांना दुकान क्र.३ मंजूर करतांना मा.आयुक्त यांची मान्यता घेण्यात आलेली नाही. या प्रकरणात पुढील प्रमाणे कार्यवाहीची शिफ़ारस करण्यात येते.

१. सदरील कबाडीपुरा दुकान क्र..३ चा भाड्याने देण्याच्या व्यवहारात महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याने तो तातडीने रद्द करण्यात यावा.

२. या संदर्भात नविन (फ्रेश) निविदा तातडीने काढून जास्तीच्या दराची निविदा मान्य करून दुकान भाड्याने देण्यात यावे.

३. सदरील प्रकरणात मालमत्ता विभागाच्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांची भूमिका देखील (प्राथमिक दृष्ट्या ) योग्य दिसली नाही. त्या संदर्भात खुलासा घेवून त्यांचेवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

# मा.राज्य माहिती आयोगाने दिलेल्या निर्णयानुसार दिनांक २१.१०.१९९९ च्या कनिष्ठ लिपीक भरतीतील श्री.सदाशिव बाबर यांचे नेमणुकी बाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल

औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत दिनांक २२.१०.१९९९ रोजी श्री.सदाशिव बाबर यांना कनिष्ठ लिपीक या पदावर स्वातंत्र्य सैनिक संवर्गात नेमणूक देण्यात आली, त्यांच्या भरती प्रक्रियेचा प्राथमिक चौकशी अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१. औरंगाबाद महानगरपालिकेमार्फ़त मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये आयुक्त, मनपा औरंगाबाद यांचे आदेश जा. क्र./मनपा/आस्था-१/९९/२६८०, दिनांक १९.६.९९ अन्वये पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यासाठी निवड समिती सदस्य म्हणून पुढील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

   १. उपआयुक्त (प्रशासन)
   २. उपआयुक्त (महसूल)
   ३. मुख्य लेखापरीक्षक
   ४. मुख्य लेखाधिकारी

२. निवड समितीची बैठक दिनांक २४,२५ व २६.०६.१९९९ रोजी घेण्यात आली. तसेच जा.क्र./मनपा/आस्था-१/९८/१९३०, दिनांक ६.६.९९ अन्वये परिपत्रक काढण्यात येवून महानगरपालिका आस्थापनेवर सर्व दैनिक /ठराविक /कायम स्वरूपी वेतनावरील कर्मचाऱ्यांचे अर्ज मागविण्यात आले. तसे नोटीस बोर्डावर जाहीर करण्यात आले.

३. सेवायोजन कार्यालय, समाजकल्याण कार्यालय यांच्याकडे पात्र उमेदवारांची यादी मागणी पत्राने मागविण्यात आली.

| | |
|---|---|
| अ) सेवायोजन कार्यालयाकडून आलेल्या पात्र उमेदवारांची संख्या | –१४९ |
| ब) समाज कल्याण कार्यालयाकडून आलेल्या पात्र उमेदवारांची संख्या | – ६५ |
| क) आदिवासी विकास कार्यालयाकडून आलेल्या पात्र उमेदवारांची संख्या | - ०६ |
| ड) धरणग्रस्त | - ८२ |
| इ) स्वातंत्र्य सैनिक | - १६ |
| फ़) दैनिक वेतन परिपत्रकानुसार पात्र उमेदवारांची संख्या | - ९३ |
| ग) मनपा वर्ग-४ स्थायी कर्मचाऱ्यांतून पात्र उमेदवार संख्या | - २४ |
| घ) अपंग | - ०१ |

असे एकूण ४३६ उमेदवारांची यादी मनपा कनिष्ठ लिपीक या पदाच्या नेमणूकीसाठी प्राप्त झाली. त्यानुषंगाने पात्र उमेदवारांची यादी प्राप्त झाल्यानंतर ४१५ उमेदवार लेखी परिक्षेसाठी बोलावण्यात आले होते.

४. महानगरपालिकेअंतर्गत दिनांक ५.६.९९ रोजी लेखी परिक्षा घेण्याचे मा.आयुक्त यांच्या दिनांक २०.५.९९ च्या मान्यतेनंतर /आदेशानंतर ठरले. तसेच दिनांक १५.६.९९ रोजी तोंडी परिक्षा घेण्याची मंजूरी देण्यात आली. दिनांक १०.६.९९ रोजी टंकलेखन मराठी व इंग्रजी परीक्षा घेण्याच्या गठीत केलेल्या समितीच्या मान्यतेने ठरले.

५. पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यासाठी शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय येथे पर्यवेक्षक व सहाय्यक असे अधिकारी/ कर्मचाऱ्यांची नेमणूक करून परिक्षा घेण्यात आली.

६. पात्र उमेदवारांची टंकलेखन परिक्षेसाठी पर्यवेक्षक व सहाय्यक म्हणून २+२ असे चार अधिकाऱ्यांची शासकीय ज्ञान विज्ञान,महाविद्यालय, औरंगाबाद येथे नेमणूक करून परिक्षा घेण्यात आली.

७. कनिष्ठ लिपीक या पदाच्या लेखी परिक्षेस ४१५ उमेदवार हजर होते. व त्यांची परिक्षा घेण्यात आली.

८. टंकलेखन परिक्षेसाठी दोन पेपर सेटरची नेमणूक करण्यात आली व लेखीपरिक्षा घेण्यासाठी ३ पेपर सेटरची नेमणूक करण्यात आली.

परिक्षेच्या गुणांचा तपशिल पुढील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| लेखी परीक्षा | - | ५० गुण |
| टंकलेखन परिक्षा | - | ३० गुण |
| तोंडी परिक्षा | - | २० गुण |

९. कनिष्ठ लिपीक पात्र उमेदवारांच्या मौखिक मुलाखतीसाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी व आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी यांना बोलावण्यात आले होते.

१०. दिनांक २.६.१९९९ रोजी प्रादेशिक निवड मंडळाने लेखी परीक्षेचे प्रश्नपत्रिका ३ संच उपलब्ध करून देण्याची असमर्थता दर्शविल्यामुळे शिक्षणाधिकारी, सांस्कृतिक अधिकारी व प्रकल्प संचालक, महानगरपालिका औरंगाबाद यांचेवर जबाबदारी द्या अंतिम प्रश्नपत्रिका मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद हे स्वत: तयार करतील असे सांगितले.

११. दिनांक २४, २५ व २६ जून १९९९ रोजी निवड समितीच्या सदस्य, समाजकल्याण अधिकारी आणि आदिवासी विकास अधिकारी यांच्या उपस्थितीत मौखिक मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीसाठी ३०७ कनिष्ठ लिपीक उमेदवार बोलावण्यात आले.

१२. लेखी टंकलेखन इंग्रजी ४० श.प्र.मि. व मराठी ३० श.प्र.मि.परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर एकूण २२ उमेदवाराच्या नेमणूकीचे आदेश देण्यात आले.

१३. स्वातंत्र्य सैनिक / त्याचे नामनिर्देशित यांना शासकीय सेवेत वर्ग-३ आणि वर्ग-४ मधील पदांवर नोकरी देण्याबाबत वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र.सीएनएस-१०८७/४९९/ के.नं.१२/१६ अ दिनांक ४.३.१९९१ नुसार स्वातंत्र्य सैनिकांसाठी नोकरी विषयक असलेल्या सवलतीच्या अनुषंगाने तरतुदी नमुद केलेल्या आहेत.

स्वातंत्र्य सैनिकांना सदरील तरतुदीनुसार त्यांच्या पाल्यांच्या नोकरीसाठी नियुक्ती अधिकाऱ्याकडे परस्पर अर्ज करता येईल. त्यांना सेवायोजन केंद्र / प्रादेशिक दुय्यम निवड मंडळामार्फ़त घेण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

१४. श्री.सदाशिव अंकुशराव बाबर यांनी पुढील प्रमाणे मुलाखतीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर केली.

१) उमेदवाराच्या माहितीचे प्रपत्र त्याचा दिनांक ५.७.१९९९ व मुलाखत क्र.३०७ देण्यात आलेला दिसतो.
२) बी.ए.ची. पदवी.
३) बी.ए.ची. मार्कशीट
४) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र.
५) मराठी ३० श.प्र.मि. याचे प्रमाणपत्र.
६) इंग्रजी टाईपिंग प्रमाणपत्र. ४० श.प्र.मि.
७) स्वातंत्र्य सैनिकाचे शपथपत्र.

१५. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये दिनांक २२.१०.२००९ रोजी सदरील परीक्षा प्रक्रीयेतील एक उमेदवार श्री. सदाशिव अंकुशराव बाबर यांची कनिष्ठ लिपीक या पदासाठी स्वातंत्र्य सैनिक या संवर्गात प्रशासनातर्फ़े नेमणूक देण्यात आली.

**माहितीचा अधिकार २००५ अन्वये भरती प्रकरणी माहितीची मागणी**

माहितीचा अधिकार २००५ अन्वये श्री.सदाशिव शंकरराव बाबर यांच्या भरती प्रकरणाबाबत श्री.वसंत पंडीतराव देशमुख यांनी प्रथम दिनांक ११.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केला व त्यानुषंगाने त्यांनी पुढील मुद्यांद्वारे भरती बाबत माहितीची मागणी केली होती.

१. श्री.सदाशिव अंकुशराव बाबर यांनी नोकरीसाठी दिलेला अर्ज त्यासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे.

२. जागा भरण्याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दिलेल्या जाहिरातीची झेरॉक्स प्रत.

३. महानगरपालिकेने दिलेल्या मुलाखत पत्राची झेरॉक्स.

४. श्री.बाबर यांना दिलेल्या नेमणूकीच्या आदेशाची सत्यप्रत.

५. स्वातंत्र्यसैनिक संवर्गातील निवड झाल्यानंतर आदेशाची छायांकित प्रत (माहिती अधिकाराच्या पत्रात सदरची माहिती नंतर समाविष्ट करण्यात आली)

तसेच अपिलार्थीने केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पुरविली तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतूदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (महसूल) यांच्याकडे दिनांक १८.८.२००७ रोजी प्रथम अपिल केले. या अपिल अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१.८.२००७ रोजी आपले आदेश पारित करून अपिलार्थीचे अपिल निकाली काढले व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३ आठवड्याच्या आत माहिती उपलब्ध करून देण्याचे आदेशित केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त-१, महानगरपालिका औरंगाबाद यांनी त्यांच्या दिनांक २३.७.२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांचा मूळ अर्जातील मुद्या क्र.३ संदर्भात या पत्रासोबत मुलाखतीची छायाप्रत जोडली आहे असे नमुद केले आहे. परंतु हे मुलाखतीसाठी महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेले नसून मुलाखतीसाठी आवश्यक असलेल्या उमेदवारांची माहिती नोंदविल्याचे प्रपत्र (Bio data) असल्याचे दिसून आले.

## मा.राज्य माहिती आयुक्त खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेश :

मा.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक २.१.२००९ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार उपआयुक्त (महसूल) यांचे पत्र क्र.मनपा/आस्था-१/२००९/१३६१, दिनांक १८.८.२००९ अन्वये दिनांक २१.१०.१९९९ च्या कनिष्ठ लिपीक भरतीची चौकशी करणेबाबत कळविले आहे.

दिनांक २१.१०.१९९९ च्या कनिष्ठ लिपीक पदासाठी स्वातंत्र्य सैनिक प्रवर्गातील परिक्षेस बसलेल्या पात्र उमेदवारांची यादी आस्थापना-१, विभागाकडे या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र./मनपा/मुलेप/२०१०/३०१, दिनांक २४.९.२०१० अन्वये मागविली असतांना ती संबंधित विभागाने अद्यापपावेतो चौकशीकामी लेखापरीक्षण विभागाकडे उपलब्ध करून दिलेली नाही.

## चौकशीचा निष्कर्ष / अभिप्राय :

श्री.सदाशिव बाबर, हे स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे शासन परिपत्रक क्र.सीएनएस-१०८७/४९९/के.नं.१२/१६-अ, दिनांक ४.३.१९९१ नुसार स्वातंत्र्य सैनिकांसाठी नोकरी विषयक असलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने पात्र होते. तसेच श्री.सदाशिव बाबर हे दिनांक २१.१०.१९९९ रोजीच्या संपूर्ण भरती प्रक्रियेमध्ये अ.क्र. ३०७ वर उपस्थित असल्याचे दिसून येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका,अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये गठीत झालेल्या निवड समितीच्या उपरोक्त कनिष्ठ लिपीक संवर्गातील केलेली भरती प्रक्रिया योग्य वाटते.

# नाथ सुपर मार्केट येथील व्यापारी संकुलातील दुकान क्र.७ व ८ भाडेतत्वावर देणेबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना सेवा-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून शहरातील मध्यवस्ती असलेल्या औरंगपुरा येथील नाल्यावर महानगरपालिकेने इमारत उभारणी करून नाथ सुपर मार्केट नावाने विविध दुकाने व कार्यालये तयार केली होती. महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून त्याचप्रमाणे नागरिकांना सुविधा उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून नाथ सुपर मार्केट येथील दुकाने भाड्याने देणे बाबत मालमत्ता विभागाने जाहिरात प्रसिध्द करून दुकान भाड्याची निविदा जा.क्र.मनपा/मा.म.अ./१४६४/९०, दिनांक २५.६.१९९० अन्वये मागविण्यात आल्या होत्या. नाथ सुपर मार्केट येथील दुकान क्र.७ साठी श्री.विलास नारायणराव बासटवार यांनी दुकानासाठीचे मासिक भाडे रू.१८०/- रू. प्रति चौ.मिटर प्रमाणे निविदा भरली होती. तर दुकान क्र.८ साठी श्री.राजेश्वरराव नारायणराव बासटवार यांनी मासिक भाडे रू.१८०/- प्रति चौ.मिटर प्रमाणे निविदा भरली होती.मालमत्ता विभागाने श्री.विलास नारायणराव बासटवार व श्री.राजेश्वरराव नारायणराव बासटवार यांना अनुक्रमे दुकान क्र.७ व ८ भाड्याने देण्यासाठी त्यांनी दाखल केलेली निविदा स्विकृत केली आणि वार्षिक आगाऊ भाडे , सर्व्हिस चार्जेसची वार्षिक आगाऊ रक्कम भरणा करण्याबाबत आणि करारनामा महापालिकेच्या हक्कात करणे संदर्भाने कार्यालयातर्फे पत्र देण्यात आले होते.

महानगरपालिकेच्या मालकीचे नाथ सुपर मार्केट येथील दुकान क्र.७ हे विलास नारायणराव बासटवार तर दुकान क्र.८ हे राजेश्वरराव नारायणराव बासटवार यांना ३० वर्षाच्या भाडेकरारावर देण्यात आलेले होते. औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाने जा.क्र.मनपा/मालमत्ता/१५०६/१९९६, दिनांक २७.१२.१९९६ अन्वये संबंधित दुकान क्र.८ चे नामांतर श्री.विलास नारायण बासटवार यांचे नांवे केलेले आहे.

या प्रकरणांत भाडेकरूंनी दुकान क्र.७ व ८ नाथ सुपर मार्केट ,औरंगपुरा येथील दुकानात फ़ेरफ़ार केल्याचे तक्रार मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांचेकडे प्राप्त झाल्यामुळे मा.आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार प्रकरण चौकशीसाठी लेखापरीक्षण विभागाकडे प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त दोन्ही दुकाने भाडेतत्वावर दिनांक १८.८.१९९० पासून देण्यात आलेली असून संबंधित दुकानांचा नोंदणीकृत भाडेपट्टा करारनामा दिनांक ३०.१२.२००९ रोजी श्री.विलास बासटवार यांनी महानगरपालिकेसोबत करून दिलेला आहे. भाडेकरार करतांना २९ वर्षे मुदतीचा भाडेकरार असून सदरील करार दिनांक ३०.१२.२००९ पासून पुढील २९ वर्षासाठी केल्याचे निदर्शनास येते.

प्रकरणांत भाडेकरूने औरंगाबाद महानगरपालिकेसोबत केलेल्या भाडेकराराच्या अटी-शर्ती पैकी करारनाम्यातील अट क्र.(६) चे उल्लंघन केल्याचे संचिकेत अहवाल प्राप्त आहेत. करारनाम्यातील अट क्र.६ चा स्पष्ट उल्लेख पुढील प्रमाणे -

दुकानांत फ़ेरबदल करण्याचा मला अधिकार राहणार नाही. दुकानाचे स्वरूपात बदल व उपयक्तेस बाधा येईल, असे बांधकाम मला करता येणार नाही. महानगरपालिकेच्या लेखी परवानगीने किरकोळ दुरूस्ती व रंगरंगोटी मी स्वखर्चाने करून देईल.

सदरील अटीचा संबंधिताने भंग केलेला आहे किंवा नाही याबाबत सहा.संचालक नगररचना यांचेकडून प्राप्त अहवाल पत्र क्र. जा.क्र.मनपा/स.स.न.र./२०१०/१८३५, दिनांक ९.९.२०१० अन्वये नाथ सुपर मार्केट येथील दुकान क्र.७ व ८ मध्ये पुढील प्रमाणे फ़ेरबदल झाल्याचे नमूद केलेले आहे.

१. दुकान क्र.७ व ८ येथे विशाल ऑप्टीकल्स नावाचे चष्म्याचे दुकान आहे.

२. दोन दुकानांना विभक्त करणारी भिंत काढून दोन्ही दुकान एकत्र करण्यात आल्याचे आढळून आले.

३. अंतर्गत सजावटीचे काम करण्यात आले असून ज्या मध्ये छताचे, भिंतीचे सौंदर्यीकरण करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

४. परवानगी बाबत चौकशी केली असता कुठलेही कागदपत्र दाखविण्यात आलेंले नाही. या प्रकरणी मालमत्ता विभागाने अशी दुरूस्ती परवानगी अनुज्ञेय केली होती काय ? याची शहानिशा होणे योग्य वाटते.

याबाबत मालमत्ता विभागाला विचारणा केली असता त्यांनी पत्र क्र.मनपा/मा.म.अ./२०५६/२०१०, दिनांक २१.९.२०१० अन्वये कळविले आहे की, संबंधित भाडेकरूस दुकानाच्या इमारतीत फ़ेरबदल करण्याची परवानगी या कार्यालयाकडून देण्यात आलेली नाही.

दुकान क्र.७ व ८ नाथ सुपर मार्केट औरंगपुरा याबाबत अवैधरित्या बांधकाम केल्या जात असल्याबाबतचे व महानगरपालिकेच्या इमारतीचे नुकसान होत असल्याबाबतची तक्रार श्री.मो.युनुस खान यांनी महानगरपालिकेकडे दिनांक ८.२.२०१० रोजी तसेच दिनांक १९.३.२०१०, दिनांक २६.३.२०१० ,व दिनांक ४.५.२०१० या तारखांना केलेली आहे. प्रकरणांत कक्ष प्रमुख ,तांत्रिक कक्ष यांनी अहवाल दिला आहे की, दुकान क्र.७ व ८ याचा वापर विनापरवानगी करून १९ वर्षानंतर (Defacto ) करारनामा केलेला आहे. भोगवटाधारकाने दस्ताऐवज सादर करण्यास असमर्थता दर्शवून टाळाटाळ केलेली आहे. तसेच दुकानात विनापरवानगी फ़ेरबदल केल्यामुळे करारनाम्याचा भंग झालेला आहे. याबाबत दुकान evict करण्यास भोगवटा धारकास नोटीस देण्याबाबत अहवाल दिलेला आहे.

मालमत्ता अधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद यांना सदरील दुकानाच्या चौकशीकामी २ स्मरणपत्रे देवून सुध्दा संबंधित दुकानाबाबत दिनांक १८.८.१९९० ते आजपावेतो मासिक भाडे व सेवाशुल्काचे विवरण तसेच करारनाम्यातील अट क्र.४ अन्वये दर पाच वर्षांनी सुधारित भाडे आकारले असल्यास त्याबाबतचा तपशिल मागितला असता माहिती लेखापरीक्षण विभागास पुरविण्यात आलेली नाही.

## भाडेकरूशी नव्याने केलेला भाडेपट्टा करारनामा :

औरंगाबाद महानगरपालिकेने जा.क्र./मनपा/मा.म.अ./२४७६/२००९, दिनांक २३.१२.२००९ अन्वये श्री.विलास नारायणराव बासटवार यांना दुकान क्र.८ बाबत दिलेली नोटीस पुढील प्रमाणे -

## नोटीस :

ज्या अर्थी, आपणास महानगरपालिकेच्या मालकीचे मो.औरंगपुरा येथील नाथ सुपर मार्केट व्यापारी संकुलातील दुकान क्र.८ जिचे क्षेत्रफ़ळ २२.१८ चौ.मी. भाडेपट्टयाने दिलेले आहे. सदरील दुकानात आपणास दिनांक १.९.१९९० रोजी ताब्यात दिल्याचे कार्यालयीन संचिकेवरून निदर्शनास येते. परंतु सदरील दुकानाबाबत आपण अद्यापपर्यंत १९ वर्ष होवून गेले असतांना भाडेपट्टा करारनामा केलेला नाही ही बाब प्रचलित अटी शर्तीचा भंग करणारी आहे.

त्याअर्थी आपण सदरील दुकानाचा वापर दिलेल्या क्षेत्रफ़ळानुसारच करणे बंधनकारक होते. परंतु आपण दुकान क्र.७ व ८ मधील भिंत पाडून दुकानाच्या क्षेत्रफ़ळात या कार्यालयाची कुठलीही लेखी परवानगी न घेता अनधिकृतपणे बदल केल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यामुळे आपणास सदरील दुकानातून निष्काशीत का करण्यात येवू नये. याबाबत आपला स्पष्ट लेखी खुलासा तीन दिवसांत या कार्यालयात सादर करावा व भाडेपट्टा करारनामा करून द्यावा. नसता आपले काही म्हणणे नाही असे गृहीत धरून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१ (ब) (१)(अ) (तीन) (चार) अन्वये कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## करारनाम्यातील अटी व शर्ती :

उपरोक्त प्रमाणे संबंधिताना नोटीस बजावल्यानंतर तब्बल १९ वर्षांनी संबंधित भाडेकरूंनी महानगरपालिकेसोबत भाडेपट्टा करारनामा महापालिकेच्या हक्कात करून दिलेला आहे. या मध्ये प्रामुख्याने अटी-शर्ती या पुढील प्रमाणे आहेत –

१. दुकानाच्या क्षेत्रफ़ळाप्रमाणे प्रतिमाह रू.१८०/- प्रति चौ.मी. दराने दुकानाचे भाडे आहे.

२. दुकान भाडे प्रत्येक वर्षी वर्षाच्या सुरूवातीला महानगरपालिका कार्यालयात भरणा करण्याचे बंधनकारक आहे. नसता अनामत जप्त करून दुकान रिकामे करून घेण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील.

३. दुकानाची अनामत रक्कम प्रति चौ.मी.रू.२०००/- दराने देण्याचे ठरले. तसेच सदरची अनामत रक्कम दुकान भाडेकरूकडे किंवा भाडेकरूच्या वारसाकडे जोपर्यंत भाड्याने राहील तोपर्यंत अनामत रक्कम विनाव्याजी जमा राहील.

४. दर पाच वर्षांनी सुधारित भाडे आकारण्याचा तसेच नियम व अटी सुधारित करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील व तो भाडेकरूस बंधनकारक राहील.

५. दुकानाचा वापर जड वस्तु ठेवण्यासाठी व गोदाम म्हणून करण्याचा भाडेकरूस अधिकार राहणार नाही. शॉपिंग सेंटर इमारतीमधील इतर भाडेकरूंना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही असा व्यवसाय करण्याचे बंधन राहील. दारूचे दुकान , मटन दुकान, चक्की, छापखाना, स्फ़ोटक वस्तुंचे दुकान / गोदाम व हॉटेल व्यवसाय हे व अशा प्रकारचे इतरांना उपसर्ग पोहचविणारे व्यवसाय करण्याचा अधिकार भाडेकरूंना राहणार नाही.

६. दुकानात फ़ेरबदल करण्याचा अधिकार भाडेकरूंना राहणार नाही. दुकानाचे स्वरूपात बदल व उपयुक्तेस बाधा येईल असे बांधकाम भाडेकरूला करता येणार नाही. महानगरपालिकेच्या लेखी परवानगीने किरकोळ दुरूस्ती व रंगरंगोटी भाडेकरू स्वखर्चाने करेल.

७. राजकीय , सामाजिक किंवा कार्यालयासाठी दुकानाचा वापर करणार नाही.

८. दुकान तारण ठेवण्याचा किंवा त्यावर आर्थिक बोजा करण्याचा अधिकार भाडेकरूला राहणार नाही. दुकान तारण ठेवल्याचे किंवा त्यावर आर्थिक बोजा केल्याचे मनपाच्या निदर्शनास आल्यास भाडेकरूची अनामत रक्कम जप्त करून दुकान रिकामे करून घेवून दुसऱ्यास भाड्याने देण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

९. दुकान किंवा दुकानाचा हिस्सा परस्पर हस्तांतर करून देण्याचा पोटभाडेकरू ठेवण्याचा अधिकार भाडेकरूला राहणार नाही. असा व्यवहार केल्यास भाडेकरूची अनामत रक्कम जप्त करून दुकान ताब्यात घेण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील.

१०. मालमत्ता कर (सर्वसामान्य कर ) वगळता इतर कर नियमाप्रमाणे भाडेकरू भरणा करेल तसेच लिफ़्टमन, वॉचमन, स्विपर इत्यादीचे खर्चापोटी दरमहा रू.५/- प्रति.चौ.मी.दराने सेवाशुल्क भाड्या व्यतिरिक्त आकारण्यात येईल.

११. दुकानाचे विद्युत वायरिंगचे काम भाडेकरू स्वखर्चाने करून घेईल. विद्युत शुल्काचा भरणा करण्याची जबाबदारी भाडेकरूची राहील. निविदेमध्ये नमूद केलेले व्यवसाय करणेच भाडेकरूस बंधनकारक राहील.

१२. भाडेपट्टयाची मुदत ११ महिन्याची आहे. भाडेपट्टयाचे नुतनीकरण करून घेण्याची जबाबदारी भाडेकरूची राहील. भाडेपट्टयाच्या अभावी अनामत रक्कम जमा करून दुकान रिकामी करून देण्याचा महानगरपालिकेस अधिकार राहील. भाडेपट्टयाचे नुतनीकरण करून देणेबाबत महानगरपालिकेचा अधिकार अंतिम राहील.

१३. निविदेच्या इतर अटी व शर्ती भाडेकरूस बंधनकारक राहतील.

वरील प्रमाणे अटी –शर्ती प्रमाणे करारनामा भाडेकरू सोबत करतांना मालमत्ता अधिकारी यांनी उपायुक्त (महसूल) यांच्या वतीने करारनामा केलेला आहे. परंतु उपायुक्त (महसूल) यांची करारनामा करून देण्यासाठी मान्यता घेतलेली नाही. त्याचप्रमाणे संबंधित भाडेकरूस दुकान १८.८.१९९० रोजी भाडेतत्वावर देण्यात आलेले आहे. त्यावेळी ठरलेल्या भाड्यानुसारच १९ वर्षानंतर करारनामा केलेला आहे.

**निष्कर्ष व अभिप्राय :**

१. भाडेकरू सोबत करारनामा करतांना मालमत्ता अधिकारी श्री.पी.जी.जाधव यांनी उपायुक्त (महसूल) यांचे तर्फे करारनाम्यावर स्वाक्षरी केलेली आहे. परंतु त्यांनी उपायुक्त (महसूल),यांची मान्यता घेतल्याबाबत संचिकेत कुठेही नोंदी नाही. त्याचप्रमाणे संबंधित भाडेकरूला १८.८.१९९० रोजी दुकानाचा ताबा दिल्यानंतर १९ वर्षानंतर करारनामा करतांना यापुढे २९ वर्ष मुदत देवून महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे प्रकरणांत संबंधित तत्कालीन मालमत्ता अधिकारी प्रथमत: दोषी असल्याबाबत दिसून येते.

२. मालमत्ता अधिकारी यांना दोन (२) स्मरणपत्र देवून सुध्दा संबंधित विभागाने दुकान क्र.७ व ८ नाथ सुपर मार्केट यांचेकडून १८.८.१९९० ते आजपावेतो भरणा केलेले मासिक भाडे व सेवाशुल्काचे विवरण त्याचप्रमाणे करारनाम्यातील अट क्र.४ अन्वये दर पाच वर्षांनी सुधारित भाडे केले असल्यास त्याचा तपशिल इत्यादी माहिती देण्यास असमर्थता दर्शविली आहे.

३. चौकशी मध्ये असे निदर्शनास आले की, भाडेकरूने भाडेपट्टा करारनाम्यातील अट क्र.६ चा भंग केलेला आहे. ज्यामुळे महानगरपालिकेच्या इमारतीचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे संबंधिता सोबत झालेला करार रद्द करून दुकानाचा ताबा तात्काळ महापालिकेने घेणे आवश्यक वाटते. तसेच महानगरपालिकेच्या झालेल्या नुकसानीबाबत तांत्रिक विभागाकडून पाहणी करून संबंधिताकडून नुकसान भरपाईची मागणी करणे योग्य.

४. दुकान क्र.७ व ८ नाथ सुपर मार्केट येथील दुकानाचा ताबा घेण्याची नोटीस देण्यापूर्वी महानगरपालिकेतर्फे न्यायालयात कॅव्हेट दाखल करणे आवश्यक वाटते. जेणेकरून संबंधित भाडेकरू न्यायालयात धाव घेवून महापालिकेच्या विरूध्द मनाई हुकुम आणणार नाहीत.

# जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाच्या चौकशी बाबत प्राथमिक अहवाल

औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे शहरातील घन कचरा व जैविक कचरा हा वेगवेगळा ठेवून त्याची विल्हेवाट करण्यांत आल्यास शहरातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब हितावह आहे. भारत सरकारच्या पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व भारतसरकार वन मंत्रालय अधिसूचना १९९८ व सुधारणा २००० ह्या कायदा द्वारे कचरा व्यवस्थापना विषयी नियम आखून दिले आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे ह्यांत जैविक कचरा घनकच-यापासून वेगळा केला आहे. या दृष्टीकोनातून औरंगाबाद महानगरपालिकेने शहरामध्ये जैविक कचरा गोळा करण्याचे काम सुरवातीस महापालिकेच्या कर्मचा-यांकडून केले जात होते. परंतू आरोग्य विभागाकडे कर्मचारी वर्ग अपूरा असल्यामुळे व प्रभावीरित्या प्रकल्प राबविण्यांसाठी सदरील जैविक कचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे हे काम खाजगी एजन्सीमार्फत करण्यांचा मनोदय समोर आला. त्यानंतर मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने तसेच शासनाने ठरवून दिलेल्या शुल्कानुसार शहरातील हॉस्पीटल्सकडून शुल्क व कचरा जमा करण्यांचे कामासाठी खाजगी एजन्सी मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

सदरील प्रकल्पाबाबत मा.सभापती स्थायी समिती यांनी चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत जा.क्र.मनपा/सभापती/२०१०/१८१/ दिनांक २८/०९/२०१० रोजी लेखा परीक्षण विभागास पत्र देण्यांत आले आहे.

**<u>जैविक कचरा प्रकल्प व कच-याची विल्हेवाट :</u>**

जैविक कचरा म्हणजे जो पेशंटच्या डायग्नॉस्टिक ट्रिटमेंट, लसीकरण व बायोलॉजीकल रिसर्च ॲक्टीव्हीटीच्या माध्यमातून गोळा होतो ह्याला जैविक कचरा असे म्हणतात.

ह्या जैविक कच-यामध्ये AIDS, Hepatitis B, Jaundis Tuberculosis असे भयंकर आजार पसरवणारे जंतु असल्याने हा कचरा घनकच-यासोबत जर मिसळला तर संपूर्ण कचराच संसर्गजन्य (इनफक्टेड) बनतो त्यामुळे रोगराईचा प्रसार अतिशय वेगाने होऊ शकतो त्यामुळे हा १५% जैविक कचरा वेगळा करून त्यांचे निर्जंतुंकीकरण करून त्याला ८००. डिग्री सेल्सीयस ते १०००. डिग्री सेल्सीयस तापमानात जाळून सर्व जंतु मारले जातात व अशी निर्जतुक राख लॅन्ड फिलींगला पाठविली जाते जेणेकरून पर्यावरणातील इतर घटक जसे जमीन, पाणी याचेही प्रदुषण होणार नाही.

या कायद्या अंतर्गतच जैविक कचरा विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिकेने पुढाकार घेवून शहरातील सर्व हॉस्पिटल, क्लिनिक, डायग्नोस्टीक सेंटर, जनावरांचे दवाखाने या सर्वांचा जैविक कचरा विल्हेवाटीसाठी “ कॉमन डिस्पोजेबल फॅसिलीटी ” उपलब्ध करून देण्याचे ठरविले.

महानगरपालिकेची आर्थिक स्थिती तसा प्रकल्प उभा करून तो चालविणे शक्य नव्हते त्यामुळे महानगरपालिकेने BOLT तत्वावर हा प्रकल्प नोव्हेंबर २००३ पासून औरंगाबाद शहरात कार्यान्वीत केला.

शहरातील सर्व वैद्यकीय संघटना म्हणजेच.

१) इंडियन मेडिकल असोसिएशन IMA

२) इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन IMA

३) होमीओपॅथ मेडिकल असोसिएशन IMA

४) पॅथॅलॉजी मेडिकल असोसिएशन IMA

५) Govt Medical College of Hospital

६) एम.जी.एम.मेडीकल कॉलेज व हॉस्पिटल

७) डेंटल मेडिकल असोसिएशन

ह्या सर्व संघटनांशी चर्चा करून महानगरपालिकेचा उद्येश त्यांच्यापर्यंत पोहचवून त्या सर्वांना आपण जैविक कचरा प्रकल्पाचे सभासद करून घेतले त्यानंतर त्यांच्याशी सेवाशुल्क किती असावे या विषयी चर्चा केली शेवटी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार सेवाशुल्क ठरविले पण तरी ब-याच डॉक्टरांना हे सेवाशुल्क मान्य नव्हते परंतू २००७ पासून सेवाशुल्क कमी करून देण्यात आले. २००४ ते २००७ ह्या काळात सेवाशुल्काची वसुली ही मनपामार्फत केली जात होती. पण मनपाकडे कर्मचारी वर्ग आरोग्य विभागात नसल्याने ती वसुली ठेकेदाराकडे देण्यात आली.

## जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाच्या ठळक बाबी.

- पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ आणि भारत सरकार पर्यावरण, वन मंत्रालय यांची अधिसुचना दि.२०/१/१९९८ व सुधारणा दि.२/६/२००० कायदा अंतर्गत बायो मेडीकल वेस्ट प्रकल्प दि.०१ नोव्हेंबर २००३ पासून कार्यान्वीत झाला आहे.
- सदरील जाहिरातीच्या प्रतिसादात आलेल्या निविदांमध्ये मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांना सदरील प्रकल्पाचे काम करण्यास संबंधित ठेकेदारास (BOLT) Build operate lease transfer या पध्दतीवर देण्यात आले हा प्रकल्प गेवराई तांडा पाटोदा शिवार येथे सुरू करण्यात आला.
- औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत येणा-या सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी स्वंयसेवी धर्मदाय संस्था अथवा ज्या व्यक्ती जैविक कचरा निर्माण करतात अशा संस्थांना बायो मेडीकल वेस्टचे सदस्य करण्यांत येत आहे .
- दिनांक ३०/०८/२०१० पर्यंत मनपा जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाचे एकूण ७६८ सदस्य झाले आहे.
- सभासद फी रू.५००/- ठेवण्यात आलेली आहे व अर्ज फीस रू.१०/- आहे. अशी एकूण बायो-मेडीकल वेस्टच्या सभासदांकडून रू.५१०/- वसूल करण्यात येते.
- आजपर्यंत या प्रकल्पामध्ये एकूण ७६८ वैद्यकीय व्यावसायीकांनी प्रकल्पाचे सभासदत्व स्विकारले असून त्यापोटी ३,९१,६८०/- रूपये मनपा फंडात जमा आहे.

- संबंधीत ठेकेदार हे दररोज त्यांच्याकडे असलेल्या ०५ वाहनाद्वारे जैविक कचरा निर्माण करणा-या संस्थाकडून दररोज जैविक कचरा गोळा करतात.
- पाटोदा शिवार गेवराई तांडा येथे उभारलेल्या प्रकल्पात नेऊन त्या कच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जाते.
- सर्व वैद्यकीय व्यवसायीकांना सेवा शुल्काचे दराबाबत मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.१२.२००१ मध्ये प्रस्ताव ठेवण्यात आला व त्या दरास मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी दिली.
- महानगरपालिकेने ठरविलेले दर काही वैद्यकीय व्यावसायिक संघटनांना मंजूर नसल्याने महानगरपालिकेने सल्लागार समितीची मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्या दालनामध्ये बैठक दिनांक १०.०३.२००५ रोजी घेण्यांत आली व दि.१६.०८.२००५ रोजी मा.आयुक्त यांच्या दालनांत सर्व संघटनेचे पदाधिकारी व ठेकेदार यांच्यात झालेल्या चर्चेनुसार नविन सुधारित दर मा.सर्वसाधारण सभेमध्ये प्रशासकीय ठराव क्रमांक ६७/८ दि.७.१०.२००५ रोजी ठेवण्यात आला.
- नोव्हेंबर २००३ प्रकल्प सुरू झाल्यापासून सेवा शुल्काची वसूली महानगरपालिका करीत होती. त्यानंतर जुलै २००७ पासून सेवा शुल्काची वसुली ठेकेदार मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स करीत आहेत व वसूल रकमेच्या २२% करारनाम्यातील अटीनुसार रॉयल्टी मनपा फंडात दर महिन्याला जमा करणे बाबत सूचना देण्यात आल्या.
- संबंधित ठेकेदारास जा.क्र.मनपा/आरोग्य/८८९/दिनांक ०४/१०/२०१०, रोजी पत्र देवून सभासदांकडून जमा झालेले सेवा शुल्क कोणत्या बँकेत जमा करतात त्या बँकेचे नांव व बँकेच्या खात्याचा गोषवारा देण्याबाबत पत्र दिले असता संबंधीत ठेकेदाराने दिलेली माहिती अपूर्ण स्वरूपात कार्यालयास दाखल केली आहे.
- सदरील प्रकल्प उभारणी साठी लागणारा सर्व खर्च हा कराराप्रमाणे ठेकेदाराने करावयाचा होता. महानगरपालिकेचा काहीही खर्च यामध्ये झालेला नाही.

## मनपा आरोग्य विभागाच्या जैविक कचरा प्रकल्पाच्या अडचणी

सध्या शहराचा विस्तार खूप झालेला आहे. शहरातील हॉस्पीटलची संख्याही वाढली आहे. जैविक कचरा प्रकल्पाचे ७८६ हॉस्पीटल, Clinic सदस्यआहेत. सध्या या कामाचा विस्तार लक्षात घेता प्रकल्पाचे सुपरव्हीजन करण्यास कर्मचारी वर्गाची अत्यंत कमतरता आहे. फक्त १ मेडिकल ऑफिसर व एक क्लर्क (६ महिन्यांपासून Election Duty साठी गेलेले आहेत.) एवढाच स्टाफ आहे. त्यामुळे ठेकेदार प्रत्यक्ष दरमहिन्यास किती सेवाशुल्क गोळा करतो ? काही डॉक्टर सेवाशुल्क देत नाहीत ते का देत नाहीत त्यांना सेवा मिळते का ? हे सर्व डॉक्टरांच्यापर्यंत प्रत्यक्ष पोहचविल्याशिवाय होणार नाही त्यासाठी कर्मचारी वर्ग प्रत्येक वॉर्डनिहाय व वाहनव्यवस्था असणे गरजेचे आहे.

तसेच ऑफिसमध्ये सभासदनिहाय सर्व रेकॉर्ड अद्यावत करण्यासाठी जसे सभासदांकडील मासिक शुल्क मागणी, सभासदांनी जमा केलेली रक्कम याबाबतचा सर्व गोषवारा अद्यावत असणे गरजेचे आहे. यासाठी एक कॉम्प्युटर ,कॉम्प्युटर ऑपरेटर असणे गरजेचे आहे.

आजपर्यंत प्रत्येक महिन्यास मिळणा-या रॉयल्टी पोटी मनपा फंडात ३९,२२,५१५/- जमा केले आहेत. तसेच आजीवन सभासदांच्या पोटी ३,९१,६८०/- रूपये मनपा फंडात जमा केले आहेत. महानगरपालिकेचा एकही रूपया खर्च न करता जैविक कचरा प्रकल्पाने मनपास एकूण ४३,१४,१९५ /- रूपये मिळवून दिले आहेत.

| वर्ष | सभासदाची एकूण संख्या | मनपा नोंदीनुसार देयक | एकूण झालेली वसूली | ठेकेदारास अदा रक्कम | मनपास मिळालेली २१% रॉयल्टी |
|---|---|---|---|---|---|
| १.११.०३ ते ०४ | १०३ | ५४६३१८ | निरंक | निरंक | निरंक |
| २००४-२००५ | ३८० | ३५५११०८ | १२३८२६४ | ९७८२२८ | २६००३५ |
| २००५-२००६ | ४७८ | ४५९१२५७ | २९९४४३३ | २३६५६०२ | ६२८८३१ |
| २००६-२००७ | ५६० | ५१६४४८९ | ४०००२३७ | ३१६०२११ | ८४००५६ |
| २००७-२००८ | ६६६ | ४२२०९९३ | २४३०३७३ | ०० | ५१०३७८ |
| २००८-२००९ | ६८७ | ४५६८४५३ | २५३१३२३ | ०० | ५३६९९७ |
| २००९-२०१० | ७६८ | ४९९८४६१ | ३४१६७०४ | ०० | ७५१६७३ |
| एप्रिल २०१० ते ऑगस्ट २०१० | ०० | ०० | ०० | ०० | ३९४५५५ |
| | **एकूण** | **२७६४१०७९** | **१६६११३३४** | **६५०४०४१** | **३९२२५२५** |

जुलै २००७ पासून मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस (संबंधीत ठेकेदार ) यांना देण्यता आलेली आहे.

वरील तक्त्यामध्ये दाखविल्यानुसार सभासदांकडून वार्षिक मागणी एकूण झालेली वसुली व मनपास मिळालेली रॉयल्टी यांची सदस्यनिहाय माहिती आरोग्य विभागात उपलब्ध आहे. एकूण मागणी रजिस्टर प्रत्येक वर्षाचे ०५ एकूण ३० रजिस्टरमध्ये माहिती उपलब्ध आहे. आपण माहिती मागविल्यास आपणांस माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

## <u>निष्कर्ष व अभिप्राय :</u>

१. जैविक कचरा विल्हेवाट प्रकल्पाबाबत माहिती घेतली असतांना असे निदर्शनास आले आहे की, २,७६,४१,०७९/- रकमेपैकी १,६६,११,३३४/- इतकी रक्कम वसूल झालेली आहे. उर्वरीत रक्कम रूपये १,१०,२९,७४५/- इतकी रक्कम वसूल होणे बाकी आहे. सदरील माहिती ही दिनांक १.११.२००३ ते ३१.३.२०१० पर्यंतची आहे.

२. कमी वसूली झाल्याची कारणे शोधून संबंधित हॉस्पीटल्स कडून वसूली करणे ही आरोग्य विभागाचे काम आहे.

३. जुलै २००७ पासून मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस या एजन्सीने कमी वसूली करून रॉयल्टी कमी भरल्याचे निदर्शनास आले. जेव्हा की संबंधित एजन्सी सोबत झालेल्या करारनाम्याप्रमाणे एजन्सीची हॉस्पीटलकडून वसूली करण्यांची जबाबदारी असून सुध्दा एजन्सीने वसूली केलेली नाही. यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

याबाबत आरोग्य विभागाने एजन्सीकडे व हॉस्पीटलकडे पाठपुरावा करून रक्कम वसूली बाबत तातडीने पावले उचलावी.

४. एजन्सीने दवाखाने बंद असल्याचे नमूद करून एकूण वसूलीमध्ये बंद दवाखान्याची वसूली कमी दाखवून त्यानुसार वसूली केलेली आहे. परंतू बंद दवाखान्याचा कोणताही अहवाल संचिकेत उपलब्ध नाही.

५. मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स यांच्या सोबत झालेल्या करारनाम्याच्या अटी शर्तीचे संबंधिताकडून पालन होते किंवा नाही याबाबत आरोग्य विभागाकडून वेळोवेळी पाहणी होत नसल्याचे दिसून येते. यापुढे संबंधित एजन्सीतर्फे होत असलेल्या कामाचा पाठपुरावा घेण्याकरीता आरोग्य विभागाने दक्षता घ्यावी.

# सीटीएस क्र.१६२९६ शहानूरवाडी औरंगाबाद या भूखंडाच्या बेकायदेशीर बांधकाम परवानगीबाबत चौकशी अहवाल.

सी.टी.एस.क्र.१६२९६ शहानूरवाडी येथील म्हाडाच्या संपादीत भूखंडावर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी बेकायदेशीर असल्याची तक्रार स.सदस्य श्री.हुशारसिंग चौहान,सभापती, शहर विकास समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी केलेली आहे. त्यानुषंगाने मा.आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे पत्र क्र.मनपा/म.आ./स्वीस/२०१०/५२६,दि.१ .१० . २०१० अन्वये चौकशी करून अहवाल सादर करणे बाबत कळविलेले आहे.

**<u>औरंगाबाद गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ यांचा पत्रव्यवहार –</u>**

प्रकरणांत नगररचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद यांचेकडून त्यांनी नगर भूमापन क्र.१६२९६ ,शहानूरवाडी ,औरंगाबाद या भूखंडावर देण्यात आलेल्या बांधकाम परवानगी संबंधिचे मूळ संचिका चौकशीसाठी मागविण्यात आली असतांना या संचिकेतील पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने, औरंगाबाद गृह निर्माण क्षेत्र विकास मंडळ ,औरंगाबाद यांनी औरंगाबाद महानगरपालिकेस पत्र क्र. मुअ/औ.म./भू.सं./ /२०१०, दिनांक /१०/२०१० विना क्रमांकाचे व निरंक दिनांकाचे पत्र देवून कळविले आहे की, मौजे शहानूरवाडी औरंगाबाद येथील स.क्र.४५ (सी.टी.एस.क्रमांक १६२९६) मधील संपूर्ण २.३१७ हेक्टर क्षेत्र महाराष्ट्र शासनातर्फे म्हाड अधिनियम १९७६ चे कलम ४१ अंतर्गत म्हाडाच्या गृहनिर्माण योजनेसाठी संपादन करण्यात आले असून सदर क्षेत्राचा ताबा शासनातर्फे म्हाडाच्या प्रतिनिधीस दिनांक २९.४.१९८१ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. सदर क्षेत्रावर संयुक्त गृहनिर्माण योजना राबविण्यात आली असून सदर योजनेतील गाळ्यांचे व भूखंडाचे वाटप संबंधित लाभधारकास करण्यात आलेले आहे. तसेच सदर क्षेत्राचा मावेजा विशेष भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद यांच्यातर्फे परिगणित करण्यात आलेला असून सदर मावेजा रक्कम संबंधित जमिन मालकास अदा करण्यासाठी मंडळातर्फे दिनांक ८.२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांच्याकडे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वरील नमूद सी.टी.एस. क्रमांकामधील संपूर्ण क्षेत्र शासनातर्फे संपादन करून म्हाडाच्या ताब्यात देण्यात आलेले असून त्यानुसार सदर क्षेत्राची नोंद म्हाडाच्या नावे मिळकत पत्रिकेवर नोंदविण्यात आलेली आहे. सदर मिळकत पत्रिकेवर इतर जणांच्या मालकीची नोंद होवू शकत नाही. सदर प्रकरणी मंडळातर्फे यापूर्वी दिनांक १६.३.२००१ अन्वये नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद व मा.अधिक्षक, भूमि अभिलेख, औरंगाबाद यांना दिनांक १.१२.२००५ रोजीच्या पत्राद्वारे अवगत करण्यात आलेले आहे. सदर पत्राची छायांकित प्रत सुलभ माहितीस्तव सोबत देण्यात येत आहे.

**नगर भूमापन कार्यालयाचा म्हाडा कार्यालयाशी झालेला पत्रव्यवहार –**

तसेच नगरभूमापन कार्यालय यांनी त्यांचे पत्र क्र. जा.क्र.४४८३/प-भू-१/ बा.नि.२३१/१०, दिनांक ११.१०.२०१० अन्वये असे कळविले आहे की, मौजे शहानूरवाडी

औरंगाबाद येथील सर्वे नं.४५ सि.स.न.१६२९३ या मिळकती बाबत मा.अधिक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांचेकडे क्र./अपिल/एस.आर./१०४३/९८ दाखल झाले होते. सदरचे अपिल १)श्रीमती राणी उषा संचर २) श्री.संजय गोपाल संचर ३) श्री.धनंजय प्रसाद संचर व ४) श्री.विनय गोपाल संचर यांनी सि.स.नं.१६२९६ या मिळकतीवर झालेली नोंद रद्द करून वादी यांचे नाव दाखल करणेबाबत दिनांक १०.९.१९९६ रोजी दाखल करण्यात आले होते. सदर अपिलामध्ये तत्कालीन मा.अधिक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांनी दिनांक १८.९.१९९८ रोजी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५५ (३) अन्वये निर्णय देवून प्रतिवादी महंमद उस्मान महंमद याकुब व यांचे नाव कमी करून त्या ऐवजी वादी यांचे नाव दाखल करणेचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार आखीव पत्रिकेवर वादीचे नावाची नोंद करण्यात आलेली आहे. तद्नंतर वादी यांनी सदर जमिनीचे नोंदणीकृत खरेदी खत करून दिल्यामुळे त्यानुसार आखीव पत्रिकेवर मालकी हक्काच्या नोंदी झालेल्या आहेत. आपणास आवश्यक असल्यास न.भू.क्र.१६२९६ बाबत दिनांक १८.९.१९९८ ची प्रत व आखीव पत्रिका या कार्यालयाकडून प्राप्त करून घ्यावी.

आपले दिनांक ७.१०.२०१० चे पत्रानुसार असेही कळविण्यात येते की, मा.अधिक्षक भूमि अभिलेख औरंगाबाद यांचे कडील दिनांक १८.९.१९९८ चे निर्णयाबाबत आपली नाराजी असेल तर आपण त्या बाबत मा.उपसंचालक भूमि अभिलेख औरंगाबाद प्रदेश यांचेकडे रितसर अपिल करावे. अशा आशयाचे पत्र संचिकेत प्राप्त आहेत.

उपरोक्त उल्लेखित नगर भूमापन कार्यालय व म्हाडा कार्यालय यांच्यातील पत्रव्यवहार हा आक्षेपकाने आक्षेपासोबत जोडलेल्या पत्रव्यवहारा आधारे काढलेला निष्कर्ष आहे. बांधकाम परवानगी प्रस्तावासोबत केवळ मालकी हक्काचे कागदपत्र म्हणून पीआर कार्ड व मोजणी नकाशा (सक्षम कार्यालयाचा) सादर करणे भूखंडधारकास बंधनकारक असते. त्यानुसार श्री.बंब व इतर यांनी त्यांच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे महानगरपालिकेकडे सादर केलेली होती. व त्याआधारे नगररचना विभागाने बांधकाम परवानगी देतांना कागदपत्रांची छाननी केलेली दिसते. परंतु बांधकाम परवानगी देतांना औरंगाबाद गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ, औरंगाबाद यांनी महानगरपालिकेशी केलेल्या पत्रव्यवहाराकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास येते.

तथापि, औरंगाबाद महानगरपालिकेने बांधकाम परवाना क्र.५८५ /२०१०-११ फ़ाईल क्र.१०१/१७/२०१०-११ दिनांक २४.८.२०१० अन्वये श्री.रोशन विजयराम बंब , श्री.पारस चंदूलाल लालवाणी व श्री.शेख निजाम जैनोद्दीन यांना नगरभूमापन क्र.१६२९६ /पैकी मो.शहानूरवाडी येथील भूखंडावर बांधकाम परवानगी दिलेली आहे. ही बांधकाम परवानगी देतांना शाखा अभियंता, उपअभियंता, नगररचना विभाग, सहाय्यक संचालक,नगररचना व मा.आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांनी एकाच दिवसात घाईगर्दीत बांधकाम परवानगीस मंजूरी दिली हे विशेष.

तद्नंतर नगररचना विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत सकृतदर्शनी नगररचना विभागास असे निदर्शनास आले की, संबंधित व्यक्तिने सादर केलेल्या कागदपत्रामध्ये मृत्यू प्रमाणपत्र संशयास्पद असल्याचे निदर्शनास आले. तसेच संबंधितांनी सादर केलेल्या पीआर कार्डावरील एकूण क्षेत्राचा ताळमेळ बसत नसल्यामुळे तक्रार योग्य असल्याचे नगररचना विभागाचे

मत असल्यामुळे उपरोक्त बांधकाम परवानगी जा.क्र.मनपा/ससनर/२०१०/२२३८, दि.३.११.२०१० च्या पत्रान्वये स्थगित करण्यात आलेली आहे.

नगररचना विभागाकडे रोशन विजयराज बंब व इतर यांनी मिळकत न.भू.क्र.१६२९६ च्या पोटविभाजनाबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. या प्रस्तावातील त्रुट्या नगररचना विभागाने त्यांचे पत्र क्र.मनपा/ससनर/२०१०/१९९१, दिनांक १.१०.२०१० अन्वये संबंधितांना कळविण्यात आल्या आहेत ज्या की पुढील प्रमाणे आहेत –

१. विकास योजना रस्त्याचा निर्देश नकाशावर करण्यात आलेला नाही.

२. मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र २३१७० चौ.मी. तथापि सादर पोटविभाजन प्रस्तावानुसार क्षेत्र २६३२८.६० चौ.मी. या क्षेत्र तफ़ावतीबाबत सक्षम कार्यालयाने जारी केलेले कागदपत्रे प्रस्तावासोबत सादर केलेली नाहीत.

३. प्रस्तावावर सर्व मिळकत धारकांच्या स्वाक्षऱ्या आवश्यक आहे. तद्नंतरच प्रस्तावावर विचार होवू शकतो.

## निष्कर्ष व अभिप्राय –

प्रकरणातील उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, पीआर कार्डावरील एकूण क्षेत्रफ़ळ २.३१७ हेक्टर असून संपूर्ण २.३१७ हेक्टर क्षेत्रफ़ळ म्हाडा कार्यालयाने संपादित केल्याचे दिसून येते. बांधकाम परवानगीसाठी प्राप्त झालेल्या पीआर कार्ड मध्ये श्री.रोशन विजयराज बंब यांनी २३८५.२६ चौ.मी. क्षेत्र तसेच बंब व इतर यांच्याही नावाचा उल्लेख असून त्यांच्या नावाचे पीआर कार्डावरील नोंद आणि पीआर कार्डावरील एकूण क्षेत्रफ़ळ तसेच म्हाडा कार्यालयाने संपादित केलेले क्षेत्रफ़ळ या सर्व बाबी एकमेकांशी सुसंगत नाहीत. पीआर कार्डावरील क्षेत्रफ़ळ कमी व नोंदी जास्त दाखविण्यात आल्या आहेत. यावरून नगर भूमापन कार्यालयाचे कागदपत्रे संशयास्पद वाटतात. त्यामुळे जोपर्यंत नविन निर्विवाद मालकी दाखविणारे पीआर कार्ड संबंधित भूखंडधारक परवानगीसाठी नगररचना विभागात अभिलेखे दाखल करीत नाही तोपर्यंत प्रकरणांतील नगररचना विभागाने दिलेले स्थगिती आदेश उठविण्यात येवू नये किंवा दुसरी कोणतीही मंजूरी देण्यात येवू नये असे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

# औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील जमिन विकास परवानगी, बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र, अकृषिक वापराची शिफारस इत्यादी विविध प्रकरणात नगर रचना विभागामार्फत होणाऱ्या कार्यवाहीमध्ये आकारण्यात येणारे विकास शुल्क, विकास खर्च रक्कम, परवाना शुल्क, अनामत रक्कम इत्यादीच्या दर वाढी बाबत प्राथमिक चौकशी अहवाल.

## प्रस्तावना :

**०१.** औरंगाबाद महानगरपालिके कडुन नगर रचना विभागास प्राप्त होणाऱ्या विषयांकित प्रकरणी आकारण्यात येणारे शुल्क हे प्रामुख्याने दोन प्रकारचे आहे.

**अ.** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनिमय १९६६ चे तरतुदीनूसार व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनूसार

**ब.** औरंगाबाद महानगरपालिकेचे स्तरावर महानगरपालिकाच्या मंजुर धोरणानूसार/ ठरावा नुसार (मु.प्रां.महा. अधि.१९४९ च्या तरतुदी नुसार)

**०२.** सन २०१०-११ चे अर्थ संकल्पात मंजुर झालेले सुधारीत वाढीव दराचे खालील पाच प्रस्ताव आहेत.

**०१.** मंजुर बांधकाम नकाशा व्यतिरीक्त जास्तीचे बांधकाम व केलेले फेरबदल इत्यादी करीता म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये आकारण्यात येणारा दंड/ प्रशमन शुल्क इ.

**०२.** म.प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम १२४ अ नुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क - जमीन विकास शुल्क व शहर विकास शुल्क आकारणी.

**०३.** महसुल विभागाकडुन अकृषिक परवानगी प्रकरणी अभिप्रायास्तव प्राप्त प्रकरणी छाननी शुल्क.

**०४.** औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू विकास नियंत्रण नियमावली नुसार जमीन विकास, बांधकाम परवानगी प्रकरणीचे सुरक्षा अनामत रक्कम, छाननी शुल्क, नुतनीकरण शुल्क इत्यादी.

**०५.** विकास खर्च रक्कम.

वरील पाच प्रस्तावा पैकी खालील दोन प्रस्ताव **अ प्रकारातील** आहेत.

०१. म.प्रा. व न. र. अधिनियम १९६६ चे कलम १२४ अ नुसार आकारण्यात येणारे विकास शुल्क - जमीन विकास शुल्क व शहर विकास शुल्क आकारणी.

०२. औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू विकास नियंत्रण नियमावली नुसार जमीन विकास परवानगी प्रकरणीचे सुरक्षा अनामत रक्कम, छाननी शुल्क, नुतनीकरण शुल्क इत्यादी.

तर उर्वरीत खालील तीन प्रस्ताव **ब प्रकारातील** आहेत.

**०१.** मंजुर बांधकाम नकाशा व्यतिरीक्त जास्तीचे बांधकाम व केलेले फेरबदल इत्यादी करीता म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १४३ अन्वये आकारण्यात येणारा दंड/ प्रशमन शुल्क इ.

**०२.** महसुल विभागाकडुन अकृषिक परवानगी प्रकरणी अभिप्रायास्तव प्राप्त प्रकरणी छाननी शुल्क.

**०३.** विकास खर्च रक्कम.

या तीन प्रस्तावात नमुद दराने करण्यात येणारी आकारणी त्यापुढे नमुद ठराव/ धोरणा संबंधाने करण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| **१** | विकास खर्च रक्कम | - | रेखांकना अंतर्गतच्या विकास कामा बाबतचे महानगरपालिकेचे प्रचलित व यापूर्वी वांरवार मान्यता झालेले मंजुर धोरण . |
| **२** | भोगवटा प्रमाणपत्र प्रकरणात मंजुर बांधकाम परवानगी नकाशापेक्षा केलेले जास्तीचे बांधकाम, फेरबदल दंड आकारुन नियमित करणे | - | महानगरपालिकेच्या सन १९८५ च्या मंजुर प्रशासकीय ठरावाच्या मर्यादेत फक्त दर सुधारीत करुन/ वाढीव दर प्रस्तावित केले आहेत. |
| **३** | अकृषीक शिफारस प्रकरणात प्रशा. शुल्क आकारणे | - | महानगरपालिकेचे सन २०१०-११ चे मंजुर अर्थ संकल्पातील मंजुर धोरण / ठराव . |

**मा.आयुक्त यांचे चौकशीचे आदेश :**

उपरोक्त विषयानुषंगाने मा.आयुक्त यांनी कार्यालयीन आदेश क्र.मनपा/नरवि/ ससंनर/ १९५/२०११, दिनांक २०.१.२०११ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करण्यासाठी समितीची स्थापना केली.

**चौकशीचे मुद्दे :-**

**०१.** मु.प्रां. मनपा. अधि. १९४९ चे कलम ९५ प्रमाणे मा. स्थायी समिती समोर सदर शुल्क वाढीचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असतांना तसे का करण्यात आले नाही.

०२. मु.प्रां. मनपा. अधि. १९४९ चे कलम १०० प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेला असा प्रस्ताव सरळ घेता येतो का ?

०३. अर्थ संकल्प वितरीत झालेनंतर नागरीकांचे माहितीस्तव दिलेली मुदत व त्यानंतर दिलेली मुदत वाढ योग्य आहे काय ?

**०४.** मा. सर्वसाधारण सभा व मा. स्थायी समिती सभेमध्ये या मुदत वाढीमुळे महानगरपालिकेचा तोटा झाला आहे अशी चर्चा झाली. असा तोटा झाला आहे का ? असल्यास किती ? जबाबदार कोण ?

०५. विकास खर्च /विकास शुल्क आकारणी बाबत वैधानिक तरतुद

०६. दिनांक २०/०१/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चानूसार आता पर्यंत मा. स्थायी समिती समोर सदर शुल्क वाढीचा प्रस्ताव आला नसल्याने मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव पुन्हा ठेवावा म्हणुन असा फेरप्रस्ताव मा. स्थायी समिती समोर ठेवता येईल का ?

०७. या अनुषंगाने आवश्यक इतर बाबी.

**मुद्येनिहाय चौकशी समितीचा अहवाल :**

**मुद्या क्र.१ : मु.प्रां. मनपा. अधि. १९४९ चे कलम ९५ प्रमाणे मा. स्थायी समिती समोर सदर शुल्क वाढीचे प्रस्ताव सादर करणे आवश्यक असतांना तसे का करण्यात आले नाही.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतूदी नुसार पुढील वित्तीय वर्षातील मनपाच्या जमा रकमा व उत्पादन यचा अंदाज मा.स्थायी समिती समोर सादर करणे आहे.

विकास खर्च हा मनपाच्या धोरणानुसार आकारण्यात येत असून त्यात असलेली प्रस्तावित दरवाढ ही एक मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत असल्याने जमा रकमा व उत्पन्नात समावेश होवून वार्षिक अंदाजात समाविष्ट करणे आवश्यक होते.

सहाय्यक संचालक नगररचना यांनी विकास खर्च, रक्कम जमीन विकास शुल्क, दंड आकारणी वाढ, अकृषिक परवानगी प्रकरणी छाननी शुल्क व बांधकाम परवानगी प्रकरणी अनामत रक्कम नुतनीकरण शुलकात वाढ यासाठी त्यांचे पत्र अ.क्र.१९.५.२०१०, २६.५.२०१०,२६.५.२०१०, १.६.२०१० व दिनांक १.६.२०१० च्या पत्रान्वये यथोचित प्रस्तावासह मुख्य लेखाधिकारी यांना उक्त बाबी सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करून घेणेस मा.आयुक्त यांचे प्रशासकीय मान्यतेने कळविलेले आहे.

स.स.नगररचना यांनी दिलेले प्रस्ताव व अधिनियम याच्या तरतूदीनुसार विकास खर्च दरवाढीचा प्रस्ताव मनपाच्या सन २०१०-११ च्या अर्थसंकल्पात उत्पन्नाचे स्त्रोत म्हणून जमा होणाऱ्या रकमेच्या हिशोबीत अंदाजासह मा.स्थायी समितीसमोर ठेवणे आवश्यक होते. तथापि, विकास खर्च वगळून इतर शुल्क आकारणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदी नुसार नियोजन विकास प्राधिकरण म्हणजेच सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे आवश्यक होते. महानगरपालिकेच्या मान्यतेनंतर अधिक तरतूदीनुसार विकास खर्च वगळून इतर शुल्क जसे जमीन विकास शुल्क, शहर विकास निधी वाढीव दराने आकारणीसाठी शासन मान्यता आवश्यक आहे.

मुद्या क्र.२ : **मु.प्रां. मनपा. अधि. १९४९ चे कलम १०० प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेला असा प्रस्ताव सरळ घेता येतो का ?**

मा.स्थायी समितीने मंजूर केलेला अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेपुढे सादर करणे कलम १०० प्रमाणे अपेक्षित आहे.

मुद्या क्र.३ **:अर्थ संकल्प वितरीत झालेनंतर नागरीकांचे माहितीस्तव दिलेली मुदत व त्यानंतर दिलेली मुदत वाढ योग्य आहे काय ?**

मा.सर्वसाधारण सभेने अर्थसंकल्पात ज्या तरतूदी मान्य केल्या आहेत. त्यात केव्हापासून लागू होणार जुन्या दराने सवलत देण्याबाबत किंवा मुदतवाढ देणे बाबत नागरीकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करणे या बाबी व त्यांच्या निश्चित तारखा यात नमूद नाही. कोणताही ठराव पारीत झाला तेव्हा पासून त्याची अंमलबजावणी अपेक्षित आहे.

मुद्या क्र.४ **: मा. सर्वसाधारण सभा व मा. स्थायी समिती सभेमध्ये या मुदत वाढीमुळे महानगरपालिकेचा तोटा झाला आहे अशी चर्चा झाली. असा तोटा झाला आहे का ? असल्यास किती ? जबाबदार कोण ?**

विकास शुल्क वगळता अधिनियमाच्या तरतूदीनुसार इतर बाबींसाठी शासनाची मंजूरी आवश्यक असल्यामुळे शासनाच्या मंजूरीच्या तारखेपासून त्याची अंमलबजावणी अपेक्षित आहे. म्हणून याबाबतीत मनपाचे नुकसान झाले असे दिसून येत नाही.

**मुद्या क्र.५: विकास खर्च /विकास शुल्क आकारणी बाबत वैधानिक तरतुद**

विकास खर्च वसूलीबाबत अधिनियमात तरतूद नाही. तथापि भूतपूर्व नगर परिषदेपासून विकास खर्च आकारणी बाबत विकास खर्च आकारणी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने धोरणात्मक निर्णयानुसार होत आहे. व मनपाचे धोरणात्मक निर्णयानुसार वेळोवेळी विकास खर्च आकारणीचे दरात वाढ करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ खालील तरतूदीनुसार किमान व कमाल विकास शुल्क आकारणीची तरतूद आहे.

औरंगाबाद महानगरपालिका बांधकाम परवानगी व विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदीनुसार विकास परवानगी छाननी शुल्क, नुतनीकरण अनामत रक्कम इत्यादीची आकारणी करण्यात येते.

**मुद्या क्र.६: दिनांक २०/०१/२०११ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेत झालेल्या चर्चानूसार आता पर्यंत मा. स्थायी समिती समोर सदर शुल्क वाढीचा प्रस्ताव आला नसल्याने मा. स्थायी समिती समोर प्रस्ताव पुन्हा ठेवावा म्हणुन असा फेरप्रस्ताव मा. स्थायी समिती समोर ठेवता येईल का ?**

मा.आयुक्तांना उच्च प्राधिकरण हे मा.स्थायी समिती आहे आणि मा.स्थायी समितीला मा.सर्वसाधारण सभा हे उच्च प्राधिकरण आहे. मा.सर्वसाधारण सभेने निर्देश दिल्यानंतर सदर शुल्क वाढीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवता येईल.

# नगररचना विभागामार्फ़त आकारण्यात येणाऱ्या फ़ी व शुल्काबाबत.

**प्रस्तावना :**

सभापती,स्थायी समिती, महानगरपालिका,औरंगाबाद यांची दिनांक ०४.०२.२०११ रोजीची तोंडी सूचननुसार खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

चौकशी समितीने मा.आयुक्त, यांना कार्यालयीन पत्र क्र.मनपा/मुलेप/२०११/५७, दिनांक २४.१.२०११ अन्वये विषयांकित प्रकरणी सविस्तर अहवाल सादर करून त्याची प्रत आपल्या अवलोकनास्तव यापूर्वीच सादर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील जमिन विकास परवानगी , बांधकाम परवानगी, भोगवटा प्रमाणपत्र, अकृषिक वापराची शिफ़ारस इत्यादी विविध प्रकरणांत नगररचना विभागामार्फ़त होणाऱ्या कार्यवाहीमध्ये आकारण्यात येणाऱ्या विकास खर्च वसूलीबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये वेगळी अशी तरतूद नाही. विकास खर्च व इतर शुल्क वाढ करतांना मा.स्थायी समितीची मान्यता घेणे, नागरिकांच्या सूचना व हरकती मागविणे इत्यादी बाबी विचारात न घेताच वाढ लागू केल्याचे दिसून येते. तथापि, आपल्या दिनांक ४.२.२०११ च्या तोंडी सूचनेनुसार दिनांक १०.१.२०११ ते १८.१.२०११ च्या दरम्यान विकास खर्च वसूलीतील फ़रकाबाबतचा स्वतंत्र तक्ता आपल्या माहितीस्तव या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे.

**`m [ÜXVrZ{ gXarb odH$mg IM© d ewëH$ dmT>rg oXZm§H$ 10.1.2011 V{ 20.1.2011 [`ªV _wXVdmT> oXbr ZgVr Va _hmZJa[mobH{$g** a·H$_ ê$.1,50,11,983/- **BVH$m oZYr AoYH$Mm àmßV Pmbm AgVm.** (सोबत विवरण तक्ता)

## मा.विरोधी पक्षनेता, महानगरपालिका,औरंगाबाद यांचे पत्रदिनांक ३.२.२०११ नुसार महानगरपालिका डिझेल पंप तपासणी बाबतचा प्राथमिक अहवाल.

सन १९९३ पासून महानगरपालिका औरंगाबादच्या मालकीच्या डिझेल पंप, सेन्ट्रल नाका येथील मनपाच्या वर्कशॉप येथे सुरू केला आहे. या पंपावरून महानगरपालिकेच्या वाहनांना डिझेल पुरविण्यात येते. मा.विरोधी पक्षनेता यांनी सदरील पंपास दिनांक १८.१.२०११ रोजी अचानक भेट देवून पंपाची तपासणी करून काही मुद्यांवर आक्षेप घेतले होते. मुख्य लेखापरीक्षक यांना चौकशी/ तपासणी करून अहवाल देण्यास मा.विरोधी पक्षनेता यांनी सूचित केले. त्यानुसार लेखापरीक्षण पथकाने डिझेल पंपाच्या उपलब्ध झालेल्या अभिलेख्यावरून तपासणी केली. याबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

### मुद्या क्र.१ :

**सेन्ट्रल नाका डिझेल पंपावर डेपो मधून डिझेल टँकर येतो त्यावेळी त्या टँकरमध्ये कुठले द्रव्य आहे व त्या द्रव्याची घनता (Density) तपासणी करण्यात येत नाही ? तसेच पेट्रोलियम नियमाप्रमाणे दररोजची घनता व स्टॉकचे रेकॉर्ड का ठेवण्यात येत नाही.**

मा. विरोधी पक्षनेता व मुख्य लेखापरीक्षक यांना डिझेल पंपाबाबतच्या आक्षेपाबाबत संबंधित विभागाने केलेला खुलासा पुढील प्रमाणे .

सेन्ट्रल नाका डिझेल पंपावर मे.इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.या केंद्रशासित कंपनीचा पंप बसविलेला असून याच कंपनीकडून डिझेल खरेदी केल्या जाते. सदरील कंपनी ही केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून या कंपनीकडूनच घेण्यात आलेले डिझेल महानगरपालिकेच्या वाहनांसाठी वापरल्या जाते. सदरील व्यवहार हा केंद्र शासित कंपनी ते स्थानिक स्वराज्य संस्था असा म्हणजेच शासन ते निमशासन असा आहे. त्यामुळे मे.इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.याच्या कडून खरेदी केलेल्या डिझेलची घनता (Density) तपासणीची आवश्यकता भासली नाही. तसेच (Density) तपासणी बाबतची यापूर्वी कोणीही तक्रार केलेली नव्हती. तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.यांच्याकडून येणाऱ्या बिलावर डेन्सीटीची नोंद असते.

दिनांक ३१.१.२०११ रोजी मा.विरोधी पक्षनेता श्री.प्रमोदजी राठोड यांनी दिलेल्या भेटी दरम्यान त्यांनी केलेल्या सुचनेनुसार दिनांक १.२.२०११ रोजी डेन्सीटी तपासण्याचे साहित्य खरेदी करण्यात आले व त्या दिवशी आलेल्या १२ के.एल.डिझेल टँकरमधील डिझेलची डेन्सीटी तपासणी केली. त्या दिवशी आलेल्या डिझेलच्या Invoice वरील घनता ८२४.७ होती व आपण केलेल्या तपासणीनुसार सदरील डिझेलची घनता ही ८२४.८ इतकी होती व ही योग्य असल्याने डिझेल लोड उतरवून घेण्यात आला. मा.विरोधी पक्षनेता यांनी केलेल्या सुचनेचे पालन करण्यात आले असून यापुढेही डिझेलची (Density) ची नियमित खात्री करून घेण्यात येईल व त्यांचे रेकॉर्ड ठेवण्यात येईल तसेच डिझेल घनता रजिस्टरवर दररोज डिझेल टँकमधील डिझेलची घनता तपासून नोंद ठेवण्यात येईल.

## लेखापरीक्षण तपासणीचा अभिप्राय :

सेन्ट्रल नाका डिझेल पंपावर मे.इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या कंपनीचा पंप बसविले असून याच कंपनीकडून डिझेल खरेदी केले जाते. डिझेल पंपावर डेपोमधून डिझेल टँकर येतो त्यावेळी द्रव्याची घनता (Density) तपासणी करणे आवश्यक आहे ते घेतल्याचे दिसून येत नाही. या संदर्भातील मा.विरोधी पक्षनेता यांनी घेतलेला आक्षेप बरोबर आहे व त्याचबरोबर विभागाने केलेला खुलासा मान्य करता येत नाही. महानगरपालिकाने द्रव्याची घनता (Density) तपासणीचे साहित्य उपलब्ध नसल्याने ते घेतलेले नव्हते, ही बाबही लेखापरीक्षण पथकास आढळून आली. विभागाने दिनांक १.२.२०११ रोजी घनता (Density) तपासण्याचे साहित्य खरेदी करून घनता तपासण्यास सुरूवात केल्याचे आढळून आले.

**मुद्या क्र.२ : दिनांक १८.१.२०११ रोजी आलेल्या डिझेल टँकरचे डिझेल पंपामध्ये उतरल्यानंतर त्याचा टँक मध्ये किती स्टॉक आहे. टाकीत किती स्टॉक होता त्याची नोंद का घेण्यात आली नाही.**

**मा.विरोधी पक्षनेता यांना डिझेलपंप स्टॉक बाबत विभागाने केलेला खुलासा पुढील प्रमाणे –**

दिनांक १८.१.२०११ पूर्वी उतरविण्यात आलेल्या सर्व डिझेल टँकरच्या नोंदी संकलन नोंदवही मध्ये वेळीच घेतल्या गेलेल्या आहेत. तथापि दिनांक १८.१.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत डिझेल टँकर मधील डिझेल उतरवून एकूण १२ हजार लिटर डिझेल टँक मध्ये भरण्यात आले. त्यावेळी डिझेल उतरविण्यापूर्वी मनपा टँकमध्ये असलेल्या डिझेलच्या डिपची नोंद संकलन नोंद वही घेण्यात आली. मात्र डिझेल टँकर संपूर्णत: मनपा डिझेल टँक मध्ये उतरविण्यता आल्यानंतर घेण्यात येणाऱ्या मनपा डिझेल टँकच्या डिपची नोंद घेण्यात आली. परंतु अनावधनाने सदरील डिपची नोंद संकलन नोंदवही मध्ये केल्या गेली नाही. कारण सद्यस्थितीत मनपाच्या असलेल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे डिझेल खरेदीसाठी चेक मिळण्यास उशीर होतो. त्यामुळे साहजिकच डिझेल खरेदी विलंबाने होते व दरम्यानच्या कालावधीत सर्व वाहनांना अत्यंत कमी डिझेल देवून वाहने चालविण्यात येत असल्यामुळे डिझेल टँकर येताच डिझेल घेण्यासाठी वाहनांची गर्दी होते. दिनांक १८.१.२०११ रोजी डिझेल टँकर उतरवून घेतल्यानंतर देखील डिझेल घेण्यासाठी बरीच वाहने येवून थांबलेली होती. या वाहनांना तात्काळ डिझेल वाटप करणे आवश्यक होते. कारण सदरील वाहनांना वेगवेगळ्या कामी त्वरीत जाणे गरजेचे होते.

तसेच पूर्वी मनपाकडे कमी वाहने असूनही यांत्रिकी विभागात एक उपअभियंता, एक कनिष्ठ अभियंता, तीन दुय्यम आवेक्षक, तीन लिपीक होते. सद्यस्थितीत वाहनांची संख्या बरीच वाढली आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प देखील यांत्रिकी विभागाद्वारे राबविण्यात येत असूनही या विभागात फ़क्त एक प्रभारी उपअभियंता , दोन कनिष्ठ अभियंता व एक लिपीक असा अत्यंत कमी स्टाफ़ आहे. त्यामुळे प्रत्येक अधिकाऱ्यावर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्यामुळे अनावधनाने दिनांक १८.१.२०११ रोजीची नोंद घेणे राहून गेले आहे.

वाहन चालकांना डिझेल भरण्यासाठीच्या स्लीप्स भरून देणे व लॉगबुक तपासणी करून डिझेल देणे गरजेचे आहे अथवा नाही याची खातरजमा करणे, स्लीप नंबर तारीख किती डिझेल द्यायचे ती Quantity इत्यादीची नोंद लॉगबुक मध्ये घ्यावी लागते. या सगळ्या वेगवेगळ्या कामाच्या ओघात सदरील संकलन नोंदवहीवर नोंद घेण्याची राहून गेली. यापूढे सदरील बाब गांभिर्याने लक्षात घेवून नोंदी वेळच्या वेळी घेण्यात येतील.

**मुख्य लेखापरीक्षक यांना जा.क्र./मनपा/यांत्रिकी/२६७१/२०११, दिनांक ७.२.२०११ च्या पत्रान्वये विभागाने केलेला खुलासा पुढीलप्रमाणे.**

दिनांक १८.१.२०११ पूर्वी उतरविण्यात आलेल्या सर्व डिझेल टँकरच्या नोंदी संकलन नोंदवही मध्ये वेळीच घेतल्या गेलेल्या आहेत. तथापि दिनांक १८.१.२०११ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत डिझेल टँकरमधील डिझेल उतरवून एकूण १२ हजार लिटर डिझेल, टँकमध्ये भरण्यात आले. त्यावेळी डिझेल उतरविण्यापूर्वी मनपा टँकमध्ये असलेल्या डिझेलच्या डिपची नोंद संकलन नोंदवही घेण्यात आली. मात्र डिझेल टँकर संपूर्णत: मनपा डिझेल टँकमध्ये उतरविण्यात आल्यानंतर घेण्यात येणाऱ्या मनपा डिझेल टँकच्या डिपची नोंद घेण्यात आली. परंतु अनावधनाने सदरील डिपची नोंद संकलन नोंदवही मध्ये केल्या गेली नाही. कारण डिझेल टँकर उतरवून घेतल्यानंतर डिझेल घेण्यासाठी बरीच वाहने येवून थांबलेली होती. या वाहनांना तात्काळ डिझेल वाटपकरणे आवश्यक होते. कारण सदरील वाहनांना वेगवेगळ्या कामी त्वरीत जाणे गरजेचे होते.

वाहनचालकांना डिझेल भरण्यासाठीच्या स्लीप्स भरून देणे व लॉगबुक तपासणी करून डिझेल देणे गरजेचे आहे अथवा नाही यांची खातरजमा करणे, स्लीप नंबर तारीख किती डिझेल द्यायचे ती Quantity इत्यादीची नोंद लॉगबुक मध्ये घ्यावी लागते. या सगळ्या वेगवेगळ्या कामाच्या ओघात सदरील संकलन नोंदवहीवर नोंद घेण्याची राहून गेली. यापुढे सदरील बाब गांभिर्याने लक्षात घेवून नोंदी वेळच्या वेळी घेण्यात येतील.

## लेखापरीक्षण विभागाचा अभिप्राय :

दिनांक १८.१.२०११ रोजी संबंधिताने डिझेल टँकर डिझेल पंपावर उतरण्यापूर्वी किती स्टॉक आहे, याबाबतची नोंद संकलन नोंदवही नुसार घेतल्याचे दिसते. परंतु डिझेल टँकर उतरविल्यानंतर संकलन नोंदवहीमध्ये नोंद घेणे आवश्यक असतांना नोंद घेतल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे मा. विरोधी पक्षनेत्यांनी फ़ार महत्वाचा मुद्या उपस्थित केला आहे. लेखापरीक्षणात ही बाब आक्षेपार्ह दिसून येते. डिझेल प्राप्त झाल्यानंतर त्यांची विहित नोंदवहीत नोंद घेणे हे संबंधितांचे प्राथमिक कर्तव्य ठरते. ही विभागाची चूकच आहे आणि विभागाने दिलेला खुलासा चूकीचा आहे.

## मुद्या क्र.३ :डिझेल स्टॉक रेकॉर्ड का ठेवण्यात येत नाही ?

**मा.विरोधी पक्षनेता यांना डिझेल पंप स्टॉक बाबत विभागाने केलेला खुलासा पुढील प्रमाणे.**

- **डिझेलचे स्टॉक रेकॉर्ड नियमितपणे ठेवण्यात येते.**

**लेखापरीक्षण विभागाचा अभिप्राय :**

संबंधित विभागाने डिझेल स्टॉक बाबतचा रेकॉर्ड अपुऱ्या स्वरूपात नोंदी घेण्यात आलेले आहे. जसे मनपा डिझेल टँक मध्ये डिझेल उतरविण्यात आल्यानंतर डिझेल टँकच्या डिपची नोंद घेणे व डिपची नोंद संकलन नोंदवही मध्ये घेणे आवश्यक असतांना ते घेतल्याचे दिसून येत नाही.

मुद्या क्र.४ : **या मध्ये जबाबदार कोण आहे. यामध्ये ज्याची जबाबदारी आहे. त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात यावी.**

मा.विरोधी पक्षनेता यांना महानगरपालिकेच्या सेन्ट्रल नाका येथे येणारे डिझेलची घनता (Density) तपासणी का करण्यात येत नाही. याबाबत संबंधित विभागाने केलेला खुलासा पुढील प्रमाणे –

सेन्ट्रल नाका डिझेल पंपावर मे.इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.या केंद्रशासित कंपनीचा पंप बसविलेला असून याच कंपनीकडून डिझेल खरेदी केल्या जाते. सदरील कंपनी ही केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून या कपंनीकडूनच घेण्यात आलेले डिझेल महानगरपालिकेच्या वाहनासाठी वापरल्या जाते. सदरील व्यवहार हा केंद्र शासित कंपनी ते स्थानिक स्वराज्य संस्था असा म्हणजेच शासन ते निमशासन असा आहे. त्यामुळे मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.यांच्याकडून खरेदी केलेल्या डिझेलची घनता (Density) तपासणीची आवश्यकता भासली नाही. त्यामुळे याबाबत कोणालाही जबाबदार धरता येणार नाही असे नमूद केले आहे.

**लेखापरीक्षण विभागाचा अभिप्राय :**

सदरील जबाबदारी त्या विभागात काम करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांची आहे. तेथे कोणावर कोणती जबाबदारी सोपविली होती, याबाबत मनपा प्रशासनाकडून माहिती घेणे योग्य होईल.

**लेखापरीक्षण विभागाचा निष्कर्ष :**

मा. विरोधी पक्षनेता यांनी सेन्ट्रल नाका येथील डिझेल पंपाबाबत उपस्थित केलेले मुद्दे अत्यंत योग्य व महत्वाचे असून विभागातील अधिकारी / कर्मचारी यांनी याबाबत योग्य त्या सूचना देवून यापुढे (Density) डिझेल टँकर उतरल्यानंतर घेणे आवश्यक आहे व दैनंदिन वितरण ,डिप व असलेला एकूण साठा याबाबतची माहिती विहित अभिलेख्यांत नोंदविणे आवश्यक आहे. यामध्ये लेख्याबाबत वरील त्रुटी दिसून येतात.

तथापि, डिझेल पंपावर मे.इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.या केंद्रशासित शासकीय कंपनीचे नियंत्रण आहे व तेथूनच डिझेलचा पुरवठा होतो. त्यामुळे डिझेलचे दर्जाबाबत शंका वाटली नाही व दर्जाबाबत कोणतीही तक्रार कुणाकडूनही प्राप्त झालेली दिसून आली नाही असा यांत्रिकी विभागाने केलेला खुलासा देखील अंशत: बरोबर वाटतो. लेखापरीक्षणा मध्ये वरील त्रुटी व्यतिरिक्त गंभीर असा घोटाळा किंवा अपहार उपलब्ध अभिलेख्यांवरून दिसून आला नाही. म्हणून तेथील कर्मचारी / अधिकारी यांना कडक शब्दांत समज देण्याची शिफ़ारस करण्यात येते.

# औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत सर्व शिक्षा अभियान
# प्राथमिक चौकशी अहवाल

## प्रस्तावना :-

औरंगाबाद महानगरपलिका अंतर्गत शिक्षण विभागामार्फत सर्व शिक्षा अभियान राबवले जाते.त्यामध्ये गरीब व गरजु होतकरु विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत शालेय साहित्य त्यामध्ये सर्वशिक्षा अभियान अंतर्गत प्राप्त झालेल्या निधी मधुन गणित, विज्ञान , भुमिती , इंग्रजी, भुगोल, क्टि व प्रयोग शाळा साहित्य तसेच जिवनाआवश्यक वस्तु स्टेशनरी , कापड व अन्न पदार्थ व इतर अनुषंगिक साहित्य या योजने अंतर्गत खरेदी करण्यात येते.

दिनांक १७.०२.२०११ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत मनपाच्या शाळेतील विघार्थ्यासाठी सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत साहित्य खरेदीतील अनियमीतता व नंदादिप साहित्य खरेदी घोटाळयाबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली व दोषी कार्यवाही करण्याची मागणी सभागृहात करण्यात आली आहे.

### मा.महापौर यांचे चौकशी बाबतचे आदेश :

मा. महापौर यांनी त्यांचे आदेश क्र .जा.क्र /मनपा /महापौर /७४१ /२०११ दि.१८.०२.२०११ अन्वये सदरील सदरील बाब ही अंत्यत गंभीर स्वरू पाची असून महानगरपालिकेची प्रतिमा मलीन करणारी आहे तसेच सर्व शिक्षा अभियानाच्या कार्यपध्दती बाबत शंका निर्माण करणारी आहे. अशी सभागृहात चर्चा झाली असे नमूद करून सर्व शिक्षा अभियानाचे लेखा परिक्षण करण्याबाबतचे आदेश दिले.

### मा.आयुक्त यांच्याही चौकशीच्या सूचना :

मा.आयुक्त यांनी दप्तर खरेदी संचिकेतील पान क्र.७ वर चौकशी करणे बाबत व अहवाल सादर करणे बाबत सूचना दिल्या आहेत.

## प्राथमिक चौकशी अहवाल

सन २०१०-११ ची सर्व शिक्षा अभियानाची मा.सभागृहातील चर्चे ची संचिका तपासली असता, औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत अध्ययन समृध्दी कार्यक्रम (Learning Enhancement Programme) टिप्पणी पृष्ठ क्रमांक १ ते ९ मध्ये श्रीमती कागदे आर.पी.यांनी अध्यन समृध्दी कार्यक्रमाबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. ज्यामध्ये -

| | |
|---|---|
| १. विविध अनुदाने | रू. ८,१७,८६५.०० |
| २. प्रशिक्षण व कार्यशाळा | रू. १,६५,९००.०० |
| ३. नियंत्रण,पर्यवेक्षण, मुल्यांकन व मुल्यमापन | रू. ९,१५,३५०.०० |
| **एकुण रक्कम** | **रू. १८,९९,११५.००** |

टिपणी मध्ये परिच्छेद क्र. ९ वर नमूद केले आहे की, उपरोक्त तपशिलनिहाय अनुदान वॉर्ड शिक्षण सभापती व समुह साधन केंद्र स्तरावर अनुदान वितरण करणे वा महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दिनांक २३.५.२००७ अन्वये सदर उपक्रमांतर्गतची खरेदी महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई या संस्थेकडून प्राधान्याने करावे अशा स्वरूपाचे निर्देश आहेत. परिच्छेद क्र.२२ ते २५ मध्ये असे नमूद केले आहे की, वरील खर्च निविदा / दरपत्रके /शासन दर निश्चितीद्वारे मान्य दरानुसार करणे योग्य तसेच टिपणीच्या अखेरीस प्रस्तावित खर्च विहित पध्दतीनुसार खर्चास मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर प्रशासन अधिकारी (शिक्षण) यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविलेले आहेत. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, Learning Enhancement Programme साठी प्रस्तावीत परिच्छेद ४ ते ८ मधील अनुदान शालेय समितीकडे वर्ग करणेस व परिच्छेद ९ ते १६ प्रमाणाचे उपक्रम, परिच्छेद १६ व १८ मधील तरतुदीनुसार व परिच्छेद १८ SEEEP साठी परिच्छेद १९ ते २२ अनुसार परिच्छेद २४ मध्ये दर्शविल्या एकुण परिच्छेद २५ मधील तरतुदीचे अधीन राहुन कार्य पार पाडणेस मान्यता देण्यास हरकत नाही असे अभिप्राय नोंदविलेले आहे.

तद्नंतर सदरहु प्रकरणात तत्कालीन प्रभारी उपायुक्त, (प्रशासन) तथा प्रकल्प संचालक यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविलेले आहेत

अध्ययन समृध्दी कार्यक्र्मा अंतर्गत इयत्ता. १ ली ते ४ थी च्या शाळांना नंदादिप शाळा वाचन कोपरा, फलक निर्मिती,उपस्थिती कार्ड्स तयार करणे व इयत्ता ५ वी ते ७ वी साठी गणित, इंग्रजी, विज्ञान संच विकसीत करणे व कार्यशाळेचे आयोजन इत्यादी साठी परिच्छेद २५ वर नमुद तरतुदी नूसार खर्च / प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसावी. असे अभिप्राय नोंदविलेले आहे.

**उपरोक्त प्रकरणी सदरील संचिकेवर मुख्यलेखाधिकारी यांनी लेखा विभागाचे पुढील प्रमाणे अभिप्राय नोंदविलेले आहेत.**

“ पुर्व पृष्ठावरील परिच्छेद क्र .२४ नुसार रू १८,९९,११५/- च्या खर्चास मान्यता देण्यास हरकत नाही ”

उपरोक्त प्रस्तावातील रक्कम रू.१८,९९,११५/- खर्चाच्या संचिकेवर मा. आयुक्त यांनी दि.२८.१०.२०१० रोजी मान्यता दिल्याचे दिसून येते.

त्यानंतर सर्व शिक्षा अभियान योजनेतील लिपीक यांनी राज्य प्रकल्प संचालक महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांचे दिनांक २८.१०.२०१० च्या पत्रानुसार प्रस्तावित LEP प्रकल्पांतर्गत प्राप्त निधीतून गणित,विज्ञान,भूमिती,इंग्रजी व भूगोल किट तसेच प्रयोगशाळा साहित्य खरेदी करणेबाबत शासन निर्णय दिनांक २३.५.२००७ नुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचेकडून खरेदी करणेबाबत शासनाने निर्देशित केलेले आहे त्यानुसार खरेदी करण्यासाठी संस्थेला पत्र देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

या प्रस्तावावर प्रशासन अधिकारी (शिक्षण) यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

पुढे टिपणी पृ.क्र.१३ वर मा.आयुक्त यांचे मान्यतेनुसार संबंधितांना द्यावयाचे कार्यादेश व मानधन अग्रिम अदायगीस्तव देयक सादर केले आहेत. त्यास प्रशासन अधिकारी शिक्षण व तत्कालीन प्रभारी उपायुक्त (प्र) तथा प्रकल्प संचालक यांनी मान्यता दिलेली आहे.

**महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांच्या साहित्य खरेदीबाबत सुचना :**

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक जा.क्र /मप्राशिप /सशिअ / LEP/२०१०-११/४४०४/दिनांक २८.१०.२०१० अन्वये महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांनी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्राप्त असलेल्या निधीमधून गणित, विज्ञान, भुमिती, इंग्रजी, लेप व भूगोल कि ट तसेच प्रयोगशाळा साहित्य खरेदीसाठी दर कार्यालयास कळविले असून शासन निर्णय दिनांक २३.०५.२००७ नुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झुमर्स फेडरेशन लि.मुंबई यांच्याकडून खरेदी करण्याबाबत शासनाने निर्देशित केलेले आहे. असे कळविले आहे.त्याखालील परिच्छेदात असेही कळविलेले आहे की, अध्ययन समृध्दी कार्यक्रम योजनेअंतर्गत प्राप्त निधी व इतर निधीतून गणित, विज्ञान, भुमिती, इंग्रजी, लेप व भूगोल कि ट तसेच प्रयोगशाळा साहित्य खरेदी करत असतांना उपरोक्त शासन निर्णय पाळता येईल.

तसेच महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या महानगरपालिके ला प्राप्त झालेल्या दिनांक १८.११.२०१० च्या पत्रात शासन निर्णय दिनांक २३.०५.२००७ नुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झुमर्स फेडरेशन लि.मुंबई या संस्थेकडून दैनदिन कामकाजात आवश्यक असणारी कार्यालयीन स्टेशनरी, संगणकीय स्टेशनरी, उपकरणे ,शालेय साहित्य, तसेच इतर नित्योपयोगी वस्तुची प्राधान्याने खरेदी करावी असे कळविलेले आहे.

शासन निर्णय क्रमांक सपस १००६/प्रक्र ३३७/२४/स,मंत्रालय सहकार पणन व वस्त्रोधोग विभाग मुंबई दि.२३.०५.२००७ अन्वये पुढील प्रमाणे शासन निर्णय दिलेला आहे.
शासन निर्णय :-

१. राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, शासकीय महामंडळे इत्यादी यांनी त्यांना दैनंदिन कामकाजात आवश्यक असणारी कार्यालयीन स्टेशनरी, संगणकीय स्टेशनरी, उपकरणे, शालेय साहित्य,तसेच इतर नित्योपयोगी वस्तुची खरेदी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.८७-ए, राज चेंबर्स, देवजी रतनशी मार्ग, दाणाबंदर, मुंबई ४०० ००१ या संस्थेकडून प्राधान्याने करावी.

**सन २००८-०९ या वर्षाच्या अहवालामध्ये मुख्यलेखापरिक्षकांनी दिलेले अभिप्राय :-**

सर्वशिक्षा अभियाना अंतर्गत केलेल्या खरेदी संदर्भाने सन २००८-०९ मध्ये लेखा परिक्षण विभागाने पुढील प्रमाणे अहवाल मा.स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे.

**भांडार वस्तु खरेदीतील अनियमितता :**

शासन निर्णय (उद्योग उर्जा व कामगार विभाग) क्रमांक भांखस १०८८ (२५१२५/उद्योग-६, दिनांक ०२ जानेवारी १९९२ व भांखस १०९३/१६३५ उद्योग-६ दि.१६ जुलै १९९३ नुसार भांडार वस्तु खरेदी बाबत सविस्तर शासनादेश / सुचना दिलेल्या आहेत. त्यात पुढील सुचनांचा समावेश आहे.)

अ) सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने रू.१०००/- पर्यंत विना दरपत्रक खरेदी करणे.
ब) रू. १०००/- वरील व रू.५०,०००/- पेक्षा कमी दरपत्रके मागवून खरेदी करणे.
क) रू.५०,०००/- व त्यापेक्षा अधिक निविदा मागवून खरेदी करणे.

उक्त शासनादेशाचे पालन न केल्यामुळे सर्व शिक्षा अभियानांतर्गत खरेदी मध्ये अनियमितता आढळून आली.

## १. **विना निविदा खरेदी :**

| अ. क्र. | प्रमाणक क्र. | दिनांक | एजन्सीचे नांव | खरेदी तपशील | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५२ | ३१.१०.२००७ | अमय ट्रेडर्स ,औरंगाबाद | इन्वर्टर | ८३,२१५/- |
| २ | ६५ | २७.११.२००७ | मे.यश ट्रेडर्स कं.औरंगाबाद | स्टेशनरी | ५४,१३७/- |
| ३ | ११४ | २६.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | फ़र्निचर | ९९,९४५/- |
| ४ | ११७ | २६.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | फ़र्निचर | ९९,९४५/- |
| ५ | ११७ | २६.०२.२००८ | मे.वैष्णवी इंटरप्रायझेस औरंगाबाद | कॅनवस कॅप्स | ५५७०८/- |
| ६ | ११९ | २९.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | कंपास टिफ़ीन वॉटर बॅग | १२७९७३/- |
| ७ | १२० | २९.०२.२००८ | मे.औरंगाबाद कन्झ्युमर को.ऑ.सोसायटी औरंगाबाद. | खेळणी | १४९९५०/- |
| ८ | १५२ | ३१.०३.२००८ | यश ट्रेडर्स कं.औरंगाबाद | ऑफ़िस व ट्रेनिंग हॉल नुतनीकरण | ६२५०६/- |
| ९ | १५३ | ३१.०३.२००८ | ए ॲन्ड एम डिझायनर औरंगाबाद | डिजीटल बॅनर्स | ६०५६३/- |
| १० | १५७ | ३१.०३.२००८ | सुयोग आर्ट मटेरियल पुणे | आर्ट ट्रेनिंग | ३१२६४५/- |
| ११ | १५९ | ३१.०३.२००८ | मे. झुम इन्फ़ो सोल्युशन प्रा.लि. | मटेरियल | २,३२,७४६/- |
| | | | | | १२,३९,३८८/- |

वरील खरेदी करतांना शासन परिपत्रक क्र. शिक्षण विभाग एम आय एस /१०६८/६८४-६ दिनांक २७ ऑगस्ट १९७० चा आधार घेतला आहे. सदरील आदेश शासन निर्णय दिनांक ०२ जानेवारी १९९२ नुसार निष्प्रभ झालेले आहेत.

उपरोक्त लेखापरीक्षण अहवालातील सूचना भविष्यातील खरेदी मध्ये अनियमितता टाळाव्यात या उद्येशाने दिलेल्या होत्या. तथापि त्याचाही उपयोग झाल्याचे दिसून येत नाही.

**चौकशीचे निष्कर्ष व अभिप्राय :**

१. शासन निर्णय दि.०२ जानेवारी १९९२ व दि.१६ जुलै १९९३ नुसार रू.५०,०००/- व त्यावरील खरेदी जाहिर निविदेद्वारे करणे अपेक्षित आहे. वास्तवीक पाहता सदरच्या शासन निर्णयातील तरतूदी आताही अबाधीत आहेत आणि त्या अद्यापी निष्प्रभ झालेल्या नाहीत.

२. महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग तर्फे निर्गमित शासन निर्णय क्र.सपस १०१०/प्रक१६/२४ स मंत्रालय, मुंबई ३२ दि.३० ऑगस्ट २०१० मध्ये सुध्दा राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये , शासकीय महामंडळे इत्यादी संस्थांना त्यांच्या दैनंदिन कामकाजाकरीता आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तु, कापड, अन्नधान्य, कार्यालयीन स्टेशनरी, उपकरणे, शालेय साहित्य, मोड्युलन फ़र्निचर व कृषि प्रक्रिया उद्योगाकरीता लागणारी यंत्रसामुग्री (आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय मानांकित उदा.आय.एस.ओ./बी.आय.एस/सी.एफ़.टी.आर.आय.इत्यादी) तसेच इतर नित्योपयोगी वस्तु या वस्तुंची खरेदी दि महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फ़ेडरेशन लि. मुंबई यांच्याकडून प्राधान्याने करण्यात यावी.

एखाद्या वस्तुंचा पुरवठा करताना खाजगी व्यापारी व महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फ़ेडरेशन लि. मुंबई यांचे दरपत्रक / **निविदा जर समान रकमेच्या** आल्यास महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फ़ेडरेशन लि., मुंबई यांना प्राधान्य देऊन त्यांना साहित्य पुरवठ्याचे काम देण्यात यावे. एकावेळी रूपये १०००/- पेक्षा कमी किंमतीची एकूण खरेदी असल्यास, सक्षम अधिकाऱ्याच्या मते महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील तरतूदींचे पालन करणे ज्यावेळी शक्य नसेल त्यावेळी कमीत कमी तीन दरपत्रके मागविण्याची गरज नाही. अशी खरेदी शक्यतो मान्यताप्राप्त सहकारी ग्राहक भांडारातून करणे आवश्यक आहे.

उपरोक्त शासन निर्णय निविदा काढण्याबाबत स्वयंस्पष्ट असतांनासुध्दा शिक्षण विभागाने जाहीर निविदा न काढता खरेदीचा प्रस्ताव ठेवल्याचे दिसून येते.

३. **महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्या पत्र क्र.मप्राशिप/सशिअ/LEP/२०१०-११/ ४४०४ दिनांक २८.१०.२०१०** मध्ये असे कळविले आहे की, महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स . फेडरेशन लि. मुंबई यांनी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्राप्त असलेल्या निधीमधून गणित, विज्ञान, भूमिती, इंग्रजी,लेप व भूगोल किट तसेच प्रयोगशाळा साहित्य खरेदीसाठी दर कार्यालयास कळविले असून **शासन निर्णय दिनांक २३.५.२००७ नुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फ़ेडरेशन लि.मुंबई यांच्याकडून खरेदी करण्याबाबत शासनाने निर्देशित**

**केलेले आहे. या सूचना दिनांक २.१.१९९२ व दिनांक १६.७.१९९३ च्या शासन निर्णयाला छेद देणा-या असल्याने आणि शासनाच्या खरेदीबाबतच्या धोरणाचे उल्लंघन करणा-या दिसून येतात. अशा चुकीच्या सूचनांमुळे सदरील खरेदी झाल्याची शक्यता आहे.**

४. महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचेकडूनच खरेदी करण्याचा स्पष्ट असा प्रस्ताव विभागाने लेखा शाखेकडे व मा.आयुक्तांकडे सादर केलेला नव्हता फक्त प्रकल्पाचे नियोजन व खर्चाचा प्रस्ताव सादर केला होता.

५. मा.आयुक्तांच्या मान्यतेनंतर महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचे दिनांक २८.१०.२०१० च्या पत्रानुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचेकडून खरेदीचा प्रस्ताव विभागाचे स्तरावरच अंतिम केल्याचे दिसून येते. यास लेखा शाखा व मा.आयुक्त यांची मान्यता नाही.

६. शासन निर्णयाच्या आधारे जाहिर निविदा मागवून खरेदी केली असली तर स्पर्धात्मक दर प्राप्त होवून निश्चीतच महानगरपालिकेचा आर्थिक फायदा झाला असता परंतु उपरोक्त प्रकरणात शासन निर्णयाची अमलबजावणी झालेली नसल्यामुळे महानगरपालिके चे आर्थिक नुकसान झाल्याची शक्यता आहे.

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.
# शिक्षण विभागा अंतर्गत सन २०१०–११ या आर्थिक वर्षात खरेदी करण्यात आलेल्या स्कुलबॅग (दप्तर ) खरेदी करण्याबाबत प्राथमिक चौकशी अहवाल.

## प्रस्तावना :

औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्तव्यातील एक भाग म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. औरंगाबाद मनपा हद्दीत असलेल्या शाळांमधून १९९२१ विद्यार्थी शिक्षणाचे धडे गिरवीत आहेत. या विद्यार्थ्यांना शाळेत जाताना त्यांचेकडील शालेय साहित्य जसे वही, पुस्तके, पाटी, कंपासपेटी, पेन, पेन्सिल इत्यादी साहित्य व्यवस्थितपणे शाळेत नेता यावी या दृष्टीने मनपा प्रशासनासमोर विद्यार्थ्यांसाठी "स्कुलबॅग" दप्तर खरेदी प्रस्ताव समोर आला आणि त्या दृष्टीने शिक्षण विभागाने खरेदीचा प्रस्ताव तयार केला.

शिक्षण विभागाने खरेदी प्रस्ताव सादर करतांना शासन निर्णयाचा आधार न घेता खरेदी केल्याच्या आरोपासह दिनांक १७.२.२०११ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विस्तृत चर्चा झाली आणि दोषी विरूध्द कार्यवाही करण्याची मागणी समोर आली.

**मा.महापौर यांचे चौकशी बाबतचे आदेश :**

सदरील बाब ही अंत्यत गंभीर स्वरू पाची असून महानगरपालिकेची प्रतिमा मलीन करणारी आहे तसेच ही कार्यपध्दती शंका निर्माण करणारी आहे. अशी सभागृहात चर्चा झ ााल्यांनंतर मा.महापौर यांनी त्यांचे आदेश क्र. मनपा/महापौर/७४१/२०११, दिनांक १८.०२.२०११ अन्वये लेखा परिक्षण करण्याबाबतचे आदेश दिले.

**मा.आयुक्त यांच्याही चौकशीच्या सूचना :**

मा.आयुक्त यांनी दप्तर खरेदी संचिकेतील पान क्र.७ वर चौकशी करणे बाबत व अहवाल सादर करणे बाबत सूचना दिल्या आहेत.

## प्राथमिक चौकशी अहवाल

**दप्तर खरेदी प्रकरणाचा प्राथमिक चौकशी अहवाल पुढील प्रमाणे आहे.**

शिक्षण विभागातील लिपीक श्री.सलमान यांनी दिनांक २४.९.२०१० रोजी सादर केलेल्या टिपणी मध्ये विद्यार्थी विशेष कल्याण योजना या अर्थसंकल्पीय लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीतून १९९२१ विद्यार्थ्यांसाठी रू.२१७/-प्रती दप्तरा प्रमाणे रू.४२,६३,०९४/- रकमेचा खरेदी प्रस्ताव सादर केला त्याचे विवरण खालील प्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | विनिर्देश | मूळ दर प्रति नग | व्हॅट | रूपये | एकूण दर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांचे दप्तर (३ कप्पे असलेले) | रेक्झीन १२×१८ | रू.१९०/- | १२.५% | २४.०० | २१४/- |

रक्कम रू.४२,६३,०९४/- ची दप्तर खरेदी प्रस्तावित करतांना ही खरेदी निविदा न मागविता सरळ महाराष्ट्र स्टेट को.ऑप. फ़ेडरेशन लि.मुंबई विभागीय कार्यालय औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास दरपत्रक मागविले.

या प्रस्तावित खरेदीसाठी तत्कालीन शिक्षणाधिकारी तथा प्रकल्प संचालक आणि प्रभारी उपआयुक्त (प्र), यांनी महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर्स फ़ेडरेशन लि. मुंबई यांचे पत्र आणि दिनांक २३ मे २००७ च्या शासन निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कन्झ्युमर्स फ़ेडरेशन लि.मुंबई या संस्थेकडून प्राधान्याने खरेदी करावी असे सूचित केले आहे पुढे असेही नमूद केले आहे की, "मान्य झाल्यास विहित समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल." त्यानंतर संचिका लेखा विभागाच्या अभिप्रायासाठी लेखा विभागाकडे पाठविली.

लेखा विभागातील कर्मचाऱ्यांनी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध असल्याबाबत अभिप्राय नोंदविले आणि लेखापाल यांनी दिनांक २३ मे २००७ चा शासन निर्णयाचे आधारे खरेदी करण्यास प्रस्ताव मान्यतेस्तव सादर केला. लेखाधिकारी यांनी प्रस्ताव विचारार्थ सादर अशी टिपणी नोंदविली तर मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्तावित खरेदी ही रू.२० लक्षा पेक्षा जास्त असल्यामुळे मा.महापौर यांचे मान्यतेने मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव ठेवणे बाबत अभिप्राय नोंदवून मा.आयुक्त यांचेकडे संचिका सादर केली. त्यानंतर मा.आयुक्त यांनी दप्तर खरेदी प्रस्तावास मान्यता दिली.

मा.आयुक्तांच्या मान्यतेनंतर दप्तर खरेदीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला.

**मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.२११ दिनांक १८.१.२०११ रोजी संपन्न झालेल्या सभेमध्ये प्रस्ताव पुढील प्रमाणे पारीत केला.**

" प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग (दप्तर) खरेदीसाठी अंदाजे ४२,५८,११४/- रूपये अपेक्षित व महाराष्ट्र शासन निर्णय सपस-१००६ /प्रक्र-३३७/२४ स, मंत्रालय मुंबई दिनांक २३ मे २००७ नुसार महाराष्ट्र स्टेट को- ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फ़ेडरेशन लि. ८७-ए, राज चेंबर्स पाचवा मजला, देवजी रतनशी मार्ग दाणाबदर मुंबई या संस्थेकडून खरेदी करणेस मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. "

दप्तर खरेदीच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर दप्तराचा नमुना प्रमाणित करण्यासाठी समिती गठीत करण्यासाठी प्रस्ताव सादर केला. त्यात सभापती, शिक्षण समिती, उपआयुक्त (प्र), मुख्य लेखाधिकारी, प्रकल्प संचालक, शिक्षणाधिकारी यांचा समावेश आहे. या समितीस मा.आयुक्त यांनी मान्यता देण्यापूर्वीच " चर्चा करावी ," असे उपआयुक्त (प्र) , यांना दिनांक ५.२.२०११ रोजी संचिकेत सूचित केले आहे.

**चौकशीचे निष्कर्ष व अभिप्राय :**

१. शासन निर्णय २ जाने.१९९२ व त्यातील सुधारीत तरतूद दिनांक १६ जुलै, १९९३ नुसार रू.५०,०००/- च्यावरील खरेदी करावयाची असल्यास जाहीर निविदेद्वारे खरेदी करणे आवश्यक आहे.

२. संचिकेत दप्तर खरेदी प्रस्तावात दिनांक २३ मे २००७ च्या शासन निर्णयाचा आधार देवून खरेदी प्रस्तावित केली आहे. महाराष्ट्र शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचे शासन निर्णय क्र.सपस १००६/प्रक ३३७/२४ स, दिनांक २३ मे २००७ अन्वये राज्यातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, शासकीय महामंडळे इत्यादी यांनी त्यांना दैनंदिन कामकाजात आवश्यक असणारी कार्यालयीन स्टेशनरी, संगणकीय स्टेशनरी, उपकरणे, शालेय साहित्य, तसेच इतर नित्योपयोगी वस्तुची खरेदी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कन्झ्युमर्स फ़ेडरेशन लि. ८७-ए, राज चेंबर्स, देवजी रतनशी मार्ग, दाणाबंदर, मुंबई ४०० ००९ या संस्थेकडून प्राधान्याने करावी असे नमूद केले आहे. प्राधान्याने याचा अर्थ त्यांचेकडूनच खरेदी करावी, असा होत नाही.

३. महाराष्ट्र शासनाचे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.सपस १०१०/ प्र.क्र.१६ /२४ स, दिनांक ३० ऑगस्ट,२०१० मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे.

" राज्यातील सर्व शासकीय /निमशासकीय कार्यालये, शासकीय महामंडळे इत्यादी संस्थांना त्यांच्या दैनंदिन कामकाजाकरीता आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तु, कापड, अन्नधान्य, कार्यालयीन स्टेशनरी, उपकरणे, शालेय साहित्य, मोड्युलन फ़र्निचर व कृषि प्रक्रिया उद्योगाकरीता लागणारी यंत्रसामुग्री (आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय मानांकित उदा.आय.एस.ओ/ बी.आय.एस / सी.एफ़.टी. आर . आय इत्यादी) तसेच इतर नित्योपयोगी वस्तु या वस्तुंची खरेदी " दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फ़ेडरेशन लि. मुंबई " यांच्याकडून प्राधान्याने करण्यात यावी.

एखाद्या वस्तुंचा पुरवठा करताना खाजगी व्यापारी व महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फ़ेडरेशन लि. मुंबई यांचे दरपत्रक / **निविदा जर समान रकमेच्या** आल्यास महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कंझ्युमर्स फ़ेडरेशन लि., मुंबई यांना प्राधान्य देऊन त्यांना साहित्य पुरवठ्याचे काम देण्यात यावे. एकावेळी रूपये १०००/- पेक्षा कमी किंमतीची एकूण खरेदी असल्यास, सक्षम अधिकाऱ्याच्या मते महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील तरतूदींचे पालन करणे ज्यावेळी शक्य नसेल त्यावेळी कमीत कमी तीन दरपत्रके मागविण्याची गरज नाही. अशी खरेदी शक्यतो मान्यताप्राप्त सहकारी ग्राहक भांडारातून करणे आवश्यक आहे. "

उपरोक्त शासन निर्णय निविदा काढण्याबाबत स्वयंस्पष्ट असतांनासुध्दा शिक्षण विभागाने जाहीर निविदा न काढता खरेदीचा प्रस्ताव ठेवल्याचे दिसून येते.

४. सदरील प्रकरणी संबंधित लिपीक, शिक्षण विभाग, तत्कालीन शिक्षणाधिकारी व प्रकल्प संचालक तथा प्रभारी उपआयुक्त (प्र) व लेखा विभागातील कर्मचारी/ अधिकारी यांनी टिपणी मध्ये

त्यांचे अभिप्राय नोंदविलेले आहेत. त्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. तथापि, मा.आयुक्त, यांचेकडे खरेदी प्रस्ताव सादर करण्यापूर्वी संचिकेतील टिपणी मध्ये संबंधित कर्मचारी वा अधिकारी यांनी खरेदी बाबतच्या शासन निर्णयातील खरेदी बाबतच्या तरतूदी व शासन धोरणाबाबत सविस्तर व स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदविणे आपेक्षित होते. तथापी सदरील प्रकरणी मा.आयुक्तांकडे पाठविलेल्या प्रस्तावात असे स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदविलेले दिसून येत नाहीत.

५. सदरील संचिकेतील पृष्ट क्र.७ वर मा.आयुक्त यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी दप्तर खरेदीचा प्रस्ताव रद्द केला आहे.

६. दप्तर खरेदी प्रकरणी दिनांक १७.२.२०११ रोजी मा.सर्वसाधारण सभेमध्ये वादळी चर्चा झाली म्हणून ही बाब समोर आली. अशाच पध्दतीने जर विना निविदा खरेदी झाली असती तर महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असते.

# मे.सेल ॲड्स एजन्सी नियुक्तीबाबत चौकशी अहवाल.

शहरात जाहिरात फ़लके, किऑक्स, ॲड पोल्स व होर्डिंग्ज, लावण्यासंदर्भात महानगरपालिकेने दिनांक ८.१०.२००३ रोजी मे. सेल ॲड्स एजन्सीला मान्यता दिली आहे. त्यानुसार एकूण २५२ होर्डिंग्ज, १५०० किऑक्स व ५०० ॲड पोल्स लावण्यास मान्यता दिलेली आहे.

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे आदेश क्र. मनपा/मआ/स्वीस/२०१० / २५६ , दिनांक ३.६.२०१० अन्वये सदरील जाहिरात एजन्सी संदर्भात चौकशी करण्याचे आदेशित केले आहे.

औरंगाबाद शहरात जाहिरात होर्डिंग्ज, किऑक्स ॲडपोल्स आणि जाहिरात फ़लक लावण्याकरीता मे.सेल ॲड्स या एजन्सीला उपायुक्त (म), महानगरपालिका,औरंगाबाद यांनी दिनांक ११.७.२००३ च्या कार्यादेशानुसार व दिनांक ८.१०.२००३ च्या सविस्तर आदेशानुसार परवानगी दिलेली होती. जाहिरात ग्रुप ४ ते १९ मधील एकूण १६ कॅटेगिरी A, B व C असे एकूण २५२ होर्डिंग्ज, १५०० किऑक्स व ५०० ॲडपोल्स लावणेस अनुमती होती. करारनाम्यानुसार (अट क्र. १-८ (ए))सदरील एजन्सीने रक्कम रू.३८,८१,२५१/-, च्या ५०% रक्कम करारनामा करतेवेळी व उर्वरीत ५०% रक्कम तद्नंतर सहा महिन्यांच्या आत महानगरपालिकेत भरणा करणे आवश्यक होते. त्यापैकी पहिला हप्ता रू.१९,४०,९२६/- चा भरणा केल्याचे दिसून येतो. तथापि त्यानंतर उर्वरीत रू.१९,४०,९२६/- चा भरणा केलेला नसल्याचे दिसून येते. ज्या दिवसापासून रक्कमभरणा केलेली नाही. त्या दिवसापासून वार्षिक १८% व्याजासह रक्कम अदा करणे आवश्यक होते. (अट क्र. १-८ (बी).

मे.सेल ॲड्स या जाहिरात धारकाने शहरातील रस्ता दुभाजकांमधील विद्युत खांबावर किऑक्स व ॲड पोल्स आणि फ़ूटपाथवर बऱ्याच ठिकाणी पूर्वीचे एजन्सी धारकाने लावलेले ॲड पोल्स व किऑक्सवर काहीजण विना परवाना जाहिराती लावून प्रसारीत करीत असल्याची दिनांक ६.८.२००३ ला तक्रार केली आहे.

मे.सेल ॲड्स या निविदाधारकास थकबाकी रक्कम रू.१९,४०,९२६/- चा भरणा करणे विषयी दिनांक १२.२.२००४, २५.३.२००४, २८.५.२००४ व दिंनांक २६.६.२००४ ला थकबाकी रकमेवर १८% व्याजासह ५ जुलै २००४ पर्यंत थकबाकी रक्कम भरणे विषयी मुदतीची सूचना (नोटीस) देण्यात आलेली आहे. सदरील निविदेच्या अट क्र. १.८ (बी) नुसार संबंधितांच्या बँक गॅरेन्टी मधून वसूलीसाठी दिनांक २२.९.२००४ रोजी उपायुक्त (महसूल) यांनी रू.५७,१३,०५२/- ची थकबाकी रक्कम भरण्यासाठी अंतिम नोटीस दिली होती. संबंधित एजन्सीने मा.न्यायालयातून स्थगिती आदेश क्र. ३४३/२००४ दिनांक ३.११.२००४ ला उपरोक्त नोटीसीला व महापालिकेस पुढील कार्यवाहीस स्थगिती घेतली होती. मा.जिल्हा न्यायालयाने ३४३/२००४ या प्रकरणाला दिनांक १६.८.२००५ रोजी सेल ॲड कंपनीने १५ दिवसाचे आत

जाहिरात कराची थकित रक्कम जमा करणेसंबंधी आदेशित केले असल्याचा उल्लेख संचिकेतील टिपणी पान क्र.एनएस-७६ वर नमूद केले आहे. या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने कोणताही मनाई हुकुम वा स्थगिती आदेश दिलेला नाही. त्यामुळे संबंधित एजन्सीच्या बँक गॅरेन्टीतून रक्कम रू.३,८८,१८६/- वसूल करण्याबाबत दिनांक १२.९.२००५ रोजी डेव्हलपमेंट क्रेडीट बँक औरंगाबाद यांना पत्र देण्यात आले. त्यानुसार संबंधित बँकेच्या ब्रॅन्च मॅनेजरकडून रक्कम रू.३,८८,१८६/- चे डीडी/पे ऑर्डर दिनांक १६.९.२००५ रोजी प्राप्त झाले म्हणजेच संबंधित जाहिरात एजन्सीकडून सुरूवातीची जमा रक्कम रू.१९,४०,९२६/- व त्यांच्या बँक गॅरेंटीतून मिळालेली रक्कम रू.३,८८,१८६/- अशी एकूण रक्कम रू.२३,२९,११२/- वसूल झाले आहेत.

## मा.लवादाचा (आरबीट्रेटर) निर्णय :

औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये जाहिरात फ़लक, ॲड पोल्स व किऑक्स अशाप्रकारे मे.सेल ॲड्स यांनी जाहिरात केलेली आहे. सदरील जाहिरात शूल्क व कर वसूली प्रकरणात सदर एजन्सीने दाखल केलेल्या आरबीट्रेशन प्रोसेडिंगमध्ये लवाद प्रमुख मा न्यायमूर्ती श्री.नरेंद्र पी.चपळगांवकर यांनी दिनांक ३.६.२००८ रोजी अवॉर्ड घोषित करून मे.सेल ॲड्स यांना रक्कम रू.५२,४१,३१६/- महानगरपालिकेत भरणा करणे बाबतचा निर्णय दिला आहे. त्याच बरोबर सदरील निर्णयातच असेही नमूद केले आहे की, अवॉर्ड घोषित केलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक ३.६.२००८ पासून एक महिन्यात महानगरपालिकेस उक्त नमूद रक्कम रू.५२,४१,३१६/- भरणा करणेबाबत आणि सदरील रकमेचा भरणा न केल्यास दिनांक ३.६.२००८ पासून नऊ (९%) टक्के प्रमाणे व्याजासह रकमेचा (भरणा करेपर्यंत) भरणा करण्याचे आदेशित केले आहे. तसेच सदरील प्रकरणात दिनांक ३.६.२००८ च्या आवॉर्डनुसार दिनांक ८.१०.२००८ रोजीच सदरील एजन्सीबरोबरचा कराराचा कालावधी संपलेला आहे. त्यामुळे सदरील एजन्सीने लावलेले जाहिरात फ़लक, ॲडपोल्स व किऑक्स हे अनधिकृत असून ते तात्काळ काढून घेण्याच्या सूचना दिनांक १०.८.२००९ रोजीच्या पत्राने दिल्याचे दिसून येते पण त्यानंतर काहीही कार्यवाही झालेली नसल्याचे दिसून येते.

## दीर्घ काळ संचिका प्रलंबित :

संपूर्ण महानगरपालिका कार्यक्षेत्रात सदरील जाहिरात एजन्सीतर्फ़े चालू असलेल्या जाहिरात प्रसिध्दीमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असून फ़ेर निविदा काढल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात ५० ते ६० लाखाची प्रतिवर्ष वाढ होण्याची शक्यता असल्याचे तत्कालीन मालमत्ता अधिकाऱ्यांनी दिनांक २६.१०.२००६ रोजी नमूद केले आहे. त्यानंतर दिनांक १.११.२००६ रोजी तत्कालीन विधी सल्लागारांनी असे मत नोंदविलेले आहे की, मा.सभापती यांचे दालनात झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार आणि मा.न्यायालयांनी प्रकरणाची सद्यस्थिती लक्षात घेता सेल ॲड्स यांनी लावलेले नविन जाहिरात फ़लक तात्काळ काढणे योग्य राहील त्यावर मा.न्यायालयाचा प्रतिबंध नाही. त्याच दिवशी जाहिरात फ़लक काढून टाकण्याच्या कार्यवाहीबाबत तत्कालीन उपायुक्त (महसूल) व मालमत्ता अधिकाऱ्यांनी संबंधितांना सूचनाही दिल्याचे दिसून येते.

त्यानंतर सदरील प्रकरणाची संचिका मालमत्ता विभागाने त्यांचे जा.क्र.११०८ दिनांक ३.१०.२००७ अन्वये विधी विभागास पाठविली व विधी विभागाने ती त्यांचे आवक क्र. एल.ए.१००४ दिनांक ३.१०.२००७ अन्वये स्वीकारल्याची संचिकेवर स्पष्ट नोंद आहे. तसेच सदरची संचिका दिनांक ०५.०१.२००९ रोजी विधी विभागाने त्यांचे जावक क्रमांक एल.ए.१३/०९ अन्वये मालमत्ता विभागास विना अभिप्राय पाठविलेली स्पष्टपणे दिसून आली. एक वर्ष व तीन महिन्याच्या प्रचंड कालावधीत विधी विभागाने काय कार्यवाही केली त्याचा सदरील संचिकेवरून बोध होत नाही.

## विभागातील अधिकाऱ्यांचा ढिसाळपणा :

सदरील प्रकरणात मा.लवादांनी दिनांक ३.६.२००८ रोजी आवॉर्ड घोषित केल्यानंतर त्यानुसार रक्कम रू.५२,४१,३४६/- (९% व्याजासह) वसूलही झालेले नाहीत आणि मे.सेल ॲड्स एजन्सीबरोबरचा करार दिनांक ८.१०.२००८ रोजी संपुष्टात येवूनही आजतागायत त्यांनी लावलेल्या जाहिराती, ॲड पोल्स व किऑक्स काढलेल्या नसल्याचे दिसून येते. सन २००८-०९ व सन २००९-१० चे महानगरपालिकेस याद्वारे मिळणारे उत्पन्नही बुडाले आहे. तद्वतच यासाठी नविन जाहिरातही अद्यापपर्यंत देण्यात आलेली नसल्याचे दिसून येते. प्रशासनाने या संदर्भात ठोस अशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. विधी विभागात एकावेळी दिनांक ३.१०.२००७ ते ५.१.२००९ आणि दुसऱ्यावेळी दिनांक १२.०१.२०१० ते १०.३.२०१० एवढ्या कालावधीसाठी सदरील प्रकरणाची संचिका का व कोणत्या कारणासाठी प्रलंबित होती याचाही बोध होत नाही. तसेच मालमत्ता विभागाने देखील या संचिकेबाबत विधी विभागाकडे पाठपुरावा वा चौकशी केलेली नाही. एकूणच या प्रकरणी विभागातील अधिकाऱ्यांचा ढिसाळपणा दिसून येतो. ज्यामुळे महापालिकेस प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.

## चौकशी समितीच्या शिफ़ारशी :

या प्रकरणात चौकशी समिती पुढील प्रमाणे शिफ़ारस करीत आहे.

१. मे.सेल ॲड्स कडून मा.लवादाच्या निर्णयानुसार रक्कम रू.५२,४१,३४६/- (९% व्याजासह) वसूल करावेत. तद्वतच सन २००८-०९ व सन २००९-१० मध्ये त्यांनी लावलेल्या जाहिरातीची रक्कम निश्चित करून ती देखील वसूली करणे.

२. जाहिरात कराराची मुदत संपल्यामुळे नविन निविदा काढून जाहिरातीचे काम त्वरीत देणे जेणेकरून महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल.

३. सदरील प्रकरणी संचिका खूप काळ प्रलंबित राहिल्याबद्दल व विलंबा बाबत संबंधितांचा खुलासा घेवून त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यासह योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणे.

# कामगार कल्याण निधी अंतर्गत बिनव्याजी कर्जाबाबत तपासणी अहवाल.

श्रीमती जनाबाई साळवे, मजूर वॉर्ड - अ व श्री. मुकुंद गायकवाड, कनिष्ठ लिपीक वॉर्ड-इ यांना कामगार कल्याण निधीमधून प्रत्येकी रू.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार रूपये फ़क्त) बिनव्याजी कर्ज देण्यात आलेले आहे. याच धर्तीवर श्री.भिमराव कचरू जाधव यांनी आपल्या मुलीच्या लग्नासाठी रू.५०,०००/- बिनव्याजी कर्जाची मागणी केली. परंतु नियमावलीत तरतूद नाही असे सांगून कर्ज नाकारण्यात आलेले आहे. असे नमूद करून या संपूर्ण प्रकरणाबाबत मा.महापौर ,महानगरपालिका,औरंगाबाद यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी आदेशित केल्यानुसार त्याचा तपासणी अहवाल पुढील प्रमाणे सादर करण्यात येतो.

१) मुख्यलेखाधिकारी, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी सदर संचिकेत श्रीमती जनाबाई साळवे यांनी वेतन अग्रीमाची मागणी केली आहे. लग्नासाठी वेतन अग्रीम देण्याची शासन निर्णयात तरतूद नाही. त्यामुळे अग्रीम देता येणार नाही. तथापि, महानगरपालिकेतील कर्मचारी कल्याण निधीतून अशा प्रकारच्या लग्न, वैद्यकीय खर्च ,उच्च शिक्षण इत्यादीसाठी अग्रीम देता येऊ शकते. सदरच्या अग्रीम वेतनातून समान हप्त्यात वसूल करता येईल. करिता कर्मचारी कल्याण निधीतून अग्रीम मंजूरीच्या धोरणात्मक निर्णयाकरीता प्रस्तावित करण्यात आले.

२. कामगार अधिकारी यांनी त्याच संचिकेत पुढे बिनव्याजी कर्ज मंजूर करण्याकरीता खालील प्रमाणे अटी व शर्ती प्रस्तावित केल्या –

१. बारा धनादेश स्वाक्षरी असलेले घेणे.

२. नोकरीचा आदेश /वेतनाचा तपशिल मागविणे योग्य.

३. रू.१०० च्या बॉण्डवर हमी घेणे योग्य.

४. तसेच कार्यालयाने पगारातून सलग बारा महिने कपात करून देण्याची हमी देणे बाबत

५. लेखा विभागाने कपातीची हमी घेऊन प्रत्येक महिन्यास मासिक हप्ता मा.अध्यक्ष साहेब, कामगार कल्याण निधी योजना यांच्या नांवे नियमित देणे योग्य राहील.

६. सर्व स.मा.कार्यकारी सदस्यांची कार्योत्तर मंजूरी घेणे योग्य.

७. बिन व्याजी कर्ज देण्याबाबत नियम व अटी धोरणात्मक निर्णय निश्चित झाल्याशिवाय कोणतेही कर्ज विषयक प्रकरणे हाताळणे योग्य होणार नाही.

उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहून तसेच मा.अध्यक्ष साहेब यांच्या दालनात झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने श्रीमती जनाबाई साळवे, सफ़ाई मजूर यांना त्यांच्या नातीच्या लग्नासाठी मागणी केल्या अन्वये तसेच मा.आयुक्त साहेब यांनी दिनांक १६.४.२०१०

रोजी आदेशित केल्या अन्वये त्यांना बिन व्याजी कर्ज रू.३०,०००/- (तीस हजार) देण्याबाबत विचार करणे योग्य असे नमूद केले आहे.

श्रीमती जनाबाई साळवे, यांच्याकडून उपरोक्त अटींची पूर्तता करून घेण्यासाठी प्रस्तावित केले.

४. मुख्य लेखाधिकारी यांनी १७.४.२०१० रोजी कर्मचारी कल्याण निधी समितीची बैठक आयोजित करून महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना कल्याण निधीतून रू.५०,०००/- पर्यंत (कमाल) बिन व्याजी कर्ज देणे बाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून उच्च शिक्षण, वैद्यकीय खर्च व मुलांच्या लग्नासाठी इ.बाबत कर्ज देता येईल व कर्ज रकमेची परतफ़ेड समान हप्त्याने मासिक वेतनातून कपात करून कर्मचारी कल्याण निधीत जमा करता येईल यासाठी कॅशबुक, कर्जप्रकरण नोंद वही ठेवण्यात काम विभागाने करावे.

कर्ज प्रकरण अंतिम / मंजूरी करणेसाठी विभागाने स्वतंत्र अटी व शर्ती तयार करून समितीची मान्यता घ्यावी. तसेच विशेष बाब म्हणून आजच्या बैठकीत श्रीमती जनाबाई साळवे ,सफ़ाई कर्मचारी यांना नातीच्या लग्नसाठी रू.३०,०००/- व गायकवाड मुकुंद काशिनाथ ,कनिष्ठ लिपीक, वॉर्ड -ई यांना वैद्यकीय उपचारासाठी रू.१०,०००/- कर्ज मंजूर करण्यात आले. त्यानुसार विभागाने कर्ज परतफ़ेड समान हप्ते पाडून कपात करण्याविषयीची कार्यवाही करणेच्या अधि न राहून संबंधितांना धनादेश अदा करणे बाबत मंजूरी देण्यात आली.

५. कामगार अधिकारी यांनी मा.आयुक्त यांची दिनांक १७.४.२०१० रोजी श्री.मुकुंद काशिनाथ गायकवाड यांच्या मेंदूच्या उपचारासाठी कामगार कल्याण निधीमधून रू.१०,०००/- ची मान्यता झाली तसेच कर्जाची परतफ़ेड सलग १० हप्त्याने करण्याच्या अटीवर बिनव्याजी कर्ज मंजूर करण्यात आले असून धनादेश क्र.०२५३५१, दिनांक १९.४.२०१० अन्वये देण्यात आला.

६. दिनांक १३.५.२०१० पर्यंत कामगार कर्मचारी यांच्याकडून बिनव्याजी कर्जासाठी २८ अर्ज प्राप्त झाले. परंतु संबंधितांनी नियमावलीची पूर्तता केलेली नाही कर्ज फ़ेडीबाबात मुख्य कार्यालयाचे हमीपत्र व इतर कागदपत्रांची पूर्तता झाल्याखेरीज लेखा विभागाने हमीपत्र दिल्याशिवाय कर्ज देणे योग्य होणार नाही व कर्जाची परतफ़ेड करता येईल.

अर्ज देतांना काही कर्मचाऱ्यांनी खोटया लग्नपत्रिका दाखल केल्या ज्यामुळे गरज असणाऱ्या कर्मचाऱ्यांना कर्ज देता येणार नाही. याबाबत शहानिशा केलीअसता बोगस प्रकरण सादर करण्यात आले आहे. त्याचा विचार करणे योग्य होणार नाही.

याबाबत एक समिती गठीत करून पुढील निर्णय घेणे योग्य वाटते. त्यामुळे कोणावरही अन्याय होणार नाही. तूर्त बचत खात्यामध्ये एकूण रू.६०,०००/- आहेत. उर्वरती सर्व रक्कम मुदत ठेवीने ठेवण्यात आलेली आहे. असे कामगार अधिकारी यांनी संचिकेत नमूद केलेले आहे.

नियमावली तयार करणेबाबत दिनांक १४.५.२०१० रोजी मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

६. कामगार अधिकारी संचिकेत नमूद करतात की, दिनांक २८.५.२०१० रोजी मा.आयुक्त यांच्याशी चर्चा झाल्यानुसार –

कामगार कल्याण निधी योजने अंतर्गत बिनव्याजी कर्जाबाबत या विभागात एकूण ३८ प्रकरणे प्राप्त झाली. त्यापैकी १८ ते २० प्रकरणे बोगस आहेत. प्रत्यक्ष चौकशी अंती खोट्या लग्न पत्रिका छापून सादर केलेल्या आहेत. तथा बऱ्याच कर्मचाऱ्यांच्या मुलांचे लग्न झालेले आहेत. तसेच कामगार कल्याण निधी योजने मध्ये शिल्लक पैसे नाहीत व नियम नियमावली तयार नाही. त्यासाठी उशिर लागणार आहे. तसेच नियमावली तयार करून मा.धर्मदाय आयुक्त यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदरील योजना हाती घेता येईल. तूर्त या योजनेस स्थगिती देऊन बंद करणे योग्य वाटते.

दिनांक २८.५.२०१० रोजी मा.आयुक्त यांनी प्रकरण तपासल्यानंतर अत्यंत नाराजी व्यक्त केली आहे. खोट्या पत्रिका छापणाऱ्यांना तात्काळ नोटीस काढा असे नमूद करून योजनेस स्थगिती दिली आहे.

## तपासणीतील निष्कर्ष :

- कामगार अधिकारी श्री.डी.बी.लोखंडे यांचे दिनांक १०.६.२०१० रोजीच्या मुख्य लेखापरीक्षक यांचे समोर प्रत्यक्ष कथनानुसार पूर्वी पासूनच त्यांचा कामगारांना कामगार निधीतून कर्ज देण्यास विरोध होता. तथापि मुख्य लेखाधिकारी व मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सहानुभूतीच्या दृष्टीकोनातून आणि विशेष बाब म्हणून श्रीमती जनाबाई साळवे यांना रू.३०,०००/- व श्री.मुकुंद गायकवाड यांना रू.१०,०००/- कर्ज मंजूर केले आहे. आता ३८ कामगारांनी कर्ज मागितले आहे. त्यात बोगस तर आहेतच पण असे कर्जाबाबत कामगार निधीच्या उपविधीत तरतूद नाहीत, नियम नाहीत असे असताना आणखी कर्ज दिल्यास माझ्या नोकरीस धोका पोहचू शकतो. त्यामुळे या प्रकरणी मी विरोध केला आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

वरील सर्व बाबींचा सर्व साकल्याने विचार केल्यास कामगार निधीतून अशा प्रकारे बिनव्याजी कर्ज देता येणार नाही. दोन प्रकरणी दिलेली कर्जे विशेष बाब म्हणून सहानूभूतीने मंजूर केलेली आहेत तेही नियमात बसत नाहीत. यात कामगार अधिकाऱ्यांचा दोष दिसत नाही.
यापुढे प्रशासनाने अत्यंत दक्षतेने काळजी घेऊन नियमानुसारच अशी प्रकरणे हाताळावीत आणि याची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. अशी संबंधितांना तंबी देण्याची शिफ़ारस करण्यात येते.

# होर्डींग फ़ी वसूलीच्या रकमेबाबत अनियमितता.

**प्रस्तावना :**

उपरोक्त विषयांकित संदर्भिय प्रकरणान्वये सन २००५-०६ वार्षिक अहवाल जा.क्र./मनपा/मुलेप/२००६/३६२, कार्यालय महानगरपालिका,औरंगाबाद दिनांक ०२.०९.२००६, नुसार मालमत्ता विभागाचे लेखापरीक्षण केलेल्या अहवालामध्ये पान क्र.९३-९८ वर होर्डिंग्ज फ़ी वसूलीच्या रकमोबबत अनियमितता दर्शविण्यात आल्या त्या खालीलप्रमाणे -

**<u>१. होर्डिंग, ॲडपोल्स इ.साठी निविदा मागविणे बाबत :</u>**

सन २००३-०४ या वर्षात विषयांकित प्रकरणी निविदा रक्कम (आधारभूत किंमत) रू.४३,४४६१८/- निश्चित करून निविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यामध्ये रू.४३,९७,८५१/- इतक्या अधिक रकमेची निविदा प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये वर्गवारी निहाय निविदा (Group wise) मागविण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

(१) होर्डिंगसाठी रू.२८,४४,६१६/- ही निर्धारित रक्कम असून त्यामध्ये १९ [illegible] आहेत. त्या प्रित्यर्थ तीन एजन्सी मिळून एकूण रू.२८,९७,८५१/- असे दर प्राप्त झाले असून ते रू.५३२३५/- ने जादा प्राप्त झाले आहेत.

(२) ॲडपोल्स, कियोस्क्स साठी अनुक्रमे रू.५.०० लक्ष व रू.१०.०० लक्ष रक्कम निर्धारित करून तितक्याच रकमेची निविदा प्राप्त झाली आहे. त्याचप्रमाणे सन २००४-०५ या वर्षासाठीचे दर रू.४३,४४,६१८/- इतके निर्धारित केले असता तीनही एजन्सीकडून प्राप्त दर हे एकूण रू.४५,६२,७६२/- प्राप्त झाल्याचे निदर्शनास येते. सदरचे दर हे रू.२१८१४४/- इतक्या जादा रकमेने प्राप्त झाले आहेत असे दिसते.

महानगरपालिकेने निविदा मागवितांना ५ वर्षासाठी निविदा दर मागविण्यात आल्याचे दिसून येते . त्यानुसार सन २००३-०४ ते सन २००७-०८ पर्यंत विविध जाहीरात फ़लकासाठी दर प्राप्त झाले आहेत. मात्र सन २००३-०४ व सन २००४-०५ या आर्थिक वर्ष संपल्यामुळे याच वर्षाबाबत तपासणी करण्यात आली असून त्या मधील बाबी खालील प्रमाणे निदर्शनास आल्या आहेत.

होर्डिंग व ग्लो-साईन साठीच्या ग्रुप (१) व (२)साठी मे.न्यूक्लियस साईटस,मुंबई यांचे तुलनात्मकदृष्ट्या दर जास्त आहेत , ग्रुप (३) करिता मे.न्यू नंदा पब्लीसिटी, नागपुर (रू.१५७०००) व ग्रुप (४) ते (२१) साठी मे.सेल ॲडस ,औरंगाबाद यांचे दर तुलनात्मक- दृष्ट्या जादा प्राप्त झाले आहेत.(रू.४०,२८,७६२/-). सदरचे दर हे सन २००३-०४ व सन २००४-०५ साठीचे आहेत. त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.८९ दिनांक १३.०३.२००३ नुसार निविदादरास मान्यता प्राप्त झाल्याचे दिसून येते. स्थायी समितीसमोर मात्र खालीलप्रमाणे वर्षनिहाय दर प्राप्त झाल्यानुसार प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सन २००३-०४ | रू.४३,९७८५१/- |
| २ | सन २००४-०५ | रू.४६,६२,७२२/- |
| ३ | सन २००५-०६ | रू.५०,४१,५१८/- |
| ४ | सन २००६-०७ | रू.५२,७६,४३०/- |
| ५ | सन २००७-०८ | रू.६१,६७,४२१/- |

(३) मे.सेल ॲडस्,औरंगाबाद यांचेकडून दिनांक ०८.०७.२००३ रोजी करारनामा करून घेण्यात आला. अटी/शर्तीनुसार ५०% रक्कम रू.१९४०९२६/- ही रक्कम पा.क्र.४०३४०, दिनांक ११.०७.२००३ अन्वये वसूल करण्यात आल्याचे दिसून येते.

तद्नंतर दिनांक ११.०७.२००३ रोजीच मे.सेल ॲडस् यांना दोन वर्षासाठी होर्डिंग, ॲडपोल्स व इतर लावण्यासाठी कार्यादेश देण्यात आला आहे.

(४) मे.न्यूक्लीयस साईटस्, मुंबई यांचेकडूनही करारनामा करून घेण्यात आला आहे. मात्र त्यावरील दिनांक नमूद करण्यात आलेला नाही. संबंधिताने अद्यापपावेतो ५०% रक्कम रू.१८०,५००/- महापालिकेकडे भरणा केलेला नाही तसेच त्यांना कार्यादिशही दिलेला नाही असेही दिसून येते. व त्यांचेकडून रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

(५) मे.न्यू नंदा पब्लीसिटी,नागपुर यांचेकडून करारनामा करून घेतलेला नाही. त्यांना कार्यादिशही देण्यात आलेला नाही असे दिसून आले. तसेच त्यांचेकडून रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.

वरील विवेचनावरून असे नमूद करण्यात येते की, मे.सेल ॲडस औरंगाबाद यांचेकडून सन २००३-०४ या वर्षातील थकित रक्कम रू.१९४०,९२६/- वसूल झालेली नाही. तसेच सन २००४-०५ या वर्षातील आधारभूत रक्कम/निविदा रकमेनुसार रू.४५,६२,७६२/- ही रक्कम सुध्दा वसूल झालेली नाही असे दिसते.

निविदा अटी/शर्ती व करारनामा अटी/शर्ती नुसार निविदेनुसार निश्चित केलेली रक्कम ही दोन समान हप्त्यामध्ये निविदा धारकाने महापालिकेस अदा करावी, तसेच अशी रक्कम ही दर सहा महिने या कालावधी मध्ये व सहा महिने संपण्यापूर्वी १५ दिवस अगोदर अदा करावी व अशी रक्कम विहीत कालावधीमध्ये अदा न केल्यास त्यावर १८% प्रतिवर्ष या दराने व्याज आकारून वसूल करण्यात येईल असे नमूद केलेले असतांनाही सन २००३-०४ या वर्षातील नंतरच्या सहा महिन्यांसाठीची रक्कम रू.१९,४०,९२६/- आणि १८% व्याज सहा महिन्यांसाठी रू.१७४६८३/- अशी मिळून रू.२११५६०९/- ही रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

(६) सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील मे.सेल ॲडस यांचेकडून निविदा रक्कम रू.४०२८७६२/- ही रक्कम वसूल झालेली नाही असे दिसून आले आहे.

## २. होर्डिंग फ़ी प्रित्यर्थ कमी वसुलीच्या रक्कमेबाबत अनियमितता :

विभागाकडून सन २००४-०५ या आर्थिक वर्षातीलच संचिका उपलब्ध करून देण्यात आल्या अशा संचिकांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

१. मे. उपेंद्र पब्लिसिटी,औरंगाबाद यांची सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी बाबतची संचिकाची तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, शहरातील विविध ठिकाणी सन १.४.२००४ ते ३१.३.२००५ या कालावधीसाठी विविध आकाराच्या होर्डींगसाठी प्रचलित दरानुसार रोषनाई प्रित्यर्थ २०% रक्कम वसूल केलेली नाही. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

(अ) S.F.S. कंपाऊन्ड जालना रोड ८०० चौ.फ़ुट रू.१७६४ X १२ = २११६८, २०% रोषणाई दर रू. ४२३४/- एकूण रू.२५४०२/- वसूल होणे आवश्यक होते मात्र रोषणाई प्रित्यर्थ २०% रक्कम रू. ४२३४/- वसूल केलेली नाही.

(ब) S.F.S. कंपाऊन्ड जालना रोड ८०० चौ.फ़ुट २६५० X १२ = ३१८००/- २०% रोषणाई दर रू.६३६०/- एकूण रू. ३८१६०/- वसुल होणे आवश्यक होते. मात्र रोषणाई प्रित्यर्थ २०% रक्कम रू. ६३६०/- केलेली नाही. परिणामी रक्कम रू.४२३४ + ६३६० = १०५९४/- कमी वसूल झालेली आहे.

सदरची रक्कम रूपये १०५९४/- तात्काळ वसूल करून अनुपालन सादर करण्याविषयी अर्धसमास पत्र क्र.२४, दि.०३.१२.२००५ अन्वये विभागास सूचित केले असता विभागाने सादर केलेले अनुपालन असमाधानकारक असल्याने आक्षेपित रक्कम वसूल करणे आवश्यक ठरते.

२. मे. हिन्दुस्थान पेट्रोलियम कार्पो.लि. यांची सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूलीबाबतची संचिका तपासली असता असे निदर्शनास आले की, क्रांती चौक येथे सन २००४-०५ साठी म्हणजेच दिनांक ०१.०७.२००४ ते दिनांक ३१.०३.२००५ पर्यंतच्या कालावधीसाठी ४५० चौ.फ़ू. व ८०० चौ.फ़ू. आकाराच्या होर्डिंगसाठी प्रचलित दरानुसार प्रतिवर्ष रू.४०६५६/- ही रक्कम वसूल केलेली नसल्याचे दिसून येते.

३. मे.नागपाल प्रोजेक्टस व कन्स्ट्रक्शन यांची सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूली बाबतची संचिका तपासल्या असता असे निदर्शनास आले की, एजन्सी मार्फ़त शहरातील विविध ठिकाणी सन २००४-०५ साठी म्हणजेच दिनांक १.६.०४ ते ३१.३.०५ पर्यंतच्या कालावधीसाठी विविध आकाराच्या होर्डिंगसाठी प्रचलित दरानुसार रू.१९,९४३/- वसुल केलेली नसल्याचे दिसून येते .

श्री.कैलास पंडीत, औरंगाबाद यांचे कडील औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील तापडीया सिटी सेंटर निराला बाजार येथील सन २००२-२००३ या आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूली बाबतची संचिका तपासली असता खालील प्रमाणे आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्या आहेत.

सन २००२-२००३ या वर्षातील चार विविध होर्डिंगसाठी एकूण रक्कम रूपये ४३२००.०० भाडे भरणा जरूरीचे होते मात्र संबंधिताकडून फ़क्त रक्कम रूपये ३२४००/- ही पावती क्रमांक ९५८९ दिनांक २६.८.२००२ रोजी वसूल झालेली आहे. म्हणजेच रूपये १०८०० /- कमी वसूल करण्यात आले आहेत.

संबंधिताकडील थकीत रक्कम वसूली बाबत अनुपालन अहवाल उलट टपाली कळविण्याबाबत अर्धसमास पत्र क्र.४५, दि.२१.१२.२००५ अन्वये विभागास सूचित करण्यात आले असून अनुपालन अद्यापपावेतो अप्राप्त आहे.

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

**सन २००२–०३ ते सन २००४–०५ मधील थकित रक्कम रू.१,२९,०३,०३२/– आजपावेतो वसूल करण्यात आलेली नाही.**

## ३. <u>अतिप्रदान रकमेबाबत :</u>

सन २००२-०३ या आर्थिक वर्षात जाहीरात धोरण ठरविण्याबाबत सर्वेक्षणासाठी निविदा मागविण्यात येवून दर वाटाघाटी अंती प्राप्त निविदाधारक मे.टंडन ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांची रू.४.५० लक्ष इतक्या रकमेची निविदा स्विकारण्यास दिनांक ०१.०१.२००२ रोजी आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याचे दिसते. त्यानुसार संबंधितास दिनांक २८.०१.२००२ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे. संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की,

संबंधित एजन्सीने दिनांक १४.०१.२००२ रोजी पत्र देवून सदरचे काम पूर्ण झाल्याचे कळविले आहे. या सर्वेक्षण कामा व्यतिरिक्त माहिती पुस्तिका व टेंडर फ़ॉर्म विहीत नमुन्यात तयार करून त्याचे देयक रू.६५६५६/- एजन्सीने सादर केले. सदरची रक्कम ५% कमी करून उर्वरित रक्कम अदा करण्यासाठी मा.आयुक्त यांनी दिनांक २८.०१.२००३ रोजी मान्तता दिली असल्याचे दिसून आले. सदरची रक्कम ही पूर्णपणे संबंधितास अदा केल्याचे प्रमाणक क्र. १२०३९, दिनांक २०.०२.२००३ नुसार निदर्शनास येते. म्हणजेच ५% रक्कम रू.३२८३/- संबंधितास जादा अदा करण्यात आली आहे.

सदरची जादा अदाईची रक्कम रू.३२८३/- संबंधिताकडून तात्काळ वसूल करून अनुपालन अहवाल पाठवावा, असे अर्धसमास पत्र क्र.२६, दि.०७.१२.२००५ अन्वये विभागास सूचित केलेले आहे. विभागाकडील खुलासा असमाधानकारक आहे.

## ४. <u>होर्डिंगच्या ठिकाणाच्या वर्गवारीबाबत :</u>

मालमत्ता विभागाकडील सन २००२-२००३ ते सन २००४-०५ या तीन आर्थिक वर्षातील होर्डिंग फ़ी वसूलीबाबत संचिकेच्या तपासणी अंतर्गत विभागाकडून सन २००४-०५ या वर्षीच्या संचिका लेखा परीक्षणास्तव उपलब्ध न करून देण्यात आल्या. तपासणी दरम्यान असे निदर्शनास आले आहे की, दिनांक २४.४.२००२ रोजीच्या सर्वसाधारण सभेतील ठरावानुसार होर्डिंगचे दर हे रस्त्याच्या वर्गवारीनुसार निश्चित करण्यात आलेले आहेत. मात्र विभागामार्फ़त रस्त्यांच्या वर्गवारी अंतर्गत करण्यात आलेल्या वर्गवारीचा तपशिल (म्हणजेच कोणत्या भागासाठी/रस्त्यासाठी कोणती वर्गवारी निश्चित करण्यात आली आहे.) विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आलेला नाही. त्यामुळे विभागामार्फ़त आकारण्यात आलेल्या होर्डिंगच्या दराबाबत व वर्गवारी बाबत तंतोतंत पडताळणी करणे शक्य झालेले नाही. विभागाने सादर केलेला खुलासा हा समाधानकारक नाही..

विभागाने जा.क्र.मनपा/मामअ/१५८४/२००६, दिनांक १२.७.२००६ नुसार अनुपालन सादर केले आहे मात्र पडताळणीस्तव पावती पुस्तके व इतर अनुषंगिक अभिलेखे उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनुपालन पडताळणी करणे शक्य झालेले नाही. आवश्यक ते अभिलेखे पडताळणीस्तव उपलब्ध करून द्यावेत असे लेखा परीक्षण विभागाकडील जा.क्र.मनपा/मुलेप/२००६/३१२,दिनांक २५.७.२००६ अन्वये विभागास कळविण्यात आले आहे.

उपरोक्त विषयांकित संदर्भिय प्रकरणान्वये आपणास कळविण्यात येते की, श्री.सुनिल पंढरीनाथ जाधव यांनी शहरामध्ये सार्वजकिन ठिकाणी अनाधिकृत होर्डींग, राजकीय नेत्यांचे वाढदिवसाचे होर्डींग पोस्टर्स लावण्यात येतात तसेच क्रांतीचौक या ठिकाणी स्वागत फ़लक वाढदिवस शुभेच्छा फ़लक लावण्यात येतात. त्या संबंधी कार्यवाही करण्याची याचिकेत विनंती केली आहे. त्यानुषंगाने दिनांक ४.२.२०१० रोजी मा.उच्च न्यायालयासमोर सुनावणी झाली असता सुनावणीच्या वेळी उपआयुक्त (सिडको) व मालमत्ता अधिकारी स्वत: उपस्थित होते व त्यामध्ये मा.उच्च न्यायालयाने कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेले आहे.

**रिट याचिका क्र.५४६/२००६ सुनिल पंढरीनाथ जाधव रा.एन–३ सिडको, औरंगाबाद.**
**विरूध्द महानगरपालिका,औरंगाबाद.**

याचिका धारक श्री.सुनिल पंढरीनाथ जाधव यांनी शहरामध्ये सार्वजनिक ठिकाणी, अनाधिकृत होर्डींग, राजकीय नेत्यांचे वाढदिवसाचे होर्डींग पोस्टर्स लावण्यात येतात तसेच क्रांतीचौक या ठिकाणी स्वागत फ़लक, वाढदिवस शुभेच्छा फ़लक, लावण्यात येतात त्या संबंधी कार्यवाही करण्याची याचिकेत विनंती केली आहे.

उपरोक्त याचिकेची दिनांक ०४.०२.२०१० रोजी मा.उच्च न्यायालयासमोर सुनावणी झाली असता, सुनावणीच्या वेळी मा.उपआयुक्त, सिडको, मालमत्ता अधिकारी स्वत: उपस्थित होते. सुनावणी दरम्यान मा.उच्च न्यायालयाने खालील प्रमाणे निर्देशित केलेले आहे.

१. शहरातील अनाधिकृत होर्डींग काढण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीचा ॲक्शन प्लॅन तयार करून सादर करणे बद्दल निर्देशित केले आहे.

२. सदरच्या अनाधिकृत होर्डींग काढण्यासाठी जे पथक निर्माण करावयाचे आहे त्या पथका बद्दलची माहिती, सदरील पथकास द्यावयाच्या सोयी, सुविधा या बाबतची माहिती.

३. अनाधिकृत होर्डींग किती दिवसात काढणार तसेच वाढदिवसासाठी लावण्यात येणारे तात्पुरते होर्डींगसाठी शुल्क / कर किती आकारणार या बाबतची माहिती.

४. शहरात लावण्यात येणाऱ्या विनापरवानगी होर्डींग लावणाऱ्या व्यक्तींविरूध्द काय कार्यवाही करण्यात येणार आहे ? दंड आकारण्यात येणार का ? असल्यास किती दंड लावण्यात येईल ? या बाबतची माहिती अपेक्षिलेली आहे.

५. वाढदिवसानिमित्त शुभेच्छुक जे होर्डींग लावतात त्या व्यक्तींकडून चार्ज वसूल करण्यात यावा.

**उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने ॲक्शन प्लॅन तयार करणेसाठी या प्रकरणातील ॲमेक्युऐस क्युरी (न्यायालयाचे मित्र) म्हणून उच्च न्यायालयाचे ॲड.तांदळे, महानगरपालिकेचे वकील ॲड. पगारे व प्रशासनीक अधिकारी यांनी एकतत्रित बसून संयुक्तिक चर्चा करून ॲक्शन प्लॅन तयार करावा. सदरील ॲक्शन प्लॅन सुनावणीच्या वेळी १०.०२.२०१० रोजी सदरील प्रकरण अंतिम करून निकाली काढण्यात येणार आहे. ॲक्शन प्लॅन नुसार कार्यवाही करण्यात आली नाही तर या बाबत जो संबंधित असेल, जबाबदार असेल त्या विरूध्द कन्टेमची कार्यवाही करण्यात येईल असे मा.उच्च न्यायालयाने मत व्यक्त केले आहे.**

**तरी उपरोक्त मा.उच्च न्यायालयाच्या दिलेल्या निर्देशाचे पालन करून कार्यवाही करण्यात यावी .**

**तसेच संदर्भ क्र.२ अन्वये दिनांक ६.२.२०१० च्या लोकमत मध्ये पान क्र.३ वरही बातमी प्रसिध्द झालेली आहे. त्यानुषंगाने या प्रकरणात कार्यवाही त्वरीत करून या विभागास कळविण्यात यावे.**

# सर्वे नं. १९/१, हिमायतनगर, हर्सुल, औरंगाबाद येथील जागेबाबत प्राथमिक चौकशी अहवाल.

मो. हिमायतनगर,सर्व्हे नं.१९/१ मधील अनधिकृत विकास कामाबाबत प्राप्त संचिका व अभिलेखांनुसार अर्जदार शे.इब्राहिम शेरू हुसैन पटेल व शे.जाबीरोद्दीन शे.शफीयोद्दीन, रा.फाजलपुरा औरंगाबाद यांनी दि.३०/९/२०१० रोजी मा.आयुक्त, महानगरपालिका यांना अर्ज करून सर्व्हे नं.१९/१ मो.हिमायतनगर औरंगाबाद येथील त्यांच्या मालकीच्या जमिनीवर श्री.सांडु धोंडिबा दुबे, अन्वर कादरी व त्यांचे साथीदार अनधिकृत प्लॉटींग करून विक्री करीत आहेत. करीता त्यांचेवर कार्यवाहीकरावी अशी लेखी मागणी दि.३०.९.२०१० रोजी केली आहे. सदर अर्जाची प्रत त्यांनी नगरसेवक श्री.अ.साजेद अ.सत्तार यांना दिल्याचे दिसून येते.

स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार यांनी सहाय्यक संचालक, नगररचना, औरंगाबाद यांना पत्र देवून सहाय्यक संचालक नगररचना यांचे पत्र क्र.भूमी अभियास/सर्व्हे क्र.१९/१/ मो.हिमायतनगर/ता.औरंगाबाद /स.स.औ/दि.६/२/२०१० या पत्राची प्रमाणित प्रत उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली आहे. त्यास अनुसरून सहाय्यक संचालक नगररचना यांनी पत्र क्र.मनपा/औरंगाबाद/नर/३/२०९९/२०१० दि.१९/१०/२०१० अन्वये लेखी उत्तर संबंधितास देण्यात आल्याचे दिसून येते. सदर पत्रानुसार स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार यांनी नमूद केलेली दि.६/२/२०१० चे पत्र या विभागाकडून देण्यात आल्याचे नसल्यामुळे सदर पत्राची प्रमाणित प्रत देता येणे शक्य नाही, असे कळविले आहे.

स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार यांनी दि. १२/११/२०१० रोजी प्रशासकीय अधिकारी, मनपा औरंगाबाद यांना पत्र देवून कळविलेकी, सर्व्हे नं.१९/१, मो.हिमायतनगर हे महानगरपालिकेचे आरक्षण प्रमाणे Green Belt (No Development Zone) असून श्री.अन्वर कादरी व श्री.सांडु धोंडिबा दुबे यांनी संगनमत करून खामनदीची जागा जी की, महानगरपालिकेची आहे त्या जागेवर अनधिकृतपणे कब्जा करून ५ एकर जमीन लोकांना वेगवेगळे प्लॉट करून खोटे कागदपत्रे व खोटे एन.ए.तयार करून अनेक लोकांची फसवणूक केली आहे. सध्या महानगरपालिकेच्या जागेवर प्लॉटींग करीत आहे व त्यासाठी त्यांनी नगररचना विभाग, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी न दिलेल्या पत्राचा उल्लेख करून खोटे कागदपत्रे तयार केले आहेत. तसेच सदर प्लॉटींगवर शेड टाकण्यात येत असून दगडलावून प्लॉटींग होतआहे, त्यामुळे त्वरीत कार्यवाही करून अवगत करण्याची अशी लेखी मागणी केली आहे.

सदर पत्रावर प्रशासकीय अधिकारी यांनी फाईलसह ठेवा असा दि.१३/११/१० रोजी अभिप्राय नोंदविल्याचे दिसून येते. त्यास अनुसरून तत्कालीन इमारत निरिक्षक श्री.संगेवार, वॉर्ड क्र.अ यांनी संचिकेत टिपणी सादर केली आहे. सदर टिपणीमध्ये त्यांनी, मो.हिमायतनगर येथे तक्रारीनुसार अतिक्रमण हटाव पथकाद्वारे पाहणी चौकशी केली असता नं.१९/१ येथे एकूण स्वत:ची २० गुंठे व महानगरपालिकेची जागा असे एकूण ५ एकर जागेमध्ये अनधिकृत रेखांकन व खुणा केल्याचे आढळून आले. जेकी तात्काळ दगडे व खुणा निष्कासित करण्यांत आले व शेडची पत्रे काढून १८ पत्रे फिल्टर बेड येथे ठेवण्यात आली. तसेच अनधिकृत रेखांकन करून, महानगरपालिकेच्या जागेवर प्लॉटिंग करून प्लॉट विक्री केल्याबाबतचा पंचनामा करण्यात आला आहे, असे नमूद केलेआहे व सदरची जागा नगररचना विभागाकडे

पाठविणे कामी प्रस्तावित केली आहे. सदर टिपणीस प्रशासकीय अधिकारी यांनी दि.१८/११/२०१० रोजी त्याच दिवशी संचिका नगररचना विभागाकडे वर्ग केल्याचे दिसून येते.

नगररचना विभागाने नमूद केलेल्या अभिप्रायानुसार सर्व्हे नं.१९/१ हिमायतनगर हा भाग महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार ना- विकास क्षेत्र (No Development Zone)असून सदर ठिकाणी कोणतेही विकास परवानगी दिलेली नाही असे नमूद करून खोटे कागदपत्रे तयार करून नागरिकांची फसवणूक केलेली असल्यामुळे संबंधितांविरूध्द योग्य ती कार्यवाही करावी अशी शिफारस करून दि.६/१२/२०१० रोजी सदरची संचिका पुन्हा प्रशासकीय विभागाकडे पाठविल्याचे दिसून येते.

स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार यांनी दि.२०/११/२०१० व दि.२९/११/२०१० रोजीच्या पत्रान्वये वादग्रस्त क्षेत्रावरील बांधकामाबाबत संबंधितांविरूध्द कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही व महानगरपालिकेच्या जागेवर सध्याही अतिक्रमण होत आहे असा लेखी अर्ज दिला आहे व त्यांचेविरूध्द सिटीचौक पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करावा असे अर्जात नमूद आहे. तथापि सदर अर्जावर कोणतीही कार्यवाही झाल्याचे संचिकेत दिसून येत नाही.

श्री. कादरी अन्वर अहेमद व श्री.कादरी इफ्तेखार अहेमद यांनी पोलिस निरिक्षक, पोलिस स्टेशन, बेगमपुरा यांनी इमारत निरिक्षक श्री.संगेवार यांनी कसलीही सूचना न देता आमच्या शेतातील चौकीदाराचे शेडच्या कामासाठी ठेवलेले पत्रे उचलून नेल्याबाबत दि.१२/११/२०१० रोजी तक्रार नोंदविलेली आहे. या तक्रारीमध्ये त्यांनी प्रामुख्याने असा उल्लेख केला आहे की, आमच्या शेतात दि.१२/११/२०१० रोज शुक्रवार दुपारी चौकीदाराच्या राहण्यासाठी पत्र्याच्या शेडचे बांधकाम सुरू होते, अचानक बांधकाम निरिक्षक श्री.संगेवार हे २० ते २५ लोकांच्या पथकासह आले आणि त्यांनी कसलीही पूर्वसूचना न देता, कसलाही आदेश न दाखविता, कसलीही नोटीस न देता, कसलेही स्पष्टीकरण देण्यास वेळ न देता, कोणताही खुलासा न देता आमच्या रोजंदारीवरील मजुराशी दादागिरी व शिवीगाळ करून, झटापटी करून आम्ही पोहोचण्याच्या आतच पत्रे व संबंधित सामान उचलून चोरासारखे पळवून नेले. मी नगर सेवक साजेद बिल्डरचा माणूस आहे त्यांचे नादी लागले तर तुम्हाला खूप महागात पडेल, त्यांच्या पाठीमागे संपूर्ण महानगरपालिका आहे आणि तुम्ही कुठेही काहीही बांधकाम केले तर ते पाडण्याचे आम्हाला मनपा आयुक्तांनी विशेष अधिकार दिलेले आहेत व तुम्हांला तुमचे सामान परत पाहिजे असेल आणि पुढील बांधकाम करावयाचे असेल तर आजच संध्याकाळपर्यंत पन्नास हजार रूपये मनपा कार्यालयात पोहोचवा असे सांगितले. असे लेखी नमूद केले आहे.

अन्य एक अर्जदार श्री.शे.इब्राहीम शेरू हुसैन पटेल व शे.जाबीरोद्दीन शे.शफीयोद्दीन,रा. फाजलपुरा औरंगाबाद यांनी मा.आयुक्त यांना दि. २९/११/२०१० रोजी वादग्रस्त जागा सर्व्हे नं.१९/१, हिमायतनगर,औरंगाबाद येथील आमच्या मालकीच्या जमिनीवर श्री.सांडू धोंडिबा दुबे, श्री.अन्वर कादरी व त्यांचे साथीदार हे अनधिकृतपणे प्लॉटींग करून विक्री करीत आहे, त्यावर कार्यवाही करणेबाबत विनंती केली आहे.

स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार यांचे पत्र (दिनांक नमूद नाही) व शे. इब्राहिम शेरू हुसैन पटेल यांचे पत्र (दिनांक नमूद नाही) असा संदर्भ देवून प्रशासकीय विभागामार्फत वादग्रस्त जागेवर तत्कालीन इमारत निरिक्षक वॉर्ड-अ श्री.शेख कादर यांनी दि.६/१२/२०१० रोजी सदर ठिकाणी असलेले साहित्य अतिक्रमण पथकामार्फत उचलून घेण्यास किंवा मालकी हक्काचे कागदपत्रे मागविणेबाबत सादर केलेले आहे. सदर टिपणीवर दिनांक नमूद नाही.

प्रशासकीय अधिकारी यांनी एफ.आय.आर. करणे, पंचनामा फोटो काढावेत व नोटीस देणे असे अभिप्राय दि.६/१२/२०१० रोजी नोंदविलेले आहेत.

दि.६/१२/२०१० रोजी महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार यांनी प्रस्तूत प्रकरणाबाबत तातडीने कार्यवाही करणेबाबत आग्रही भुमिका मांडली होती. सभागृहामध्ये सदर विषयावर बरीच चर्चा होवून प्रशासकीय अधिकारी व सहाय्यक संचालक नगर रचना यांचे प्रतिनिधी यांचे खुलासे घेण्यात आले आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून मा.सभापती,स्थायी समिती यांनी दोषीविरूध्द तात्काळ कार्यवाही करण्याचे, एफ.आय.आर. दाखल करण्याचे आदेशित केले. त्यास अनुसरून मा.आयुक्त यांनी श्री.एस.पी.खन्ना,उपअभियंता,नगररचना विभाग यांना स्थायी समिती सभा सोडून तात्काळ संबंधिताविरूध्द खोट्या कागदपत्रांच्या कारणावरून गुन्हा दाखल करण्याबाबत आदेशित केले. त्यानुसार श्री.एस.पी.खन्ना हे पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करणेसाठी रवाना झाले. प्रशासकीय अधिकारी यांनी सभागृहात खुलासा केला की, संबंधित इमारत निरिक्षक हे अनधिकृत प्लॉटींग व बांधकाम करणेचे प्रकरणाबाबत पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यासाठी गेले आहेत, असा खुलासा केलेला आहे. खोटी कागदपत्रे सादर केल्याचे कारणावरून संबंधिताविरूध्द तक्रार देणेसाठी श्री.खन्ना यांना आदेशित केल्यानंतर श्री.खन्ना बेगमपुरा व सिटीचौक पोलिस स्टेशन मध्ये गेले असता त्यांनी संबंधित पोलिस निरिक्षक यांची भेट घेतली व त्यांना प्रकरणाची माहिती दिली. याबाबत पोलिस निरिक्षक यांनी तक्रार नोंदविणेबाबत सक्षम अधिकारी यांचे आदेशाची प्रत व तसे लेखी पत्रासह तक्रार नोंदवावी असे स्पष्ट केले. त्यानुसार मा.आयुक्तांचे आदेशासह दि.७/१२/२०१० रोजी पोलिस निरिक्षक, पोलिस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद येथे लेखी पत्र दिले. सदर पत्रचे अनुषंगाने संबंधित पोलिस निरिक्षक यांचे सुचनेनुसार मूळ कागदपत्रे संचिकेसह सादर करावे व सदर बाब ज्या विभागाचे संबंधित आहे त्या विभागाकडून गुन्हा नोंदविण्यातयावा असे सूचित केल्यावरून मा.जिल्हाधिकारी यांना पत्र क्र.मनपा/नरिव/ससंनर/उप-३/२०१०/९७८ दि.७/१२/२०१० अन्वये विनंती करण्यात आलेली आहे. त्यामुळे बिगर शेती परवानगी रद्य करणे व संबंधिताविरूध्द गुन्हा दाखल करणे या दोन्ही बाबत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत काय कार्यवाही करण्यात आली, याची माहिती स्वतंत्रपणे घेणे उचित ठरले.

नगर रचना विभागाचे वरील कार्यवाही व्यतिरिक्त वादग्रस्त क्षेत्रावरील अनधिकृत विकास केल्यावरून फौजदारी कार्यवाही करणेबाबत प्रशासकीय अधिकारी यांनी इमारत निरिक्षक यांना एफ.आय.आर.दाखल करणेबाबत दि.७/१२/२०१० रोजी आदेशित केल्याचे दिसून येते. त्यानुसार श्री.शेख कादर शेख अहेमद, पोलिस निरिक्षक पोलिस स्टेशन बेगमपुरा यांना दि.८/१२/२०१० अन्वये श्री.सांडू दुबे, श्री.कादरी अन्वर अहमद हे मो.हर्सुल हिमायतनगर येथील खामनदीला लागून पूर्वेस स.नं. १९/१ जमिनीवर नाविकास क्षेत्र (No Development Zone) असतानाही महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृत रेखांकन (प्लॉटींग) तयार करून विक्री करीत आहेत व बांधकाम करण्याचा प्रयत्न करीत असल्याने महाराष्ट्र प्राधिकरण नगर रचना अधिनियम -१९६६ चे कलम ५२ नुसार फिर्याद नोंदविण्यात यावी असा अर्ज दिल्याचे दिसून येते. सदर अर्जावर पोलिस ठाणे अंमलदार, पोलिस स्टेशन बेगमपुरा औरंगाबाद (शहर) यांची दि.८/१२/२०१० दिनांकित स्वाक्षरी असल्याचे दिसून येते.

संबंधित इमारत निरिक्षक श्री.शेख कादर यांनी दि.९/१२/२०१० रोजी जागेची पाहणी करून व संबंधितांनी मालकी हक्काची कागदपत्रे सादर न केल्याबाबत तसेच लावलेली जी.आय.पोल न काढलेबाबत संचिकेत नमूद आहे. त्यावर प्रशासकीय अधिकारी यांनी

स.सदस्यांचा पाठपुरावा चालू असून तात्काळ शेड काढण्याची कार्यवाही करावी असे नमूद केले आहे. त्यानुसार दि.९/१२/२०१० रोजी श्री.शेख कादर, इमारत निरिक्षक यांनी अनधिकृत शेड बांधकामासाठी उभे केलेले १२ लोखंडी पाईप सोबत २ मोठे पत्रे व १ अर्धा जूना पत्रा अतिक्रमण हटाव पथकामार्फत कार्यालयात जमा केल्याचा अहवाल प्राप्त आहे. यावर प्रशासकीय अधिकारी यांनी मा.सभापती व मा.आयुक्त यांना अहवाल सादर केल्याचे दिसून आलेले नाही. या व्यतिरिक्त संचिकेत काही माहिती उपलब्ध नाही.

सदरील प्रकरणातील स.नं.१९/१, हिमायतनगर या जागेच्या मालकी हक्काबाबत सविस्तर माहिती दि.१५/१२/२०१० रोजी तहसिल कार्यालय, औरंगाबाद येथील तलाटी व अभिलेख कक्ष यांचेकडून घेतली असता, सन १९५९ ते आजपर्यंतच्या नोंदीनुसार यामध्ये क्षेत्र ४ हेक्टर २ आर एवढे आहे. सातबा-यावर एकूण ११ खाजगी व्यक्तिंच्या नावाची नोंद आहे.

सदरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यावर संपुर्णतः सन १९५९ पासून खाजगी व्यक्तिंची कब्जेदार म्हणून नोंद असल्याचे दिसून येते व त्यावर कोठेही सदरील क्षेत्र तत्कालिन नगर परिषद अथवा विद्यमान महानगरपालिकेच्या नावाचा उल्लेख दिसून येत नाही. (सूलभ संदर्भासाठी नमूना नं. सातबा-याच्या फोटोप्रती सोबत जोडल्या आहेत.)

सदर संपूर्ण प्रकरणाची छाननी केली असता दिसून आलेली परिस्थिती वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेचा विचार करता यामध्ये प्राप्त इ ाालेल्या तक्रारी व त्यावर विभागातर्फे करण्यात आलेली कार्यवाही याचाही विचार करता प्रामुख्याने दोन विभागांनी या प्रकरणाची हाताळणी केलेली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे मत नोंदविण्यात येत आहे.

## १) **प्रशासकीय विभाग :**

संबंधित क्षेत्रावरील अनधिकृत विकासाबाबत प्राप्त तक्रारीनुसार वेळोवेळी प्रशासकीय विभागाने कार्यवाही केल्याचे दिसून येते. तथापि, अशा स्वरूपाच्या अनधिकृत विकासाला पायबंद घालण्यासाठी प्रशासकीय विभागाने दि.८/१२/२०१० रोजी दाखल केलेल्या फिर्यादीचा पाठपुरावा करून गुन्हा दाखल करणे आवश्यक होते. तथापि गुन्हा दाखल झालेला नाही ही बाब वरिष्ठ स्तरावर निदर्शनास आणून देणे आवश्यक होते.

## २) **नगर रचना विभाग :**

सकृतदर्शनी नगर रचना विभागाने त्यांच्या विभागाची जबाबदारी योग्य रितीने पार पाडल्याचे दिसून येते. तथापि, अकृषि परवानगी अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना पाठविलेल्या पत्रानुसार आवश्यक कार्यवाही होण्यासाठी योग्य तो पाठपुरावा केला जाणे आवश्यक आहे. जेणेकरून भविष्यात अशा स्वरूपाची प्रकरणे उद्‌भवणार नाही, याची दक्षता घेता येईल व यातून योग्य तो संदश जनसामान्यांपर्यंत जाईल असे समितीचे मत आहे.

**निष्कर्ष :**

१. उपलब्ध अभिलेख्यांचा विचार करता सदरचे क्षेत्र महानगरपालिकेच्या मालकीचे नाही.

२. सदरचे क्षेत्र मंजूर विकास आराखड्यानुसार नाविकास क्षेत्रात (No Development Zone) मोडते.

३. सदर ठिकाणी होणारा अनधिकृत विकास रोखण्यासाठी गुन्हा दाखल होणे आवश्यक आहे.

४. खोट्या कागदपत्रांच्या आधारे अकृषि ना हरकत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त करणा-यावरही गुन्हा दाखल होणे आवश्यक वाटते, त्याकरीता मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

# जकात विभागाचे लेखापरीक्षणाबाबत प्राथमिक अहवाल

महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या मुख्य स्त्रोतापैकी एक म्हणजे जकात कर. जकात कराच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून महानगरपालिका प्रशासनाने वेळोवेळी प्रयत्न केले. त्यातूनच जर जकात वसूली खाजगी अभिकर्त्यामार्फत केल्यास निश्चितच उत्पन्नात वाढ होईल ही बाब समोर आली. त्यासाठी जकात ठेका निविदा प्रसिध्द करण्यता आल्या. प्राप्त निविदापैकी मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.यांची दि.१/३/२००६ ते २८/२/२००७ या कालावधीसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेनुसार “ खाजगी अभिकर्ता ” म्हणून जकात वसूलीचे कामासाठी नियुक्ती करण्यता आली.

तद्नंतर दि.१/३/२००७ ते २९/२/२००८ या कालावधीसाठी जकात वसुली ठेका निविदा मागविण्यात आल्या. यामध्ये मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.यांचे सोबत जकात वसुली करण्याचा व त्यांना “ खाजगी अभिकर्ता ” म्हणून नेमणूक करण्याचा करार मा.स्थायी समितीच्या मान्यतेने करण्यात आला.

त्यानंतर दि.१९/११/२००८ ते २८/२/२००९ या कालावधीसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. यांची जकात संकलन अभिकर्ता म्हणून नियुक्ती देण्यात आली.

याच पध्दतीने दि.१/३/२००९ ते २८/२/२०१० या कालावधीसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.यांची जकात संकलन अभिकर्ता म्हणून नियुक्ती देण्यात आली.

त्यानंतर दि.१/७/२०१० ते ३०/६/२०११ पर्यंतच्या कालावधीसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मे.सहकार ग्लोबल प्रा.लि.या एजन्सीची जकात संकलन अभिकर्ता म्हणून नेमणूक करण्यात आली.

साधारणपणे रू.१११.०६ कोटीचा ठेका पुढे सन २०१०-२०११ मध्ये रू.१३८.०० कोटीस खाजगी अभिकर्त्यास देण्यात आला. महानगरपालिकेच्या उत्पन्नात त्यामुळे नैसर्गिक १०% वाढीप्रमाणे वाढ होत गेलेली आहे.

जकात वसुली खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यात येत आहे. यामध्ये काही अनियमितता निदर्शनास येत आहेत. व्यापारी तसेच नागरिकांच्या तक्रारी प्राप्त आहेत. करिता जेंव्हापासून जकात वसूलीसाठी खाजगी अभिकर्त्याची नियुक्ती केली तेंव्हापासून करारनाम्यातील नियम, अटी व शर्तीनुसार जकात वसुली केली किंवा कसे ? कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी, विमा, इत्यादी बाबींची पुर्तता केली किंवा कसे ? महानगरपालिका फंडात वेळोवेळी योग्य पध्दतीने रक्कम जमा केली का ? इत्यादी बाबींच्या अनुषंगाने लेखापरीक्षण करण्याबाबत मा.महापौर यांनी त्यांचे पत्र क्र. मनपा/महापौर/२०१०/२४८ दि.२८/७/२०१० अन्वये लेखापरीक्षण विभागास पत्र दिले.

मा.महापौर यांचे आदेशानुसार लेखा परीक्षण विभागाने जकात अधिक्षक यांना लेखा परिक्षणांसाठी अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबतदि.४/८/२०१० रोजी पत्र देण्यात आले. तसेच लेखापरीक्षण करण्यासाठी पथक स्थापन करून पथकास लेखापरीक्षण करण्याचे आदेश निर्गमीत करण्यात आले.

लेखापरीक्षण पथकातील कर्मचारी मा.जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूकीच्या कामी प्रतिनियुक्तीवर गेलेले असल्यामुळे जकात विभागाचे लेखापरीक्षण करता आले नाही.

तथापि मा.महापौर यांनी आदेशित केल्याप्रमाणे जकात विभागातील खाजगी अभिकर्त्यामार्फत करण्यात येत असलेल्या जकात वसुलीचे कामाची प्राथमिक पाहणी दि.२१/१०/२०१० रोजी करण्यात आली असून खालील प्रमाणे प्राथमिक गोष्टी लक्षात आल्या.

जकात वसुलीच्या पावत्या तपासल्या असतांना जकात नियम -१२ प्रमाणे आयात मालाचे मुल्यांकनानुसार वसुली केल्याचे दिसून आले त्याचा तक्ता पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | वाहन क्रमांक | मालाचे वर्णन | डागाची संख्या | बिजक क्र. | सादर केलेल्या देयकाची रक्कम | मनपाने केलेले मुल्यांकन | वस्तुचे दर | जकात रक्कम रूपये | पावती क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एम.एच.२० एए- ६७९१ | कपडा | १ | ३८९ | ३०७१५ | ३१०८३ | २% | ६२२ | ०४२२७४९ २१/१०/१० |
| २ | एच.आर.-५५ ८७६९ | कपडा | १ | ०३७७४३ | १३१२० | १३३५८ | २% | २६७ | ०४२१०५३ २१/१०/१० |
| ३ | एच.आर.-५५ ८७६९ | ड्रायफ्रुट | ६ | ३३३१ | ३५४५८ | ८४००० | २% | १६८० | ०४२१०७६ २१/१०/१० |
| ४ | एम.एच.२० डब्ल्यू-९१५६ | बेअरींग | ५ | ००१७० | ११४९३ | ११४८३८ | २.५% | २८७१ | ०४२४९०३ २१/१०/१० |
| ५ | एच.आर.-५५ ८७६९ | ड्रायफ्रुट | ३ | ३३३३ | २४०३० | ५५००० | २% | ११०० | ०४२१०७५ २१/१०/१० |
| ६ | एच.आर.-५५ ८७६९ | ॲटोपार्ट | १ | ६१६६ | १८२०१ | १८३५४ | २.५% | ४५९ | ०४२१०५० २१/१०/१० |
| ७ | एच.आर.-५५ ८७६९ | सायकल पार्ट | ५ | ०३ | ७९२० | २५००० | २% | ५०० | ०४२१०५२ २१/१०/१० |
| ८ | एम.एच.२० डब्ल्यु- ६७९१ | कपडा | १ | | ७०५०० | ७१५०० | २% | १४३० | ०४२२७४३ २१/१०/१० |

तसेच मनपाने ठरवून दिलेल्या वस्तुच्या दराप्रमाणे कंत्राटदारातर्फे नेमण्यात आलेल्या कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी बाबत खाजगी अभिकर्त्याने स्वत: जबाबदारी स्विकारली असून नियमित रक्कम भरणा केल्याचे कळविले आहे.

खाजगी अभिकर्त्यामार्फत वेळोवेळी ठरलेल्या वारास रकमा मनपा फंडात जमा केल्याचे समजले.

## निष्कर्ष व अभिप्राय :-

१) जकात संकलन अभिकर्ता म्हणून मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.यांचेतर्फे करण्यात येत असलेली जकात कराची वसुली, जकात दर सुची व जकात नियम क्र.१२ च्या अनुषंगाने अनुषंगीक प्रसंगी आयात मालाचे मुल्यांकन करून करण्यता येत असून ती योग्य वाटते.

२) मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. यांचेमार्फत जकात नाक्यावर नियुक्त कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी रक्कम जमा करण्याची जबाबदारी संस्थने स्विकारली असून करारनाम्यातील अटी-शर्ती प्रमाणे कार्यवाही होत असल्याचे दिसून येते.

३) खाजगी अभिकर्त्यामार्फत ठरलेली जकात कर ठेक्याची रक्कम वेळोवेळी महानगरपालिका फंडात जमा होत असल्याचे जकात विभागाने दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होते.

**(विलास जाधव)**
मुख्य लेखापरीक्षक
महानगरपालिका,औरंगाबाद.

ठिकाण **: महानगरपालिका, औरंगाबाद.**

दिनांक : / /२०११

(कार्यालयीन उपयोगासाठी)

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

(मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये)

मुख्य लेखा परीक्षक यांचा लेखा परीक्षण अहवाल

वार्षिक अहवाल

सन २००९-२०१०

व

सन २०१०-२०११

# : : अ नु क्र म णि का : :

## लेखा परीक्षण अहवाल: सन २००९-१० व सन २०१०-११

मुख्य लेखा परीक्षक यांचे लेखा परीक्षणाबाबत निवेदन: **(पृ.क्र. १ ते २ )**

**भाग – १**

(अ) **विभागनिहाय लेखा परीक्षण तपशिल**:

| अ.क्र. | विभागाचे नांव | लेखा परीक्षणाअंतर्गत कालावधी | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ०१ | प्रशासकीय विभाग | सन २००३-०४ ते सन २००७-०८ | ०३ ते ०७ |
| ०२ | जायकवाडी स्थापत्य विभाग | सन २००६-०७ ते सन २००९-१० | ०८ ते १३ |
| ०३ | कर आकारणी १ व २ विभाग | सन २००३-०४ ते सन २००८-०९ | १४ ते १७ |
| ०४ | नगरसचिव विभाग | सन २००३-०४ ते सन २००८-०९ | १८ ते २० |
| ०५ | अभिलेख कक्ष विभाग | सन २००५-०६ ते सन २००८-०९ | २१ ते २२ |
| ०६ | अग्निशमन विभाग | सन २००५-०६ ते सन २००८-०९ | २३ ते ५४ |
| ०७ | विधी विभाग | सन २००५-०६ ते सन २००८-०९ | ५५ ते ७३ |
| ०८ | सिध्दार्थ जलतरण विभाग | सन २००२-०३ ते सन २००७-०८ | ७४ ते ९८ |
| ०९ | वॉर्ड - ड विभाग | सन २००५-०६ ते सन २००८-०९ | ९९ ते ११८ |
| १० | वॉर्ड -फ विभाग | सन २००६-०७ ते सन २००८-०९ | ११९ ते १३२ |
| ११ | लेखा विभाग | सन २००९-१० ते सन २०१०-११ | १३३ ते १६२ |

| | | | |
|---|---|---|---|
| **भाग – २** | | | |
| **ब )** | **विशेष तपासणी / लेखा परीक्षण तपशील:** | | **१६३** |
| १ | डॉ.चोबे हॉस्पिटल ते देवगिरी कॉलनी मधील ड्रेनेज संदर्भाने चौकशी अहवाल. | | १६४ |
| २ | डॉ.दिनकर देशपांडे यांच्या विरूध्दच्या खरेदी प्रकरणातील चौकशी अहवाल | | १६६ ते १७१ |
| ३ | आर.सी.एच.नियुक्त्यांबाबत चौकशी अहवाल. | | १७२ ते १९४ |
| ४ | पावर बकेट व सिव्हर सेव्हींग मशिन्सचा वापर करणे बाबतचा चौकशी अहवाल. | | १९५ ते २०१ |
| ५ | ए.एम.टी. चौकशी अहवाल | | २०२ ते २१४ |
| ६ | कबाडीपुरा येथील दुकान क्र.३ भाडेतत्वावर देणेबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल. | | २१५ ते २१८ |
| ७ | कनिष्ठ लिपीक भरतीची प्राथमिक चौकशी अहवाल | | २१९ ते २२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | नाथ सुपर मार्केट येथील दुकान क्र.७ व ८ भाडेतत्वावर देणेबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल. | | २२३ ते २२७ |
| ९ | जैविक कचरा प्रकल्पातील त्रुटींबाबतचा तपासणी अहवाल. | | २२८ ते २३२ |
| १० | सिटीएस क्र.१६२९६ शहानूरवाडी येथील बेकायदेशीर बांधकाम परवानगी बाबतचा चौकशी अहवाल. | | २३३ ते २३५ |
| ११ | नगररचना विभागामार्फत आकारण्यात येणारे विकास शुल्क, व इतर दरवाढी बाबतचा चौकशी अहवाल. | | २३६ ते २३९ |
| १२ | नगररचना विभागामार्फत आकारण्यात येणा-या फी व शुल्काबाबत. | | २४० ते २४६ |
| १३ | मनपा डिझेल पंप तपासणीबाबतचा प्राथमिक अहवाल. | | २४७ ते २५० |
| १४ | सर्व शिक्षा अभियानांतर्गत साहित्य खरेदीतील व अनियमितता व नंदादीप साहित्य खरेदीतील घोटाळयाबाबतचा प्राथमिक चौकशी अहवाल. | | २५१ ते २५६ |
| १५ | शिक्षण विभागांतर्गत खरेदी केलेल्या दप्तर खरेदी बाबतचा अहवाल. | | २५७ ते २६० |
| १६ | सेल्स ॲड एजन्सी चौकशी अहवाल | | २६१ ते २६३ |
| १७ | कामगार कल्याण निधी अंतर्गत बिनव्याजी कर्जाबाबत तपासणी अहवाल. | | २६४ ते २६६ |
| १८ | होर्डिंग फी वसूलीच्या रकमेबाबत अनियमितता. | | २६७ ते २७२ |
| १९ | सर्वे नं.१९/१ हिमायतनगर हर्सूल औरंगाबाद येथील जागेबाबत प्राथमिक चौकशी अहवाल. | | २७३ ते २७७ |
| २० | जकात विभागाचे लेखापरीक्षण करणे. | | २७८ ते २८० |

(कार्यालयीन उपयोगासाठी)

# औरंगाबाद महानगरपालिका,औरंगाबाद.

(मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम १०६ (३) अन्वये)

## मुख्य लेखा परीक्षक यांचा लेखा परीक्षण अहवाल

वार्षिक अहवाल

**सन** २०१२-२०१३

व

**सन** २०१३-२०१४